म. ग्रं. सं. ठाणे.
विषय प्रवास
सं. क्र. ७३१

शरच्चंद्र गोखले

# भारताचा राजकीय परिसर



REFBK-0026392

# भारताचा राजकीय परिसर

डॉ. शरच्चंद्र गोखले

REFBK-0026392

संयुक्त प्रकाशन

केसरी-श्रीविद्या

संयुक्त प्रकाशन

✹

प्रकाशक : दामोदर दिनकर (मधुकाका) कुलकर्णी
केसरी मराठा – श्रीविद्या संयुक्त प्रकाशन
द्वारा · श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.

✹

© डॉ. शरच्चंद्र गोखले
विश्वस्त–संपादक केसरी, ५६८ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.

✹

प्रकाशनकाल · प्रथमावृत्ती
२२ जानेवारी १९९१

✹

मुखपृष्ठ . कमल शेडगे

✹

मूल्य . पन्नास रुपये

✹

फोटोकंपोज व मुद्रक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणे – ४११ ०३०.

✹

– माझे आंतरराष्ट्रीय स्नेही –

- श्री. वाय. एफ ह्युअी (हाँगकाँग)
- सौ. शार्लोत नूजबर्ग (अमेरिका)
- डॉ. मथिल्डा व मॅक्स ग्रूनर (जर्मनी)

यांना स्नेहपूर्वक अर्पण

– डॉ. शरच्चंद्र गोखले

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | शतकोटी लोकांचा देश - चीन | १ |
| २ | भाऊबदकीने दुभगलेला देश श्रीलका | २५ |
| ३ | सदाबहार तरुणाचा देश - थायलड | ४३ |
| ४ | बदललेला पाकिस्तान | ५९ |
| ५ | सुजलाम् सुफलाम् बांगला देश | ६९ |
| ६ | हिमालयाच्या छायेतील नेपाळ | ७७ |
| ७ | कानी कुंडल मोतीहार - इंडोनेशिया | ८७ |
| ८ | सुगधी बदराचे भवितव्य - हॉंगकॉंग | ९५ |
| ९ | एकांतवासातला ब्रह्मदेश | १०५ |
| १० | प्रशात महासागराच्या परिसरात - वेस्टर्न सामोवा | ११३ |
| ११ | झाकलेली अस्पृश्यता - जपान | १२३ |
| १२ | राजकीय परिसर आणि संरक्षण विचार | १३५ |

# प्रस्तावना

आशिया व प्रशात महासागर विभागाच्या समाजविकासविषयक विभागाचा प्रमुख म्हणून आतरराष्ट्रीय समाज कल्याण संघटनेत व सल्लागार म्हणून सयुक्त राष्ट्रसघात बरीच वर्षे काम करीत असताना या भागातील पचेचाळीस देशातील नेते, त्याचे धोरण समजावून घेता आले त्या देशातील विकासाचे कार्यक्रम जवळून पाहायला मिळाले काही देशांत सल्लागार म्हणून काम केल्यामुळे तेथील ज्येष्ठ नेत्याशी परिचय, स्नेह जमला यामुळे घरात केव्हाहि स्वागत होईल अशी जवळीक साधली गेली यातील अनेक मडळी आमच्या घरी येत-जात असत. सहज बोलता बोलता त्या देशाची सस्कृति, तत्त्वज्ञान, ईश्वरविषयक कल्पना, समाजरचना, कुटुबपद्धती, ग्रामीण विकास, देशापुढचे आर्थिक, सामाजिक, आणि राजकीय प्रश्न याची ओळख होई. देशातल्या नेतृत्वाच्या स्तरावरील व्यक्तींशी मन मोकळे बोलणे झाल्यामुळे थोड्या अवधीतसुद्धा त्या त्या देशाची चांगली ओळख होई काही देशात सल्लागार म्हणून राहिल्यामुळे, प्रत्यक्ष कार्यानुभवातून प्रश्न समजावून घेता आले उत्तरे शोधायला मदत करता आली

या कामात आतर्राष्ट्रीय धोरणाचा भाग अगदी वेगळा आणि प्रत्यक्ष कामाचा भाग वेगळा त्यात सुसगति राखणे आवश्यक ही दोन्ही सूत्रे सतत मनात ठेवून काम करावे लागे प्रत्येक देशात ग्रामीण भागात जाऊन तेथील खेडी, तेथील समाज जवळून न्याहाळण्याची सधी मी घेत असे. एकदा एका मित्राबरोबर दक्षिण कोरियात एका खेड्यात गेलो. कोरिया हा झपाट्याने औद्योगिकरण झालेला देश आहे. या खेड्यात राहणारी माझ्या मित्राची आई म्हणाली, "आता चागल्या नोकऱ्या मिळतात मुली सुना शिकतात, पैसे मिळवतात, पण मला काळजी आहे या मुलींना 'किमची' (कोरियन लोणचे) करायला येत नाही मग पैसे मिळवून काय उपयोग?" सर्व देशातल्या सासू, आजीबाया याची काळजी एकाच तऱ्हेची आहे मुबईच्या रस्त्यावर बसणारा एक अपग भिकारी माझा मित्र झाला होता एकदा 'मानवी मूलभूत हक्क' या विषयीच्या परिषदेला मी न्यूयॉर्कला चाललो होतो. तो म्हणाला, 'ही सभा काय ठरवणार?' मी त्याला भाकरी, रोजगार, डोक्यावर छप्पर, अशा सोप्या तऱ्हेने मूलभूत हक्काची सनद समजावून सागितली दहा दिवसानी परत आल्यावर तो घाई घाईने खुरडत खुरडत आला म्हणाला, "सभा झाली का? आता उद्यापासून मला घरदार, रोजगार मिळणार का?" आतरराष्ट्रीय स्तरावरचे यूनोचे ठराव आणि रोजच्या जीवनातला सघर्ष यातील दारुण अतर, आणि

विकासाच्या नियोजनासाठी त्याची सागड घालायची जरुरी अगदी मनात भिनली म्हणूनच आंतर्राष्ट्रीय धोरणाचा विचार करत असतानाच, प्रत्यक्ष क्षेत्रात कार्य करीत राहयला हवे नाहीतर जमिनीवरचे पाय नकळत सुटतात म्हणून भारतात अपगाचे पुनर्वसन, कुष्ठनिवारण, निराधार मुलाचे प्रतिपालन, वृद्धाचे प्रश्न या क्षेत्रात मी काम करीत राहिलो. शब्दबबाळ आतर्राष्ट्रीय धोरणे, ठराव आणि जाहीरनामे याना माणुसकीचा ओलावा, त्या त्या देशातील मातीचा गध नसेल तर ती धोरणे केवळ कागदी सदिच्छा उरतात म्हणून मी देशादेशात, खेड्यापाड्यात जाऊन हे प्रकल्प आणि त्यांची माणुसकीशी असलेली बाधिलकी मी शोधत राहिलो यातून त्या त्या देशाविषयी एक नेमके चित्र मनात उभे राहिले

माझे मित्र श्री जयंतराव टिळक आणि श्री माधवराव गडकरी याच्या आग्रहावरून या देशोदेशींच्या भटकतीविषयी मी 'केसरी' आणि 'लोकसत्ता' याच्या रविवारच्या अकातून वेळोवेळी लिहिले (त्या वेळी मी केसरीचा सपादक नव्हतो) हे सारे लेखन त्या काळाचे, वेळेचे प्रतिबिंब आहे माझ्या वैयक्तिक दृष्टिकोणामुळे कदाचित त्यात एखाद्या सामाजिक विषयावर अधिक भर दिला गेला असेल कदाचित त्रुटिसुद्धा असतील, पण शक्यतोवर हे लेखन वस्तुनिष्ठ आणि एका सामाजिक प्रश्नाच्या अभ्यासकाच्या दृष्टीने लिहिले गेले आहे वृत्तपत्रीय लेखनामुळे शब्दसख्येवर मर्यादा तर होतीच, पण फार जड किंवा तपशीलवार चर्चा टाळायची होती मला सौंदर्याची ओढ फार त्यामुळे प्रत्येक देशातला निसर्ग मला लोभावून गेला त्याच्या खालोखाल तेथील माणुसकीच्या दर्शनाने मी भारावलो गेलो त्याचे चित्रण या लेखनात आहे

या साऱ्यातून भारताच्या राजकीय परिसराचे जे दर्शन झाले त्यातून आंतर्राष्ट्रीय राजकीय, सामाजिक आणि सरक्षणविषयक सदर्भ आपोआप उलगडत गेले हे लेखन ललित आणि वृत्तपत्रीय असल्याने कालनिबद्ध आणि डोळ्यापुढे तत्कालिन राजकीय पट उभा करणारे आहे वृत्तपत्रीय लेखनाचे ते सामर्थ्यहि आहे आणि ती मर्यादाहि आहे आपल्यालाहि ते आवडेल ही आशा आहे.

पुस्तकाच्या वितरणाची जबाबदारी घेणारे मित्र सर्वश्री मधुकाका कुलकर्णी, सपादनात मदत करणारे प्रसन्नकुमार अकलूजकर, आल्हाद गोडबोले, मुद्रणातील विजय गोखले, आठवले, ब्रह्मे, सातफळे, पुरोहित, विजय बारभाई, सौ बापट आणि मुखपृष्ठाकार कमल शेडगे याचे, तसेच 'केसरी'च्या प्रकाशन विभागाचे एरडे याचे मन:पूर्वक आभार!

– शरच्चंद्र गोखले

# शतकोटी लोकांचा देश

# चीन

चीनला जाण्याचे ठरले त्या वेळी मनात अनेक शंका, अनेक प्रश्न होते. चार वेळा चीनला जाऊन आल्यानंतर सर्व शकांचे निराकरण झाले आहे असे नाही. पण शतकोटी लोक ज्यात राहतात, ज्या देशाची सरहद्द १५ देशांना भिडली आहे, ज्या देशात ५१ अल्पसख्य वांशिक गट राहतात, त्या देशाची प्रगति पाहून मी स्तिमित झालो आहे यात शका नाही. लहानपणी चीन म्हटला म्हणजे, सरजामशाहीच्या जोखडाला बाधलेली माणसे, गुलामगिरीत राहणाऱ्या स्त्रिया, रेशमी कापड, अफूचा व्यापार आणि ८००० (आठ हजार) किलोमीटर्सच्या लांबीची व ज्यावरून एका वेळी दोन गाड्या जातील अशा रुदीची, या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरलेली, अस्ताव्यस्त बलाढ्य भिंत असेच चित्र नजरेसमोर येई. चिनी सरकारचे अपंग पुनर्वसन आणि कुष्ठकार्य पहायला या, असे आग्रहाचे निमत्रण आले, त्या वेळी या बलाढ्य भिंतीच्या पलीकडे जग कसे आहे, कसे बदलते आहे या उत्सुक अपेक्षेने मी ते स्वीकाराले.

बीजिंग (पेकिंग नव्हे) विमानतळावर उतरल्यावर कम्युनिस्ट देशातली नाकेबदी वेगळी असेल असे वाटले होते. पण हसतमुख चेहरे आणि प्रसन्न स्वागत याने जरा बरे वाटू लागले बीजिंग शहराकडे जाताना मनात मात्र एक विचार येत राहिला की, "बॉबे"ची मुबई करायला आमच्याकडे कोण खळखळ केली जाते. पण राष्ट्रीय परपरा जपण्याकरता पेकिंगचे बीजिंग, नानकिंगचे नानजिंग आणि कॅंटानचे 'चुग्वो' सहजपणाने केले जाते. विमानतळ शहरापासून अर्ध्या तासाच्या अंतरावर आहे. पण रस्त्याच्या दुतर्फा झाडांच्या दहादहा रांगा लावलेल्या आहेत बीजिंग शहरात वारा फार. धूळ फार उडते हिरवा पट्टा नष्ट झालेला म्हणून पक्षप्रमुख' (एका अर्थाने राष्ट्रपती) तग किंवा दग शिया पिंग (डेंग झिया नव्हे) यानी सुदर मुबई, हरित मुंबईप्रमाणे फक्त पोस्टर्स न लावता बीजिंगला हिरव्या वनराजीचा विळखा घालण्याचे ठरवले बलाढ्य भिंतीप्रमाणे हिरवी भिंत उभारा अशी घोषणा प्रत्यक्ष कार्यवाहीत

आणली गेली. त्यामुळे आज वसंताच्या आगमनाबरोबर प्रसन्नपणे फुललेले पाइनचे वृक्ष, गुलमोहोर, सूचीपर्ण दिसत आहेत. नानजिंग शहरात तर प्रत्येक रस्त्यावर एकाच जातीची झाडे दुतर्फा लावली आहेत त्यामुळे एका रस्त्याला अशोक तर दुसऱ्या रस्त्याला पिंपळ यांनी हातांची मिळवणी करून कमानी उभारल्या आहेत काही रस्त्यांना तर चक्क झाडाचीच नावे दिलेली आहेत. झाडांच्याबद्दल जरा जास्तच कोवळिक या देशात दिसली. संस्था, कार्यालये, सगळीकडे झाडाची काळजी हा एक सहज घडणारा भाग, आणि आपण लावलेल्या झाडांचा अभिमान स्पष्ट दिसला

## बीजिंग : सायकलींचे शहर

बीजिंगला आत शिरताच दिसल्या त्या सायकली ! एकेकाळी पुण्याला सायकलचे शहर मानले जात असे पण बीजिंग त्याच्यावर ताण आहे. हजारो माणसे दुचाकीवरून कामाला जातात, येतात, ७० टक्के वाहतूक दुचाकीवर होते त्याच्या खालोखाल बसेस, त्यामानाने मोटारी फार थोड्या सरकारी मंत्री, परदेशी पाहुणे, विशिष्ट व्यक्ति याकरता, त्यामुळे मोटारीतून जाताना आपणच वेगळे पडल्यासारखे वाटते. एकेकाळी चिनी शिष्टमंडळे त्याच्या चिनी भाषेच्या आग्रहाकरता आणि काळपट, उदास कपडे घालण्याकरता प्रसिद्ध होती आता मात्र शेकडो तरुण-तरुणी रंगीत कपडे घालायला लागलेली आहेत. मुलींच्या चेहऱ्यावर रंगभूषा थोडीफार दिसू लागली आहे. शहरात, खेड्यात मुले, मुली खांद्याला खांदा लावून कारखान्यात, शेतात काम करतात. बसेस चालवतात, त्यामुळे त्यांच्या वागण्यात एक प्रकारचा नवाच मोकळेपणा दिसतो

''हॉटेल बीजिंग'' हे एक सर्वात जुने हॉटेल. हा भाग सर्वात जुना मुंबईच्या जुन्या ताजमहाल हॉटेलप्रमाणे चीनचा इतिहास ह्या हॉटेलच्या बांधकामात प्रतिबिंबित झाला आहे चीन आणि रशिया यांचे प्रेम ज्या वेळी ओसंडून जात होते त्या काळात रशियन वास्तुशास्त्रज्ञ आणि स्थपति यांनी हा भाग बांधला. प्रचंड उंच खांब, त्यावर तोललेले उंच मजले, प्रचंड पायऱ्या, दोन जाड समांतर भिंती व त्यावर उंच खिडक्या अगदी 'मॉस्कोव्हा'ची आठवण करून देणारी मधला कक्ष खास चिनी पारंपरिक शैलीतला आणि पूर्व कक्ष हा खास युरोपीय व अमेरिकन पंचताराकित हॉटेलसारखा रशियाच्या सरहद्दीवर चीनचे भांडण सुरू झाल्यापासून रशियन माणसे येणे कमी झाले आहे. पण व्यापार, तंत्रविद्या आणि आंतरराष्ट्रीय संबंध वाढल्यामुळे अनेक अमेरिकन प्रवासी आणि युरोपीय व्यापारी दिसतात या ''बांबूच्या पडद्याचे'' दार जरा मोकळे झाले आहे असे आता वाटते थोडेफार भारतीय, आंतरराष्ट्रीय संस्थातील वा भारत सरकारातील, क्वचित व्यापारातील येतात पण एकूण भारतीय चेहरा दुर्मिळच म्हणायचा आपले राजदूत श्री मेनन मला म्हणाले की, १०० कोटी लोकसंख्येच्या या देशात फक्त चोवीस भारतीय आहेत अर्थात दूतावास सोडून यात दहाबारा विद्यार्थी बीजिंग विद्यापीठात आहेत काही आंतरराष्ट्रीय संघटनांत बीजिंग बाहेर फारसे कोणी नाही. सांस्कृतिक क्रांतीच्या आधी श्री व सौ शर्मा हे एक

आपल्याकडील साम्यवादी जोडपे आले पण त्याचे त्या वेळी जप्त केलेले पासपोर्ट त्याना आताच चिनी शासनाकडून परत मिळाले आहेत ही माहिती मिळाल्यावर माझे भारतीय वेगळेपण मला आणखीच जाणवू लागले

येथे भाषा हा मात्र बराच अडचणीचा भाग आहे सर्व माणसे मुख्यत· चिनी – खरे म्हणजे 'मँडेरिन' बोलतात चिनी भाषेचे अनेक प्रकार राज्याराज्यातून आहेत पण सर्वांची लिपी मात्र एक आहे ती म्हणजे चित्रलिपी वैशिष्ट्य म्हणजे हीच लिपी जपान आणि कोरियन लोक वापरतात त्यामुळे एकमेकाना अक्षरे कळतात, पण भाषा वेगळी त्यामुळे अर्थ मात्र उमगत नाही इग्रजी, फ्रेंच फारसे कोणी बोलत नाही पण त्याबद्दल न्यूनगड तर नाहीच उलट याना चीन समजावून घ्यायचा असेल तर त्यानी चिनी का न शिकावे असा प्रश्न आहे. पण त्यामुळे आता 'दुभाषी' हा नवाच व्यवसाय मान्यता पावला आहे लोकसख्या मात्र लोंढ्यांनी वाहताना दिसते

## सांस्कृतिक क्रांति

चीनमध्ये नेमके काय घडते आहे याविषयी साऱ्या जगालाच उत्सुकता आहे रशिया आणि चीन दोघेही साम्यवादी, पण त्यांच्यातला सीमातंटा गेली १५ वर्षे इतका धुमसत आहे की दोन्ही राष्ट्रांची तोंडे दोन दिशेला आहेत असे वाटावे भारतासबंधाबाबत म्हणायचे तर हिंदी चिनी भाईभाईपासून, सरहद्दीवरच्या युद्धापर्यंत सबध ताणले गेले तरी दोघानाही एकमेकाना वगळून आशियाचा, पर्यायाने जगाचा विचार करताच येणार नाही याची जाणीव झालेली आहे १९९७ साली हॉंगकॉंग हा चीनचा भाग त्याच्या ताब्यात येणार. त्या भागातली भांडवलशाही अर्थरचना, नफा आणि खासगी मालकी यावर आधारलेली श्रीमंत समाजरचना आणि निर्यातीच्या पायावर उभी राहिलेली बाजारपेठ या साऱ्यांचा परिणाम चीनवर काय होणार आणि चीनच्या साम्यवादी चौकटीचा हॉंगकॉंगवर काय परिणाम होणार हा एक यक्षप्रश्नच आहे एक प्रयोग म्हणून 'शेनझेन'सारख्या शहरातून निर्यात वाढवणारे धंदे उभारायचे म्हणून ११ शहरांचा एक निर्यातपट्टा किंवा इकॉनॉमिक झोन निर्माण केला यातून परदेशी भांडवल आकर्षित करता येईल, चिनी कामगारांना नवे तंत्रज्ञान व व्यवस्थापनेचे कौशल्य मिळेल, निर्यातीतून परदेशी चलन मिळेल, असे चीनला वाटते हेच मधाचे बोट लावून 'तैवान'ला चीनमध्ये काही उभयमान्य अटीवर सामील व्हायला प्रवृत्त करावे असाहि एक रोख आहे पण आजवर तरी तैवानचा मासा या गळाला लागलेला नाही.

चीनमध्ये 'सास्कृतिक क्रांती'च्या नावाने जी प्रचंड उलथापालथ झाली, तिचा रग दाट गर्दलाल साम्यवादी होता शेती, कारखानदारी सारे समाजाच्या मालकीचे. खासगी मालमत्ता नाही नफाखोरी नाही, सस्कृतीच्या नावाखाली बुद्धिवाद, कला, साहित्यावर त्या काळात नाकेबदी आली अनेकांची श्रमशिबिरात पाठवणी करण्यात आली त्या काळात 'कम्यून' हा परवलीचा शब्द होता प्रतिक्रांतिवादी ही टोपी कोणाच्याही डोक्यावर बसली की तो समाजातून उठायचाच या पार्श्वभूमीवर आज जे चीनमध्ये घडते आहे ते एका

अर्थाने अकल्पित, परंपरेच्या सर्वस्वी विरुद्ध आहे. त्यामुळे कट्टर कम्युनिस्टांना हा नवा आर्थिक प्रयोग फसावा असेच मनोमन वाटत असावे आज शेती, कारखानदारी सरकारच्या मालकीची असली तरी आता खासगी कुटुंबांना शेतजमीन खडाने (लीज) मिळू शकते. जमिनीचा खड किंवा भाडे विशिष्ट पायली धान्याच्या रूपाने द्यावे लागते ते दिल्यानंतर तो शेतकरी आपल्याला वाटेल ते पिकवू शकतो. मोकळ्या बाजारात योग्य किमतीला धान्य विकू शकतो. अर्थातच किमतीवर शासनाचे कठोर नियंत्रण आहे शेतकरी आता शेतीची अवजारे, ट्रॅक्टर्स विकत घेऊ शकतो स्वत:चे घर बांधू शकतो सांस्कृतिक क्रातीच्या काळात शेतकऱ्यांना बराकीत राहून सार्वजनिक स्वयपाकघरात किंवा लगरमध्ये जेवावे लागे आता मिळालेल्या या आर्थिक स्वातंत्र्यामुळे १९७८ पासून दरवर्षी अन्नोत्पादन ८ टक्के वाढत चालले आहे चिनी लोकाना अधिक प्रकार खायला मिळतात. शेतीच्या विकासाबरोबर शेतमालाची दुकाने निघू लागली राजरस्त्यावर खाणावळी उभ्या राहिल्या शिंपी, सुताराची दुकाने, रेस्टॉरटस् निघाली त्यामागोमाग दूरदर्शन, कापडे धुवायची यंत्रे आली पूर्वी १५ हून अधिक नोकर ठेवणे हा पिळवणुकीचा प्रकार मानला जात होता. आता १० दशलक्ष उद्योगधंदे नोंदले गेले आहेत. त्यात १५ दशलक्ष माणसे काम करत आहेत ८० कोटींची उलाढाल आहे सरकारी व खासगी उद्योगधंदे मिळून चीनमधील प्रत्येक माणसाला काम आहे रोजगार आहे, घर आहे, साम्यवादी चौकटीत नवे आर्थिक स्वातंत्र्य आल्याने देशाचा चेहरामोहरा झपाट्याने बदलतो आहे उद्याचे स्वरूप काय असेल हे नक्की कोणालाच सांगता येईल असे वाटत नाही पण आज या देशात झपाट्याने बदल होत आहे. बदलाला वेग आहे परतु दिशा कोणती हे अजून कळायचे आहे

## दंग शिया पिंग यांचे नेतृत्व

हे कसे घडते आहे हे समजण्यासाठी त्यामागच्या नेतृत्वाला समजावून घेतले पाहिजे. चिनी साम्यवादी पक्षाचे नेते दग शिया पिंग यांचे चिरंजीव दग पूफाग हे चीन सरकारच्या अपग पुनर्वसन विभागाचे प्रमुख त्याच्याच निमंत्रणावरून मी चीनला गेलो सांस्कृतिक क्रातीच्या वेळेला 'रेडगार्ड्स्'च्या दगलखोरीत दग पूफाग याना दुसऱ्या मजल्यावरून ढकलण्यात आले त्यात त्याचा पाठीचा मणका मोडला ते जन्मभराचे अपंग झाले आपल्या 'व्हीलचेअर'वरूनच ते सारा कारभार पाहतात देशपरदेशात हिंडतात ५० दशलक्ष डॉलर्सचा कुष्ठपुनर्वसनाचा प्रयोग, अपगाच्या पुनर्स्थापनेचा प्रयोग त्यानी सुरू केला आहे दग पूफांग हे एक जिवत आश्चर्य आहे त्यांच्याशी चर्चा करणे, त्यांचे नियोजन पाहणे हा माझ्या भेटीचा हेतु होता त्यांच्यामार्फतच त्याच्या वडिलाचा दंग शिया पिंग यांचा परिचय झाला त्यानी फार सन्मानपूर्वक माझा गौरव करून मला पुनर्वसनाचे मानचिन्ह भेट म्हणून दिले इतक्या मोठ्या अपगसख्येचे पुनर्वसन करायचे, तर त्यामागे 'राजकीय इच्छाशक्ती' हवी ती तुम्ही दिली असे म्हणताच, त्यामागचा सूचक अर्थ समजून ते म्हणाले, कोणत्याही राष्ट्रप्रमुखाचा मुलगा यासाठी अपग होण्याची गरज नाही ही

राजकीय इच्छाशक्ती, प्रश्न समजावून घेतला तरच निर्माण होऊ शकते अपगाना दया वगैरे काही नको ते उत्तम काम करू शकतात. आज चीनमध्ये स्वत:चा उद्योगधदा वा नोकरी नसलेला एकही अपंग माणूस नाही कोणत्याही कारखान्याने ३५ टक्के अपंगांना नोकऱ्या दिल्या तर त्यांना करामध्ये ५० टक्के माफी मिळते त्यांनी ५० टक्के अपगांना कारखान्यात नेमले तर सपूर्णपणे करमाफी मिळते या कारखान्यांना वेलफेअर फॅक्टरी म्हणतात असे १५००० कारखाने आहेत कुष्ठरोगाविषयी सशोधन, यांत्रिक अवयवाची निर्मिती यात त्यानी मोठी आघाडी मारली आहे परतु कुष्ठरोगाबाबतचे कुष्ठजतुसशोधन, प्रतिबधक लस निर्माण करण्याची प्रक्रिया, पहाणी, लोकशिक्षण आणि उपचाराचा भारतातील कार्यक्रम यातून खूप शिकण्याची चीनला इच्छा आहे. त्याकरिता ते भारतात एक प्रतिनिधी मडळ पाठवणार आहेत पुनर्वसनासबधी त्याचे विचार पाश्चिमात्य विचारापासून सपूर्णपणे वेगळे आहेत आर्थिक स्वातत्र्यावर अपगाचे पुनर्वसन उभारले पाहिजे असे त्याना वाटते

त्यांचे वडील दंग शिया पिंग हे आज ८५ वर्षांचे आहेत उची पाच फुटांपेक्षा कमी, पण त्याची स्वप्ने कमालीची उच आहेत त्याचे शिक्षण प्रथम चीनमध्ये, नंतर पॅरिस आणि मॉस्को येथे झाले त्यामुळे फ्रेंच, रशियन बोलू, समजू शकतात तसेच इग्रजीही बोलतात ब्रिज खेळणे, पोहणे, चित्रलिपीचे प्रयोग हे त्याचे छद आहेत आज चीनमध्ये जे आर्थिक बदल घडवण्याचा ते प्रयत्न करीत आहेत तो एका अर्थाने नवीन समाज निर्माण करण्याचा प्रयोग आहे तो संपूर्णपणे नवा प्रयत्न आहे त्याला काय म्हणावे? दग त्याला दुसरी क्राती म्हणतात या प्रयोगात पारपरिक साम्यवादी अशा अनेक कल्पनांना फाटा दिलेला आहे. राष्ट्रीकरण आणि खासगी मालमत्ता, राजकीय एकाधिकारशाही आणि मर्यादित चौकटीतले आर्थिक स्वातत्र्य, मध्यवर्ती नियोजन आणि चुरस करणाऱ्या बाजारपेठा, सस्कृतीचे रक्षण पण धर्माचा अभाव असे वरकरणी परस्पर विरोधी वाटणारे घटक या समाजरचनेत आहेत हा प्राणी का पक्षी? या प्रयोगाला काय म्हणावे? काही लोक त्याला बाजारपेठेचा समाजवाद (मार्केट सोशॅलिझम) म्हणतात तर काही त्याला उपभोग्य वस्तु मुबलक देणारा समाजवाद म्हणतात दग शिया पिंग त्याला 'चिनी वळणाचा' समाजवाद म्हणतात तस पाहिल तर नावात काय आहे? त्याचे अनेकदा उद्धृक्त केलेले वचन असे आहे 'माजराला काळी मनी म्हणा, पाढरी भाटी म्हणा, परतु जोवर उदीर खाण्याचे काम केले जाते तोवर नावात काय आहे?

## अपगांचे पुनर्वसन

चीनच्या दौऱ्याची सुरुवात अपग पुनर्वसनाच्या राष्ट्रीय सभेपासून झाली पहिलाच प्रश्न होता चीनमध्ये अपग माणसे किती? युनायटेड नेशन्सच्या पाहणीप्रमाणे दर दहामागे एक अपग आहे. चीनमध्ये व भारतात हे प्रमाण त्याहून कमी आहे याचे कारण कदाचित आपली अपगतेची परिभाषा असेल उपाध्यक्ष डॉ स्यू म्हणाले, विकसनशील देशात, जी अपगता डोळ्याना ठसठशीतपणाने दिसते तिलाच अपगता मानण्याची प्रवृत्ति असते

चीनमध्ये अपगतेच्या प्रतिबंधनावर खूप भर दिला गेला आहे पण अपगतेबद्दल न्यूनगड मात्र फारसा नाही किंवा देवाला दोष दिला जात नाही अपगांना व्यवसायाचे शिक्षण देऊन पुनर्वसन केले जाते त्यांना इतराच्या इतकाच पगार दिला जातो हे कसे घडते हे पहाण्याची माझी उत्सुकता होती. त्यासाठी ज्याला 'कल्याण कारखाने' (वेल्फेअर फॅक्टरी) (फ्कली कुग) म्हणतात असे दोन कारखाने मी बघायला गेलो एक बिजिंगपासून १०० मैलावर होता दुसरा नानजिंगपासून जवळच्या खेड्यात होता. एक कारखाना तयार कपड्याचा होता, तर दुसरा कारखाना विद्युत उपकरणे बनवण्याचा होता एकात मुख्यत: मूकबधीर माणसे होती प्रत्येक कारखान्यात १०० ते १५० कामगार होते त्याचा पगार सर्वसामान्यपणे १०० युवान (चिनी रुपयासारखे नाणे) होता. कपड्याच्या कारखान्याची मॅनेजर बाई होत्या विद्युत उपकरणाच्या कारखान्याची प्रमुख अभियता एक स्त्री होती दोन्ही कारखाने शासनाच्या मालकीचे पण युनियनवर सर्व निर्मितीची जबाबदारी कारखान्यात येण्याजाण्याकरता जवळच्या लोकांना सायकली, तर लाबच्या लोकांसाठी बस होती किमान काम किती झाले पाहिजे यावर बधन होते पण त्यापेक्षा जास्त काम झाले तर कामगारांना बोनस दिला जात होता कपड्याच्या कारखान्यातल्या मुख्य डिझाइनर बाईंना मी विचारले. तुम्हाला आता रगीबेरगी कपडे आधुनिक तऱ्हेने डिझाइन करणे शक्य होते का? त्याला मागणी आहे का? त्यावर त्यानी मला तयार झालेल्या मुलामुलींच्या कपड्याचा एक 'वॉर्डरोब' दाखवला. अगदी जपानी वा स्विस मुलाना हेवा वाटावा इतका तो सुदर होता. कारखान्याच्या उत्पन्नातला ५५ टक्के भाग शासनाचा उरलेल्या भागात कारखान्याच्या वाढीसाठी भांडवली खर्च, बोनस, कामगारासाठी सेवा यांचा समावेश होतो विद्युत उपकरणाच्या कारखान्यात तयार होणारा माल मग तो टी व्ही, रेकॉर्डर, रेडिओ, रेफ्रिजरेटर, साऱ्याची 'क्वालिटी' उत्तम किमती स्वस्त कारण कारखान्याची शासकीय मालकी आणि दर्जा व किमतीवर नियंत्रण या पगारात कसे भागते याचे उत्तर देताना एक स्त्री कामगार म्हणाली, चीनमध्ये कारखान्यातील मॅनेजर व कामगार यांच्या पगारात अंतर फार कमी आहे तरीहि या पगारात चागले भागते साधारणपणे १०० युवान पगार असतो किमती वीस वर्षे स्थिर आहेत शहरात जरा भाज्या कमी पडतात पण सर्वत्र किमती सारख्या खासगी सपत्तीवर नियत्रण, त्यामुळे ६ ते ८ युवानमध्ये ३ ते ४ खोल्याचा ब्लॉक मिळतो एका अर्थाने या चौकटीमुळे सर्वसामान्य माणसांच्या किमान गरजा निश्चितपणे भागवल्या जातात त्यामुळे असमानता नाही आणि उपासमारी आणि बेकारी अजिबात नाही

## नियोजनाची नवी दिशा

नियोजनासबधी बोलताना असे लक्षात आले की, १९७९ पूर्वी नियोजनाचा सारा रोख अवजड उद्योगधद्याची वाढ करण्यावर होता आता मात्र ग्राहकाना लागणाऱ्या नित्योपयोगी वस्तूचे (टी व्ही, रेडिओ, रेफ्रिजरेटर इत्यादि) उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात येत आहे १९८२ नंतर कपड्याचे रग आणि फॅशन यातला हुकूमशाही

एकसारखेपणा सपला आजसुद्धा गर्दीत अनेक माणसे, जुन्या तऱ्हेचे बोंगळ, ढिले 'माओ' सूट घालताना दिसले तरी अनेक लोक 'जीन्स' किंवा पाश्चत्त्य तऱ्हेचे सूट घातलेले दिसतात १९८४ नंतर मात्र साऱ्या उत्पादनाचा रोख गिऱ्हाइकी बाजारपेठेकडे वळला आहे सार्वजनिक सरकारी उद्योगसुद्धा ठेकेदारीच्या पद्धतीने चालवल्यामुळे नफ्यात चालतात मध्यवर्ती नियोजनात, उत्पादनाची उद्दिष्टे ठरवून दिली जातात कच्चा माल किती द्यायचा हे ठरवले जाते आणि उत्पादनातील विशिष्ट हिस्सा नियंत्रित दराने विकला जातो नफ्यातील ५५ टक्के शासनाला कराच्या रूपाने दिले की उरलेल्या भागाचा उपयोग कसा करावा हे त्या त्या उद्योगाने ठरवायचे मात्र ग्राहकांना योग्य किमतीत माल मिळतो का नाही हे पहाणे शासनाचे काम आहे एका अर्थाने हे प्रशासकीय नियोजन नसून हे मार्गदर्शक नियोजन आहे असे सागण्यात येते. त्यामुळे तोट्यात चालत असेल तर सरकारी कारखाना बद करण्यात येतो नोकरी टिकवण्याकरता कारखाना तोट्यात चालवणे त्याना मजूर नाही त्या कामगाराना शेतात, धरणावर दुसरी नोकरी लगेच दिली जाते ग्राहकांना लागणाऱ्या वस्तु देशात निर्माण करणे, त्या योग्य आणि स्थिर किमतीमध्ये सर्वांना उपलब्ध करून देणे हे या धोरणाचे सूत्र आहे. परंतु सुमारे ७० टक्के वस्तूच्या किमती आज शासन ठरवते त्या मुख्यत ग्राहकाच्या गरजेच्या वस्तु आहेत.

## सांस्कृतिक क्रांतीनंतरचा चीन

चीनमध्ये दोन विचारप्रवाह दिसतात- आधुनिक, यंत्रोद्योग व विज्ञानप्रधान देशातून काही शिकावे असे वाटणारा एक वर्ग आणि जे जे परदेशी आहे, ज्ञान, वस्तु, पैसे, संस्कृती ते ते त्याज्य मानणारा दुसरा माओ त्से तुंग यांनी साऱ्या चीनभोवती बाबूचा अपारदर्शी पडदा उभारला चीन एका अर्थाने एकांतवासात जगू लागला दग शिया पिंग यानी या जुन्या वाड्यातच दरवाजे-खिडक्या उघडायला सुरुवात केली आहे अनेक तऱ्हेच्या वस्तु, यंत्रे याची आयात केली जात आहे परदेशी भाडवलाला तंत्रज्ञानाला उत्तेजन दिले जात आहे हा दरवाजा अजून पूर्ण उघडला आहे असे म्हणवत नाही आजहि जवळ जवळ २००० परदेशी उद्योगाचा प्रवेश चिनी बाजारपेठेत झाला आहे मात्र गमतीची गोष्ट अशी, यापैकी बहुतेक तथाकथित परदेशी उद्योग-परदेशी राहणाऱ्या चिनी लोकाच्या मालकीचे आहेत सपूर्ण परदेशी म्हणता येतील असे केवळ ७० अमेरिकन, ६७ जपानी, ४२ ब्रिटिश व थोडे युरोपियन आहेत अशा तऱ्हेचे 'परदेशी चिनी' उद्योग आल्यामुळे, भाडवल, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाचे नवे वारे वाहू लागले आहेत यातून परदेशी राहणाऱ्या भारतीयांना भारतविकासासाठी काय करता येईल याचा एक वेगळाच आदर्श मला दिसतो आहे कट्टर साम्यवादी मडळींचा अर्थात याला विरोध आहे विरोध करणाऱ्या या मडळींना उत्तर देताना दग शिया म्हणतात, आपण खिडक्या उघडू नयेत कारण त्यातून माश्या, चिलटे आत येतील असे हे विरोधक म्हणतात खिडक्या घट्ट बद कराव्या आणि आम्ही आत गुदमरून मरावे असे त्याना वाटते माझे तर सागणे आहे "खिडक्या उघडा, मोकळी हवा घ्या "

चीनची राजकीय चौकट ही एकपक्षीय आहे. हा साचा बदलणार नाही याची काळजी दग शिया व इतर पक्षनेते घेत आहेत पण त्याचबरोबर १९८२च्या घटनेतील बदलानुसार चिनी राजसत्ताही कायद्यावर आधारलेली राजसत्ता झाली आहे थोडेफार धार्मिक स्वातंत्र्य आहे पण भाषणस्वातंत्र्यावर खूप बंधने आहेत दग पूफांग आणि इतर समाजसेवकाच्या बरोबर चर्चा करताना एक लक्षात आले की लोकशाही ही लोकांच्या सहभागाने सिद्ध होते हा सहभाग साक्षात असावा लागतो म्हणून खेड्याच्या, कम्युनच्या पातळीवर हे शक्य होते, पण खूप लोकसंख्या असलेल्या प्रचंड देशात राजनैतिक धोरणांची राष्ट्रीय चौकट हा चर्चेचा विषय करायला हे शासन तयार नाही लोकशाहीचे प्रचंड आकर्षण मला विद्यापीठात आणि तरुणाच्यात दिसले, परतु हा विचार शासनाला किती पचेल, विकासाला उपयोगी ठरेल हे केवळ कालमानानेच ठरणार आहे

परराष्ट्रीय धोरणातहि खूप बदल होतो आहे असे वाटते आशियातील सर्व देशांत चीन हा विकसनशील शातताप्रिय देश आहे दाखवण्याचा प्रयत्न होतो आहे त्यामुळे थायलंड मलेशिया इंडोनेशिया [illegible]

उघड मदत बद झाली आहे. निदान तसे म्हणतात आता झगडा आहे तो केवळ रशियन सरहद्दीवर आहे. आणि काम्पुचियात आहे. या नव्या परराष्ट्र धोरणाचे खरे स्वरूप गेल्या वर्षी हॉंगकॉंगबाबत चीनने जो करार ब्रिटनशी केला त्यात दिसून आले आहे १९९७ नतर एका चिनी चौकटीत साम्यवादी व भाडवलवादी अशा दोन अर्थव्यवस्था नादणार आहेत त्याचा अखेर कशात होतो हे आता सागणे कठीण असले तरी दग शिया याचे परराष्ट्र धोरण, आर्थिक पायावर आधारलेले आहे हे स्पष्ट दिसते चीन हा गरीब देश आहे हे तर खरेच पण १९८० साली दरडोई दरसाल डॉलर्स तीनशेच उत्पन्न २००० साली ८०० डॉलर्सवर नेण्याचा त्यांचा निर्धार आहे. १९८५ साली अन्नोत्पादन दरवर्षी २३ टक्के वाढत आहे. भुकेकगाल, अवर्षणपीडित चीन हे चित्र त्याना बदलून टाकायचे आहे. आता दूर खेड्यातही दूरदर्शनवर थोडीफार [illegible]

असे त्याना ठाऊकच नव्हते "पैशाला रग नसतो संपत्तीला पाप मानायचे कारण नाही जोवर ती श्रमाने, निढळाच्या घामाने, पिळवणूक न करता मिळालेली असते" हे थोडेसे पोथीनिष्ठ साम्यवादाला न पटणारे दग शियाचे धोरण आहे. या नव्या उत्पादनप्रवृत्ती आर्थिक धोरणाचा तडाखा बसलाच तर जपान, कोरिया, सिंगापूर, तायवान याना प्रथम बसणार आहे

चायनीज ॲकॅडमी ऑफ सोशल सायन्सेसचे एक प्राध्यापक डॉ त्सावो कूसान म्हणतात की, आर्थिक सुधारणांच्या या लाटेबरोबर लोकशाहीचे वारे या देशात येण्याचा सभव आहे. यातूनच सर्वांना किमान गरजा भागवणारे, अन्न, निवारा, नोकरी, रोजगार देणारे, सर्वांना समान संधि, आरोग्य, शिक्षणाच्या सुविधा देण्यासाठी लागणारे कायद्याचे राज्य येईल असा मला विश्वास वाटतो या साच्यातून राजकीय स्थैर्य, आर्थिक विकास

निर्माण होईल, परतु लोकशाही येणार का हा आजचा यक्ष प्रश्न आहे.

## 'शतकोटी माणसांच्या देशात'

नानजिंगचे जुने नाव जिंगलिंग. चीनमध्ये हॉटेलचा उद्योग फारसा पुढारलेला नाही. पण आता प्रत्येक शहरात निदान एक तरी उत्तम पंचतारांकित हॉटेल आहे. मी हॉटेल जिंगलिंगमध्ये उतरलो. अत्यंत आधुनिक व्यवस्था (अघोळ झाल्यावर न्हाणीघराचे तपमान बदलण्याची व्यवस्थासुद्धा) आणि त्याचबरोबर खास पौर्वात्य तऱ्हेचे आतिथ्य आहे. नानजिंगमध्ये दोन सांस्कृतिक कार्यक्रम पाहिले एक खास पारंपरिक शैलीची चिनी सगीतिका समुद्रातल्या ड्रॅगन राजपुरुषावर प्रेम करणारी राजकन्या वगैरे वगैरे. रगभूमीवरचे देखावे उत्कृष्ट होते आधुनिक यत्रसामग्रीने सज्ज असा रंगमंच होता चिनी क्लासिकल संगीत मात्र फार संथ आणि पाल्हाळिक वाटले नाटकात गाणी चालू असताना त्यांची अक्षरे शेजारच्या पडद्यावर दिसतात, विशेष म्हणजे काम करणाऱ्या सर्व स्त्रिया होत्या. एका अर्थाने तो 'कॉस्च्यूम ड्रामा' होता. दुसरा कार्यक्रम पाहिला तो चिनी 'पॉप' सगीताचा. या कार्यक्रमाला ३० ते ४० हजार तरुण-तरुणी उपस्थित होते पण जपानी पॉप गीतगायकांना चीनमध्ये अफाट लोकप्रियता आहे. या पॉप सगीताने देशोदेशीच्या सरहद्दी पार नष्ट केल्या आहेत. कानठळ्या बसतील इतका तीव्र स्वरांचा ठेका धरून सगीताचा समुद्र उसळला होता. ३०/४० हजार तरुण-तरुणी हात वर करून ठेका देत होते गात होते, नाचत होते, 'ब्रह्मानदी टाळी'ला लागल्याचा जिवंत प्रत्यय घेत होते.

चीनमध्ये शेक्सपीअर सोसायटी आहे मी तिकडे असताना शेक्सपीयरच्या सोळा नाटकांचा महोत्सव होता मी 'ॲज यू लाइक इट' हा चिनी प्रयोग पाहू शकलो तात्पर्य शेक्सपीयर इग्रजीतच चागला वाटतो

## गुन्हेगारी आणि शिक्षा

नानजिंगला असताना, रस्त्यावर लावलेली मोठीमोठी भित्तीपत्रके पाहिली. चिनी मजकूर कळत नव्हता, पण त्यावर छापलेली मोठी लाल शाईतली 'बरोबर'ची खूण (टिक मार्क) नजरेत भरत होती हे काय आहे असे येथील कमिशनरना मी विचारले, ते म्हणाले की, काही गुन्हेगाराना रविवारी जाहीर फाशी देण्यात येणार आहे त्या गुन्हेगाराची व त्यांच्या गुन्ह्याची माहिती त्या पत्रकात आहे जाहीर फाशी बघायला शेकडो लोक जमतात हा प्रकार थोडासा रानटी वाटत नाही का असे विचारल्यावर ते म्हणाले की, 'जाहीर फाशी' हा आमच्या दृष्टीने लोकशिक्षणाचा एक भाग आहे चीनमध्ये बलात्काराला देहात शिक्षा आहे. कायदेशीर न्यायदानाच्या नावाखाली समाजविरोधी गुन्हेगारीला थारा मिळणार नाही, हे समाजाला पटवून देण्यासाठी हे करणे आवश्यक आहे सर्वसाधारणपणे कोणताहि खटला सहा महिन्यांच्यावर लोंबकळत राहात नाही, असेहि सागण्यात आले भ्रष्टाचार हा समाजविरोधी गुन्हा असल्याने त्याला जास्तीत जास्त शिक्षा दिली जाते

## शिक्षण आणि संस्कृति

शाळेत जाणाऱ्या वयातली जवळजवळ सर्व मुले प्राथमिक शाळेत दाखल झालेली आहेत वांशिक अल्पसंख्याकांच्या भागात २/३ मुले प्राथमिक शाळेत भरती झाली आहेत तेथे शाळा सोडण्याचेहि प्रमाण मोठे आहे १५० दशलक्ष निरक्षर लोकांपैकी निम्म्या स्त्रिया आहेत म्हणून मुलींच्या शिक्षणावर फार मोठा भर देण्यात आला आहे, याशिवाय 'शाळेबाहेर विज्ञान शिक्षणाची' मोठी चळवळ उभारण्यात आलेली आहे.

बीजिंग विद्यापीठात तामिळ आणि हिंदी शिकवण्यात येते कागद तयार करण्याची व छापण्याची कला चीनमध्ये निर्माण झाली, याचा त्यांना फार अभिमान वाटतो साक्षरतेबरोबर तेथे पुस्तकांची भूक वाढते आहे १९८५ या एका वर्षात ४५ हजार पुस्तके व ७ कोटि प्रती छापण्यात आल्या संस्कृति मंत्रालयाने एके काळी बंदी घातलेली परंपरागत पुस्तके छापायला आता सुरुवात केली आहे. चीनमध्ये वानरराजाची कथा मुलांची फार आवडती आहे. एका राजाला बुद्ध ग्रंथाच्या मूळ संहिता हव्या असतात त्यासाठी तो चीनमधून भारतात जायला निघतो तो एका वानरराजाची मदत घेतो तो इतर वानरांच्या मदतीने सागर पार करण्यासाठी पूल बांधतो डोंगर उचलून आणतो शेवटी राजाची सफर यशस्वी होते अशी 'वानरराजाची कथा' (स्टोरी ऑफ द मंकी किंग) प्रसिद्ध आहे त्याची चित्रमाला करण्यात आली आहे या कथेचे रामायणातल्या काही भागाशी असलेले साधर्म्य विलक्षण आहे.

## काही पर्यटनस्थळे

या दौऱ्यात पर्यटकांना आकर्षण वाटणाऱ्या काही ठिकाणांना भेट देता आली चीनची बलाढ्य भिंत सुमारे ६००० किलोमीटर्स लांब, डोंगराच्या मणक्यावर बांधलेली पूर्व-पश्चिम भिंत आहे अवकाशात गेलेल्या अवकाशयात्रींना वरून दिसलेली ती मोठी मानवनिर्मित खूण आहे ती भिंत बघायला गेलो असता आमच्या नातीएवढी एक चिनी नात भेटली निंग निॲंग नावाची. ती मला 'ये ये' म्हणजे आजोबा म्हणून हाक मारीत होती पण "शाड शाग हाऊ" (गुडमॉर्निंग) च्यापुढे संभाषणाची गाडी जाईना शेवटी तिने आपले एक शाळेतले गाणे म्हणून दाखवले आणि निरोप घेतला जगभर आजोबा आणि नातवंडे सारखीच "फरबिडन सिटी" या मिंग सम्राटाच्या राजवाड्यात १ हजार ९९९ खोल्या आहेत त्या सम्राटाच्या जेवणाच्या वेळी १०० पदार्थ टेबलावर मांडलेले असत त्यातले ३०% नुसते बघायचे ३०% नुसता सुगंध घ्यायचा आणि उरलेल्या ४०% पैकी फक्त १०% खायचे असे हे रंगीत, सुगंध, स्वादिष्ट जेवण याखेरीज बुद्धमंदिरे, सुंदर बगीचे, तलाव यांगत्सीसारख्या प्रचंड नदीवरचा लांबलचक पूल. अनेक गोष्टी पाहिल्या मिंग घराण्यातील माणसे जेथे समाधीस्थ आहेत त्या मिंग समाधीस्थानाला गेलो तेथे जाणाऱ्या रस्त्यावर दोन्ही बाजूला अमात्य, सेनापति यांचे राक्षसी आकाराचे पुतळे आहेत नंतर रस्त्याच्या दुतर्फा हत्ती, घोडे, सिंह यांच्या महाकाय मूर्ति आहेत चिनी परंपरेत चार प्राण्यांना फार महत्त्व आहे. १ कासव (कुई), २ युनिकॉर्न (ची तीन), ३ ड्रॅगन

(लॉंग), ४ फिनिक्स (फग) या चारहि प्राण्याना साकेतिक अर्थ आणि महत्व आहे कासव दीर्घायुष्य दाखवते युनिकॉर्न या प्राण्याला सिंहाचे तोंड, आयाळ, घोड्याचे पाय, पख आणि शिंगे असून तो सामर्थ्याचे प्रतीक आहे. ड्रॅगन ज्वाला टाकणारा, पख व नखे असणारा महाकाय सर्व राजसत्तेचे प्रतीक आहे, आणि बगळ्यासारखा दिसणारा पण राखेतून जिवत होणारा ज्वालाजीवि फिनिक्स हा स्वर्गाशी नाते सागणारा आहे ही सारी राजचिन्हे आहेत चिनी रगांनासुद्धा विशिष्ट अर्थ आहे लाल रग हा सत्तेचा आणि राजचिन्हाचा प्रतीक आहे

## चीनमधील वृत्तपत्रे

'चायना डेली' हे मुख्य इग्रजी वृत्तपत्र सरकारी आहे, पण त्यात आशियातल्या बातम्यावर भर आहे. पहिल्या पानावर २/३ जागा चीनच्या विकासविषयक बातम्यांना आहे १/३ भागात आशिया व इतर देशातील महत्त्वाच्या बातम्या, दुसऱ्या पानावर आर्थिक विषय, बाजारभाव, शेअर्स, सोन्याचे भाव, परदेशी चलनाचे भाव तिसऱ्या पानावर स्थानिक "बेकायदा बाधलेले २१ गाळे बीजिंग महापालिकेने ताब्यात घेऊन प्राथमिक शिक्षकाना दिले" "रस्त्यावर सापडलेल्या मुलाचे आई-बाप शोधून कोर्टाने ते त्याना घ्यायला लावले" "उत्खननात ७००० वर्षांपूर्वीचे अवशेष सापडले" अशा बातम्या आहेत चौथ्या पानावर शेती, विज्ञान, पाचवे पान जाहिराती, दूरदर्शन, स्थानिक कार्यक्रम, शब्द कोडी, ब्रिजचे डाव आहेत सातव्यावर खेळ, आठव्यावर परदेशी बातम्या, दैनिक वृत्तपत्रात फोटो पुष्कळ आहेत. जाहिराती मुख्यत: विमान कपनी, कॉम्प्युटर, वर्ड प्रोसेसर, कपडे यांच्याच आहेत अनेक जाहिराती सरकारी आहेत. पण वृत्तपत्रात खाण्यापिण्याच्या किंवा हॉटेलच्या, दारूच्या व सिगारेटस्च्या जाहिराती नाहीत

## लोकसंख्येचा प्रश्न

क्रांतिनतर चीनच्या लक्षात आलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकसख्येचा प्रश्न. १९५० नतर मुलाबाळांचे अमाप लेंढार वाढून लोकसंख्या दुप्पट झाली आज चीनजवळ शेती करण्याजोगी १ ५ मिलियन 'मू' एवढी जमीन आहे यामुळे दरडोई धान्योत्पादन कमी झाले आहे त्यामुळे लोकसख्यावाढीचा वेग कमी व्हायला हवा. पण त्याचबरोबर अन्नोत्पादन आणि दरडोई उत्पन्न वाढवायला हवे, हे लक्षात आले त्यामुळे हा कार्यक्रम केवळ लोकसख्या मर्यादित करण्याचा राहिलेला नाही आर्थिक विकासाशी त्याचा साक्षात् सबध जोडला गेला आहे. त्यामुळेच 'एका जोडप्याला एक मूल' ही घोषणा अमलात आणली गेली यामुळे देशात किती माणसे मरतात व जन्मतात, याच्यात समतोल येण्यासाठी एका जोडप्याला एक मूल हे केवळ पुढील पधरा वर्षांचे धोरण आहे जे या धोरणाची अंमलबजावणी करतात त्याना 'बोनस' मिळतो त्याचा जाहीर सत्कार केला जातो या मुलाना शाळेत अग्रक्रम मिळतो घर मिळताना वा नोकरी मिळताना या कुटुंबाना अग्रक्रम दिला जातो जास्त मुले झाल्यास वा होऊ दिल्यास दड

होतो गर्भपात सरकारला मजूर आहे पण गर्भ राहू न देणे अधिक पसत केले जाते एके काळी जन्माचे, मृत्यूचे व लोकसख्यावाढीचे प्रमाण फार मोठे होते आता ही तिन्ही प्रमाणे खाली आलेली आहेत. जननक्षम वयातील २२ टक्के माणसाना फक्त एक मूल आहे लोकसंख्या नियोजनाची सक्ती कोणावरहि केली जात नाही पण या कार्यक्रमाला देशात फार मोठा पाठिंबा मिळून कुटुब नियोजन ही आता लोकाची चळवळ झाली आहे

## चित्रलिपी

चिनी चित्रलिपी हा एक कलेचा प्रकार आहे. कॅलीग्राफी किंवा चिनी चित्राक्षरे लिहिण्याची कला गेली ३००० वर्षे अस्तित्वात आहे या कलेला चिनी भाषेत 'शू फा' किंवा चित्रलेखनाची कला म्हणतात लिहिण्याचे साधन म्हणून भारतात जसा बोरू आला, तसा चीनमध्ये ब्रशचा उपयोग सुरू झाला ब्रशने लिहिण्याचे अनेक फायदे सागतात एक तर त्याला चागले टोक आणता येते, त्यामुळे नाजूक वा जाड रेषा काढता येतात ब्रश दाबून एकसारखी रेषा वा जाड रेषा काढता येते ब्रशाच्या केसामुळे तो चटकन वळवणे शक्य होते शिवाय तो किंचित टेकवून उचलता येतो बॉलपेनमुळे जे लेखन होते, त्यापेक्षा यामुळे कलाकुसर करणे, अक्षरांची लाबी-रुंदी वा वळण बदलणे शक्य होते. या चित्रलिपीच्या अनेक शैली आहेत आठव्या शतकातील यान सेनकिंग किंवा लिऊ वा त्सावो हे या लिपीचे शैलीकार आहेत पाची बोटांनी ब्रश धरायचा, हात वा कोपर कागदाला न टेकवता चित्राक्षरे काढायची, अक्षरांची रचना, सफाई, नजाकत आणि लेखनाची रचना यावर त्या लेखनाचे सौंदर्य आहे, असे मानतात वाग पिता-पुत्राची एक गोष्ट सांगतात दोघेहि बापलेक उत्तम चित्रलिपीकार, मुलाने एकदा एक सुंदर लेखन करून ते वडिलांना दाखवले बापाने आपल्या ब्रशने एक छोटा ठिपका उजव्या कोपऱ्यात काढला नंतर प्रदर्शनात गेल्यावर अनेकानी त्या ठिपक्याचे कौतुक केले कारण त्या सर्व चित्राक्षरापेक्षा तो पूर्णविराम अधिक डौलदार आणि सुदर होता हे कसे साधले असे विचारताना, बापाने मुलाला पाण्याने भरलेल्या बारा बादल्या दाखवल्या आणि सुचवले की, इतकी शाई संपेतो रियाज करीत राहा सुदर अक्षर, सुदर चित्रलिपी यायला घाम गाळावा लागतो

या लिपीचा शोध कागजी या एका सम्राट हुआगच्या मत्र्याने लावला त्याने पक्ष्यांची व प्राण्याची उठलेली पावले न्याहाळली त्याचे आकार अगदी वेगळे पण स्पष्ट होते. त्यातून स्फूर्ति घेऊन त्याने अवती-भोवतीच्या वस्तूना चित्ररूप दिले या चित्रातील मूळ आकार कायम ठेवून त्यावर संस्कार करण्यात आले त्यांना एक शैली देण्यात आली. त्याची चित्रलिपी झाली मूळ चित्रांचा केवळ साधर्म्य दाखवणारा आकार दाखवला गेल्याने त्या चित्राना 'प्रतिबिंब आकार' म्हणू लागले अर्थात जे दृग्गोचर आहे (जसे प्राणी, माणूस, झाड) त्यांची चित्राक्षरे सुलभ आहेत समजण्याजोगी आहेत पण ज्या कल्पना आहेत, ज्या भावना आहेत, (जसे सुदर, राग) त्यांची चित्राक्षरे समजणे जड आहे सूर्याचे चित्राक्षर मुळात ( ) असे आहे, तर चद्राचे (।) असे आहे सस्कृतीचा

जसजसा विकास झाला तसे चित्राक्षराकडून कल्पना अक्षराकडे लिहिणे सुरू झाले त्यामुळे प्रतीकाक्षरे किंवा कल्पना सुचवणारी चित्राक्षरे शोधली गेली त्यानतर सख्याक्षरे आली त्यामुळे एक वचन, बहुवचन स्पष्ट झाले आता अलीकडे उच्चारानुसार उच्चाराक्षरे निर्माण झाली आहेत त्यामुळे अक्षरचित्रे, कल्पनाचित्रे व उच्चारचित्रे असे मुख्य तीन भाग आज दिसतात आज सोप्या झालेल्या चित्रलिपीत २००० च्या वर चित्राक्षरे आहेत. त्यामुळे थोड्या अक्षरात अर्थविश्व उभे करता येते, असा दावा आहे टायपिस्ट मडळींची मात्र खरी पचाईत आहे. पण कॉम्प्युटर, प्रिंटरमुळे लेखन स्वच्छ आणि जलद झाले आहे

## पुढे काय होणार?

आजपासून, १५ वर्षांनी इ. स २००० मधे हा देश कोठे जाणार आहे? उद्योगधंद्यात आघाडीवर जाऊन आर्थिक नवजीवनाचे साम्यवादी स्वप्न साकार करणार आहे का काही समाजशास्त्रज्ञ म्हणतात, त्याप्रमाणे असमान विकासाचा तो नकाशा ठरणार आहे? बीजिंगसारखी शहरे, त्याचे कारखाने, बहुसख्य सुशिक्षित माणसे प्रचड वेगाने पुढे जातील तर खेडोपाडी फार मागे राहतील एका अर्थाने शहरातून समृद्धीची बेटे उभी राहतील. पण बहुसख्य खेडी आणि लोक दारिद्र्यात मागासलेले राहातील साम्यवादाने पूर्व युरोपातसुद्धा जीवनमान म्हणावे तेवढे उचावले नाही मार्क्स, लेनिनची भाकिते सपूर्णपणे खरी झालेली नाहीत मग चिनी राजवटीने आरभलेला हा साम्यवादी चौकटीतला खुल्या बाजारपेठाचा प्रयोग, ग्राहकोन्मुख नियोजनाचा प्रयोग यशस्वी होणार आहे का? पण हा समाजपरिवर्तनाचा प्रयोग शेवटी सामान्य माणूसच घडवणारा आहे कन्फ्युशियसने एके ठिकाणी म्हटले आहे की, ''तुम्ही सैन्याचे सेनापती मारू शकता, पण गरिबातल्या गरीब शेतकऱ्याचे, विचार, त्याचे मत हिरावून घेऊ शकणार नाही'' गरिबातल्या गरिबाला विकासाचे चित्र रेखाटण्यात काय सहभाग मिळणार आहे यावरच या बलाढ्य देशाचे भविष्य अवलबून आहे.

## चीनमधले चार दिवस : दुसरी भेट

भारताचे पतप्रधान श्री राजीव गाधी याच्याबरोबर पत्रकार म्हणून जायला हवे असा निरोप आला त्यावेळी माझ्या मनापुढे माझ्या पूर्वीच्या चीनच्या भेटीत आलेले अनुभव भारत-चीन प्रश्नाचा गेल्या ३४ वर्षांचा खेदकारक इतिहास आणि गेल्या वर्षात केंद्र सरकारच्या परराष्ट्र खात्याच्यावतीने समाजविकास, पुनर्वसन आदि विषयाच्या बाबतीत चीन-भारत सबध कसे वाढविता येतील याविषयक दिल्ली बेजिंग आणि हॉगकॉग येथे झालेल्या चर्चा आणि भेटी डोळ्यासमोर उभ्या राहिल्या श्री राजीव गाधी याच्या चार दिवसाच्या भेटीमागे ४० वर्षांचा कडू इतिहास आहे 'हिंदी-चिनी भाई भाई' या घोषणेनंतर चीनने केलेली स्वारी, एकतर्फी माघार, दुरावलेले सबध यामुळे एकापेक्षा अनेक अर्थांनी इतिहास घडविणारी ही भेट होती त्यामुळे परराष्ट्र खात्यामधल्या चर्चेमध्ये तुटलेल्या रेकॉर्डप्रमाणे वारवार एकच प्रश्न येत राहिला,

चिनी संस्कृतीचा शिष्टाचार आणि वेळेबाबत काटेकोरपणाचा पूर्व तयारीतहि दिसला त्यामुळे चिनी दूतावासाने प्रत्येक शहराचे कमाल आणि किमान तपमान देऊन बीजिंगमधल्या गोठविणाऱ्या, शून्याखाली १५° असणाऱ्या थंडीची पूर्वसूचना दिली होती परदेश विभागाने आत लोकरीची अंतर्वस्त्रे आणि पायात दोन–दोन पायमोजे घातल्याशिवाय बाहेर पडू नका, असा सल्ला दिला होता बीजिंगच्या उत्तरेला वाळवंटाचा भाग असल्यामुळे तिकडून येणारे गार वारे फार झोंबणारे असतात. तेव्हा दोन्ही कान झाकणारी चामड्याची केसाळ टोपी घालावी असे सुचविले होते भारतीय दूतावासाने चिनी शब्दांचे उच्चार सांगणारी यादी दिली होती अशा गोठवणाऱ्या थंडीची तयारी करून आम्ही दिल्ली विमानतळावर दाखल झालो आणि महामंत्र्यांच्या खास 'एअर इंडिया'च्या '००१' आभाळातल्या पालखीत बसलो पहाटे उठून तयार होतो तोवर बीजिंग आले आणि विमानातून उतरून सारेजण तातडीने ग्रेट हॉलमधल्या स्वागत समारंभासाठी गेलो

'ग्रेट हॉल' ही राजवाड्यासारखी प्रचंड इमारत आहे. मुख्य हॉलमध्ये ३०० सैनिकांचे संचलन आणि ५०० मुलांचे नृत्यप्रदर्शन एकाच वेळी झाले यावरून या हॉलच्या लांबी–रुंदीची कल्पना येईल हॉलमध्ये शिरल्याबरोबर डाव्या बाजूला भारतीय पाहुणे आणि उजव्या बाजूला चिनी नेते उभे राहिले श्री राजीव गांधी यांचे चीनचे पंतप्रधान ली फंग यांनी स्वागत करून त्यांची भारतीय व चिनी नेत्यांशी परस्पर ओळख करून दिली चिनी लष्करी बँडवर भारताचे राष्ट्रगीत वाजू लागले एकेकाळी याच राजधानीतून भारतीय नागरिकांना पळून लावले गेले होते भारत–चीन संघर्षाच्यावेळी भारतीय दूतावासातल्या लोकांना अवहेलना सहन करावी लागली होती चिनी बँडवर 'जनगणमन' ऐकताना भारताच्या सामर्थ्याचा नवीन अविष्कार चीनला समजला आहे, असे उगीचच वाटल्यावाचून राहिले नाही यानंतर मुलामुलींच्या नृत्यपथकाकडे आम्ही गेलो भारत–चीन संबंध कसाहि असो या गुटगुटीत चिनी मुलांच्या चेहऱ्यावर इतका गोडवा होता की, कुणाचेहि मन मोहून जावे रंगीबेरंगी कपडे घातलेल्या या मुलामुलींनी हातात डफ, रेशमी रिबिनी आणि फुलांचे भरघोस गुच्छ घेतले होते ते काय चिनी गाणे म्हणत होते ते काही उमगले नाही, पण नाचणाऱ्या, गाणाऱ्या मुलामुलींच्या चेहऱ्यावरचे निरागस भाव सहज सांगून गेले, की या जगातला माणूस इथून तिथून सारखाच त्याला बिघडवते ते राजकारण आणि सुदैवाने ही मुले अजूनतरी राजकारणाच्या पलीकडे होती

स्वागत समारंभानंतर 'ग्रेट हॉल'च्या दुसऱ्या एका दालनात दोन्ही पंतप्रधानांची चर्चा सुरू होणार होती चर्चेच्या आधी चीनचे पंतप्रधान ली फंग यांनी भारतीय पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली श्री राजीव गांधी यांच्याप्रमाणे चिनी पंतप्रधान हेहि तरुण आहेत एकेकाळी परराष्ट्र विभागात चिनी बोलणारी माणसे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी असत आज भारताचे चीनमधले राजदूत श्री रंगनाथन हे उत्कृष्ट रशियन आणि त्याहीपेक्षा शैलीदार चिनी बोलू शकतात दूतावासामधले प्रथम सचिव सुरेश गोयल, जयदेव रानडे, विजय गोखले, गौतम बंबावाले आणि अनिता मेनन सारीच मंडळी

अस्खलित चिनी बोलत असल्याकारणाने आम्हाला इतर चिनी नेत्याशी बोलणे फार सोपे झाले चिनी पतप्रधान हे फार स्पष्टवक्ते आहेत· कापुचियाच्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, आम्ही तिथे शस्त्रे पुरवितो हे खरे आहे, परंतु ज्या दिवशी व्हिएटनामी सैन्य मागे घेतले जाईल त्याच दिवशी हा प्रश्न सुटेल भारत–चीन सरहद्दीचा प्रश्न किती दिवसात सुटेल, या प्रश्नाला 'आमच्या बैठकीची सुरुवात तर होऊ द्या' असा जबाब मिळाला. एकूण उत्तरावरून भारताशी स्नेहसबध जोडण्याची त्यांची इच्छा आहे हा गोठलेला प्रश्न सोडवायला चर्चेशिवाय पर्याय नाही हे त्यानी स्पष्ट केले जागतिक राजकारणाची त्याची जाण स्पष्टच दिसत होती

या प्रश्नोत्तराच्या फैरीनतर दोन्ही पतप्रधानांनी गोलदाजीला सुरुवात केली ते म्हणाले, "भारत आणि चीन या दोन्ही सस्कृति फार जुन्या आहेत पडित नेहरू आणि झाओ एनलाय यानी पहिल्या प्रथम उगवत्या राष्ट्रांच्या आकाक्षांना वाचा फोडली पचशीलाचा पुरस्कार केला मधला काळ थोडा दुराव्याचा असला तरी भारताचे पतप्रधान इथे आले हीच नव्या युगाची सुरुवात आहे असे मी मानतो"

श्री राजीव गाधी हे खूप हळू बोलतात ते मृदुभाषी आहेत त्यामुळे प्रथमदर्शनी ते कणखर नसावे असा भास होतो पण चर्चेच्यावेळी त्यानी आपला कणखरपणा स्पष्टपणे दाखविला असे दिसते श्री राजीव गाधी यानी आशिया आणि जगातली परिस्थिती सागून भारत आणि चीन मैत्री ही आजच्या काळाची ऐतिहासकि गरज आहे असे सांगितले औपचारिक सुरुवात झाल्यानतर दोन्ही पतप्रधान कुणाचीहि मदत न घेता खासगी चर्चेसाठी बसले त्याचवेळी परराष्ट्रमत्री चिनी परराष्ट्रमत्र्याबरोबर, व्यापारमंत्री त्याच्या व्यापारमत्र्याच्या बरोबर अशी वेगवेगळ्या पातळीवरची बोलणी सुरू झाली, बिनसरकारी पातळीवर कुष्ठनिवारण, अपगांचे पुनर्वसन आणि समाजकल्याण या विषयांवर बिनसरकारी चिनी सस्थाच्याबरोबर झालेल्या बोलण्यात मी सहभागी झालो

## इतिहासाला वेगळे वळण

चीनच्या चार दिवसाच्या दौऱ्यात सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे चिनी नेत्याबरोबर झालेली चर्चा चीनचे पतप्रधान ली फग, चीनचे अध्यक्ष याग शाग खुन, चीनमधल्या लष्करी महासमितीचे अध्यक्ष तग श्याओ पिंग आणि कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव चाओ ज याग याच्याशी झालेल्या चर्चेच्या फेऱ्या या फार महत्त्वाच्या आहेत तग श्याओ पिंग हे तांत्रिकदृष्ट्या प्रमुख नसले तरी त्याची जागा राष्ट्रपित्याच्या जागेसारखी आहे त्यामुळे तग श्याओ पिंग यानी पतप्रधान राजीव गाधी याचे मन·पूर्वक स्वागत करताना पुन· पुन्हा हस्तांदोलन करून "माझ्या तरुण मित्रा, तुझे स्वागत असो" असे म्हटलेले दूरचित्रवाणीवर ज्या वेळी लक्षावधी चिनी नागरिकानी पाहिले त्या वेळी त्याना सदेश मिळाला की दोस्ती होणार। श्री राजीव गाधी शाघायला गेल्यानतर त्याना पाहायला हजारो नागरिकानी रस्त्यात गर्दी केली "पडित नेहरू चीनला असताना मी उपपतप्रधान होतो तुमची आई पतप्रधान असताना आमची गाठ

पडली होती " असे खास आशियाई पद्धतीने, घरगुती नाते सांगून दग शिया बोलू लागले आणि पहिल्या वाक्यातच म्हणाले की, भारत-चीन प्रश्न चर्चेच्या पातळीवर न सुटण्याचे मला कुठलेहि कारण दिसत नाही. तुम्ही इथे आलात हीच नवयुगाची नांदी आहे. आपण हा प्रश्न सोडवू शकू असा मला विश्वास वाटतो 'काय, तुम्ही माझ्याशी सहमत आहात की नाही?' या ज्येष्ठ नेत्यासमोर श्री राजीव गाधी क्षणभर भारावल्यासारखे, गोंधळल्यासारखे वाटले आणि पुन पुन्हा विचारल्यावर हळू आवाजात म्हणाले, 'मी सहमत आहे.'

या तिन्ही ज्येष्ठ नेत्यांच्या चर्चेमध्ये फक्त तीनच पर्याय उपलब्ध होते १) भारत-चीन सबधांची गोठलेली स्थिती आहे अशीच चालू ठेवायची २) युद्ध करून प्रश्न सोडवायचा ३) सर्वोच्च राजकीय पातळीवर चर्चा करून या प्रश्नाना तोंड फोडायचे अर्थात तिसरा पर्याय स्वीकारलाच पाहिजे. अशी परिस्थिती आज जगात आणि दोन्ही देशात निर्माण झाली आहे

चर्चेमध्ये काय घडले याचा विचार करण्यापूर्वी चीनबाबत काही वस्तुस्थिती सागितली पाहिजे चीनबाबत भारतात खूप अज्ञान आहे त्यामुळे काही पार्श्वभूमि पाहणे आवश्यक आहे चीन हा जगामधला तिसऱ्या क्रमाकाचा मोठा देश आहे. साडेनऊ दशलक्ष चौरस किलोमीटर एवढा भूभाग आहे चीनला वीस हजार किलोमीटरची सरहद्द आणि अठरा हजार किलोमीटर किनारा आहे चीनची सरहद्द कोरिया, मगोलिया, रशिया, अफगाणिस्तान, भारत, नेपाळ, भूतान, ब्रह्मदेश, लाओस आणि व्हिएतनाम या देशांना भिडलेली आहे चीनमध्ये बावीस राज्ये असून पाच स्वयशासित प्रदेश आणि तीन महापालिका मध्यवर्ती शासनाच्या अधिकारात आहेत ज्याला आपण जिल्हे म्हणतो असे एकवीसशे जिल्हे आहेत चीनमध्ये एकूण लोकसख्या एक बिलियन किंवा एक सहस्त्रलक्ष इतकी आहे देशामध्ये अनेक वांशिक गट आहेत यापैकी 'हान' वशाचे ९४ टक्के लोक आहेत आणि उरलेल्या सहा टक्क्यात मोंगोल, तिबेटी, कोरियन, माँचू, इत्यादि आहेत १९८० नतर खासगी रितीने धर्मपालनाला मोकळी दिली गेली आहे परतु बहुसंख्य लोक बौद्ध पार्श्वभूमीचे पण आज सार्वजनिकरित्या धर्मपालन न करणारे आहेत थोडेफार ख्रिस्ती आणि मुसलमान आहेत

## मागचा इतिहास

चीनचा लिखित इतिहास चार हजार वर्षांचा आहे चीनमध्ये 'शिया' वंशापासून आजतागायत अनेक राजवंश झाले तांग राजवंशाच्या काळात बुद्ध धर्माचा प्रसार झाला चिनी कविता आणि सस्कृति यांचे ते सुवर्णयुग होते असे मानले जाते १८४० नंतर ब्रिटिश, फ्रेंच इत्यादि पाश्चिमात्य देशानी चीनमध्ये शिरकाव करून घेतला १९११ साली चिंग नावाची राजसत्ता उलथून टाकल्यानतर एक दुर्बल, मध्यवर्ती सरकार स्थापन झाले त्याचे नेते होते सन यत सेन त्यानतरच्या काळात चँग कै शेक याचे नेतृत्व उदयाला आले दुसऱ्या महायुद्धानतर या सरजामी सत्तेविरुद्ध लढाई उभारून १९४९ साली

माओ-झे-दाँग यांच्या नेतृत्वाखाली लोकसत्ताक राज्य सुरू झाले चीनमध्ये राष्ट्रीय लोकसभा म्हणजे 'नॅशनल पीपल्स कॉंग्रेस' राज्यपातळीवर अशीच लोकसभा असते या नॅशनल पीपल्स कॉंग्रेसमध्ये पाच वर्षांकरिता सदस्य निवडून येतात आणि दरवर्षी एक अधिवेशन होते एक अध्यक्ष आणि उपाध्यक्ष असतो आणि त्यांची नेमणूक 'पॉलिट ब्यूरो' कडून होते 'स्टेट कौन्सिल' ही प्रशासकीय रचना असून त्यात महामंत्री, उपमहामंत्री आणि इतर मंत्री असतात याशिवाय सेंट्रल मिलिटरी नावाची समिति असून ही लष्करी व्यवहारावर नियंत्रण ठेवते गेल्या तीस वर्षांत चीनने आर्थिक प्रगति चागली केली असून दरवर्षी नऊ टक्के वेगाने राष्ट्राचे उत्पन्न वाढते आहे १९५० च्या सुमाराला नियोजनावर आधारलेली अर्थरचना होती माओ-त्से-तुग यानी ही रचना मोडून काढली १९७८ साली तग श्याओ फिंग आल्यानंतर चीनचे दरवाजे सर्व राष्ट्राला खुले झाले लहान उद्योगधंदे आणि शेती यांना उत्तेजन आणि निर्यातीचा पुरस्कार सुरू झाला. अर्थोत्पादनात खासगी क्षेत्राला वाव मिळू लागला. यामुळे आज जगामध्ये राष्ट्रीय उत्पनाच्या बाबतीत चीनचा क्रमांक सातवा आहे दरडोई उत्पन्न शहरात २४६ डॉलर्स तर खेड्यात १२४ डॉलर्स आहे धान्य, पोलाद, सिमेंट आणि ऊर्वरके यांचे उत्पादन खूप वाढलेले आहे १९८७ पासून भारत-चीन व्यापार ११८ दशलक्ष डॉलर्स इतका आहे परतु भारताची चीनला निर्यात तीस दशलक्ष डॉलर्स असून आयात मात्र ८८ दशलक्ष डॉलर्स आहे चीनकडून आपण मुख्यत' कापड, रेशीम आणि यत्रसामग्री आयात करतो

चीन-आणि भारत याचे संबध हजारो वर्षांचे आहेत. अनेक प्रवासी यात्रेकरू याची नावे यासबधात आठवतात ह्यु आन त्संग, फा शियान, यी किंग याची प्रवासवर्णने तर प्रसिद्धच आहेत परतु भारतातून गेलेले बोधिधर्म आणि कुमार-जीव यांनी प्रथम बौद्ध तत्त्वज्ञान तिकडे नेले अलीकडच्या काळात पडित नेहरू चुग किंग ला गेले युद्ध काळात डॉ अटल आणि डॉ कोटणीस गेले, रवींद्रनाथ टागोर गेले परंतु पंडित नेहरू आणि झाओ-एन-लाय याची इडोनेशियाची भेट, बांडुग परिषद आणि पचशीलाचा पुरस्कार ही फार महत्त्वाची गोष्ट होती पतप्रधान झाओ-एन-लाय १९५४, १९५६ आणि १९६० साली भारतात आले. १९५८ च्या सुमाराला भारत आणि चीन याचे सरहद्दीबाबतचे मतभेद सुरू झाले १९५८ साली लडाख आणि अकसाई चीन या भागात महामार्ग बाधल्याबद्दल भारताने तक्रार केली १९६० साली पडित नेहरू आणि झाओ-एन-लाय यांची दिल्लीत भेट झाली, चर्चा झाली आणि याच वेळेला मतभेदाची तीव्रता जाणवायला लागली याच चर्चेत पडित नेहरूनी सरहद्दीबाबतचा भारताचा रोख आणि पत्रव्यवहार चुकीचा असल्याचे कबूल केले. १९६२ साली प्रत्यक्ष युद्धाला सुरुवात झाली त्यानंतर चीनने एकतर्फी माघार घेतली चिनी राज्यकर्ते हे युद्धपिपासू असून त्यानी आमच्या पाठीत खजीर खुपसला आहे असे पडितजी म्हणाले पण आज मागे पाहताना वस्तुस्थिती अशी दिसते की, खजीर समोरून खुपसला होता पण येणाऱ्या आपत्तींकडे आपण डोळेझाक केल्यामुळे आपल्याला उलटे वाटले

राजदूताच्या नेमणुका १९७६ नतर पुन्हा करण्यात आल्या १९७९ साली

त्यावेळचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी चीनला गेले आणि काम्पूचियावरील हल्ल्यामुळे दौरा मध्येच सोडून परत आले यानतर १९८० मध्ये पतप्रधान इंदिरा गाधी आणि चीनचे पंतप्रधान याची बेलग्रेडला गाठ पडली चीनचे परराष्ट्रमत्री १९८१ साली भारतात आले या चर्चेनंतर १९८७ पर्यंत अधिकाऱ्यांच्या आठ बैठकी झाल्या भारत-चीन सास्कृतिक करार १९८८ साली झाला भारताच्या पतप्रधानानी चीनला भेट द्यावी, असे निमत्रण प्रथम जून १९८१ साली दिले पुन्हा एकदा याची आठवण १९८३ साली करण्यात आली १९८५ साली झाओ-झि-यांग यानी न्यूयॉर्कमध्ये या निमत्रणाचा पुनरुच्चार केला चीनचे पतप्रधान तीनदा आले, तीन वेळा निमत्रण दिले हे झाल्यानतर श्री राजीव गाधी चीनला जाणे आवश्यक ठरले अलीकडे झालेल्या आंतरराष्ट्रीय वातावरणातील शाततापूर्ण बदलामुळे त्या चर्चेला वेगळेच महत्त्व आले

## भारत-चीन मतभेद

पूर्वीच्या भारत सरकारच्या श्वेतपत्रिकेमध्ये असे सांगितले होते की, चीनने भारताचा एकूण ४५ हजार, ५०० चौरस मैल भाग व्यापलेला आहे यामध्ये अक्साई चीन जवळ जवळ १२ हजार, ५०० चौरस मैल आहे नागभूमीच्या डोक्यावर असलेल्या भागात २५ हजार चौरस मैल प्रदेश चीनच्या ताब्यात आहे कोणाला कोणता भाग महत्त्वाचा वाटतो हे त्या त्या देशाच्या सरक्षणविषयक गरजावर अवलबून आहे अक्साई चीन प्रदेशात चीनला दोन प्रदेश जोडायला पट्टा हवा आहे परतु पाकिस्तानचा वरचा भाग भारताला राखणे आवश्यक आहे पूर्वेकडे अरुणाचल प्रदेश, तवांग हा चीनचा भाग आहे, असे चीनचे म्हणणे आहे. तवाग भागातला महसूल स्वातत्र मिळाल्यानंतरहि म्हणजे १९५१ सालापर्यंत ल्हासा इथे भरला जात होता, असा चीनचा दावा आहे अरुणाचलवरचा चीनचा अधिकार भारताने कधीच मानला नाही परतु भूतान-भारत करार, सिक्कीम भारताचा भाग होणे, अरुणाचल राज्य होणे या साऱ्यामुळे चीनला भारताच्या भूमिकेविषयी भीति वाटते होती, असे दिसते १९६२ मध्ये असलेले भारताचे सेनासामर्थ्य कमकुवत होते आज त्यात फार मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे याची जाणीव चीनला झाली आहे तिबेटचा प्रश्न ही एक मोठीच डोकेदुखी आहे या साऱ्या परिस्थितीमुळे जुन्या चिनी सम्राटाची मान्य केलेला चीन-तिबेट करार किंवा ब्रिटिशांनी दिलेली मॅकमोहन रेषा हा वारसा न स्वीकारता स्वतत्रपणाने या प्रश्नाकडे पुन्हा पाहता येईल का, असा प्रश्न आहे आपण भूतकाळाचे बदी होऊन स्वस्थ बसणार का, बदलत्या जगामध्ये नवी दृष्टी घेऊन या प्रश्नाला तोंड फोडणार? या प्रश्नाला भारत आणि चीन या दोन्ही देशानी सर्वोच्च राजकीय पातळीवर चर्चा करून रोखठोक उत्तर दिलेले आहे या चर्चेमध्ये भूतकाळाचे नाते ओळखून वर्तमानाची गरज जाणून भविष्याकडे झेप घेण्याची ताकद दिसली आहे

चौ-एन-लाय ज्यावेळी भारतात चर्चेसाठी आले त्यावेळी या विषयाची

पार्श्वभूमि तयार करायला इतिहास विभागाचे प्रमुख डॉ गोपाल यांना सांगण्यात आले होते त्यानी तिबेट हा भारताचाच भाग आहे, अशी भूमिका घेतली आणि त्या भूमिकेची शहानिशा न करता भारताने त्या विषयाचा पाठपुरावा केला. अलीकडे जॉन लाल यांनी प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रावरून डॉ गोपाळ याची भूमिका चुकीची होती, असे दिसते

त्यामुळे या चर्चेनंतर भारत आणि चीन याच्यामध्ये झालेला समझोता आणि करार हा १९७१ साली झालेल्या भारत-रशिया करारानंतर झालेला सर्वात मोठा आणि महत्वाचा समझोता आहे, असे मला वाटते राजीव गाधी याच्या आक्रमक परराष्ट्रीय धोरणामागे जॉर्डनला पाकिस्तानपासून वेगळा काढणे हा जसा एक भाग होता तसाच चीनला पाकिस्तानपासून वेगळा काढणे हा देखील दुसरा महत्वाचा भाग आहे यातून भारत, रशिया आणि चीन अशा तीन समर्थशक्ति एकत्र आल्या तर इतिहासाला वेगळे वळण लागेल, असे दिसते

## चर्चेचा अन्वयार्थ

चीनमध्ये झालेल्या चर्चेचा अन्वयार्थ समजावून घेताना आणखी एक दोन गोष्टी लक्षात घ्यायला हव्या तिबेट हे एक स्वतत्र राज्य होते पण राष्ट्र नव्हते तिबेटच्यावतीने चीनच्या सम्राटाला खडणी दिली जात असे या दृष्टीने तिबेट हे चीनचे माडलिक राज्य होते परतु सरदार पणिक्कर (त्यावेळचे भारताचे राजदूत) याच्या चिनी पत्रात 'सार्वभौमत्व' असा शब्द आला तेथूनच मतभेदाला सुरुवात झाली चौ-एन-लाय मोरारजीभाई यांच्या कक्षामध्ये चर्चेला आले असताना मोरारजींची आडमुठी भूमिका पाहून चर्चेतून चौ एन लाय यानी सभात्याग केला भूतानशी झालेला करार, तैवान, अरुणाचलबाबत भारताची भूमिका यामुळे मतभेद वाढून चीनने अचानक भारतावर हल्ला केला या आक्रमणाचा हेतु मुख्यत· राजकीय होता, असे दिसते परंतु प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यानतर आघाडीच्या सैनिकांना लागणारी पुरवठ्याची जी लांबच लाब साखळी असते ती टिकवणे अवघड आहे, असे चीनच्या लक्षात आल्यावर चीनने एकतर्फी माघार घेतली भारताचा अवमान करण्याचा त्यांचा राजकीय हेतु साध्य झाला यामध्ये चूक कोणाची, राजकीय नेतृत्वाची, तयारी नसलेल्या लष्कराची की हल्ला होणार आहे हे न समजणाऱ्या गुप्तहेर खात्याची? कारणे काहीहि असोत या ठिकाणी भारत-चीन मतभेद तीव्र झाले, सघर्षाप्रत आले आणि तिथेच गोठले

१९७८ साली तग श्याओ पिंग यांनी अटलबिहारी वाजपेयींच्या मार्फत पतप्रधानाना निरोप पाठविला की आपण चर्चा करायला यावे जनता पक्षाची राजवट सपल्यानतर श्रीमती इंदिरा गाधी याना या निमंत्रणाचा स्वीकार करायला अवसर मिळाला नाही त्यावेळच्या परिस्थितीत आणि आजच्या परिस्थितीत खूपच फरक झाला आहे त्यावेळची लष्कराची शक्ति आणि आजचे सामर्थ्य यात जमिनी-अस्मानाचा फरक आहे पहिल्या पराभवाचा धडा भारत शिकला आहे आज अणुशक्ति आणि दूरगामी प्रक्षेपणास्त्रे

यात भारताने प्रगति केली आहे त्यामुळे भारत आज वेगळ्या समर्थ भूमिकेत आहे जागतिक पातळीवरहि शांततेचे वारे वाहू लागले आहेत अमेरिका आणि पी एल ओ यांची बोलणी सुरू झाली आहेत इराण- इराक युद्ध संपल्यात जमा आहे त्यामुळे भूतकाळाच्या सावलीतून बाहेर पडून उद्याच्या प्रकाशाकडे जाण्याची नवी सुरुवात होत आहे, असे दिसते

पंडित नेहरू यांच्या जन्मशताब्दी वर्षात पंचशीलाचा पुनरुच्चार होतो आहे ही फार चांगली घटना आहे चीन आणि भारत यांचा समझोता झाल्यामुळे पाकिस्तानला अप्रत्यक्ष ताकीद मिळाली आहे बांगला देशात पाणीतंट्याची चर्चा चालू असताना चीनच्या मंत्र्याने बांगला देशाच्या सरकारला असे सांगितले की, याबाबत भारताचा प्रथम सल्ला घ्यावा, त्यावरून चीनची बदलती भूमिका सर्वांच्या लक्षात यावी रशिया आणि चीन सीमातंटा चर्चेच्या पातळीवर आला आणि सुटला अमेरिका आणि कॅनडा यांच्यातहि सीमातंटा आहे पण त्यामुळे दोन्ही देशाचे इतर क्षेत्रातले संबंध कमी झालेले नाहीत त्यामुळे भारत आणि चीन यांचे तिबेट आणि कांम्पूचिया यांवर संपूर्ण मतैक्य नसले तरी सहकार्याचा हात पुढे करायला सुरुवात झाली आहे. सीमेबद्दल देवाणघेवाण करावी लागेल, परंतु लष्करीदृष्टीने आवश्यक असणारा भाग भारताकडेच राहील केवळ सीमातंट्याकडे गुंतून पडण्यापेक्षा व्यापार, उद्योग, आर्थिक विकास आणि संस्कृति या क्षेत्रात सहकार्य सुरू होईल. सरहद्दीवर शांतता राखण्याची आणि सरहद्दीच्या प्रश्नाचा तपशीलवार विचार करण्याची जबाबदारी संयुक्त कार्यकारी समितीवर टाकली गेली आहे दरवर्षी किमान दोनदा राजकीय पातळीवर विचारविनिमय होणार आहे याखेरीज व्यापार, विज्ञान, हवाई वाहतूक आणि संस्कृति याविषयी करार झालेले आहेत ही आपली जमेची बाजू.

हे सारे चित्र उत्साहवर्धक असले तरी त्याबाबत काही सावधानतेचा इशारा द्यायलाच हवा चीनची जुनी चाल ओळखून आपण भावनेत वाहून न जाता ताकसुद्धा फुंकून प्यावे पूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन जो निर्णय असेल तो लेखी आणि स्पष्ट असायला हवा. तिबेटच्या बाबतीत दलाई लामाकडून दडपण यायचा संभव आहे परंतु त्या दडपणाला भारताने थारा देऊ नये चर्चा संपल्यानंतर चीनचे पत्रक दहा ओळींचे आहे तर भारताचे पत्रक पानभर आहे दोन संस्कृतींमधला हा फरक आपण विसरू नये निवडणूकपूर्व वर्षात खेळलेला हा एक राजकीय जुगार आहे आज तरी दान आपल्यासारखे पडलेले आहे. आपण भूतकाळाचे बंदी असू नये, पण जमिनीवरचे पाय सोडून कल्पनारंजनातहि गुंतू नये एका चार दिवसाच्या भेटीत चौतीस वर्षांचे प्रश्न सुटतील ही अपेक्षा चुकीची आहे पण प्रश्न सुटायला सुरुवात होते आहे ही गोष्ट चांगली आहे. ही चर्चा आशावादीपणाने परंतु व्यवहारचातुर्याने पुढे चालविली पाहिजे या दृष्टीने दोन्ही देशांनी काढलेल्या संयुक्त पत्रकात एकमेकांचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक एकात्मता राखण्याचे, एकमेकांवर अतिक्रमण न करण्याचे पंचशील तत्त्वांमधील उल्लेख आहेत. सरहद्दीबाबत असे म्हटले आहे, 'दोन्ही देशातील नेत्यांनी भारत-चीन सरहद्दीबाबत सखोल चर्चा केली आणि हा प्रश्न शांततापूर्ण आणि मैत्रीच्या भावनेने चर्चेत

सोडविण्याचे ठरले इतर क्षेत्रात देवाणघेवाण वाढवून योग्य ते वातावरण तयार करून सरहद्दीचा प्रश्न हा परस्परमान्य मार्गाने सोडवायचे ठरले आणि यासाठी प्रत्यक्ष पाऊल म्हणून संयुक्त कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली

अशा राजकीय दौऱ्याचे मुख्यत· तीन भाग असतात. एक म्हणजे यानिमित्त दिल्या जाणाऱ्या राजकीय मेजवान्या यामध्ये जेवणापेक्षा भाषणाचा भाग अधिक असतो आणि तिसरा भाग म्हणजे यानिमित्त त्या देशातील काही प्रेक्षणीय स्थळे, औद्योगिक प्रतिष्ठाने आणि विद्यापीठ याना भेटी चीनच्या दौऱ्यामध्ये हे सर्व व्यवस्थित पार पडले पहिल्याच दिवशी सध्याकाळी चीनच्या महामंत्र्यांनी ग्रेट हॉलमध्ये मोठी मेजवानी दिली मुख्य टेबलाच्या पाठीमागे चिनी भरतकाम केलेले रेशमाचे एक प्रचड निसर्गचित्र (१० फूट × ३० फूट) लावलेले होते दुसऱ्या दिवशी दुपारी बीजिंगमधल्या प्रख्यात 'रोस्ट डग' रेस्टॉरंटमध्ये खास चिनी पद्धतीचे जेवण झाले तिसऱ्या दिवशी शियानच्या गव्हर्नरांनी निरोपाचे जेवण दिले या सर्व जेवणात चिनी पद्धतीचे खाणे आणि वाईन दिली जात असे त्यांच्याकडे 'माओ ताय' नावाचे जरासे जहाल मद्य मिळते त्याच्या वर्णनावरून असे कळते की ते इतके जहाल आहे की ते प्यायलानतर सिगारेट ओढू नका असे पाहुण्याना थट्टेने सागतात श्री राजीव गाधी यानी तिसऱ्या दिवशी दुपारी चेंग वा विश्वविद्यालयात भाषण केले.

या दौऱ्यामध्ये श्री. राजीव गाधी यानी दुसऱ्या दिवशी 'स्वर्गमदिर' किंवा 'टेंपल ऑफ हेवन' नावाच्या जुन्या सम्राटाच्या राजवाड्याला भेट दिली त्याच दिवशी दुपारी त्यांनी चीनच्या बलाढ्य भिंतीलाहि भेट दिली चिनी संरक्षणाची व्यवस्थाहि जरा वेगळी वाटली श्री राजीव गाधी जाणार म्हटल्यानतर केवळ तेवढाच परिसर मोकळा न करता तो सबध भागच सर्व परिसर लोकांना बद केला जाई ज्या मोठ्या राजवाड्याच्या समूहात सम्राट राहत असत त्या बदिस्त शहरात किंवा 'फरबिडन सिटी' इथेहि त्यांनी भेट दिली दोन उंच स्फटिकाच्या खाबावर पहाटेचे दव जमावे म्हणून शिंपल्याच्या आकाराची भाडी त्यावर ठेवलेली, त्याच्या राखणीला एक स्फटिकाचा सिंह बसवलेला, आणि हे दव पिऊन अमर होऊ पाहणारा तो सम्राट – त्याचे वैभव काय सागावे ? अतिशय सुदर अशी ही वास्तु आहे

शियानला गेल्यानतर तिथे अलीकडे उत्खननात सापडलेले मातीचे सैनिकाचे माणसाच्या पूर्णाकृतीचे सहा–सहा फूट उचीचे मातीचे पुतळे आहेत प्रत्येकाच्या हातात खरीखुरी शस्त्रे आहेत रागाच्यामध्ये मातीचे रथ आणि खरेखुरे दिसणारे मातीचे घोडे आहेत सम्राटाच्या मृत्यूनतर त्याच्या आवडत्या वस्तु त्याच्याबरोबर पुराव्यात या प्रथेचा हा अगदी वेगळा आविष्कार आहे हे उत्खनन गेल्या आठ–दहा वर्षांत झाले पण हे बघायला तिथे रोज हजारो पर्यटक येत असतात याच शियान गावात एक जुना पॅगोडा आहे बुद्धाचे पहिले शिष्य काश्यप यानी स्थापन केलेले हे प्रार्थना मदिर त्याच्यावर भारतीय छटा स्पष्ट दिसते

शाघायला मालू नावाच्या शहरात औद्योगिक वसाहत दाखविण्यात आली ज्याला पूर्वी 'कम्युन' असे म्हणत असत त्याला आता 'इंडस्ट्रियल टाऊनशिप' असे म्हणतात अगदी आवश्यक तेथेच यत्राचा उपयोग बाकी सर्व काम माणसाने करावयाचे तयार झालेल्या वस्तु निर्यात करायच्या किंवा मोठ्या कारखान्याला पुरवायच्या यांत्रिक शेती झाल्यामुळे बेकार झालेल्या श्रमिकाची ही सोय आहे त्यामुळे 'शेती सोडा पण खेडे सोडू नका' ही चीनची नवी घोषणा आहे आम्ही कारखान्यातून बाहेर पडताना समोर उभ्या असलेल्या लोकाशी बोलू लागलो एक स्त्री म्हणाली, 'मी शिक्षिका आहे.' ती प्राथमिक शिक्षिका असेल अशा कल्पनेने एकाने प्रश्न केला, 'कोणत्या इयत्तेला शिकविता?' ती म्हणाली, मी विद्यापीठामध्ये ''स्पेस फिजिक्स''ची प्राध्यापिका आहे

चीनमधली तरुण पिढी ही खूप वेगळी आहे आमच्याबरोबर असलेल्या तरुण मार्गदर्शकाने आम्हाला सागितले की, आता माओचा जमाना गेला या तरुण मुलाना नवीन रॉक आणि पॉप सगीत आवडते जुन्या तऱ्हेचे 'ऑपेरा' त्याना आवडत नाही या मुलाना परदेशी जाण्याची, फॅशन करण्याची गाडी घेण्याची हौस आहे तो म्हणाला, आमची लग्ने आम्हीच ठरवतो आम्हाला समृद्ध चीन हवा आहे. पण त्याबरोबर आम्हाला समृद्ध वैयक्तिक जीवनहि हवे आहे लोकशाहीवाचून वैयक्तिक स्वातत्र्य, समृद्धी कशी मिळणार या प्रश्नाला ''लौकरच दिसेल पाहू'' इतकेच उत्तर त्या तरुणाने दिले पण बोललेल्या शब्दापेक्षा त्याचे न बोललेले भाष्य फार बोलके होते त्याचा प्रत्यय पुढच्या वर्षी आलाच चीनमधल्या युवकाची ही लोकशाहीची मागणी मनात ठेवूनच आम्ही भारतात परतलो

## काल आणि आज

विसाव्या शतका[illegible] [illegible] आहे. गल्या वर्षी चीनमध्ये तेनआनमेन चौकात लोकशाहीच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी फार मोठी निदर्शने केली चिनी शासनाने लष्करी बळाचा उपयोग करून कित्येक विद्यार्थ्यांना ठार मारले हजारो लोकाना कैदेत टाकले यानतर शेकडो लोकशाहीवादी चिनी विद्यार्थ्यांनी परदेशामध्ये आश्रय घेतला चौकात उभारलेला लोकशाहीच्या देवतेचा पुतळा तिथून हलला असला तरी आमच्या अंतःकरणातील लोकशाहीची ज्योत अजूनहि जळते आहे अशा घोषणा पॅरिसमध्ये राहणाऱ्या चिनी विद्यार्थ्यांनी केल्या. या उठावाला १ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या विद्यार्थ्यांनी या चळवळीकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी एका बोटीमध्ये ध्वनिक्षेपक बसवून पॅरिसपासून बीजिंगपर्यंत समुद्रयात्रा आरभली. अर्थातच या प्रयत्नाला अनेक राष्ट्रानी म्हणावा तसा पाठिंबा दिला नाही परतु या उठावाचे पडसाद साऱ्या जगभर दिसत आहेत चीनच्या प्रभावाखाली असणाऱ्या हॉंगकॉंग आणि मकाव या दोन्ही भागात तीव्र निराशेची लाट आलेली [illegible] आहे या दोन्ही प्रदेशातील ध्येयवादी तरुणाना

चिनी शासन लोकशाहीचा उठाव सहजासहजी खपवून घेईल अशी अजीबात आशा वाटत नाही यामुळे त्याच्या मनात तीव्र निराशा निर्माण झाली आहे. पर्व युरोपमध्ये जो बदल घडतो आहे त्या बदलाच्या पाठोपाठ चीनमध्ये लोकशाहीचा उठाव अटळ आहे असे दिसते अहे.

खुद्द चीनच्या अंतर्गत राजकारणात जो फरक झाला आहे तो म्हणावा तितक्या प्रकर्षाने लोकाच्या नजरेसमोर आलेला नाही चिनी शासनाने झाओ झियाँग याना पदच्युत करून इतिहास नव्याने लिहिण्याला सुरुवात केली तेन–आन–मेन चौकात जे घडले किंवा 'अगा जे घडलेचि नाही' त्याचे विपर्यस्त वृत्त पाश्चिमात्य माध्यमांनी दिले असे भासवण्याचा प्रयत्न चिनी शासनाने केला गेल्या वर्षी लोकशाहीसाठी ज्यानी आपले अश्रु आणि रक्त सांडले त्या विद्यार्थ्यांची आज चीनमध्ये उघडपणे आठवणहि काढता येत नाही त्यामुळे चीनमध्ये राहणाऱ्या आणि लोकशाहीवर श्रद्धा ठेवणाऱ्या विचारवतांना एकच मार्ग उरला आहे तो म्हणजे पळून जाणचा. एक निवृत्त प्राध्यापक म्हणाला, मला परदेशात झाडूवाल्याची नोकरी मिळाली तरी चालेल त्यासाठी खोटा पासपोर्ट घेऊन पळावे लागले तरी चालेल. यासाठी गरज पडेल तर लाच देऊन, पोलिसामध्ये ओळख काढून मी पळून जाईन. हेहि न साधले तर एखाद्या अमेरिकन स्त्रीशी करारी लग्न करूनसुद्धा मी येथून पळून जाणार आहे. आज चीनमध्ये परिस्थिति अस्थिर आणि वातावरण भ्रष्टाचारी आहे बँकेमध्ये पैसे ठेवणाऱ्यापेक्षा काढणाऱ्यांची गर्दी आहे आजवर अशी समजूत होती की, दग शिया पिंग राजवटीत आपले मत व्यक्त करण्याचा तरी अधिकार तरुणांना आहे. परतु ज्या निर्दय रीतीने या तरुणाच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या ते पाहिले म्हणजे राजकीय सत्ता ही बदुकीच्या नळीतून निर्माण होत असते, या माओच्या वचनाची आठवण होते

सरकारचे म्हणणे असे आहे की, जून ४ ला तेन आन मेन चौकात ज्या लोकाच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या ते लोकशाहीवादी तरुण नसन गुडगिरी करणारे समाजघातकी लोक होते. चिनी समाजवादात मतस्वातत्र्य असले तरी ते सरकारी मत व्यक्त करण्याचे मर्यादित स्वातत्र्य आहे. विरोध करण्याचे स्वातत्र्य नाही चिनी विचारवत थंड चेहेरे करून बोलत असतात जणू आपल्या चेहऱ्यावर जरासुद्धा सरकारविरोधी भाव दिसला तर आपली काही धडगत नाही असेच त्यांना वाटत असते. दुसरे एक समाजशास्त्रज्ञ म्हणाले की, आम्हाला काय वाटते ते आम्ही बोलत नाही आमच्या मनात काय आहे हे आम्ही दाखवत नाही मुक्त उद्गाराला या राजवटीत जागाच नाही चौकात झालेल्या अत्याचाराची छायाचित्रे गुडघ्यावर बसलेल्या तरुण नेत्याना पाठीमागून घातलेल्या गोळ्या, उपोषणाला बसलेल्या विद्यार्थ्यांच्या अगावर घातलेल्या रणगाड्याची छायाचित्रे आज सगळ्या जगभर उपलब्ध आहेत चिनी नेत्याना मात्र असे वाटते की साऱ्या जगाने तिकडे डोळेझाक केली आहे

यावर्षी (१९९०) मध्ये बीजिंगला गेलो असताना भारतीय राजदूत रगनाथन आणि चीनचे अध्यक्ष, परराष्ट्रमत्री याची भेट घेता आली चीनचे महामत्री ली फग याची

स्वतंत्र भेट झाली भारत-चीन सीमावादाबद्दल बोलताना ते म्हणाले, "हा प्रश्न सोडवायला चीन उत्सुक आहे, पण असे आंतरराष्ट्रीय प्रश्न पुरेशी राजकीय मदत आणि काळजीपूर्वक वाटाघाटीवाचून सुटत नसतात."

चीनमध्ये वेगाने होत असलेला बदल स्पष्ट दिसतो आहे कोणी स्पष्ट बोलत नसले तरी तरुण पिढी लोकशाहीच्या मागे उभी आहे असेच चित्र आहे. कम्युनिस्ट राजवट असल्याने अनेक गोष्टी त्यांना शक्य झाल्या आहेत. बीजिंगमध्ये भिकारी नाही, झोपडपट्टी नाही, वेश्याव्यवसाय नाही. सर्वसाधारण पगार तीनशे युवान (१ युवान = ४।। रुपये) महिना यात भागते कारण वीज, स्वयपाकाचा गॅस आणि चोवीस तास पाणी असलेल्या तीन खोल्याच्या घराचे भाडे फक्त २० ते २५ युवान आहे. सर्व जमीन सरकारच्या मालकीची आहे. घर घेता येते, पण जमीन घेता येत नाही. प्रत्येकाला सायकल आहे. आता खासगी धंदा करण्याची मुभा आहे. खाण्याचे पदार्थ स्वस्त आहेत. किमती स्थिर आहेत. एकापेक्षा अधिक मुले झाल्यास सर्व सरकारी सवलती बंद होतात. राष्ट्रीय कामासाठी न्यायालये आडवी येऊन 'स्थगिती' देत नाहीत. उद्योगधंदे वाढत आहेत. परदेशी पर्यटक येत आहेत. जुने बंद गळ्याचे काळे कोट गेले आहेत. भांडवलशाहीचा प्रभाव वाढत गेला तर काय होईल हे सांगणे कठीण आहे आज तरी अवस्था थोडी आशा- थोडी भीति अशी आहे

चार जून १९८९ ला ज्या तरुणांनी लोकशाहीचा जयघोष केला त्यातले जे पकडले गेले त्यांचे हात मागे बांधून त्यांना गुडघ्यावर बसवून त्यांच्या मस्तकात गोळी मारून चिनी राजसत्तेने त्याचा खून केला "एक जखम, आणिक येशू तुझ्या काळजात" हेच खरे. चीनमध्ये बदल जरून होणार आहे, पण तो चिनी नेतृत्वाला आवडेल अशा दिशेने आणि अशा गतीने असे नवे पक्षसचिव म्हणतात. याचा अर्थ चीनमध्ये लोकशाहीच्या नावाखाली आत्मा नसलेली राजकीय रचना निर्माण होणार काय असा प्रश्न अभ्यासकांच्या मनात येत आहे.

(केसरी, लोकसत्ता)

❀ ❀ ❀

६३२ ६३९२ २२/८/९२

## भाऊबंदकीने दुभंगलेला देश

# श्रीलंका

आज काल, श्रीलंकेत चालेलल्या राजकीय घडामोडी आणि हिंसाचार याबद्धल मी ज्या ज्या वेळी वाचतो, त्यावेळी माझ्या मनात एकच आर्त उद्‌गार निघतो की, या सुदर देशाला झाले आहे तरी काय? श्रीलंकेची आजची स्थिती पाहिली म्हणजे खरोखरच असे वाटू लागते की, टाळता येण्याजोग्या भाऊबंदकीने दुभगणारा हा निसर्गसुंदर देश आहे

अगदी प्रथम १५-२० वर्षापूर्वी मी श्रीलकेला गेलो आणि त्या देशाच्या प्रेमातच पडलो त्यानतर मधूनमधून जात राहिलो ४-५ वर्षापूर्वी युनायटेड नेशन्सचा, समाजकल्याण सल्लागार म्हणून मला श्रीलंका येथे नेमण्यात आले आणि ओळीने २ वर्षे, चार चार महिने जाऊन श्रीलंकेच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा मी अभ्यास केला. श्रीलंकेच्या समाजकल्याण मत्रालयाचे धोरण आणि नियोजन यात काय बदल करता येईल याचा एक अहवाल तयार करून तो श्रीलंकेचे पंतप्रधान श्रीयुत प्रेमदास आणि अध्यक्ष श्री जयवर्धने यांना मी सादर केला, हा अहवाल 'गोखले अहवाल' म्हणून श्रीलंकेच्या लोकसभेने मजूर केला आहे. या कामाच्या निमित्ताने श्रीलंकेमधील अनेक थोर माणसांचा आणि त्या समाजाचा परिचय झाला

### मातीला मसाल्याचा सुगंध

श्रीलंकेच्या माझ्या वास्तव्यात मी जरी कोलबो येथे राहात होतो तरी कामानिमित्त प्रत्येक जिल्ह्यात मला जावे लागे. कोलबोहून उत्तरेकडे जायला निघाल्यानंतर वाटेत एक मोठी कालुतरा नावाची नदी किंवा गगा लागते या गगेच्या काठी बुद्धाचे अवशेष प्रथम आणले गेले. त्या ठिकाणी मोठा स्तूप आणि मंदिर उभारलेले आहे. तेथून पुढे जाताना उजव्या बाजूला समुद्राची जी किनारपट्टी आहे ती डोळ्याचे पारणे फेडील अशी आहे

काठाशी हिरवट निळा असणारा हा समुद्र दूरवर अधिकाधिक गडद निळा होत जातो पारदर्शक असल्यामुळे आत मोठी प्रवाळाची झाडे दिसतात काठावर एकसारख्या आदळून त्या लाटा फेसाचा रुपेरी चुरा उधळत असतात अशा शामसुदर सागराच्या बाहुपाशात, राहिलेल्या हिक्कादुवा नावाच्या छोट्या बेटावरची घरे आणि माणसे सदैव लाटाचे सगीत आणि सागराची निळाई याच्या एका शाश्वत धुदीत असल्यासारखीच आहेत या बुद्धमदिरामध्ये, देवापुढे सागितलेले मागणे कधीच वाया जात नाही असा या लोकांचा विश्वास आहे सध्याच्या तामिळ–सिंहली वादामध्ये हे एकात्मतेचे मागणे मागावे इतकेच मला वाटले

उत्तरेकडे जाताना वाटेत आम्ही श्री थिओडोर गुणशेखरे, याच्या घरी गेलो. हे समाजकल्याण सचिव होते आणि नतर रेडिओ सिलोनचे महानिरीक्षक होते टी. जी याच्या घरी गेल्यावर जेवणाने स्वागताला सुरुवात झाली त्याच्या जेवणावर भारतीय विशेषत तामिळ स्वयंपाकाचा खूप परिणाम आहे दोशासारखा, वाटीच्या आकाराचा "हॉप्सर्स" (आपल्याकडील अप्पम्) नावाचा एक पदार्थ देऊन जेवणाला सुरुवात होते, त्यानतर मासे आणि भात नारळाचे पाणी, तेल आणि खोबरे यानी हे जेवण रसभरित केले जाते जेवणाच्या शेवटी 'किरिपानी' नावाचा एक प्रकार देण्यात आला, दह्यामध्ये मध किंवा गुळाची काकवी घालून हा पदार्थ करण्यात येतो, हा एक अतिशय लोकप्रिय असा मिष्टान्नाचा प्रकार आहे. जेवण झाल्यानतर टी जी. च्या अगणात आणि परसात हिंडताना गोव्याची आणि कोकणाची फार आठवण होत राहिली. पण आम्ही चकित कशाने झालो असलो तर तेथील मसाल्यांच्या पदार्थांनी. त्यांच्या घराच्या मागच्या अंगणात ८–९ फुटाचे मोठमोठ्या लागडाचे धलपे बाधून ठेवलेले होते मला वाटले हे सरपण दिसते आहे. पण त्याला मसालेदार गध होता टी जी म्हणाले की तिचा वास घेऊन बघ, ही दालचिनी आहे. आपल्याकडे ज्याच्या साधारण छोट्या तुकड्यांची किंमत मुबईत ६० रुपये किलो असते अशा चवदार मसाल्याच्या पदार्थांच्या मोळ्याच्या मोळ्या अंगणात रचून ठेवलेल्या होत्या याशिवाय बागेमध्ये झाडाला लागलेल्या काळ्यामिऱ्या, हिरव्यामिऱ्या, वेलदोडे, लवग ह्या सगळ्या वेली आणि वृक्ष पाहून या मातीलाच काही वेगळ्या मसाल्यांचा सुगध आहे असे मला वाटू लागले जमिनीखाली रत्नांच्या खाणी आणि वर मसाल्यांची बेटे. माणसाला आणखी हवे तरी काय ?

तिथून पुढे जाताना प्रथम मोठे गाव लागते ते म्हणजे रत्नपूर. सिंघला भाषेमध्ये सस्कृतपासून आणि प्राकृतपासून आलेले पुष्कळ शब्द आहेत राष्ट्र शब्दाचे रूप 'रट' असे झालेले आहे त्यामुळे रतुनायके हा राष्ट्रनायक असतो, जर्मन भाषेतहि 'रॉल हौस' असा नगरभवनासाठी शब्द आहे लकेच्या मध्यभागी अनुराधापूर नावाचे एक सुंदर गाव आहे. अनुराधापूरची सुदर राज्यकन्या आणि तिचा प्रेमविवाह याबाबत अनेक कविता आणि कथा प्रसिद्ध आहेत. अनुराधापूरहून पुढे जायचे तर वाटेत लागते कॅन्डी

## निसर्गसुंदर कॅन्डी

कॅन्डी हे साधारण डोंगरमाथ्यावर वसलेले गाव. कॅन्डी विश्वविद्यालयामध्ये मी अनेकदा गेलो कॅन्डीला ज्या ठिकाणी आम्ही राहात होतो त्या हॉटेलचे नावच 'सॅन्डी रिव्हर' असे होते. हिरव्या रगाच्या नाजूक वळणाच्या नदीच्या भोवती असलेली रुपेरी वाळू हा त्या निसर्ग वैभवाचा भाग होता कॅन्डी हे डोंगरावर हिरव्यागार वनराईत वसलेले गाव आहे. कोठूनहि तेथील बुद्ध मदिराचा कळस दिसतो आणि लपडाव खेळल्यासारखा, अधूनमधून नदीचा प्रवाह दिसत राहतो. कॅन्डीचे बुद्धमदिर हे फार प्रसिद्ध आहे. बुद्धाचे अवशेष म्हणून भगवान बुद्धाचा एक दात, हेमामालिनी नावाच्या शिष्येने आपल्या आबाड्यामध्ये लपवून आणला, अशी एक लोककथा आहे तो दात देवाच्या मदिरात प्रचड सुवर्ण स्तुपाखाली ठेवलेला असतो आणि त्याची रोज सांजसकाळ पूजा केली जाते वर्षातून एकदा आपल्याकडे देवाची पालखी निघते तसा बुद्धाचा परिहार निघतो परिहाराच्या पुढे अनेक शृगारलेले हत्ती, मागे पालखी त्यानतर वाद्यमेळा, नर्तकी आणि शेवटी भाविक गण असतो श्रीलकेच्या माझ्या वास्तव्यात माझ्याबरोबर सदैव समाजकल्याण मत्रालयाचे सचिव, सचालक ही मडळी असत. त्यामुळे थट्टेने आमच्या सर्व भेटींना तेथील मडळी 'गोखले परिहार' असे म्हणत असत देवळामध्ये आमचे सरकारी स्वागत झाले सरकारी स्वागत म्हणजे गोपुरापाशीच विड्यांचा पानाचा मोठा जुडा आणि शहाळे देऊन स्वागत केले जाते केळीचे खाब रस्त्याच्या दुतर्फा लावतात त्या मांडवाखालून आपल्यापुढे युवक आणि युवती ढोल आणि झाजा यांच्या तालावर नाचत पुढे जातात, त्यांच्या मागे पाहुण्याची मिरवणूक प्रत्यक्ष समारभाच्या ठिकाणी काही खुर्च्यांवर पाढरे वस्त्र आंथरलेले दिसले त्यावेळी चौकशी केल्यानंतर कळले की बुद्ध भिक्षूसाठी ही आसने आहेत. प्रत्येक समारभाची सुरुवात बुद्ध भिक्षूच्या आशीर्वादाने होते, त्यानंतर माडाच्या पानाचे पखे हलवीत ही भिक्षू मडळी आपल्या जाभया पंख्याच्या आड लपवीत तांत्रिक चर्चा ऐकत बसलेली असतात रत्नपूर, अनुराधापूर ही शहरांची नावे मात्र आपल्याला थेट महाभारत काळात नेऊन सोडतात सिंघला भाषेमध्ये आभार मानताना 'इस्तुति' स्तुति असे म्हणतात तर सस्कृत भाषेतील तरतम भाव दाखविणारा प्रयोग वापरून मंत्रिमहोदयांना 'अमात्योत्तम' असे म्हणतात सिंघला भाषेमध्ये दुधाला कीर म्हणतात संस्कृत क्षीरचे हे रूप आहे अभिवादनादाखल आपण नमस्कार म्हणतो तसे ते 'आयुबोवान' (आयुभवान किंवा आयुष्मान भव) असे म्हणतात मोठ्या शहाळ्याला तामिली असे म्हणतात. काही तामिळ शब्दही सिंघला भाषेत आलेले आहेत जगप्रसिद्ध असलेले 'सूप' मुलीगटानी' याचे मूळ तामिळ 'मुलीग तन्नी' किंवा तिखट' मसालेदार पाणी असे आहे

कॅन्डीपासून वरच्या डोंगरात ''नुआरलिआ'' येथे चहाचे मळे आहेत या मळ्यावर असणाऱ्या मळेमालकाचे बगले हे जुन्या ब्रिटिश साम्राज्य काळातील वैभवाचे निदर्शक आहेत खूप उचावर असलेले हे राजवाड्यासारखे बगले मुळात

चांगले ऐसपैस आहेतच पण त्याच्या भोवती असलेल्या प्रचंड बगीच्यामुळे, झाडाच्यामुळे आणि त्या उंचीमुळे मला तर ते नेहमीच स्वप्नधूसर वाटत आले आहेत सकाळी अंगणात चहाला बसलो बंगल्याच्या कमरेला धुक्याने घातलेल्या घट्ट मिठीमुळे वातावरण वेगळेच स्वप्नील झाले होते धुक्याची मिठी तर कशी लेकराने आईला गळामिठी घालावी तशी साखरमिठी हवीहवीशी श्रीलंकेमध्ये आपण ज्याला बाग म्हणतो अशा खुरट्या झुडपाच्या बागेची कल्पना संभवतच नाही. बाग म्हणजे पार गगनाला जाऊन भिडलेले प्रचंड वृक्षच आणि त्यांच्यावरच चढलेल्या मसाल्याच्या वेली असतात. त्या बंगल्याच्या आवारात निवडुंगाचे झाडसुद्धा दोन मजले उंच गेलेले होते अंगणात तऱ्हेतऱ्हेचे रंगीबेरंगी फुलाचे ताटवे, त्यामुळे बंगल्याच्या समोर व्हराड्यात सध्याकाळी किंवा सकाळी बसल्यावर स्वर्ग दोन बोटे उरतो असे वाटावे यात नवल नाही आपल्या भोवतालचा सर्व प्रदेश खालची दरी त्यावेळी दाट धुक्याने झाकलेली असते क्वचित त्या धुक्यातून दिसले तर उंच झाडाचे शेंडे तेवढे दिसायचे वरली आभाळाची निळाई, सभोवार धुक्याची दाट किनारपट्टी आणि लाबवर दिसलाच तर निळाशार समुद्र. या निसर्गसुंदर वातावरणातील ही सुखद शांतता आपल्याला साय-साखरेची मिठी घालतो आणि मनात आपोआपच तानपुरे गुंजायला लागतात. माझे आतिथ्य करणारे श्री. गामिनी तामित्ता यांच्या बादुल्ला ग्लेन अल्पाइन टी एस्टेटवर अंगणात सुप्रसिद्ध सिंघला गायक श्री. अमरदेव यांचे गाणे ऐकले आणि केरळच्या येशुदासाच्या गीतांच्या आठवणीत मनाला एक सुखद झोका मिळाला.

त्या मानाने चहाचे मळे मात्र मला सुदर वाटले नाहीत कारण चहाची झाडे पार बुटकी ती फार वाढू देत नाहीत, नाहीतर त्याची पाने खुडताच येणार नाहीत. येथे डोंगरावर मुख्यत चहाचे मळे, मालकाचे बगले आणि त्यांचे क्लब्ज आहेत एक दिवस एका क्लबमध्ये 'जॉर्ज' नावाची आसामी मला भेटली त्याला मळ्यात राहायचे एकात जीवन हेच पसत. कॅन्डीला भेटलेल्या एका श्रीलंकन मुलीशी त्याला लग्न करायचे होते परतु त्याच्या आई-बापाना ते पसत नव्हते आणि नुसती मैत्री म्हणून राहणे या मुलीला पसत नव्हते या सघर्षामध्ये जॉर्ज हा आतल्या आत जळत राहिला, एकातप्रिय झाला त्यामुळे जॉर्जच्या आयुष्यात दोनच अक असत, खूप पिऊन खूप बडबड करायची किंवा अजिबात गप्प बसून कामकाज पहायचे ज्या क्लबला आम्ही गेलो होतो तेथे जाण्याची वाट अरुंद, वळणावळणाची, 'बिकट वाट वहिवाट नसावी' या कवी आनंद फंदीच्या उक्तीच्या अगदी जवळ जाणारी होती जॉर्जच्या बरोबर त्याच्यासोबत एक धिप्पाड अल्सेशियन कुत्रा असायचा. त्या क्लबचे वातावरण इतके सुंदर आणि तो क्लब इतक्या उंचीवर होता की, सध्याकाळी धुके पडल्यावर आपण एका नक्षत्राच्या घरात बसलो आहोत असे वाटू लागले हातात मोतीया रंगाचे मादक रसायन घेऊन आभाळाकडे बघत जॉर्ज बसला होता त्या दिवशी क्लबात आम्ही तीन-चार लोकच होतो आणि जॉर्जच्या

बोलण्याचा अंक सुरू झाला होता एखाद्या लहान मुलासारखा तो भडाभडा बोलू लागला पडद्यामागून पडदा उघडावा तसे आयुष्याला नाटकाचे वेगवेगळे प्रवेश, वेगवेगळे अंक आमच्या नजरेसमोर तो उभे करीत होता आणि सांगत होता, ''या गर्दीच्या जगात मी एकटाच आहे हो.'' कळस म्हणजे शेवटी दोन्ही तळव्यात डोके धरून तो ओक्साबोक्शी रडू लागला इतक्या सुंदर जागेत इतके वैभव असताना, या जगाच्या गर्दीत एकटा असलेला तो माणूस दोस्तीच्या, आपुलकीच्या शोधात वणवण फिरत होता. रात्री अकरा वाजता बैठक संपल्यानंतर तो परत जातो म्हणाला, तेव्हा मलाच त्याची काळजी वाटू लागली. दिव्याचे ठिपके दिसेपर्यंत जीव मुठीत धरून आम्ही बघत होतो, शेवटी ठिपके दिसेनासे झाल्यावर आम्ही आत आलो

आमचा हा मित्र श्रीयुत लील गुणशेखरे हा एकेकाळचा परराष्ट्र सचिव, त्यानंतर श्रीलंकेत झालेल्या राजकीय बदलानंतर समाजकल्याण संचालक झाला होता. सिंघला भाषेतील एक नामवंत लेखक, साहित्य सभेचा अध्यक्ष आणि रेडिओवर नेहमी बोलणारा हा गोष्टीवेल्हाळ गृहस्थ आहे. चवदार खाणे आणि चविष्ट गप्पा मारणे हा लीलचा स्वभावविशेष आहे त्याच्या जवळ असंख्य चुटके, किस्से आणि गोष्टींचा भरणा कायम असतो

## भाऊबंदकीचा इतिहास

कॅन्डी बघून निघून आम्ही उत्तरेकडे जाफनाकडे गेलो त्यावेळी आमच्या जोडीला मजूर नेते आणि तामिळांचे पुढारी श्रीयुत थोंडामन हे होते थोंडामन हे चांगले विश्लेषक आणि राजकीय विचारवंत आहेत ते मला तामिळ आणि सिंघला मंडळी यांच्यातील या भाऊबंदकीचा इतिहास सांगत होते ते म्हणाले की, कॅन्डीमध्ये राहणारी सिंघला मंडळी, ज्यांना कॅन्डीयन म्हणतात (जुन्या 'कंद' राजाचा तर हा वंश नव्हे?) ते आपण उत्तर हिंदुस्थानातून रजपूत राजवंशातून श्रीलंकेत आलो असे म्हणतात त्यामुळे त्यांच्या घरामध्ये आजसुद्धा हत्तींच्या प्रचंड दातांची कमान करून दिवाणखान्यात मांडण्याची, बैठकीच्या जागी छत्रचामरे ठेवण्याचा परिपाठ आहे. त्यांच्या बायका उजवीकडून डावीकडे पदर घेतात पण गोल साडीच्या निऱ्या एखाद्या पसरलेल्या पंख्यासारख्या करून खोवतात संगीताची आणि नृत्याची परंपरा या लोकांच्यात पुष्कळ आहे

फार फार वर्षांपूर्वी मसाल्याच्या शोधात निघालेले डच व्यापारी श्रीलंकेच्या किनाऱ्याला उतरले आणि त्यांनी तांबूस रुपेरी वाळूच्या रंगावरून श्रीलंकेला 'ताप्रोबान' असे नाव दिले त्याचे मूळ 'ताम्रवर्ण' असे असेल असे श्रीयुत थोंडामन म्हणत होते युरोपातून जहाज घेऊन निघालेल्या डच साहसी दर्यावर्दी खलाशांना, आशियातील चहा, रस्ते, रेशीम आणि मसाले यांची लालसा होती श्रीलंकेत तर वैभवाचे हे सर्वस्व साठविले होते एकेकाळी तेथील राजाने ठायी ठायी कालवे खोदून सर्व देशात पाणी फिरविले आज मात्र सर्व कालवे बुजले गेले

आहेत, नव्या नियोजनात ते कालवे पुन्हा उकरून पाणी सर्वत्र पोचवण्याचा प्रयत्न ''महाबेली गगा'' प्रकल्पातून केला जात आहे.

## समृद्ध श्रीलंका

अनुराधापूर आणि रत्नपूर या भागात १५-२० फूट खोदल्यावरसुद्धा रत्ने मिळण्याचा सभव असतो असे आजही काही लोक मानतात त्यामुळे आजही रत्नपुरात आपल्याला रत्ने सापडतील म्हणून अनेक शेतातून, डोंगरउतारावरून लोक खोदत आणि शोधत बसलेले दिसतात श्रीलकेमधील खड्याची जात ही आफ्रिकेतील रत्नांच्याइतकी सरस नसली तरीसुद्धा पुष्कळच चागली आहे त्यामुळे रत्नाचा व्यापार, चहाचे आणि मसाल्याचा व्यापार यामुळे श्रीलंकेत समृद्धीचा पाया आहे हे या दर्यावर्दी माणसांनी केव्हाच ओळखले होते श्रीलंकेमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार झाल्यानतर अनेक ठिकाणी स्तभ, गुफा, बुद्धमदिरे उभी राहिली आपल्याकडील शेषशायी ही एकच विष्णुमूर्ति निजलेल्या देवाची आहे. तशीच भगवान बुद्धाची निजलेली मूर्ति थायलड आणि श्रीलंकेत उपलब्ध अहे भारतातील श्रवणबेळगोळला असलेल्या दिगबर मूर्तिप्रमाणेच बुद्धाची खूप प्रचंड डोंगराएवढी उच मूर्ति अनुराधापूरच्या जवळ आहे. त्याच ठिकाणी हिंदू मदिरेहि आहेत आपल्याकडील दाक्षिणात्य मदिराप्रमाणे आतले देव सकाळी आरती झाल्यावर पडदे लावून झोपतात आणि त्याना सध्याकाळी पूजेसाठी पुन्हा उठवतात. गमत ही आहे की, रामाच्या सीतेला पळविणारा रावण, हा श्रीलकेचा राजा असे आपण मानतो, परतु बुद्ध श्रीलकेमध्ये रावणाची एकही खूण शिल्लक नाही. श्रीलकेतील राजवशाबद्दल आणि इतिहासाबद्दल उपलब्ध असलेले महाकाव्य म्हणजे 'महावस' परतु या काव्यातही राम कथेचा वा रावणाचा उल्लेख नाही

## तामीळ मजुरांचा प्रश्न

श्रीलकेतील सततचा गारवा, योग्य तितका पाऊस हा चहाला पोषक आहे, असे ज्यावेळी लक्षात आले, त्यावेळी डच लोकाच्या नतर आलेले पोर्तुगीज आणि इग्रज यानी येथे चहाचे मळे लावायला सुरुवात केली खुद्द श्रीलंकेमध्ये त्यावेळी लोकवस्ती कमी जी माणसे होती ती आपल्या शेतीवाडीवर समाधानात आणि सुखात होती. त्यामुळे चहाचे मळे वाढवायचे तर त्यासाठी मजूर हवेत, म्हणून दक्षिण भारतातून मजूर लोकांना आणायला सुरुवात झाली

श्रीलंकेचा उत्तर भाग आणि भारताचे दक्षिण टोक यांच्यात अंतर फारसे नाही एका रात्रीचा प्रवास आहे, त्यामुळे लक्षावधी तामिळ मजूर श्रीलकेत आले, स्थायिक झाले तेथील राजकारणात, समाजकारणात रस घेऊ लागले. आजही श्रीलंकेतील सरकारात वरिष्ठ जागेवर अनेक तामिळ मडळी आहेत अनेकाच्या नावाचा इतिहास पाहू लागलो तर भंडारनायके, आर्यरत्ने, गुणशेखरे इत्यादी नावांच्या मागे असलेल्या भारतीय परपरेचे सूत्र सहज लक्षात येते इग्रज माणसानी जे जातीय त्रिकोणाचे

राजकारण भारतात केले तेच श्रीलंकेत केले त्यामुळे श्रीलंकेमध्ये राज्य करणारे हे इंग्रज आणि प्रजा मुख्यत: सिंहली आणि तामिळी त्यामुळे तामिळ आणि सिंहली या दोन गटात सदैव फूट कशी राहील याचा विचार इंग्रज राज्यकर्त्यांनी केला एखादा माणूस चळवळ करीत आहे असे दिसले तर त्या माणसाला एखादी पदवी देऊन, इग्लंडला पाठवून त्याची योग्य ती व्यवस्था केली जात असे दुर्दैवाची गोष्ट अशी की, श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही दिवसातच श्रीलंकेच्या राजकारणात एक तिसराच प्रभाव सुरू झाला आणि तो प्रवाह कम्युनिस्ट विचाराचा होता ज्या काळात भारतामध्येही नक्षलाइट विचाराची सुरुवात झाली, त्या काळात मलेशियात दंगे झाले, इंडोनेशियात उठाव झाला, त्याच काळात श्रीलंकेमध्ये तरुण कम्युनिस्टांनी फार मोठा उठाव केला हजारो माणसे मारली गेली लष्कराच्या मदतीशिवाय एका भागातून दुसऱ्या भागात जाणे मुष्कील झाले त्यावेळी या वाट चुकलेल्या तरुणांच्यासाठी (इनसर्जंट्स) त्यावेळीचे तुरुंग खात्याचे महानिरीक्षक श्री पिलाई आणि त्यानंतरचे प्रमुख श्री प्रिया डेलगोडा यांनी या युवक विद्रोहकांचे पुनर्वसाचे कार्यक्रम कसे राबवता येतील याचा विचार केला पुनर्वसनाचा एक भाग म्हणजे त्यांना वैचारिकदृष्ट्या बदलणे हा होता सुदैवाने भंडारनायके पंतप्रधान झाल्यानंतर पुनर्विचाराला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आणि ही चळवळ आटोक्यात आली परंतु या चळवळीमधून हिंसाचार आणि कत्तलीचे शास्त्र मात्र अनेक लोक शिकले

बहुसंख्य तामिळ मंडळीही चहाच्या मळ्यात मजुरी करीत असल्यामुळे, त्यांचे जीवनमान भूधारक सिंहली माणसापेक्षा वेगळ्याच तऱ्हेचे आहे. त्यांचा पगार, त्यांच्या कामाची स्थिती, त्यांची घरे सगळ्याचा विचार केला तर हा एक फार मोठा शोषित गट आहे यात शंका नाही इतर देशाप्रमाणेच, राजकारणी मंडळी तामिळ मजुरांच्या मतांवर निवडून आली पण त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी काही ठोस प्रयत्न केले गेले नाहीत श्रीयुत थोंडामन यांच्यासारखा एखादा अपवाद वेगळा, ज्या ज्या वेळी आम्ही चहाच्या मळ्यात गेलो त्या त्या वेळी तिथे असलेल्या मजुरांच्या हलाखीच्या स्थितीचा विचार हा माझ्या मनात सलत राहिला आणि या लोकांच्यासाठी शासन फारसे काही करीत नाही हे ठळकपणाने दिसू लागले तामिळ माणसात असणारी तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि संघटनशक्ति यांच्या बळावर नव्या पिढीतील मुले आणि मुली आपल्या मागण्यांचा विचार ठामपणे करायला लागलेली आहेत असे हळूहळू दिसू लागले त्यावेळी मी श्रीलंकेचे शासन आणि भारतीय राजदूत यांना मी वृत्तांत दिला माझ्या सांगण्याचा सारांश असा होता की, हे सारे पूर्व भारतीय तामिळ, यांचा प्रश्न शांततेने सुटला नाही तर येथे भडका उडण्याचा संभव आहे. असा भडका उडाला तर या अंतर्गत प्रश्नापासून आपण सर्वस्वी अलिप्त आहोत हे सांगून भारताला हात झटकून मोकळे होता येणार नाही कारण हे तामिळ मूळचे भारतीय त्यांचे पूर्वापार संबंध आणि नातलग, त्यांची पाळे-मुळे तामिळनाडू आणि केरळामध्ये खोलवर रुजलेली आहेत त्या सुमाराला तामिळ मजुरांच्या प्रतिनिधींना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले पण

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात न आल्यामुळे म्हणत किंवा भंडारनायके यांची राजवट बदलल्यानंतर, आता सर्व काही स्थिरस्तावर झाले असे वाटल्यामुळे म्हणा, जयवर्धने सरकारने या प्रश्नाची दखल घेतली पण ती फार उशिरा तोपर्यंत 'तामिळ वाघ' आणि इतर चळवळी भक्कम झाल्या होत्या

## भाऊबंदकीचा अंक पहिला

या भाऊबंदकीमधील पहिला अंक असा होता की, पोलिस आणि लष्कराच्या बळावर आपण या परिस्थितीवर काबू ठेवू शकू असे श्रीलंका शासनाला वाटत राहिले. प्रत्यक्ष घडले मात्र वेगळेच पोलिसांना अपयश आल्यानंतर, लष्कराचा उपयोग करण्यात आला एखादी लढाई असावी त्याप्रमाणे बॉंब आणि तोफा यांचा सर्रास वापर केला गेला याचा परिणाम एकच झाला आणि तो म्हणजे तामिळ युवाशक्तींनी सशस्त्र बंडाचा मार्ग उद्घोषित केला येणाऱ्या जाणाऱ्या लष्कराच्या वाहनावर बॉंब टाकले बराकी पेटवून दिल्या, लष्करी अधिकाऱ्यांचे खून करण्यात आले, एकदा हे सूडचक्र सुरू झाल्यानंतर लष्कराने तितक्याच तीव्रपणाने प्रतिकार सुरू केला. देशाचा विकास, देशाची शांतता, सारे काही थांबल्यासारखे वाटले अशा वेळी भारताने राजनैतिक मध्यस्थी करावी म्हणून प्रयत्न सुरू झाले मद्रासचे मुख्य मंत्री, श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री, त्यावेळचे परदेश सचिव श्री रोमेश भंडारी यांच्या भेटी गाठी, येरझाऱ्या सुरू झाल्या सुरुवातीलाच श्रीलंकेचा हा अंतर्गत प्रश्न आहे त्यामुळे त्यात सल्लामसलतीच्या पलीकडे आपण जाणार नाही हे भारताने स्पष्ट केले. परंतु निर्वासित होणाऱ्या तामिळ लोकांचा लोंढा भारतात येत राहिल्यामुळे तामिळनाडू सरकारला या प्रश्नाचे गांभीर्य रोजच्या रोज वाढत आहे असे दिसू लागले. या निर्वासितांना परत पाठवावे तरी अवघड, रोखावे तरी अवघड, असा एक आंतरराष्ट्रीय यक्षप्रश्न निर्माण झाला

## भारतविरोधी शक्तींची हातमिळवणी

नंतरच्या दुसऱ्या अंकात तर भारत या उठावाच्या पाठीमागे आहे असा राजकीय हेत्वारोप श्री जयवर्धने यांनी केला. त्यामुळे नको असेल तर याविषयी आम्ही काहीच करणार नाही असे पंतप्रधान राजीव गांधी म्हणाले, पण रुसून, एकमेकाकडे पाठ फिरवून, प्रश्न आपोआप सुटणार नाही असे स्पष्ट दिसल्यानंतर श्रीलंकेने ही चळवळ आटोक्यात आणण्याकरिता इतर काही परकीय शक्तींच्याकडे (इस्राइल, अमेरिका आणि पाकिस्तान) मदतीचा हात पसरला लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, मदत देण्याकरिता इच्छुक असलेली सर्व राष्ट्रे हे भारतविरोधी देश आहेत. हे देश मदत देऊ शकतील पण त्या मदतीची - फार महाग राजकीय किंमत श्रीलंकेला मोजावी लागेल असे दिसल्यानंतर या मदतीचाही पुनर्विचार सुरू झाला आणि या भाऊबंदकीच्या नाटकाचा तिसरा अंक सुरू झाला आपण मरू किंवा मारू अशा जिद्दीला पोचलेला तामिळ समाज आणि त्यांना स्वायत्तता देण्याशिवाय

गत्यंतर नाही हे जाणणारे जयवर्धने सरकार याची रस्सीखेच सुरू झाली. ही स्वायत्तता आपल्याला मिळणारच असा विश्वास वाढल्यामुळे तामिळ समाज आपल्या मागण्या वाढवत चालला आहे. त्याचा शेवट फाळणीत होणार का अशी स्वाभाविक काळजी जयवर्धने सरकारला वाटत होती. ज्या सरकारी अधिकाऱ्यांना हे दडपशाहीचे धोरण पसत नाही अशा माणसांच्या बदल्या इतर प्रदेशात करून पंतप्रधान प्रेमदास यांनी आपल्या धोरणाचा पाठिंबा घट्ट केला आहे त्याची व्यूहरचना अशी होती की, मागण्या आटोक्यात ठेवण्याकरिता एकीकडे लष्कराचे दडपण चालू ठेवायचे, एकीकडे भारताशी गोड बोलून निर्वासिताचे लोंढे थाबवावयाचे आणि दुसरीकडे स्वायत्तता देऊन या दोन्ही जमातींना एकत्र नादायला लावायचे. असा हा पेचीदार आणि अवघड डाव आहे यात तामिळ आणि सिंहली लोकांच्या इतकेच इतरही राजकीय पक्षोपक्ष आणि देश गुतलेले आहेत त्यामुळे हे नाटक केव्हा सपणार आणि कसे सपणार याची काळजी श्रीलंकेच्या इतकीच इतर शेजाऱ्यांना पडलेली आहे.

## वांशिक झगड्याची आर्थिक बाजू

श्रीलका हा छोटासा देश आहे पुष्कळसे जिल्हे हे भारतातील लहान तालुक्यासारखेच आहेत श्रीलकेमध्ये शिक्षणाचा प्रसार फार मोठा आहे पाच विश्वविद्यालये आहेत भारतापेक्षा त्याची सामाजिक सुरक्षापद्धत अधिक चागली आहे परतु गरिबीचा प्रश्न मात्र अजून सुटलेला नाही समाजाचे दोन भाग, कोलबोसारख्या ठिकाणी राहणारे वरिष्ठ वर्गातील व्यापारी, वकील, डॉक्टर इत्यादी व्यावसायिक मंडळी. खेड्यात राहणारे जमीनदार, श्रीमत शेतकरी, (ज्याच्याकडे घरी एखादा हत्ती, प्रचड वाडा, जवळपास मोठ्या मसाल्याच्या बागा असाव्या) हा एक गट आहे उरलेली बहुसंख्य लोकसख्या ही भूमिहिन शेतकरी, शेतीवरचे मजूर, कारखान्यातील किंवा चहाच्या मळ्यातील मजूर आहेत ही गरिबी इतकी जीवघेणी आहे की, विकासाच्या मूलभूत सुविधासुद्धा त्याच्यामार्फत पुरेशा प्रमाणात पोचलेल्या नाहीत वैद्यकीय सेवा, समाजसेवा शिक्षण, घरबाधणी, याचे फायदे या गरिबाना अजूनही मिळत नाहीत दोन उच्च नारळाच्या झाडांना दोर बांधून कमरेला कोयता बाधून शेतमजूर एकदा झाडावर चढले की, दोराच्या आधाराने या झाडावरून त्या झाडावर जातो आणि नारळाचे उत्पन्न काढतो. दिवसाकाठी दोन-तीन हजार श्रीलकन रुपये येतील इतक्या किमतीचे नारळ काढणाऱ्या आणि जीव धोक्यात घालणाऱ्या या माणसाला रोज फक्त ४ ते ५ रुपये मिळणार. दोरीवरून ही माणसे पडली तर पुरेशी भरपाईसुद्धा मिळत नाही कोर्टकचेरी करण्यात आयुष्य वाया जाऊन' अपगतेत दिवस काढावे लागतात. चहाच्या मळ्यावर काम करणाऱ्या मुख्यत' स्त्रिया आहेत त्यानाहि पुरेशी मजुरी मिळत नाही जोवर गरिबीचा प्रश्न सोडवला जात नाही आणि गरिबीचा फार मोठा हिस्सा हा जोवर तामिळ श्रमिकाना झेलावा लागतो, तोवर हा वांशिक झगडा मिटवायचा असेल तर त्या आधी आर्थिक झगडा

## तामिळ आणि सिंहली

अलीकडे श्रीलंकेत गेलो असताना या नाटकाच्या तिसऱ्या अंकाची झलक मला पाहायला मिळाली दोन्ही वांशिक गटात माझे मित्र असल्यामुळे दोन्ही बाजू ऐकायला मिळाल्या, परत येताना आमच्याबरोबर आमचे मित्र श्री. लील गुणशेखरे होतेच तामिळ माणसे किती हुशार आहेत याचे वर्णन करताना त्यांनी एक गोष्ट सांगितली जाफनामध्ये एका सरकारी कार्यालयात उंदीर फार झालेले आहेत, सबब सरकारने एक मांजर नेमावे अशी सूचना एका तामिळ अधिकाऱ्याने केली कोलंबोमधील मंत्रालयाने दहा प्रश्न विचारून सरकारी नोकरीत मांजर नेमायला परवानगी दिली आणि त्याच्या खाण्यापिण्याची मांजर-भत्ता मंजूर केला. दोन एक वर्षांनी कोलंबोहून एक सिंहली संचालक जाफनाच्या कार्यालयाची तपासणी करायला आले आणि त्यांनी ते मांजर हजर करायचा हुकूम केला त्या कार्यालयात मांजरच नसल्यामुळे ते उपस्थित कुठून करावे? असा प्रश्न पडला थोरला तामिळ बंधू म्हणाला अरे बाहेरच्या हॉटेलच्या दाराशी एक मरतुकडे मांजर बसले आहे ते घेऊन ये, ते आपण साहेबांना दाखवू, ते मरतुकडे मांजर पाहिल्यावर हे सिंहली साहेब भडकले आणि विचारू लागले की, इतके खाऊ-पिऊ घालून हे मांजर इतके मरतुकडे कसे? त्यावेळी थोरले तामिळबंधू म्हणाले, "सर, आपण नेमलेले मांजर, सध्या हक्काची रजा घेऊन घरी गेले आहे आणि त्याच्या जागी कालपासूनच या मांजराची 'ॲक्टिंग कॅट' म्हणून नेमणूक करण्यात आली आहे" तामिळाच्या व्यवस्थापकीय हुशारीचे असे अनेक किस्से त्यांनी मला प्रवासात ऐकवले

## हत्तींचे अनाथालय

परत येताना आम्ही रत्नपूरजवळ एका जंगलात अतिशय सुंदर अशा डाक बंगल्यात उतरलो, जवळच नदी वाहत होती आणि मी सहज म्हटले, एखादा सिनेमा काढायला ही जागा फार चांगली आहे, तेव्हा मला सांगण्यात आले की, जगप्रसिद्ध फिल्म 'एलेफंट वॉक' याचे चित्रण येथेच झाले. या भागात हत्ती खूप आहेत परत येताना वाटेत "वीलवेट" अभयारण्य लागते तेथे आम्ही गेलो. कॅन्डीच्या जगप्रसिद्ध बागा आणि रत्नपूरचे हे अभयारण्य खरोखरच श्रीलंकेचे वैभव आहे. त्या अभयारण्यात चिमुकल्या अनाथ हत्तींच्यासाठी एक अर्भकालय काढले आहे. अनाथ मुलांच्यासाठी अर्भकालय असते, तेव्हा हा भाग समाजकल्याणाचा असावा म्हणून उत्सुकतेने आम्ही तेथे गेलो तेथील संचालकाने सांगितले की, क्वचितप्रसंगी आई मरून गेल्यामळे किंवा क्वचित कळपापासून चुकल्यामुळे हत्तींचे बछडे अनाथ होतात तेव्हा सगळ्या श्रीलंकेमधून हत्तींचे अनाथ बछडे येथे आणण्यात येतात यांना लहान मुलासारखे बाटलीने दूध पाजले जाते गवताची गादी करून झोपवले जाते अंगाई गीते म्हणत असेल असे वाटत नाही पण त्यांना साबण लावून

आघोळ घातली जाते तेल लावले जाते हत्तीचे पिल्लू २ ते २॥ फूट उच असते आणि वजनानेही भरपूर असते. त्यामुळे एखाद्या बछड्याला उचलून घ्यायचे असेल तर २-३ माणसांची गरज असते बछडे दिसतात मात्र सुदर. अनाथालयाचे संचालक म्हणाले, हत्ती हे लक्ष्मीचे आणि वैभवाचे प्रतीक आहे. त्यामुळे हत्तींचे बछडे अनाथ झाले तरीसुद्धा किती अनाथ होणार, म्हणून त्याची ही सरकारी व्यवस्था केली आहे

## भाषाभेद आणि धर्मभेद

श्रीलकेच्या लोकसख्येपैकी ७४ टक्के सिंघला भाषा बोलतात तर सुमारे २६ टक्के तामिळ बोलतात त्यापैकी ८ टक्के मुसलमान आहेत साम्राज्यवादी ब्रिटिश राजनीतीप्रमाणे आजचे श्रीलकेचे राज्यकर्ते या मुसलमानाचा उपयोग 'फोडा आणि झोडा' यासाठी करत आहेत आपण या भानगडीत पडायला नको म्हणून म्हणा किंवा यातून काही राजकीय स्वार्थ साधता आला तर बघावे यासाठी म्हणा पण मुस्लिम अल्पसंख्याकाचा गट अजून कुंपणावर बसून आहे. हा प्रश्न सुरू तरी कसा झाला? स्वातत्र्य मिळाल्यानंतर श्रीलका शासनाने 'सिंघला' भाषा ही राष्ट्रभाषा ठरवली आणि बौद्ध धर्म हा राष्ट्रीय धर्म आहे असे ठरवले अर्थातच २६ टक्के तामिळ बोलणाऱ्या मडळींना तामिळ भाषेचा अधिकृत उपयोग करता येईना तामिळ मुलांना विश्वविद्यालयात प्रवेश मिळवायचा असेल तर अधिक गुण मिळवण्याची आवश्यकता निर्माण झाली श्रीमती सिरिमाओ भंडारनायके याच्या काळात शिक्षणात माध्यमानुसार दर्जा देण्याची प्रथा सुरू झाली आणि तामिळ मुलांच्यावर अन्याय होऊ लागला. श्री. जयवर्धने यांनी या धोरणाला स्थिरता प्राप्त करून दिली याचा प्रतिकार म्हणून 'स्वतत्र तामिळ राज्याचा' पुरस्कार सुरू झाला राष्ट्राचे ऐक्य धोक्यात आले अशी हाकाटी झाली आणि स्वतंत्र राज्याचा पुरस्कार करणाऱ्या 'तामिळ युनायटेड लिबरेशन फ्रट' (डी.यु.एल.एफ.) या आघाडीच्या १८ खासदाराना लोकसभेतून जावे लागले. पण त्यांचे नेते अमृतलिंगम यांचे पाठबळ आजही कमी झालेले नाही. जुलै १९८३ पासून श्रीलकेतून एक लक्ष साठ हजार तामिळ माणसे निर्वासित बनून भारतात आली आहेत ही माणसे भारतात राहून, परदेशी श्रीलकन तामिळांच्या पैशाच्या बळावर श्रीलंकेचे विभाजन करू पाहात आहेत हे श्रीलंका शासनाचे म्हणणे तर तामिळ भाषा, हिंदू धर्म यांच्यावर सर्रास अत्याचार होत आहेत. तामिळ लोकांना दुय्यम नागरिक म्हणून वागवले जात आहे. आणि सपूर्णपणे वैध अशा स्वायत्ततेच्या मागणीसाठी त्यांच्यावर लष्करी हल्ले होत आहेत, असे तामिळ नेत्यांचे म्हणणे आहे.

## नाटकाचा शेवटचा अंक

या नाटकाच्या चौथ्या अकात बेंगलोर येथे भरलेल्या सार्क देशाच्या परिषदेनतर या प्रश्नाला एक नवीनच वळण लागलेले दिसते तामिळ निर्वासित, तामिळनाडूमध्ये

आल्यानतर तामिळनाडू जनतेच्या भावना तीव्र व्हाव्यात हे स्वाभाविक. परंतु तामिळनाडूचे मुख्य मत्री श्री एम जी. रामचद्रन यांनी याविषयी घेतलेली भूमिका थोडीशी बुचकळ्यात पाडणारी होती बेंगलोर येथील परिषदेपूर्वी तामिळनाडूमध्ये असणारे लिब्रेशन टायगर ऑफ तामिळ इलम या संस्थेच्या कार्यकर्त्यांकडे असलेले वायरलेसचे सेटस् मद्रास पोलिसांनी धाड घालून जप्त केले त्याचप्रमाणे काही तामिळ निर्वासितांच्या पुढारी मडळींना त्याच्या घरातच अटक करण्यात आली. श्रीयुत पीर भास्करन हे मुख्य मंत्री एम जी रामचद्रन यांचे एक मानलेले शिष्य आहेत. पण दुर्दैवाने या उपोषणाच्या वेळी त्यानी मुख्य मंत्र्याचा सल्ला ऐकायचे नाकारले.

बुद्धिबळाच्या या डावात उत्तरेकडील जाफना प्रात हा स्वतत्र तामिळ देश व्हावा या एका टोकाच्या मागणीपासून ते उत्तर भागाला स्वायत्तता द्यावी या मवाळ सूचनेपर्यंत चाललेला विचार, बेंगलोर परिषदेच्या वेळेला आणखीन वेगळ्या वळणाला लागला जहाल पक्षाच्या मागणीप्रमाणे ही विभागणी चार तत्वावर व्हायला हवी १) तामिळ भाषिक लोकाच्याकडे भौगोलिकदृष्ट्या एकत्र असणारा भाग स्वतत्र व्हावा २) तामिळ राष्ट्रीयत्वाला मान्यता मिळावी. ३) तामिळ भाषिकाना स्वयनिर्णयाचा हक्क मिळावा आणि ४) चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या पूर्व भारतीय मजुरांना चहाच्या मळ्याचे हक्क देण्यात यावेत अशा तऱ्हेच्या जहाल मागणीला पाठिंबा देता येणार नाही हे भारत सरकारने स्पष्ट केले. बेंगलोरच्या चर्चेमध्ये श्रीयुत जयवर्धने यानी जाफना व्यतिरिक्त पूर्व लंकेमधील तीन तामिळ प्रात वेगळे करायला समती दाखवली. बॅटिकलोवा प्रांतात तामिळ भाषिकाचे वर्चस्व आहे त्रिंगोमालीमध्ये सिंहली भाषिकाचे वर्चस्व आहे आणि अंपेरियामध्ये मुसलमान लोकसख्येचे वर्चस्व आहे. या तिन्ही भागातील सीमातटा सोडविण्यासाठी एक कमिशन नेमावे अशीहि मागणी श्रीयुत जयवर्धने यानी केली उत्तरेकडील तामिळ प्रात आणि पूर्वेकडील तामिळ प्रात याना जोडणारा एक भूखंडाचा पट्टा देण्यात यावा अशी मागणी तामिळ लढाक नेत्यांनी आता केलेली आहे केवळ जाफना प्रात वेगळा करण्यापेक्षा हे तिन्ही प्रांत वेगळे करावे या सूचनेला भारत सरकारचा पाठिंबा आहे

परतु खऱ्या अर्थाने भारत सरकार यामध्ये एका मोठ्या यक्षप्रश्नाला सामोरे जात आहे. एखाद्या वाघाची शेपटी पकडून धरावी तशी ही स्थिती आहे, धरता तर येत नाही आणि सोडताही येत नाही सोडले तर हा वाघ खाऊन टाकील, धरले तर हा वाघ फरफटत नेईल, अशी स्थिती आज झालेली आहे. स्वतंत्र राज्य मागणाऱ्या तामिळ जहालाना आपण कुठपर्यंत पाठिंबा द्यायचा याचा विचार करताना भारतात उभ्या असलेल्या पजाब, काश्मीर आणि गुरखालँड या प्रश्नाची पार्श्वभूमि लक्षात घेऊन मगच तो निर्णय भारताला करावा लागणार आहे. तामिळ जहाल आज लढाईच्या पावित्र्यात उभे आहेत

धर्म आणि भाषा यावर आधारलेला हा श्रीलकेतील अल्पसख्याकाचा प्रश्न

आहे भारताला यातून शिकण्यासारखे पुष्कळ आहे. पजाब आणि गुरखालँड याचे प्रश्न सोडवताना आपण जो न्याय लावू तोच तामिळ अल्पसख्याकाना लावावा लागेल हे विसरता येणार नाही असा हा पेच आहे. या भाऊबदकीचा शेवट काय होणार? श्रीलकेचे विभाजन ? तामिळ प्राताला स्वायत्तता? तामिळ भाषा व हिंदू धर्माला राजमान्यता? कां लष्करी कारवाई, वाढता निर्वासिताचा लोंढा आणि यात भारताला साक्षात हस्तक्षेप करायला लावणारे दडपण ?

तेथून परत येताना माझ्या मनात एक विचार येत होता की, मसाले, हत्ती, चहा, रत्ने, भरपूर पाणी, सुंदर हवामान असणारे एखाद्या निळ्या समुद्रामध्ये पाचूचा खडा बसवावा तसे हे पाचूचे बेट आहे. या बेटावर दोन भाऊ, भाऊबदकीत गुतलेले आहेत हे चार हात एकत्र आले तर त्याच्या वैभवाला परिसीमा नाही पण हे भाऊ भांडतच राहिले तर त्यांच्या दुर्दैवालाही परिसीमा राहणार नाही

## शांतिसेनेची कामगिरी आणि नंतर

४ फेब्रुवारी १९४८ ला श्रीलंका देश स्वतंत्र झाला, २२ मे १९७२ ला स्वतंत्र प्रजासत्ताकाची स्थापना झाली प्रजासत्ताक स्थापन होण्यापूर्वीच म्हणजे १९७१ साली कम्युनिस्ट विचारांच्या युवकांचा अतिरेकी उठाव झाला, त्यामुळे महामत्री भडारनायके यांची राजसत्ता हादरून गेली. या अतिरेकी उठावाच्या काळात श्रीलंकेला भारतीय नौदलाची मदत बोलवावी लागली भारतीय सैन्याने जरी लकेच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवले नाही तरी नौदलाचे सरक्षक कडे त्या वेळी उभे करण्यात आले होते हे विसरता येणार नाही. यानंतरच्या काळात श्रीमती भंडारनायके यांनी ही चळवळ मोडून काढावी यासाठी कठोर लष्करी दडपण आणले. पाच वर्षांच्या त्याच्या कारकीर्दीत सर्वसाधारण माणसांची भावना सरकारविरोधी होत चालली होती एकसारखा त्याग, वाढणारी महागाई, खालावणारे जीवनमान या तापत्रयीला कंटाळून जनतेने श्रीमती भडारनायके यांचा पराभव केला आणि ज्युनिअस जयवर्धने या ज्येष्ठ नेत्याला महामत्री म्हणून निवडण्यात आले. १९७२ साली तयार करण्यात आलेली श्रीलकेची घटना बदलण्यात आली आणि कार्यकारी अध्यक्ष म्हणून जयवर्धने याना 'न भूतो, न भविष्यति' असे अधिकार देण्यात आले. कार्यकारी अध्यक्ष म्हणून ते राज्य सस्थेचे प्रमुख आणि शासनयंत्रणेचेहि प्रमुख झाले. ऑक्टोबर १९८२ मध्ये पुन्हा एकदा निवडणुका होऊन आणखी सहा वर्षांचा कालावधि मिळाला याच काळात राष्ट्रव्यापी लोकमताचा कौल घेऊन लोकसभेचा काळ १९८९ पर्यंत वाढवण्यात आला परतु गेली ४० वर्षे तामिळ आणि सिंहली लोकामधला तणाव हा श्रीलंकेच्या राजकीय जीवनाचा अविभाज्य भाग झाला

वैध मार्गाने अन्यायाचे निवारण होत नाही हे लक्षात आल्यावर जातीय तणावाचे

रूपातर खून, दंडेली आणि लुटालूट यामध्ये झाले. सूडसत्राची ही एक लाट तामिळ बहुसंख्य असणाऱ्या जाफना प्रांतातून उसळली आणि ती लाट घोंगावत, उसळत साऱ्या श्रीलंकेभर पसरली

श्रीलंकेतील पूर्व भारतीय तामिळ लोकांवर अन्याय होऊ नये यासाठी त्यानी चळवळ करावी, त्याला भारतातून पाठिंबा मिळावा हे सहज समजण्यासारखे होते. परंतु तामिळवाद्यानी आपल्याला स्वतंत्र तामिळ राष्ट्र निर्माण करायला हवे असे मागणे आणि त्याला भारतातील तामिळनाडूमधील आग्रही मंडळींनी पाठिंबा देणे हे राजकीय शहाणपणाचे लक्षण नव्हते कोणत्याहि देशात दगल झाली तर त्या होळीवर आपली पोळी भाजावी अशी इच्छा असणाऱ्या काही सत्तानी तातडीने श्रीलंकेतील तामिळ गनिमाना शस्त्रे पुरविण्याची इच्छा दर्शविली. इतकेच नाही तर प्रत्यक्षपणे शस्त्रे पुरविली. तामिळ वाघाना गुप्त छावण्यामधून लष्करी शिक्षणहि दिले. श्रीलकेमध्ये निर्माण झालेल्या अस्वस्थ वातावरणाचा फायदा घ्यावा म्हणून अनेक परकीय सत्तांनी श्रीलकेला लष्कर पाठविण्याची तयारी दर्शविली चीन, पाकिस्तान, अमेरिका सगळ्यानाच एकाएकी श्रीलंकेच्या प्रेमाचा पान्हा फुटला इस्रायलने आपली गुप्तचर यंत्रणा श्रीलंकेला देऊ केली श्रीलंकेतील या घडामोडींकडे सावधपणाने पाहणाऱ्या भारताला या परिस्थितीची काळजी वाटली यात नवल काहीच नाही १९८६-८७ चा काळ हा दगलीचा प्रकोप करणारा होता, यात शंका नाही ह्या प्रश्नाचे उत्तर राजकीय वाटाघाटीतून शोधले पाहिजे याची जाणीव राष्ट्राध्यक्ष जयवर्धने यांना होती राजकीय तोडगा निघू शकला नाही तर लष्करी कारवाईवाचून गत्यतर उरणार नाही श्रीलंकेचे लष्कर आणि अल्पसख्य तामिळ याच्यातच लढाई झाली तर फार मोठे हत्याकाड होण्याचा सभव आहे हे लक्षात घेऊन जयवर्धने यांनी भारतीय राजसत्तेला मदतीची हाक दिली यामध्ये दहा वर्षे स्थिर झालेल्या आपल्या सत्तेचा जुगार खेळावा लागतो, याचीहि जाणीव जयवर्धने याना होती परंतु हत्याकांड तर टाळायचे, तामिळांना नि:शस्त्र करून वाटाघाटीच्या टेबलापर्यंत आणायचे आणि स्वतंत्र तामिळ राज्याची मागणी वाढू द्यायची नाही, असे जयवर्धने यांचे धोरण होते याच्याउलट श्रीलकेमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणाने शिरकाव करू पाहणाऱ्या पाकिस्तान, अमेरिका आदि शक्तींना दूर ठेवणे भारताच्या हिताचे आहे याची जाणीव श्री. राजीव गांधी यांना स्पष्ट होती एक प्रकारे जयवर्धने आणि राजीव गाधी या दोघानीही राजकीय परिस्थितीशी केलेली ही एक अपरिहार्य तडजोड होती असेच म्हटले पाहिजे

या अतर्गत यादवीमध्ये हजारो लोकांना प्राण गमवावे लागले कोट्यवधि रुपयाची मालमत्ता नष्ट झाली सरकार अस्थिर झाले श्रीलंकेचे स्थैर्य आणि विकास याचे स्वप्न विरघळू लागले २९ जुलैच्या भारत-श्रीलका करारात (१) ताबडतोब युद्धविराम (२) सरकारी फौजा बराकीत परत बोलवायच्या (३) बडखोरानी शस्त्रे खाली ठेवायची आणि (४) शांतता कराराचे पालन होते किंवा

नाही यासाठी भारताने श्रीलंकेत शांतिसेना पाठवायची अशी ही रचना होती ह्यापूर्वी तामिळ बंडखोरावर श्रीलंकेच्या लष्कराने केलेले अत्याचार भारतीय जनतेला बघवेनात म्हणून तामिळ भागात रेडक्रॉसमार्फत औषधे व अन्न पुरविण्याचा भारताने प्रयत्न केला हे सामान घेऊन जाणाऱ्या भारतीय बोटी परत पाठविल्या त्या वेळी बँकॉक येथील भारतीय दूतावासात बसून क्षणोक्षणी घडत जाणारे हे नाट्य नभोवाणीवर मी ऐकत होतो बोटी जात नाहीत म्हटल्यावर भारताने विमानाने अन्न आणि औषधे वरून टाकण्याचा निर्णय केला आणि अमलात आणला. भारत–श्रीलंका करार हा एक विवाद्य करार झाला. भारत सरकार उघडपणाने तामिळ बंडखोराना पाठीशी घालत आहे असा प्रेमदास यानी जाहीर आरोप केला

आपला दुखावलेला स्वाभिमान पुन:स्थापित करण्यासाठी भारताने वाहतुकीची विमाने पाठवून त्यामधून अन्न आणि औषधांचा पुरवठा करणार असे जाहीर केले या विमानांबरोबर 'मिराज' जातीची लढाऊ विमाने पाठविण्यात आली एका परीने भारताला साऱ्या जगाला हे दाखवून द्यायचे होते की भारत ही जबरदस्त शक्ति आहे आणि भारताच्याच मागच्या अंगणात लष्करी कारवाई करून तामिळ जनतेचा सहार श्रीलंका करू पाहील तर ते भारत सहन करणार नाही. भारताच्या या भूमिकेचे तामिळ गनिमांनी खूप स्वागत केले पण श्रीलंकेतील राजकीय नेते बधिर होऊन 'भारताची दादागिरी' अशा शब्दात भारतीय कारवाईचे वर्णन करू लागले श्रीलंकेतील भारतीय नागरिकाना परत पाठविण्याची व्यवस्था भारतीय उच्चआयुक्त करू लागले. दोन्ही देशाचे सबध कधी नव्हते इतके दुराव्याचे झाले आणि अशा वेळी एकाएकी नाट्यपूर्ण घडामोडी होऊन राजकीय नाटकाचा अखेरचा अक सुरू झाला.

कोलबो शहरात दगे सुरू झाले आणि असंतोषाचा स्फोट झाला करारावर सह्या करून श्री राजीव गांधी परत येत असताना विमानतळावर एका नौदलाच्या खलाशाने सलामी देतानाच बदुकीच्या दस्त्याने त्यांच्यावर हल्ला केला राजीव गाधी यांनी तो चुकविला इतिहासाला वळण लावणारी ही घटना होती करारावर सह्या झाल्यापासून काही तासातच भारतीय शांतिसेना हवाई वाहतूक विमानातून श्रीलंकेत दाखल झाली करारविरुद्ध झालेल्या दगलीत साठ पोलिस सैनिक आणि काही नागरिक मारले गेले

या करारान्वये उत्तर आणि पूर्व भाग एकत्र करून त्यामधून एकच विधानसभा निर्माण करायचा प्रस्ताव होता एक वर्षांपुरती ही व्यवस्था करायची होती उत्तर भागात तामिळांची बहुसंख्या असल्याने त्यांना या नव्या विधानसभेत आपल्या हितसबंधांना तिलाजली दिली जाईल, असे पूर्व भागातील लोकाना वाटू लागले एक वर्षांनंतर लोकमताचा कौल घेऊन ही व्यवस्था निश्चित केली जाईल, अशी तरतूद असली तरी पूर्वेकडच्या मुसलमानाना आपली वेगळी स्वायत्तता विधानसभा आत्ताच्या

आता हवी होती

कराराप्रमाणे श्रीलकेचे सैन्य बराकीत बद असल्यामुळे भारतीय शांतिसेनेला कायदा आणि सुव्यवस्थेचे काम पहावे लागले कोणालाहि हेवा वाटावा अशा स्वरूपाचे हे काम खासच नव्हते भारतीय सेना तामिळांना पक्षपाती आहेत असा आरोप वारंवार केला जात होता याच वेळी श्रीलंकेच्या नौदलाने एक मच्छिमार बोट पकडली या बोटीला रडार जोडले होते आणि बोटीवर मशिनगन्स व तोफा होत्या. बोटीत सतरा तामिळ वाघ आणि इतर पुढारी होते या प्रकरणी श्री जयवर्धने इतके रागावले की ते म्हणाले, ''लकेची सेना बराकीत बद आहे पण भारतीय सेना सुद्धा बाहेर असूनहि बद असल्याप्रमाणे निरुपयोगी ठरते आहे. पूर्व श्रीलंकेमध्ये भारतीय शातिसेनेला शातता प्रस्थापित करता येत नसेल तर मी त्याना परत जाण्याची विनती करेन ते काम श्रीलंकेच्या लष्कराला देईन.' नतर याची चीड येऊन भारताने शांतता रक्षणाचा निश्चय कडकपणाने अमलात आणला यासाठी शातिसेनेची सख्या बारा हजारावरून वीस हजारावर नेण्यात आली यानंतरच्या सतरा दिवसांच्या लढाईत दोनशे भारतीय सैनिक मरण पावले तर सहाशे तामिळ बडखोर ठार झाले जाफना शहर पुन्हा श्रीलंकेच्या ताब्यात आले

श्रीलंकेच्या दक्षिणेकडे जनता विमुक्ति पेरेमुना या मार्क्सिसिस्ट गटाने अनेक ठिकाणी धाडी घालून बदुका पळविल्या आणि राजकीय खुनाखुनी करायला सुरुवात केली यात सरकारी अधिकारी आणि मत्री यांच्यावर हल्ले झाले लोकसभेच्या समितीची सभा चालू असताना जयवर्धने यांच्याजवळ एका ग्रेनेडचा स्फोट झाला यातून जयवर्धने व प्रेमदास वाचले, पण एक मत्री मरण पावला ह्या काळात श्रीलकेमध्ये भारतविरोधी भावना इतकी प्रबळ होती की श्रीलंकेने सार्कच्या सभेला जाऊ नये, असाहि प्रचार चालू झाला भारत व श्रीलंका सबध दुरावू लागले. त्याचबरोबर पाकिस्तान - श्रीलका संबंध घनिष्ट बनू लागले ही सारी राजकीय अस्वस्थ परिस्थिति फार काळ चालू देणे इष्ट नाही म्हणून भारत आणि श्रीलंका या दोन्ही देशानी पुन्हा एकदा नवीन प्रयत्नाना सुरुवात केली.

श्रीलंकेला इस्रायलने दिलेली गुप्तचरविषयक मदत आणि पाकिस्तानने देऊ केलेली लष्करी मदत भारताला मानवणारी नाही श्रीलंकेत आलेले काही ब्रिटिश, भाडोत्री लष्करी तज्ज्ञ हेहि भारताला मजूर नाहीत. श्रीलंकेतील बदरांचा उपयोग भारतविरोधी कारवायांसाठी केला जाणार नाही याची हमी भारताला हवी आहे विशेषत: त्रिंकोमाली बदरात ब्रिटिश सरकारने बाधलेले तेलसाठ्याची योजना यापुढे भारत आणि श्रीलका याच्या सहकार्याने चालावी अशी भारताची मागणी आहे. रणगाडे निर्मितीबाबतचे अमेरिकेशी केलेले करार भारतविरोधी असतील असे भारताला वाटते श्रीलकेची नभोवाणी म्हणजे रेडिओ सिलोन यानी अमेरिकेच्या व्हाईस ऑफ अमेरिका याच्याशी किंवा जर्मन नभोवाणीबरोबर केलेले करार भारताला पसत नाहीत

## अवघड पर्याय

श्रीलंकेच्या राजकीय नाट्याला वेगळी कलाटणी मिळाली ती निवडणुका जाहीर झाल्यामुळे. वयाच्या बहात्तराव्या वर्षी येणारी अध्यक्षीय निवडणूक ही आपल्या आयुष्यातली शेवटली संधि आहे, हे श्रीमती भंडारनायके यांनी ओळखले आणि या संधीचा पूर्ण फायदा घेण्याचे ठरवले श्री. जयवर्धने यांनी आपण निवडणुकीत उतरणार नाही, असे जाहीर करून भारत कराराला विरोधी असणारे श्री रणसिंघे प्रेमदास यांची उमेदवारी जाहीर केली श्री प्रेमदास यांना ज्या ज्या वेळी मी भेटलो तेव्हा त्यांच्या शांत, पण निर्धारपूर्वक निर्णय घेण्याच्या शक्तीचा मला प्रत्यय आला आहे. त्यांच्या सरकारचा सल्लागार म्हणून काम करताना त्यांच्या राजकीय आवाक्याचे मला नेहमीच कौतुक वाटले आहे. अध्यक्षीय निवडणूक हा श्रीलंकेच्या लोकशाहीची परीक्षा घेणारा प्रसंग होता. राजकीय तणाव वाढलेला होता परंतु सुदैवाची गोष्ट अशी की, निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा जनता विमुक्ति पक्षाचा आग्रह फेटाळून हजारो संख्येने मतदार मतदानाला गेले. मतदानाला बाहेर पडाल तर हिंसाचार होईल, या भीतीला न घाबरता पंचावन्न टक्के मतदार हे मतदानासाठी आले. त्यांनी पुन्हा एकदा सत्ताधारी पक्षाला लोकसत्तेचा मुकुट अर्पण केला श्री. प्रेमदास विजयी झाले हे त्यांच्या 'सामान्यांचा प्रतिनिधि' या प्रतिमेमुळे! त्यांनी शांततेचा, विकासाचा पाठपुरावा केला. या निवडणुकीत तामिळ गटाचे मंत्री श्री थोंडामन यांचा पाठिंबा फार महत्त्वाचा होता. त्यांच्यामुळेच त्यांना पन्नास हजार मताची आघाडी मिळाली निवडणुकीनंतर पण राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे घेण्याआधी जयवर्धने आणि प्रेमदास दोघेहि सार्क सभेला गेले.

ही निवडणूक म्हणजे श्रीलंकेच्या जनतेपुढे असणाऱ्या अवघड पर्यायांची निवडणूक होती. प्रस्थापित का बदल, जातीयवाद का राष्ट्रवाद, शांतता का संघर्ष, कत्तल का विकास या प्रश्नावर एक्कावन लक्ष मतदारांनी आज शांततेच्या बाजूने मतदान केले आहे भारताविरुद्ध संघर्षाची भूमिका घ्यावी असे सांगणाऱ्या श्रीमती भंडारनायके यांचा मतदारांनी सपशेल पराभव केला आहे. प्रेमदास यांच्या शब्दात सांगायचे तर, 'बंदुकीच्या गोळीपेक्षा लोकशाहीत मत महत्त्वाचे' हेच यातून सिद्ध होते. यानंतर विधानसभेसाठी निवडणुका झाल्या. ह्या निवडणुकाहि शांततेने पार पडलेल्या आहेत. प्रेमदास यांच्या हाती आज उद्ध्वस्त झालेली अर्थरचना आणि कत्तलीचे अवशेष दाखवणारी अस्वस्थ शांतता आहे. पूर्व आणि उत्तर श्रीलंका यांना एकत्र कसे राखता येईल हा त्यांच्यापुढचा मोठा पेच आहे. भारत-श्रीलंका कराराचा पुनर्विचार होऊन, भारतातील धोरणाच्या बदलाबरोबर आणि सत्ताबदलाबरोबरच शांतिसेना भारतात परत आली. श्रीलंका सरकारवर आपल्या अंतर्गत प्रश्नांचे उत्तर शोधण्याची जबाबदारी आली आहे.

शांतिसेना श्रीलंकेत पाठवणे हे माझ्या दृष्टीने फार योग्य पाउल होते. पण खरोखरीच त्यांचे काम श्रीलंकेच्या सैन्याला पाठबळ देण्याचे हवे होते शांतिसेना

प्रत्यक्ष युद्धात उतरल्यामुळे शांतिसेना उरली नाही आणि याबाबतच्या धोरणाचा पराभव झाला. आता शांततेचा पाठपुरावा करत राहाण्याचे जर प्रेमदास यांना साधले आणि नेहेमीच्या स्पष्टवक्तेपणानुसार तामिळ मागणीबाबत आपली भूमिका लोकांना ठामपणाने सांगून पटवून देता आली तरच या भाऊबंदकीच्या नाटकाचा शेवट सुखात होईल. नाही तर सान्या आशियाई राजकारणाच्या दृष्टीने ती एक शोकांतिकाच ठरेल.

(केसरी)

❀ ❀ ❀

# ३

## सदाबहार सदातरुण लोकांचा देश

# थायलंड

थायलंडला मी किती वेळा आलो हे मोजायचे सोडून दिले आहे. यूनोची आशियातली राजधानी असल्यामुळे इथे येत राहिलो. पण प्रत्येक वेळेला या देशाचे नवेपण काही सपत नाही असे दिसते. आज दिल्लीहून निघालो तेव्हा मनाशी ठरवले की, पुन्हा एकदा बँकाक आपण पाहिलेच नाही, असे समजून या शहराकडे जायचे 'थाय एअरवेज'चे विमान रेशमासारखा मऊसूत प्रवास करते, असे म्हणतात. पण आजचा प्रवास जरा कच्च्या रेशमासारखा होता. सकाळी ७ वाजता विमानतळावरून बाहेर पडलो तो तपमान ८०° फॅरेनहाइटला पोचले होते. हवा मुंबईसारखी दमट. कायम उन्हाळा. दुपारी तर या उन्हाळ्याने घसा कोरडा होतो. पण एअरपोर्ट, हॉटेल्स, ऑफिसेस सारे वातानुकूलित असल्याने एकसारखे गरम, गार, गरम, गार या चक्रात सापडतो. पण एकदा थाय मित्र वा परिचित भेटला की थडगार शिडकावा झाल्यासारखे वाटते. विमानतळावर सुंदर फुलांचे हार घातले गेले. मला वाटते तऱ्हेतऱ्हेच्या रंगीबेरंगी फुलांचे गजरे करणे, हार करणे, घरात पुष्परचना करणे यात थाय लोकांचा कोणी हात धरणार नाही. सार्वजनिक समारंभात, आपल्याकडे जे हार घालतात त्यात हारपणाच नसतो. इथे प्रत्येक हाराला पदर वेगळ्या रंगाचा. वेगळ्या आकाराच्या फुलांचा गोंडा. फुलांचे रूपगंध तर सोडाच रचनासुद्धा मन मोहून टाकते. हारानंतर लक्ष जाते हार घालणाऱ्याच्याकडे. या थाय माणसाचे वय सांगताच येत नाही. सदा तरुण, सदाबहार माणसे. उंचीने जरा मध्यम, दाढीमिश्या कमीच. रंग पीतगौर असा. केस काळे, डोळे बारीक पण तेजस्वी. त्यामुळे थाय स्त्री-पुरुष एकदम म्हातारे तरी नाही तर एकदम तरुण तरी. कपडे फार टापटिपीने घालतात. पोशाख पाश्चात्त्य तऱ्हेचा. बहुतांशी स्त्रिया पाश्चात्त्य तऱ्हेने केशभूषा करतात, रंगतात आणि कपडेही तसेच घालतात. अंगाभोवती कायम सुगंध दरवळत राहावा असे त्यांना वाटत असावे. नावे जवळजवळ सर्वांचीच संस्कृत किंवा संस्कृतोत्भव आहेत. यूनोच्या कार्यालयात नर्स आहे. तिचे नाव 'कंबुग्रीवा कमललोचना'. एक प्राध्यापिका आहे

'सुपर्व', एक आहेत प्रा फरणी (थायमध्ये भ चा फ होतो भरणी नक्षत्र फरणी होते, तर भोजन हे फोजन होते ) पुरुषांची नावेसुद्धा सायोम (श्याम), रत्नबिचित्र, चद्रविधुन अशी आहेत इथे लगेच जाणवते म्हणजे सैनिकांचे अस्तित्व विमानातून उतरल्यापासून सर्वत्र शस्त्रधारी सैनिक दिसतात शस्त्रधारी पोलिस दिसतात. हिरवे खाकी कपडे, चकाकणारी शिरस्त्राणे, काळे चष्मे आणि स्वयंचलित बदुका गमत म्हणजे गेल्या कित्येक शतकात या देशावर आक्रमण झालेले नाही परकीयाचे राज्य नाही पण राज्यक्रांति मात्र नियमितपणाने होत असते पण ती बँकॉकपुरती आणि पुष्कळशी नाटकी असते सत्ताधारी पक्ष बदलतो. पण पुन्हा आपले रामराज्य चालू. या देशाच्या सम्राटाला 'राजा राम' म्हणतात या राजवशाला 'चक्री' राजवश म्हटले जाते पाश्चात्त्य देशाकडून थायलंडने वरकड गोष्टी पुष्कळ घेतल्या आहेत त्यामुळे या देशात इतके ''जनरल'' भेटतात की काही वेळा सैनिकांपेक्षा जनरल जास्त असावे अशी शका येते 'डॉन मुआँग' विमानतळातून बाहेर आलो आणि वातानुकूलित युनोचे ध्वज फडकवण्याच्या गाडीतून शहरात निघालो तो सकाळ फुटत होती

## सुंदर सकाळ

बँकाकमधली सकाळ ही जरा जगावेगळीच असते रुद रस्ते, प्रचड इमारती, सुंदर गाड्या. पण सकाळी ७-७॥ पर्यंत गर्दी नसते एकदा सकाळी ८ ला गाड्यांची गर्दी सुरू झाली की तो प्रवाह रात्री दहापर्यंत अखड चालतो प्रत्येक सिग्नलपाशी १० ते १२ मिनिटे थाबत एका भागातून दुसऱ्या भागात जायला तासभर सहज लागतो पण भल्या पहाटे लवकरच सकाळी शहर जागे होते ते बुद्धभिक्षूंच्या पदरवाने या देशात प्रत्येकाला एकदा तरी भिक्षु होण्याची दीक्षा घ्यावी लागते अगदी राजालासुद्धा या काळात मुंडण करायचे, भगवी वस्त्रे नेसायची, हातात दंड आणि कमडलू घ्यायचा. मंदिरात (इथे त्याना 'वट' म्हणतात.) अभ्यास करायचा आणि रोज सकाळी एकदा भिक्षा मागायला बाहेर पडायचे जे मिळेल त्यावर निर्वाह करायचा राजालासुद्धा हा ॐ भवती भिक्षांदेहिचा पंथ घ्यावा लागतो. आपल्याकडे सोडमुज झाली की मुलाला लगोटी लावून, दड घेऊन भिक्षावळीला पाठवतात पण तो समारभ असतो इथली भिक्षावळ ही खरीखुरी व्रतसाधना असते त्यामुळे पहाटेच्यावेळी शेकडो भिक्षु पायात काही न घालता भिक्षेसाठी येतात. त्याच्या पायाचा चटचट असा आवाज येत राहतो आणि याच वेळी सारी रात्र रग आणि रगेलपणात घालवणारे रसिक घरी परतायला निघालेले असतात. बँकाक हे रगलेल्या रात्रीकरता प्रसिद्ध आहे. ती शौकिन मंडळी रात्रीच्या धुद आठवणी घोळवत घरी परत येत असतात आणि 'मर्यादित काळासाठी' निवृत्ती घेतलेले भिक्षु परिक्रमेला निघतात उपभोग आणि तपश्चर्या, भौतिक आणि आध्यात्मिक, मर्त्य आणि अमर्त्य, खाद्याला खांदा लावून या शहरात वावरतात. वर आभाळाकडे पहावे तो ठायी ठायी स्तूप, बुद्ध मदिरे, वट याची सोनेरी शिखरे, उगवत्या सूर्याच्या प्रकाशात झळाळताना दिसतात मधूनमधून उच हात पसरलेले दूरदर्शनचे अँटिना, मात्र या चित्रात विसगत दिसतात शहराच्या जवळ आलो की हा विरोधाभास जास्तच दिसतो कोपऱ्यावरच ब्रह्मदेवाचे देऊळ आहे देवळाच्या

पायऱ्यावर लॉटरीची तिकिटे विकणारा आपले दुकान मांडतो आहे. प्रत्येकाची ललाटरेषा लिहिणारा ब्रह्मदेव त्याच्या पायरीवर नशीब उघडण्याची जाहिरात आणि लॉटरीची तिकिटे. मला वाटते गमत म्हणून एखादेवेळी ब्रह्मदेवाने जागे होऊन तिकिट विकत घेतले तर त्याच्या नशिबात काय असेल एरवी भरगर्दी असणाऱ्या या रस्त्यावर ही थाय म्हातारी आपल्या खाद्यपदार्थांची गाडी लावते आहे गाडीवर शेगडी आहे. भोवती सोललेल्या कोंबड्या, बदके आहेत सकाळी 'नामचा' (पाणचट चहा) झाला की ही बाई तोंडात पानाचा तोबरा भरून, आपला 'स्टॉल' खोलते ताजेताजे 'पाणसाप' सळईवर भाजून तयार होतात तोच ऑफिसात जाणारी माणसे या न्याहारीवर तुटून पडतात

बँकाक शहरापासून लाब 'नाखोर्न' किंवा 'भोराट'मध्ये बाबूच्या छत्रीसारख्या पसरट 'हॅटस्' घातलेले शेतकरी आपले रेडे नागराला जुंपतात आणि भातशेतीत कामाला लागतात अफूचा 'सोनेरी त्रिकोण' म्हणवणाऱ्या ब्रह्मदेश, थायलड, लाओसच्या मधल्या खळग्यात खेचराच्या पाठीवर कच्च्या अफूच्या गोण्या लादून, वनवासी आदिवासी थाय लोक डोंगरपहाडाकडे जाऊ लागतात त्याच्या अफूला आता बदी असली तरी परदेशी मागणी खूप आहे 'चेंग माय' या उत्तर भागात खूप रगीबेरगी कपडे आणि चादी-कथलाचे दागिने घातलेले हे आदिवासी आपल्या लमाणाच्या सारखे दिसतात. ब्रह्मदेशाच्या दिशेने जुन्या ''अयोध्या' नगरीत, परदेशी प्रवाशांच्या बसेस भरभरून यायला लागतात त्या रामनगरीतली देवळे, मूर्ति, कातड्याची कातीव चित्रे साऱ्याच्याकडे म्हाताऱ्या अमेरिकन बायका टकाटका पाहत राहतात बँकाकमधून वाहणाऱ्या 'चौ फाया' नदीतून तांदुळाच्या गोण्या भरलेल्या लांबलचक बुटक्या बोटी आणि फुलाफळांनी ओतप्रोत भरलेल्या नावा, गिऱ्हाइकी शोधत निघतात शहराच्या मध्यावर युनोच्या चौदा मजली काचेच्या इमारतीत, शेकडो देशामधली माणसे एकमेकांना 'सवासदी', 'नमस्ते', 'बॉन्जूर' म्हणून अभिवादन करीत आशियाचे रस्ते, व्यापार, शिक्षण, निर्वासित अनेक प्रश्नाचा विचार सुरू करतात बँकाक हे पूर्व आणि पश्चिमेचा अजब मिलाफ आहे जुने अणि नवे, धर्म आणि वासना, कॉम्प्युटर आणि सणसमारंभ, श्रद्धा अणि बाजार 'मसाज पार्लर' आणि मदिरे शेजारी शेजारी गुण्यागोविंदाने नांदतात माझा बँकाकमधला नवा दिवस सुरू होतो

## संस्कृतींचे थर

अलीकडे थायलंडला 'अमेरिका-शिया' म्हणत परंतु जरा डोळसपणाने पाहिले तर थाय समाजावर अनेक सस्कृतींचे थरावर थर बसलेले आहे भारताचा ठसा, धर्म, भाषा, सस्कृती यावर आहे इथल्या विद्यापीठाचे नाव 'थमासात' (धर्मशास्त्र-धम्मसात्र-थमासात) असे आहे विद्यापीठात प्रवेशद्वारातच वीणाधारी, कमलासनावर बसलेल्या सरस्वतीची सुदर मूर्ति आहे विघ्नहर्त्या गणपतीचे दर्शन अनेक ठिकाणी होते. ऐरावताला एरावन म्हणतात आणि त्या नावाचे एक भव्य हॉटेल आहे आता इद्र, नाराय (नारायण) या नावाची प्रचड हॉटेल्स आहेत इथले नृत्यनाट्य रामायणावर आधारलेले आहे मात्र या कथेत हनुमान हा ब्रह्मचारी नसून, एक प्रणयी, रगेल योद्धा आहे या समाजावर चिनी सस्कृतीचाहि ठसा आहे अनेक शिल्पे विशेषत· ड्रॅगन, तोंडात गोळा असणारे सिंह,

लाकडी नक्षीकाम यातून चिनी परंपरा दिसते पण खाण्यापिण्याच्या पद्धतीवर चिनी ठसा अधिक आहे अलीकडच्या काळात जर्मन, डच याच्याबरोबर अमेरिकन पगडा आलेला आहे त्याला राजकीय कारणेहि आहेत व्हिएतनाम युद्ध सुरू झाले आणि सरहद्दीपलीकडल्या त्या देशातली अशांतता, अस्वस्थता सीमा ओलाडून थायलडमध्ये वाहू लागली आपल्यावर आक्रमणाची शक्यता लक्षात घेऊन थायलडने अमेरिकेबरोबर करार केला यातून अमेरिकन सैनिकासाठी 'विश्राती आणि करमणूक' केंद्र म्हणून बँकाकचा उपयोग केला जाऊ लागला हजारो अमेरिकन सैनिक चैनीत सुट्टी घालवावी म्हणून बँकाकला येऊ लागली यातून हजारो 'बार' उघडण्यात आले 'मसाज पार्लर्स' 'नाईट क्लब्ज' तयार झाले वेश्याव्यवसाय हे उत्पन्नाचे मोठे साधन बनले. अमेरिकन पद्धतीप्रमाणे रात्री रगवणाऱ्या वेश्याना प्रमाणपत्रे, चषक देण्यात आले याचा परिणाम असा झाला की, आज थाय समाजात रात्री चैन करण्यासाठी बाहेर जाणे, मसाज करून घेणे समाजमान्य आहे त्यामुळे घरी पाहुणा आला तर नवरा बायकोला राजरोस सांगतो की मी पाहुण्याला घेऊन 'मसाज पार्लर'मध्ये जातो चीनमध्ये होणाऱ्या राजकीय बदलाचा परिणाम म्हणून थायलडवर चीनचे आक्रमण होईल असे भय वाटल्याने, थाय सरकारने अमेरिका-धार्जिणे धोरण पत्करले. १९५० साली अमेरिकेची मदत सुरू झाली लष्करी मदतीबरोबरच नागरी विकास होऊ लागला इमारती, डिपार्टमेंटल स्टोअर्स, सिनेमा, हॉटेल भराभरा वाढू लागली १९६५ साली अमेरिकेने सहा लष्करी विमानतळ बांधले त्यासाठी रस्ते, वाहतूक व्यवस्था सुधारली अर्ध्या शतकापूर्वी राजा समोर दिसला तरी इथले लोक गुडघ्यावर वाकून बसत. वर पाहात नसत. पण अचानक या भौतिक विकासाबरोबर ही माणसे राजकीय दृष्ट्या जागृत झाली आहेत जगाच्या बाजारात उभी राहिली आहेत बँकाक हे त्या प्रचड बदलाचे एक प्रतीक आहे बँकाकचे जुने नाव फार लाबलचक पधरा शब्दाचे आहे त्यात रत्नकोष, अमरनिधान अशी विशेषणे आहेत पण थाय लोक याला क्रुगक्षेप-स्वर्देवतार्चा निवास म्हणतात या देशावर परकीयाचे राज्य कधीच नव्हते त्यामुळे मुबई, शाघाय, सिंगापूर, कलकत्ता याच्यासारखा ब्रिटिश राज्याचा ठसा या शहराला नाही. एकेकाळी व्हेनिसप्रमाणे या शहरात नदीला काढलेले अनेक कालवे होते त्यांना 'क्लॉग' म्हणतात आणि अजूनहि त्यातून वेगवान छोट्या नावातून एकसारखी वाहतूक चालू आहे या नदीच्या काठी असलेली जुनी लाकडी घरे सुदर आहेत नदीत किंवा जमिनीवर डांब रोवून त्यावर पोकळी ठेवून उचावर घर बाधले जाते. घराला गॅरेज असावे तशी छोटी बोट घराजवळच बांधून ठेवलेली असते मनात आले की बोट काढायची बाहेर पडायचे घरातली पोरे निम्मा दिवस नदीत डुबत असतात. थायलडमध्ये वनश्री फार सुदर आहे फुले खूप आहेत गुलाब, शिरिष, प्राजक्त, बकुळ, जास्वंद, गुलमोहोर. जे म्हणाल ते फळेसुद्धा खूप आहेत फणसाचा दुरियन नावाचा एक उग्र वासाचा प्रकार आहे. याखेरीज राबुतान, पोपया, खूप गोड आहेत आंबा मोठा, पिवळसर रगाचा आहे. खोबरे आणि नारळ हा रोजच्या जेवण्याचा अविभाज्य भाग आहे फळाचे कापून वेगवेगळे प्रकार, आकृती तयार करणे हा 'खानदानी' जेवणाचा मोठा भाग आहे. बँकाकमध्ये चित्रलाद राजवाडा, चातुचार उद्यान, याखेरीज अनेक सुदर बुद्धमदिरे आहेत बुद्धजन्म, गृहत्याग,

धनप्राप्ती, जीवनत्याग हे सारे प्रसग अनेक भित्तीचित्रे आणि मूर्तीमधून दाखवलेले आहे. चालता बुद्ध, निजलेला बुद्ध या मूर्ति फार प्रचड आहेत याखेरीज रत्नबुद्ध आहे. संसार परित्याग केलेल्या बुद्धाची रत्नमूर्ति व्हावी (एमरल्ड बुद्ध) हा एक त्या तत्त्वज्ञानाचा पराभव म्हणावा का माणसाच्या भौतिक हव्यासाचे उदाहरण म्हणावे हेच कळत नाही

## थाय मंदिर

देवळात मात्र अनुभव वेगळा येतो. सध्याकाळी मी बुद्ध मंदिरात गेलो देवळाच्या प्रागणात आज शेकडो सैनिक आलेले होते देवाला आपला नैवद्य अर्पण करून, देवाचे आशीर्वाद आणि प्रमुख भिक्षूचे प्रवचन ऐकायला ते आले आहेत खाकी हिरवे गणवेश, हातातल्या कमळांचा शुभ्र रग आणि भिक्षूचा भगवा या साऱ्या रगाची एक विचित्र रगपचमी चालू आहे. आत देवळात शेकडो, हजारो स्त्रिया टोपल्या भरभरून रगीत फुले, उदबत्त्या आणि तऱ्हेतऱ्हेचे खाद्यपदार्थ देवाला अर्पण करीत होत्या देऊळ सगमरवराचे आहे भिंतीवर सोनेरी वर्खाचा कागद आहे सोनेरी मुलामा असलेले स्तूप अगदी गप्प बसल्यासारखे थड आहेत प्रांगणात दैत्याच्या अक्राळविक्राळ मूर्ति आहेत. तर भिंतीवर सुंदर चित्रमाला आहेत मदिराला - अमेरिकन आणि पाश्चात्त्य धर्तीच्या वेगवेगळ्या रगाच्या लाल-निळ्या खिडक्या आहेत, त्यातून झिरपणाऱ्या प्रकाशाला एक वेगळी डूब देतात सोन्याच्या सिंहासनावर बसून पाली भाषेतल्या मत्रांचे पठण चालू आहे. ध्वनि-क्षेपक, टेपरेकॉर्डस् याच्या तारा पसरल्या आहेत. या सर्व रग आणि नाद आणि सुगधाच्या कल्लोळात बुद्धाची मूर्ति अभयहस्त मुद्रेत बसलेली आहे. पद्मासन, डोळे अर्धोन्मिलित आणि अभय आशीर्वाद देणारा तो पद्महस्त या देवाला आम्हा माणसांच्या या भौतिक हव्यासाचे काय वाटत असेल? भक्त आणि देव याच्यातले अतर कमी झाले आहे, का अजून भक्ताला मधे एक दलाल लागतो आहे? नैवेद्य अर्पण करून देव प्रसन्न होईल, असे वाटणे हा देवाचा अपमान का आपल्या तीव्र करुणाभावनेचे उदात्तीकरण? भगवान बुद्ध जाणे. पण या पाली मत्रपठणाच्या नादाची एक धुंदी आहे यात शका नाही यातच देवाच्या प्रदक्षिणेला सुरुवात होते सैनिकाचे पायसुद्धा वाजत नाहीत चदनाचा धूर वर्तुळाकार करीत वर जात असतो यातच शुभ्र वसनातल्या भिक्षुणी प्रदक्षिणेला निघतात परिक्रमेचा रस्ता मात्र इतका शांत आहे. ह्या शेकडो माणसाच्या पावलाच्या आवाजावाचून दुसरा आवाज ऐकू येत नाही. रात्र पडायला लागली आहे. देवळाच्या प्रकाशात अंधार साठायला लागला आहे. मेणबत्त्याचे प्रकाशाचे ठिपके आणि उदबत्त्यांचा दरवळ वर नेणारी वर्तुळे मंदिराभोवती हळूहळू प्रदक्षिणा करीत आहेत आत बुद्धमूर्ति शात आहे. भक्ताच्या चेहऱ्यावर उत्सुक पण आर्त भाव आहे त्या करुणाघना तुझ्या कृपास्पर्शाने जीवन उजळेल का?

## राजकीय इतिहास

थायलडमधे पुराणग्रथ तीन, रामकीएन किंवा रामायण, बुद्धचरित्र आणि 'तीन जगे' तिसरा ग्रथ चिनी परपरेतून आलेला आहे. या तीनही ग्रथातून आणि जातक कथातून

घेतलेल्या प्रसगावर अनेक नृत्ये, नाटके, शिल्पे आणि भित्तीचित्रे काढली गेली आहेत नतरच्या काळात चिनी परपरेचा परिणाम म्हणून दगड आणि झाडाच्या चित्रणावर चिनी ठसा दिसतो. या चित्रपरंपरेमागे काही राजकारणाचा इतिहास आहे १९३० ला 'लोकपक्ष' नावाच्या पक्षाचे नेते फील्ड मार्शल पिबुल होते त्यानी ३२ साली राज्यक्राती घडवून आणली आणि राजसत्तेचे सार्वभौमत्व मान्य झाले या पक्षाचे राजगुरु होते प्रीदी (प्रीति) पानोमोयाग फ्रान्समध्ये वकिलीचे शिक्षण घेतलेले हे गृहस्थ आणि पिबुल याच्या झगड्यात पुढची पचवीस वर्षे गेली पण १९३२ साली राजा राम सातवा याने देशाला लोकशाही ससद देणारी घटना मान्य करवून घेतली याच काळात लष्करी उठाव व्हायचा पुन्हा एकदा नागरी सत्ता यायची असा लपडाव चालला होता परतु पतप्रधान पिबुल याने थायलडचे आधुनिकीकरण करायचा सपाटा लावला गरज पडेल तर लोकांना फरफटत न्यायचे पण त्याना आधुनिक करून सोडायचे हा त्याचा बाणा होता तुर्कस्थानच्या कमाल पाशाप्रमाणे अतातुर्क पिबुलने लोकाचे कपडे, भाषा, घरे, सगळ्यावर पाश्चात्त्य छाप टाकली लोक सूट, हॅट घालू लागले स्त्रिया सारोंग न घालता पाश्चात्त्य झगे घालू लागल्या इतकेच काय पिबुलने 'सयाम' हे देशाचे जुने नाव टाकून थायलड हे नवीन नाव दिले थाय म्हणजे स्वतत्र पिबुलचा युद्धकाळात जपानला पाठिंबा होता त्याला आशा होती की दुसऱ्या महायुद्धात जपानचा जय होईल पण जपानचा पराभव झाला पिबुलचा पराभव करून प्रीदी सत्तेवर आला १९३२ च्या राज्यक्रातीनंतर सयामच्या राजाने राज्यत्याग केला होता आणि तो इग्लडमध्ये राहात होता तो १९४१ साली वारला त्याचा एक पुतण्या आनद महिदॉल हा स्वित्झर्लंडमध्ये शिकत होता तो वारस ठरला एक प्रधानमडळ राज्यकारभार बघू लागले आनद वीस वर्षांचा होईपर्यंत युरोपात राहिला १९४० साली परत आला त्याचे लोकानी प्रचड स्वागत केले एक वर्षानतर 'ग्रँड पॅलेस' या राजवाड्यात त्याच्याच शयनगृहात गोळ्या घालून खून करण्यात आला हा खून होता का आत्महत्या होती हे आजवर न उलगडलेले कोडे आहे त्यावर कमिशन नेमले, चौकश्या झाल्या पण या विषयी थाय राजनीतीने जे मौन धारण केले आहे ते आजतागायत हा विषय कोणी बोलत नाही बोललेला कोणाला आवडत नाही याचा परिणाम असा झाला की, आनंदाचा धाकटा भाऊ भूमिपाल, अदूलदेज (अतुलतेज) हा नववा राम म्हणून राज्यावर आला पिबुल पुन्हा सत्तेवर आला आणि पाश्चिमात्य सस्काराना पुन्हा जोर चढला या काळात बँकाकच्या शिल्परचनेवर युरोपियन ठसा आला आणि आधुनिक चित्रकला, वास्तववादी चित्रकला याचा आरभ झाला

बँकाकची वाहतूक हा एक जगावेगळा प्रकार आहे हे शहर मुळात कालव्याचे बोटीने ये-जा व्हायची तिथे रस्ते झाले पण त्यावरून बैलगाड्याहि नीट जाणार नाहीत असे त्यात अमेरिकन मदतीबरोबर इतक्या मोटारी आल्या की बपरला बपर लावून गाड्या जात असतात त्यातच लोकसेवेसाठी बसेस त्या भयानक वेगाने जातात गमत म्हणजे त्याच्यावर एक पाटी लावलेली असते "तुम्ही एकदाच जगत असता" मात्र सावधानतेचा हा इशारा बस ड्रायव्हरपेक्षा पादचाऱ्यांच्यासाठी असावा त्यातच मोठ्या

आकाराच्या रिक्षा बेगुमान धावतात त्याना टुकटुक म्हणतात त्यात तीन प्रवासी बसायची सोय आहे पण बसतात मात्र आठ–नऊ लोक वाढत्या वस्तीबरोबर कालवे बुजवून त्याचे रस्ते करण्यात आले, पण यानी काही प्रश्न सुटला नाही. उलट त्यामुळे ड्रेनेजची सगळी व्यवस्था अस्ताव्यस्त झाली यात भर म्हणजे पावसाळा पावसाळ्यात बँकाक एखाद्या पाणी भरलेल्या परातीसारखे असते पावसाचे भरपूर पाणी शिवाय उत्तरेकडच्या भातशेतीतून खाली वाहून आलेले पाणी याचा प्रलय होतो आणखी खाली दक्षिणेकडे पाणी जाऊच शकत नाही एका पावसाळ्यात (८४ साली) टेलिफोनच्या ताराच्या स्पर्शाने तेरा लोक मरण पावले कारण त्यात वीज शिरली होती आणि दोन हजार लोकांना पाणसाप चावल्यामुळे रुग्णालयात दाखल करावे लागले खरा प्रश्न आहे तो शहराच्या पातळीचा बँकाकचा सर्वात उंच भाग हा समुद्रसपाटीपासून फक्त सहा फूट उंचीवर आहे खालचे भाग हे समुद्रसपाटीच्याही खाली आहेत जमिनीतले पाणी नळाने वर खेचले जाते पण भूगर्भातील पाण्याची पातळी जशी खाली जाते तसे बँकाक शहरहि खाली जाते आहे बँगकॉक चा मूळ अर्थ 'ऑलिव्ह फळाचे खेडे ' फ्रेंच लोकांनी हे वसवले. टस्किन नावाच्या राजाने थॉनबुरी या उपनगरात राज्य केले पण तो जुलमी होता म्हणून त्याचा सेनापती चाओ फाया चक्री याने त्याला पदच्युत केले. राजाचे रक्त भूमीवर सांडता कामा नये म्हणून त्याला रेशमी थैलीत बंद केले. चंदनाच्या लाकडाने मारून त्याची मान मोडली यानंतर चक्री वंशाचे राज्य सुरू झाले आता एकच मोठा कालवा या शहरात उरला आहे. पण या क्लोंगच्या काठावरून रमतगमत जाणे हा एक मजेशीर अनुभव आहे.

## चैनीचा आध्यात्मिक अर्थ

आशियातल्या दोन मोठ्या संस्कृती. भारत आणि चीन त्यांच्यामध्ये थायलंड आहे भारतीय संस्कृतीत फार अवघड प्रश्नाची चिकित्सा होते आध्यात्मिक चर्चा होते. ईश्वर कसा आहे, कोठे आहे जीवन म्हणजे काय, मरणाचा अर्थ काय इत्यादी चिनी संस्कृती अवघड पण भौतिक प्रश्नाचा विचार करते. पैसे कसे मिळवावे, कसे राखावे, कुटुंबाचे सातत्य कसे टिकवावे काय खावे, काय प्यावे त्यामुळे भारतीय गंभीरपणा घेऊन थाय लोकानी तो भौतिक प्रश्नाना लागू केला आहे थोडक्यात म्हणजे मजा कशी करावी याचा गंभीर विचार ते करतात याला ते म्हणतात 'सानुक' त्याचा शब्दश अर्थ 'मजा करणे' त्यामुळे एरवी गप्पा मारतामारता जरा गंभीर वळण लागले तरी थाय माणूस म्हणतो 'तुम्ही फारच विचार करता बुवा' आणि मग गप्पाची गाडी साध्या टवाळ गप्पाच्याकडे वळते मला वाटते की थाय मित्राना फार गंभीर व्हायला आवडत नाही त्यांना वाटते आपण खूप त्रागा करतो जी गोष्ट ज्यावेळी व्हायची ती झाली नाही की आपण रागावतो थाय माणूस शांतपणाने म्हणतो "माइ पेन राय" मराठीत स्वैर भाषांतर करायचे तर "जाऊ द्या हो, होऊन जाईल " किंवा पंजाबी माणूस म्हणतो, "की फर्क पैंदा' काय फरक पडणार किंवा युरोपात म्हणतात 'नो प्रॉब्लेम' त्यातलाच हा प्रकार आहे थायलंडमधील चिनी लोकही हळूहळू या 'सानुका' पद्धतीकडे झुकत आहेत पूर्वी ब्रह्मदेशातून आक्रमण होत असे अनेक चिनी लोक तिकडून आले या आक्रमणातून

बुद्धमूर्ति वाचवाव्या म्हणून शुद्ध सोन्याच्या या मूर्तींच्यावर मातीचा लेप दिला जाई एकदा एक १५ फूट उचीची मूर्ति आणताना पाऊस पडला. माती ओली झाली जरा धक्का लागल्यावर ढलपे निघाले आणि आतील सोने दिसू लागले अशा प्रसगीसुद्धा थाय माणूस ४० टन सोने पाहिल्यावर म्हणाला "माइ पेन राय" असू द्या हो. मला वाटते थाय लोकांनीच ही गोष्ट बनवली असेल थायलँडमध्ये सर्वात प्रसिद्ध बुद्धमूर्ति आहे ती निजलेल्या बुद्धाची खऱ्या अर्थाने हा पुतळा बुद्धाच्या निधनाचा आहे. १५० फूट लाब असलेल्या या पुतळ्याच्या पावलावर मोत्याचा लेप लावला आहे या पावलाचे १०८ भाग आहेत आणि त्यावर सर्व शुभलक्षणे बघायला मिळतात पण या थाय 'सानुक' प्रमाणे या महाकाय मूर्तीच्याजवळ नाणी टाकून करायला लाल फोन आहे. दाराशी लॉटरीची तिकिटे मिळत आहेत स्थार्थ परमार्थाची विलक्षण सागड घातली आहे.

## बँकॉकमधले निशाजीवन

बँकाकमधले निशाजीवन हा वेगळाच प्रकार आहे. पॉटपॉग रस्ता, सुकुमथायचा काही भाग अशा काही पेठात हा मनोरजनापासून ते देहविक्रयापर्यंतचा व्यवसाय चालतो. खास इंग्रजी पद्धतीचे बार इथे आहेत. तसे खास पद्धतीची उत्तान पार्लर्स आहेत. या मदक बाहुल्याच्या जगातही वेगळेपण आहे ऑस्ट्रेलियन, जर्मन वेश्या हाच धदा करते पण थाय व्यवहारात एक शान आहे. कलात्मकता आहे. थायलंडच्या महिदॉल विद्यापीठाने याचा अभ्यास केला. त्याना असे आढळले की, बँकाकमध्ये अशी जवळजवळ १००० च्या वर ठिकाणे आहेत. बार, क्लब, मसाज पार्लर्स इत्यादी कायद्याने १९६० पासून वेश्याव्यवसायाला बंदी आहे याशिवाय २४ च्या वर 'सोबती' पुरवण्याच्या – एस्कार्ट सस्था आहेत. मसाज करणाऱ्या १००० मुलींच्यापैकी १% जास्त मुली सरकारी नोकरीत असून, जास्त पैसे मिळवण्यासाठी हा उद्योग करतात. हे वाचल्यावर सत्ताधारी मडळींची काही दिवस झोप उडाली होती या अभ्यासाप्रमाणे बँकाकमध्ये २ लाख मुली वेश्याव्यवसायात आहेत जगातला सगळ्यात मोठा हा बाजार आहे. याशिवाय 'पुरुष वेश्या' हा प्रकारही इथे आहे आपल्याकडे 'हिजडे' असतात त्याना 'ट्रान्सव्हेस्टाईटस्' म्हणतात. याच्या जाहिराती वृत्तपत्रात येतात त्याचे क्लब्ज वेगळे आहेत अरबांच्यासाठी वेगळा क्लब आहे. थायलडच्या आर्थिक नियोजनात ग्रामीण भागाला अग्रक्रम नसल्यामुळे गरिबीच्या आसुडाखाली मार खाणाऱ्या कुटुंबातल्या या मुली या बाजारात येतात दुर्दैव असे की थाय सरकारचे पर्यटन खाते या बाजाराची निर्लज्ज जाहिरात करते कोणी कसे वागावे हा ज्या त्या देशाचा प्रश्न आहे पण आशियाच्या उबरठ्यावर 'एडस्' रोगाचा धोक्याचा कदील दिसत असताना याचा पुनर्विचार व्हावा असे सर्वांनाच वाटते

## तरंगता बाजार

पश्चिमेला तासभर शहराबाहेर गेलो की, दरम्नोन सादुक शहर लागते इथे तो जगप्रसिद्ध तरगता बाजार आहे एकेकाळी देशाचा सर्व व्यापार या लहान लहान नावातून चालत असे चिंचोळ्या आकाराच्या या लाब नावा बायका चालवत असतात छत्रीसारख्या

भल्यामोठ्या बाबूच्या टोप्या लाब हाताचे निळे ब्लाऊझ आणि काळे सोराग पाण्यात असताना ऊन लागले तर त्वचा काळी होते, म्हणून हा पोशाख या बोटीत ताजी ताजी फळे, भाज्या, मासे, मास आणि फुले ओतप्रोत भरतात काही नावा म्हणजे तरगती स्वयपाकघरे असतात पूर्वी सर्व पदार्थ बांबूच्या टोपल्यात दिले जात आता प्लॅस्टिकच्या पिशव्या आल्या आहेत, इतकाच फरक आता कोकाकोलासुद्धा प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून दिला जातो

या प्रदेशात प्रथम भारताच्या आग्नेय भागातून आलेले 'मॉन' वशाचे लोक पोचले सम्राट अशोकाच्या बौद्ध धर्माचा संदेश घेऊन ते आले त्यावेळी नारलोन पॅथोम ही या राज्याची राजधानी आणि या साम्राज्याचे नाव 'सुवर्णभूमि' होते आजहि बँकाकला २०० वर्षे झाली त्याप्रसगी राजाने जी घोषणा केली त्यात थायलडला पुन्हा एकदा 'सुवानभुवान' सुवर्णभूमि करण्याचा आदेश दिला होता या साम्राज्याच्या सीमा ब्रह्मदेशापासून व्हिएतनामपर्यंत आणि दक्षिणेकडे मलेशिया, ब्रुनेईपर्यंत होत्या यानतर इथे 'द्वारावती'चे साम्राज्य आले त्याची सीमा कबोडियापर्यंत वाढली ही 'मॉन' जमात कलाकुसरीत फार प्रवीण होती मधली काही शतके अधारात गेली. पण १९०० साली रेल्वे बाधण्यात आली या भागाला पुन्हा ऊर्जितावस्था आली इथल्या फळबागांतून नारळ, केळी, सीताफळे, कलिंगडे आणि दुरियन सर्वत्र निर्यात केले जातात जवळ काचनबुरी (कांचनपुरी) नावाचा प्रदेश व त्याच नावाची राजधानी आहे 'माअे क्लाँग' नावाच्या नदीचे हे खोरे सुपीक आणि सपन्न आहे या नदीला मिळणारी एक उपनदी म्हणजे 'क्वाई' नदी या खोऱ्यात सर्वत्र हिरवेगार आहे आणि भूगर्भातही नीळे खडे, नीलमणी सापडतात सागवानी लाकूड ब्रह्मदेशाला विकणे हा जुना धदा इथे हिरवट जाभळ्या रगाची उसाची शेते आणि त्यावरचे तुरे पाहिले की खऱ्या सुजलाम् सुफलाम् राज्याची कल्पना येते इतक्या सुदर प्रातात एक मोठी शोकातिका झाली गेल्या युद्धात जपानी लोकानी युद्धकैद्याना गुलाम करून त्याच्याकडून या नदीवर पूल बाधला यासाठी झालेले अत्याचार, नतरचे बड आणि उडवलेला पूल या नाट्यमय कहाणीवर 'ब्रिज ऑन द रिव्हर क्वाई' हा प्रख्यात चित्रपट निघाला हा पूल बाधून ब्रह्मदेशावर स्वारी करायचा जपानचा विचार होता हा पूल प्रचड वेगाने अत्यत कमी वेळात बाधला दहा दशलक्ष क्युबिक मीटर दगड लाबून आणला नऊ मैल पूल बाधला यात १२ हजार युद्धकैदी आणि १ लाख इंडोनेशिया, मलेशिया येथून आणलेले मजूर मरण पावले त्या काळातल्या जपानी तुरुगासारख्या बराकीत या विषयीचे प्रदर्शन आहे या युद्धकैद्याच्या छावणीत सडास नव्हते खाली खोदलेल्या खाईवर लाकडी वासे टाकून त्या दोन तुळ्यावर बसावे खाली किडे वळवळत असायचे जखमा बऱ्या होत नसल्या की नदीत बसायचे म्हणजे चिघळलेला भाग माशांच्या झुडी येऊन खाऊन टाकत वेदनाशामक उपलब्ध नसल्याने, सडलेले अवयव, कापण्याची करवत या प्रदर्शनात बघायला हवी या युद्धकैद्याच्या छावणीत बसावे खाली किडे वळवळत असायचे जखमा बऱ्या होत नसल्या की नदीत बसायचे म्हणजे चिघळलेला भाग माशाच्या झुडी येऊन खाऊन टाकत वेदनाशामक

उपलब्ध नसल्याने सडलेले अवयव, कापण्याची करवत या प्रदर्शनात आहे पण या प्रचड, क्रूर मरणाच्या थैमानात 'ऐडवर्ड डनलॉप' या ऑस्ट्रेलियन सर्जनने हजारो लोकाचे प्राण कसे वाचवले त्याची चित्रे, वर्णने प्रत्यक्षच प्रदर्शनात बघायला हवी. परत जाताना वाटेत लागते 'आयुध्या' किंवा अयोध्या हे साम्राज्य जवळजवळ सहाशे वर्षे भरभराटीत होते. सम्राट नाराय (नारायण) ह्याच्या पदरी जपानी 'सामुराई' सैनिक होते या काळात येथे डच, स्पॅनिश, इग्रज, भारतीय, इराणी आणि मलायातील लोक राहत होते इतकेच काय पण राजाचा एक दिवाण हा ग्रीक होता याच्या दरबारात फ्रेंच लोक पुष्कळ होते आणि पहिल्या जेसुइट सस्था इथेच स्थापन झाल्या याच काळात 'फराग' म्हणजे परदेशी – विशेषत· गोरा हा शब्दप्रयोग भारतातून आला. तीन नद्याच्या सगमावरचे हे अयोध्या शहर एकेकाळी फार सुदर असावे. गरुड, हनुमंत, ड्रॅगन याच्या प्रचड मूर्ति इथे आहेत श्रीलकेमधून आलेल्या 'हीनयान' बुद्धपथाने इथेच पाय रोवले बुद्धाचा शिष्य मोंगोल याच्या नावाने इथे स्तूप आहे, पण आज सारे वैभव उद्ध्वस्त दिसते आहे ओसाड भिंती, भग्नमंदिरे असलेल्या पठारावर सुसाट वारा धावत असतो भोवती शिरिषाचे वृक्ष, गुलमोहोराचे वृक्ष लालभगवे रूप घेऊन उभे आहेत त्या धावत्या वाऱ्यात मन शतकामागून शतके ओलाडत जाते. मनी उरते ती फक्त खत शब्द उरतो तो फक्त ''हा हत हा हत''

## उत्सव आणि सण

सध्याचे राजे राम – भूमिबाल यांनी तीस वर्षांपूर्वी पेरणीचा एक उत्सव पुन्हा सुरू केला राजा, राणी, राजपुत्र, राजकन्या सारे जुन्या बँकाकच्या एका उद्यानात जमतात कृषिखात्याचे सचालक पारपरिक पोशाख करून स्वागत करतात. मग शिंग तुताऱ्याच्या नादात ही मिरवणूक शेताकडे जाते चार स्त्रिया खांद्यावर शिंकाळी घेऊन येतात दोन चांदीच्या आणि दोन सोन्याच्या टोपल्यातून पेरणीला लागणारे भात आणले जाते त्यांच्या मागे चार नांगर, जमीन नागरतात आणि या टोपल्यातून भात टाकले जाते. सहा जातीचा तांदूळ पेरला जातो मग मोठ्या तबकातून नैवेद्याचे अन्न आणले जाते राजाने त्याला आशीर्वाद दिला की ते बैलाना आणि गाईला घातले जाते बैल लाब जिभेने जे अन्न प्रथम फस्त करील त्यावर पुढील वर्षाचा हगाम कसा जाईल, याचे भविष्य राजज्योतिषी सागतो नतर ही तबके 'नटराज' शिवाच्या मूर्तीपुढे अर्पण केली जातात गतवर्षीच्या कृषिपंडितांना पुरस्कार दिला जातो थायलडच्या मध्य भागात मैलोमैल भातशेती केली जाते या भागात फारसा वारा नसतो त्यामुळे पाणथळ जमीन, हिरवीगार भाताची रोपे आणि निळे आभाळ यांचे नाते इथे आपल्याला जाणवते जगातल्या निर्यातीपैकी निम्मा तांदूळ इथून जातो थाय परपरेत तादुळाची एक मातृदेवता आहे. (माऊे फोसोप) प्रतिवर्षी गर्भवती होणाऱ्या भूमातेच्या या बाळाना–तांदुळांना आत्मा आहे म्हणूनच त्यांच्यासाठी अष्टदिशाची पूजा केली जाते. थायलडमधून तादूळ निर्यात होत असला तरी दर एकरी उत्पन्न मात्र कमी आहे आणि सर्वसाधारण शेतकरी खूप गरीब आहे

थायलडच्या लोकांना राजाविषयी खूप प्रेम आहे भूमिबॉल राजा होण्याची शक्यता

फार कमी होती पण त्याचे काका निपुत्रिक वारले थोरल्या भावाचा अपघाती मृत्यु झाला सध्याचे राजे भूमिबॉल हे सडसडीत, चष्मा लावणारे, सवेदनशील आहेत आणि थाय राष्ट्रीयत्वाचे ते प्रतीक झालेले आहेत देशाच्या विकासात त्याना खूप रस आहे गरिबाचा कळवळा आहे आणि आपल्या राजधर्माची त्याना खूप जबाबदारी वाटते. त्यानी पूर्वी भिक्षू होण्याचे व्रत पूर्ण केले आहे आणि गेल्या तीस वर्षात त्यानी अनेक प्रकल्पाना प्रत्यक्ष मदत केली आहे वनविकास, आदिवासी कल्याण, कृत्रिम पाऊस, चागल्या भाताची पैदास अशा अनेक कल्पना त्यानी स्वत· राबवल्या आहेत. त्याना चित्रकलेची, सगीताची खूप आवड आहे 'मनोहरा' नावाचे नृत्यनाट्य त्यांनी दिग्दर्शित केले त्याचा प्रयोग व्हिएन्ना येथेहि झाला होता त्याची थोरली मुलगी 'उबोलरत्ना' हिने एका अमेरिकन इजिनिअरबरोबर लग्न केले ती अमेरिकेत राहते. याचे राजा राम यांना दु·ख आहे. पण त्याची लाडकी मुलगी 'सिरिन्धॉर्न' (श्रीनिधान) हिला लोक 'फ्र' थेप, देवता मानतात त्या पाली आणि सस्कृतच्या विद्यार्थिनी आहेत समाजकल्याण व सस्कृतीच्या प्रेमी आहेत राजा आणि राजकन्या याच्याशी एकदोनदा भेट झाली अतिशय कुशल संवादपटू आणि राजकारणाची जबरदस्त जाण त्याना आहे. आज तरी 'श्रीनिधान' ह्या कन्येकडे राजपद जाईल असे वाटते

दक्षिणेकडे 'सुखोथाय' हे असेच जुने शहर आहे पूर्वी ज्यावेळी कुबलाखानाची चीनवर धाड आली त्यावेळी युनान आणि सेचुआन प्रांतातले हजारो शेतकरी पळाले खेमरमधून, सुपीक जमिनीच्या शोधात सुखोथियला आले. इथला राजा 'इत्रदित' (इद्रजीत) शिलालेखावर धर्माज्ञा कोरल्या. या राजाने, राजवाड्याबाहेर एक घटा लावून, कोणीही प्रजाजनाने दाद मागण्यासाठी घटा वाजवावी अशी व्यवस्था केली होती याच काळात थाय लिपीचा शोध लागला याच राजाने हिंदू राजपद्धती सोडून बौद्ध पद्धतीचा राजयोगी राजा असावा अशी पद्धत सुरू केली अयोध्येचा राजा 'नारायण' याने पावसाळ्यापूर्वी पतग उडवायची प्रथा सुरू केली सुखोथायमध्येहि ती वाढली आजसुद्धा सर्व देशभर एप्रिलमध्ये पतगाचा उत्सव होतो मैदानाचे दोन भाग केले जातात एक पुरुष-पतगाचा, एक स्त्री-पतगाचा या फरकानुसार पतगाचे आकार आणि रग असतात सुखोथाय भागात श्रीलकेच्या परपरा थाय परपरेत मिसळल्या आहेत हत्तींच्या सोंडेने उचललेला स्तूप ही खास श्रीलकन शैली आहे श्रीलकेच्या 'थेरवडा बुद्धसप्रदायाचा' (स्थविरथेवर-थेरवडा-थेरडा) थाय धर्मपरंपरेत आजही समावेश झालेला आहे

थायलंडच्या उत्तरेला सर्वात प्रसिद्ध भाग म्हणजे चेंगमाय पिंग, वांग, नान आणि यॉम या चार नद्यांनी हा प्रदेश समृद्ध केलेला आहे जुन्या काळी या प्रदेशाला 'लान्ना' (हजार भातशेते) असे नाव होते चिआग थाय शहराला उत्तरेचे गुलाबपुष्प मानतात या भागात सक्रात आणि रगपचमी भारतीय पद्धतीप्रमाणे साजरी केली जाते सक्रांतीनंतर आभाळातल्या नागदेवता हिमालयातले पाणी आभाळातून ओततात अशी दतकथा आहे चेगमायचे आदिवासी हस्तकला कौशल्यात खूप तरबेज आहेत

## सोनेरी त्रिकोण

थायलड, लाओस आणि ब्रह्मदेश याच्या सीमा जिथे मिळतात त्या भागाला 'सोनेरी त्रिकोण' म्हणतात या भागात अफू केली जाते सरकारशी कायम भांडत असलेल्या शान जमातीच्या लोकानी 'शान युनायटेड आर्मी' नावाची निमलष्करी सघटना स्थापन केलेली आहे या राजकीय कामासाठी अफूचा व्यापार करून ते पैसे मिळवतात एका अफूच्या तांड्यात १५० ते २०० खेचरांच्या पाठीवर अफू लादलेली असते या भागातला अफूची निर्मिती आणि व्यापार बद व्हावा म्हणून चीन, थायलड, फ्रान्स, अमेरिका एकत्र येऊन प्रयत्न करीत आहेत या अफूच्या प्रश्नात फार खोल राजकारण गुंतलेले आहे. ज्यावेळी फ्रेंच सरकार इडोचायना भागातील कम्युनिस्टाचा उठाव मोडायचा प्रयत्न करीत होते त्यावेळी लाओ सरहद्दीवरच्या 'हामाँग' वन्यजातींचे सैन्य त्यानी उभारले व्हिएतनाम युद्धाच्यावेळी अमेरिकेने याच तत्राचा अवलब केला. वरकरणी सायगावमध्ये अफूची जाहीर होळी करत असताना, गुप्तपणे लाओशियन भागात आदिवासी 'हामाँग' सेना उभारणी अमेरिकेनी केली अफूचे उत्पादन वाढले त्या सैन्यासाठी अमेरिकेने ही अफू विकत घेतली पण करायचे काय? पूर्वीपासून स्थानिक प्रयोगशाळातून अफूचे रूपांतर 'हिरॉइन'मध्ये केले जात असे या आदिवासी भागात हेच घडले यापैकी ९८% हिरॉइन व्हिएतनाममध्ये लढणाऱ्या अमेरिकन सैनिकांपर्यंत पोचले व्हिएतनामचे युद्ध सपण्यापूर्वी दर पाच अमेरिकन सैनिकातला एक सैनिक 'हिरॉइन' बाज झाला होता याबाबत श्री. अल्बर्ट मॅकाय यांचे ''आग्नेय आशियातील अफूचे राजकारण'' नावाचे पुस्तक प्रसिद्ध आहे. (१९७२) या 'हामाँग' सैन्यातील अनेक माणसे व्हिएतनामनंतर अमेरिकेत स्थायिक झाली आहेत कम्युनिस्ट जगात थायलड हे भाडवलदारी बेट आहे. अफूवर जगणाऱ्या भाडोत्री सेनाचे काय करायचे हा थायलंडपुढे मोठा प्रश्न आहे. ब्रह्मदेशातले चीन, करिन आणि शान या जमाती स्वत:चे स्वतत्र अस्तित्व स्वतत्र राज्य करू पाहात होत्या. शान ही जमात सयामचेच रूप आहे माओ त्से तुगच्या सैन्याचा पराभव करण्यासाठी पुन्हा एका अफू निर्मितीला चँग के शेकच्या चीनने प्रोत्साहन दिले. ब्रह्मदेशातील 'वा' आदिवासींना या कामाला लावले. तायवानच्या नेत्यानी या जमातीला लष्करी शिक्षण आणि शस्त्रे दिली हिरॉइन करण्यासाठी तज्ज्ञ चिनी रसायनशास्त्री पाठवले मधल्या काळात 'खुन सा' हा सोनेरी त्रिकोणातल्या भाडोत्री सैन्याचा आणि आतरराष्ट्रीय राजकारणातला नेता झाला होता ब्रह्मदेशाच्या सरकारने त्याला ''स्वयंसेवक सैन्याचा'' जनरल नेमले या सेनापतीने मोठ्या प्रमाणावर अफूचा व्यापार सुरू केला. १९६७ साली 'अफूची लढाई' होऊन खुन सा ला पकडून तुरुगात टाकण्यात आले. पण नतर दोन रशियन तज्ञाची 'शान' टोळ्याच्या ताब्यातून सुटका करण्याच्या अटीवर त्याची सुटका झाली १९७० च्या सुमाराला ब्रह्मी सरकारविरुद्ध उठाव करणाऱ्या कम्युनिस्ट 'आदिवासी' टोळ्याचा पाठिंबा चीन सरकारने काढून घेतला परिणामत: या भागातले दहा हजार भाडोत्री सैनिक बेकार झाले १९७९ ते १९८१ या काळातल्या दुष्काळाने अफूचे पीक नष्ट झाले थाय सरकारने अफूविरुद्ध आघाडी उघडली पण अजूनही हिरॉइन

उत्पादनात सोनेरी त्रिकोणाचा ८०% भाग आहे असे थाय सरकारला वाटते मध्ये एकदा इराण, अफगाणिस्थान आणि पाकिस्तान याच्यामधल्या प्रदेशात सोनेरी चद्रकोर, अफू निर्मिती वाढली होती. पण आता पुन्हा एकदा 'सोनेरी त्रिकोणाची' या उद्योगावरची अधिसत्ता वाढू लागली आहे. तुर्कस्थान-सिसिलीमधून युरोपकडे अफू नेणारा माफियांचा मार्ग मर्यादित झाल्याने सोनेरी चद्रकोरीच्या उत्पादनात घट झाली पण आता चीनला अफूच्या या उद्योगात पुन्हा रस वाटतो आहे असे म्हणतात जेथे मोठी चिनी वसाहत आहे तेथे ॲम्स्टरडॅम, लंडन, सानफ्रान्सिस्को, व्हॅंक्यूव्हर, न्यूयॉर्क येथे हा मला पोचवला जातो चिनी 'ट्रियाद' पद्धतीमुळे पैसे पाठवण्यासाठी चेकबुक लागत नाही गुप्तपणाने चालणारी ही 'चिट' - पद्धत अशी आहे. न्यूयॉर्कमधल्या सोन्याच्या दुकानात-चिनी दुकानात - एकजण जातो एक दशलक्ष डॉलर्स घेऊन जातो. त्याच्या बदलात कोठे तरी 'योग्य ठिकाणी' हिरॉइन ही मादक पूड पोचवलेली असते थायलडच्या दृष्टीने हा एक नवाच प्रश्न उभा राहिला आहे. मुख्यतः अमेरिकन मदतीने, 'मारिजुआना' निर्मिति सुरू झाली आहे. परदेशी मदतीने हे उत्पादन शेतकरी करतात आणि 'थाय स्टिक्स' नावाने ते जगभर विकले जाते अफू थंड हवेत वाढते पण मारिजुआना कुठेहि उगवतो खरा प्रश्न अफूचा नसून, त्यामागच्या राजकारणाचा आहे ते थांबल्यावाचून हा प्रश्न सुटेल असे वाटत नाही

## आदिवासी

थायलडच्या उत्तरेला, वनवासी आदिवासी वस्ती आहे. येथे जवळजवळ ५ लक्ष लोक आहेत जमीन जाळायची मग शेती करायची अशी त्याची भटकी शेती असल्याने दर दोन-चार वर्षांनी त्यांचे गाव बदलते त्याची भाषा तिबेटी वळणाची आहे. यात ब्रह्मदेशातून आलेले 'कारेन' आहे याउलट 'लावा' जमातीचे लोक फक्त १२ हजार आहेत याशिवाय हमॉंग किंवा मिगो, याव्रो, आखा आणि लाहू या मोठ्या जमाती आहेत सर्व आदिम जातींचे केंद्र म्हणजे त्याचे खेडे. खेड्यात अधिकार चालतो तो वृद्ध पचाचा त्याच्या खालोखाल देवऋषीचा किंवा पुजाऱ्याचा हे सर्व 'चाखाओ' लोक याचे वेश, भाषा, गाणी, संस्कार विधी इतर थाय लोकांच्यापेक्षा अगदी वेगळे आहेत या सर्वांचे पोशाख अत्यत रगीबेरगी, सुदर असतात लिसू लोक झळाळत्या निळ्या किंवा हिरव्या रंगाचे कपडे घालतात. तर हमोंग लोकांच्या कपड्यावर भूमितीमधले त्रिकोण, चौकोन, गोलाकार काढलेले असतात यावो लोक कपड्यावर वाघ, ड्रॅगन इ. चिन्हे भरतात. हे भरतकाम करायला दोन वर्षे तरी लागतात आदिवासींना सोने, खडे आवडत नाहीत ते चांदी वापरतात वर्षातून एकदाच ते चादीचे वाळे, माळा राखेने घासून नव्या वर्षासाठी चकचकीत करतात. कारेन जातीचे लोक मात्र चिंचेच्या पाण्यात चांदीचे दागिने उकळवून स्वच्छ करतात तबाखूसाठी पाईप किंवा पानासाठी पानदान बाळगतात अनेक आदिवासी खेड्यात रात्री, कोणीही फराग (किंवा फिरगी-परका) अथवा थाय माणूस जाऊ शकत नाही चेंग माई हे सोनेरी त्रिकोणाचे महाद्वार आहे.

येथील मेकाँग नदी ही ब्रह्मपुत्रासारखी प्रचड आणि वरदायिनी आहे हे आदिवासी खूप आगतस्वागत करणारे, आतीथ्यशील आहेत पण राजकारणाच्या जाळ्यात अडकलेला सुवर्ण त्रिकोण आणि खाली दक्षिणेला हिनयान बौद्धमताचा इतर थायलंड, यामध्ये आदिवासी सस्कृती मात्र हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. थायलंडमध्ये ईशान्य दिशेला 'ई सान' म्हणतात पण रूढार्थाने इ सान म्हणजे दूरचा प्रांत हा भाग चीन आणि कांपुचियाला जवळचा आहे यातूनही 'मेकाँग' ही महानदी वाहत जाते आळशावरून गगा जावी, तसे खूप पाणी, कसदार जमीन असूनही माणसे दारिद्र्याने गाजलेली आहेत या भागात दुष्काळ पडायचा तो पडतोच पाऊस फार कमी आहे इथल्या पावसाला वेडा पाऊस म्हणतात पडला तर एका रात्रीत सहा इच नाही तर सहा आठवडे थेंब नाही अमेरिकन सैन्य आल्यावर या प्राताचा विकास करायचा विचार सुरू झाला 'टॅपिओका' हे मुख्य पीक त्या पिकासाठी सर्रास जगलतोड झाली आज भाताच्या खालोखाल याची निर्यात होते जगलतोडीने पाऊस पळाला आहे. हा भाग लाओसच्या सरहद्दीजवळ आहे त्यामुळे इथे कायम तणाव असतो लाओ लोकांनी गोळीबार करायचे, विमान पाडायचे प्रकार घडतात पण थांबतात लाओसची गडबड चालू असते कारण त्यामागे रशियाचे शस्त्रबळ आणि सैन्यबळ आहे थायलडमध्ये अमेरिकन विमानतळ, शस्त्रे आणि सैन्य आहे गरिबाच्या अगणात पाटलाचे भाडण झाले तर माडव मोडतो तो गरिबाचा हेच खरे. या भागात काही जर्मन, कॅनेडियन लोक बुद्ध भिक्षू होऊन राहिलेले आहेत काय करतात बुद्धाला माहिती

कांबोडियाच्या सीमेलगतच्या भागात हत्ती सापडतात हत्ती हे थायलडचे राष्ट्रीय आणि राजचिन्ह शिल्पात, देवळात, चित्रात सर्वत्र हत्ती दिसतात. सैन्यात पूर्वी गजदळ होते पण सर्वात मोलाचा गजराज म्हणजे शुभ्र हत्ती किंवा ऐरावत (थायमध्ये एरावन) आजसुद्धा 'चित्रालद' राजवाड्यात १०-१२ पाढरे हत्ती आहेत. पाढरे याला थायमध्ये 'फेक' – पांढरा फेक – असावा असा शब्द आहे पण मी पाहिलेले हे पाढरे हत्ती शुभ्र नाहीतच, फार तर भुरे म्हणता येतील असे लग्नाची मुलगी गोरी नसली म्हणजे गहू वर्णाची असते तसाच हा प्रकार. या हत्तीला इतर राजलक्षणे पुष्कळ असतात, असे सागितले जाते तो झोपल्यावर घोरत नाही, श्वास सुगधी असतो इत्यादी पण हे हत्ती राजाचे असल्याने लांबून पाहून मी समाधान मानले हत्ती पकडणाऱ्या लोकाची वेगळी जमात आहे पण [illegible] तर तो राजालाच दान करावा लागतो. तसा कायदा आहे. 'पांढरा हत्ती' पाळणे हे अत्यत महागाईचे काम आहे तो केळी, साखर, अशा सात्विक आहारावर असतो या शतकाच्या सुरुवातीला थायलडमध्ये १ लाख हत्ती होते आज केवळ दहा हजार आहेत असे सागतात त्यातले निम्मे काम करतात. निम्मे जंगली आहेत जवळ काबोडियाची सीमा आहे दोन जागतिक महाशक्तींच्या साठमारीत कांबोडियातील अंतर्गत सघर्ष विकोपाला गेले आहेत राजपुत्र नरोदम (नरोत्तम) आणि सिंहनुक (सिंहमुख) याचे काय व्हायचे ते होईल पण लक्षावधी कापुचियन लोक

निर्वासित बनून थायलंडमध्ये आले आहेत काटेरी ताराच्या कुंपणात हे निर्वासित या भागात गेली १५ वर्षे आहेत. याना प्यायला ताजे पाणी नाही दर आठवड्याला युनोच्या 'हाय कमिशनर फॉर रिफ्युजीज' यांच्याकडून दहा कप भात आणि एक माशाचा डबा मिळतो त्यावर भागवायचे काबूज लोकाना जबरदस्तीचे एका ना एका राजकीय गोटात ओढले जाते खेमार रूज, खेमर मुक्ती आघाडी (लिबरेशन फ्रंट) किंवा प्रिन्स सिंहनूकचा राजकीय गट हे मुख्य गट. या निर्वासिताना शेत लावता येत नाही काम करता येत नाही हजारो बाया आणि मुले नुसती बसलेली आहेत. वाट पाहत आहेत पण कशाची? त्याना काय भविष्य आहे? रात्री बेरात्री व्हिएटनामी हल्ला होतोच. त्यामुळे रोज रात्री बाडबिस्तरा बांधून झोपायचे पळायला बरे. ह्या छावण्याना अधिकृत निर्वासित छावण्या मानले जात नाही खेमार रूज ही चीनच्या पाठबळाची तर प्रिन्स सिंहनूक ही रशियन पाठबळाची संघटना यातच 'पॉल पॉट' गटाचे शिरकाण चालूच असते यात भरडला गेला आहे कांपुचियाचा सामान्य माणूस ठेचली जात आहे त्याची समृद्ध सस्कृती ह्या छावणीत जाऊन कापुचियन मुलांना मी भेटून आलो दोन दिवस जेवण नकोसे झाले आजही त्या मुलाचे ओढलेले भकास चेहरे आठवतात आणि वाटते या जगाचे भवितव्य तरी काय आहे?

## 'पताया'चा सागरकिनारा

उत्तर आणि आग्नेयेपेक्षा थायलंडचा दक्षिण भाग खूप शात आहे इथे पतायासारखे निसर्गरम्य समुद्र किनारे आहेत पतायाची पांढरी वाळू इतकी मऊसूत, समुद्र इतका शांत निळा, प्रवाळ फार देखणे पण इथे 'जेलिफिश' तितकेच विषारी पतायाच्या उत्तरेला पाच मैलावर 'चित्रपवन' नावाचे बौद्ध तत्वज्ञान शिकवणारे महाविद्यालय आहे. इथेच 'फ्रा कितीबुत्थो' (कीर्तीवृत्त) नावाचा वादग्रस्त भिक्षुनेता राहतो. काहींच्या मते तो दारिद्र्य, भ्रष्टाचार याच्याविरुद्ध आहे तर काहींच्या मते तो उजव्या 'अमेरिकन' बाजूसाठी शस्त्रे पुरवतो. तो एकदा जाहीरपणाने असे म्हणाला की, "कम्युनिस्टाना ठार मारण्यात कोणतेही पाप नाही." बौद्ध तत्वज्ञानाचा पुनर्विचार करणारा दुसरा गट म्हणजे 'धम्मकाय' (धर्मकार्य) मंदिराच्या मिशनरी भिक्षूंचा. अमेरिकेत जसे महर्षी आणि योगी आहेत त्या पद्धतीने धम्मकाय प्रवचनांच्या कॅसेट्स, रंगीत पुस्तके आहेत. खूप संघटित अशी ही धार्मिक चळवळ असून, तिला अनेक राजकारणी नेत्यांचा पाठिंबा आहे. राजकुमारी श्रीनिधान यांनाही या पुनरुज्जीवनाच्या चळवळीत खूप रस आहे. परतु पताया, फुकेत या बेटावर वेगळीच पर्यटक सस्कृती वाढते आहे. दररोज हजारो पर्यटक येतात. त्याच्यासाठी पाण्याच्या तळाशी जाण्याकरता 'स्कूबा डायव्हिंग' 'वॉटर स्कूटर्स' सायकाळसाठी बार्स, मसाज पार्लर आणि हे पुरेसे नसेल तर 'स्त्री वेषातील पुरुषाचा शो' आहे हे पुरुष रंगभूमीवर झगझगीत प्रकाशात ओळखत नाहीत पण नंतर बाहेर आले म्हणजे बघवत नाहीत पतायाहून बोट घेऊन, मासेमारीसाठी, लाबवर समुद्रात जावे आणि खाली पाणी व आभाळ या शून्याकारात स्वत:ला हरवून जावे याचा आनद मी आणि माझ्या पत्नीने अनेकदा घेतला आहे

थायलंडमध्ये हॉटेलाची परपरा जुनी आहे थायलडमध्ये रेल्वे आली त्यावेळी सिंगापूरच्या गव्हर्नरासह अनेक अतिथी आले. त्याच्यासाठी फ्रेंच आचारी, चिनी आचारी बोलावण्यात आले होते. जपानमध्ये मोटार आणि टेलिफोन येण्यापूर्वी ते थायलडमध्ये आले त्यावेळचे 'रेल्वे हॉटेल' पुढे फार प्रसिद्धीस आले कारण 'किलिंग फील्डस्' या प्रख्यात चित्रपटाचे चित्रीकरण तिथे झाले पूर्वी 'ब्रिज ऑन द रिव्हर क्वाई' झाले होते अजूनही अनेक अमेरिकन चित्रपटांचे चित्रीकरण थायलडमध्ये होते आज बँकाकमध्ये या दृष्टीने जुने, सुदर आणि महाग हॉटेल म्हणजे 'ओरिएटल'. नदीच्या काठावर बसून शाही जेवण घ्यावे तर तिथेच तिथला वेटर चादीच्या थाळीतून एका वेळेला एकच वस्तू, एकाच गिऱ्हाईकासाठी आणतो अर्थात ओरिएटच्या सदर्भात गिऱ्हाईक हा शब्द योग्य नव्हे 'मेहमान', 'अतिथिदेव' हेच खरे. आता मात्र दुसितथानि म्हणजे 'स्वर्गलोक', रिजन्सी यासारखी प्रचड हॉटेल्स झाली आहेत

मला मात्र युनोच्या कार्यालयाच्या मागच्या बाजूला असलेले रॉयल किंवा थाय हॉटेल आवडते सध्याकाळी भात आणि तुळशीपत्र घातलेली थाय चिकनकरी खावी. वर खोलीत येऊन बाहेर गच्चीत पाय ताणून बसावे ९ मजले खाली रस्त्यावर भयकर वेगाने गाड्या जात येत असतात. खाली असलेल्या नृत्यगृहातील 'जाझ' सगीताचा अस्पष्ट ठेका ऐकू येतो रात्र झाली की समोरच्या बुद्धमंदिराच्या सोनेरी कळसाच्या मागे चद्रबिंब दिसू लागते. पाली स्तोत्रपठणाला घटा, झाझ याच्या तालावर सुरुवात होते मी आभाळात बघत, विचार करत राहतो की विरोधाभासाच्या या देशात, रामाच्या राज्यात, बुद्धाच्या शांतियात्रेत आज सकाळी मला भेटलेल्या कांबोजमधल्या निर्वासित मुलाचे काय होणार?

(केसरी, लोकसत्ता)

❀ ❀ ❀

# ४

## बदललेला

# पाकिस्तान

पाकिस्तानला आजवर तीन वेळा जाण्याचा योग आला. पहिल्या खेपेला गेलो त्यावेळी पाकिस्तान स्वतंत्र राष्ट्र म्हणून उभे राहत होते. चार-पाच वर्षांपूर्वी पाकिस्तान हुकूमशाहीच्या वरवंट्याखाली रगडले जात होते आणि अलीकडच्या काळात पुन्हा एकदा लोकशाहीचे वारे त्या देशात वाहू लागले आहेत दुसऱ्या खेपेला मी पाकिस्तानला गेलो तो आंतरराष्ट्रीय संघटनेच्यावतीने तिथे गेलो. तो काळ भारताविषयीच्या संशयाचा, हुकूमशाहीचा होता. त्यामुळे कराचीला उतरल्यावर व्हिसा असूनसुद्धा नवीन फॉर्म भरावे लागले आणि विमानतळातून बाहेर पडताना दररोज पोलिस ठाण्यावर हजेरी लावणे आवश्यक आहे, असेहि सांगण्यात आले. या सर्व प्रकारात क्षणोक्षणी माझा पारा चढत होता. आमच्या स्वागतासाठी आलेल्या माणसाजवळ स्वागताच्या या लोकविलक्षण पद्धतीचा निषेध करीत होतो. आणि तो गृहस्थ गयावया करून सांगत होता, "अजी हुजूर, माफ कीजियेगा." पाकिस्तानातील माणसे ज्यावेळी भारतात येतात त्यावेळी त्यांनाही पोलिस चौकीत हजेरी द्यावी लागते. रागारागातच आम्ही विमानतळाबाहेर पडलो. भोवतालची गर्दी, टॅक्सीवाल्यांची झोंबाझोंबी, माणसांचा कलकलाट हे सगळं मला ओळखीचे वाटत होते. हॉटेलात पोचल्यावर पाकिस्तान मंत्रालयातील सचिव भेटायला आले आणि माझा सगळा क्षोभ पुन्हा एकदा मी व्यक्त केला. ते म्हणाले, आपण आमचे मेहमान आहात आपल्याला कोठेही जायची गरज नाही पण कुणीतरी अधिकारी आपल्याला येऊन भेटले किंवा आपल्यावतीने कुणीतरी त्याना भेटेले, 'तकलीफ मॉफ हो ' त्यानतर भेटायला आले ते शेख नावाचे समाजकल्याणातील अधिकारी. हा गृहस्थ एकेकाळी पुण्यात साचापीर स्ट्रीटवर राहत होता त्याने चक्क मराठीत बोलायला सुरुवात केली त्याने पहिलाच प्रश्न विचारला, "का हो गोखले साहेब, साचापीर स्ट्रीट अजून आहे तसाच आहे का? तिथल्याच म्युन्सिपल मदरसामध्ये मी प्राथमिक शाळेत गेलो ते दोन रस्ते मिळतात तेथे भल मोठे पिंपळाचे झाड आहे अजून ते

तसेच आहे का? वेस्टएंड थिएटरात शाळा चुकवून चित्रपट पहात होतो ते तसेच आहे का? आमच्या शेजारी देशपांडे नावाचे डिफेन्स अकाउंटमधले एक गृहस्थ राहत असत. ते कुठे आहेत? अल्ला जाणे पण त्याची आई पुरणाच्या पोळ्या फार सुरेख करीत असे" एक ना दोन प्रश्नाची सरबत्ती करत होता. पुरणाची चव आठवत होता पुणे शहर सोडल्याची कुठेतरी बोच मनात होती जुन्या भारताच्या आठवणी कुठेतरी खोल रुजून बसलेल्या होत्या

नंतर दुसऱ्या खेपेला मी पाकिस्तानात गेलो त्यावेळी मला अशी अनेक माणसे भेटली की, ज्यांचा जन्म पाकिस्तानच्या निर्मितीनंतर झालेला आहे या लोकाना फाळणीच्या यातना, जुन्या देशाच्या आठवणी यातले काहीही नाही कारण त्यांचा जन्मच नव्या देशात झाला आहे बुजुर्ग माणसे जुन्या गोष्टी सांगतात ते ऐकताना क्षणभर वाईट वाटते पण त्या गोष्टी ऐकत बसण्याचा कंटाळापण येतो या नव्या पिढीच्या दृष्टीने जसा ग्रीस, जसा रशिया तसाच भारत त्यामुळे भारताविषयी प्रेमाची अथवा द्वेषाची कसलीच भावना नाही. नव्या पाकिस्तानची शक्ती आणि त्रुटी यातच आहे.

मुसलमान समाजाकरिता स्वतंत्र राष्ट्र असावे ही भावना भारतीय मुसलमानात कुणी आणि कशी रुजविली हा प्रश्न इतिहासाने सोडवायचा आहे परंतु ब्रिटिश साम्राज्य सत्तेने जातीभेदाला खत घालून 'फोडा आणि झोडा' हे तत्त्व आचरून भारतातील मुसलमानाना स्वातंत्र्याच्या चळवळीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला पहिल्या सहा अधिवेशनात मुस्लिम लीगतर्फे पुढील मागण्या करण्यात आल्या.

(१) इम्पीरिअल कौन्सिलपासून ते नगरपालिकेपर्यंत सर्व लोकनियुक्त संस्थातून मुसलमानाना स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळावे.

(२) सर्व विद्यापीठात मुसलमानांना प्रतिनिधित्व मिळावे

(३) उर्दू माध्यमाच्या शाळा काढाव्या व अलिगढ, ढाका येथे स्वतंत्र मुस्लिम विद्यापीठाची स्थापना करण्यात यावी.

(४) सरकारी नोकरीत मुसलमानाना खास जागा राखून ठेवाव्यात या जागा मुसलमानाच्या सख्येवर अवलबून न ठेवता राजकीय निकषावर ठेवाव्यात

(५) राज्य व्यवहाराची भाषा म्हणून उर्दूला मान्यता द्यावी

फोडा-झोडा राजनीतीमुळे मुस्लिम समाजातील काही नेत्यांचा लो टिळकांच्या विचाराबद्दल गैरसमज होता. या संदर्भात महमद अलि यांनी १९१६ साली लोकमान्यांना पत्र लिहिले ते असे, 'तुमच्या विषयीच्या गैरसमजाने इतके दिवस मला ग्रासून टाकले होते हा गैरसमज व्हावा याचा मला पूर्वीपासूनच पश्चात्ताप होत आला आहे आणि प्रत्यक्ष जरी नाही तरी मनापासून मी आपली क्षमा मागतो आहे' हे पत्र टिळकांपर्यंत पोचले नाही कारण सेन्सॉरने ते मध्येच अडकवून टाकले अखेर भारत आणि पाकिस्तान याच्यात फाळणी झाली परंतु सरदार पटेल यांच्या कर्तृत्वाने सर्व संस्थाने भारतात सामील झाली

या दोन्ही देशाच्या इतिहासाला यामुळे एक वेगळेच वळण लागले

## राजकीय इतिहास

१९४७ मध्ये पाकिस्तान स्थापन झाल्यापासून पुढली १४ वर्षे ते 'डोमिनियन' म्हणून राहिले १९५६ साली ते 'इस्लामी प्रजासत्ताक' झाले सघराज्य पद्धतीची लोकसभेमार्फत चालणारी लोकशाही तेथे होती परतु १९५८ साली फिल्ड मार्शल आयुबखान यानी राज्यक्राती करून अध्यक्षपदाची सूत्रे आपल्या हाती घेतली त्यानी तसा बदल घटनेत करून घेतला आणि त्याचे राज्य १९६९ पर्यंत चालले त्यावेळी जनरल याह्याखान यानी आयुबखानाच्या विरुद्ध जागृत झालेल्या लोकमताचा फायदा घेऊन आयुबखानाना पदच्युत केले १९७० साली पहिल्या प्रथम मुक्त निवडणुका घेण्यात आल्या या निवडणुकाच्या निकालातून असे स्पष्ट दिसले की, पश्चिम पाकिस्तानात झुल्फिकार अलि भुट्टो याना जनतेचा पाठिंबा आहे, तर पूर्व पाकिस्तानात शेख मुजिबर रहमान हे लोकप्रिय नेते आहेत शेख मुजिबर याच्या आवामी पक्षाला १६२ पैकी १६० जागा मिळाल्या याचा उघड अर्थ असा होत्रा की, पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानच्या संयुक्त लोकसभेत शेख मुजिबर याची सत्ता प्रस्थापित झाली असती ते पाकिस्तानचे महामत्री झाले असते पजाब आणि सिंधमधील मुसलमानाना बगाली मुसलमानाचा हा वरचष्मा नको होता शेख मुजिबर याच्या मते पूर्व पाकिस्तानला स्वायत्तता देणे आवश्यक होते आणि तशी त्यानी मागणी केली होती या मागणीला भुट्टो आणि याह्याखान याचा विरोध होता हा सघर्ष इतका तीव्र होता की, २६ मार्च १९७१ ला बागला देशाचे लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याची घोषणा दि. २६ मार्च १९७१ रोजी करण्यात आली यातून यादवी युद्ध सुरू झाले याह्या आणि भुट्टो यानी बगाली बडखोरी मोडून काढण्याचा हुकूम लष्कराला दिला आणि मुजिब याना अटक करण्याची आज्ञा काढली पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानमधील हे युद्ध डिसेंबर १९७१ पर्यंत चालले. या वेळेला बागला देशाच्या मदतीला भारतीय सैन्य गेले आणि पाकिस्तानी फौजा ढाका येथे भारतीय सैन्याला शरण आल्या बागला देश स्वतत्र झाला.

यानतर १९७७ साली याह्याखान यानी आपली सत्ता भुट्टो यांच्याकडे सोपविली सार्वत्रिक निवडणुकाच्या वेळी विरोधकाची मोहीम इतकी प्रखर होती की, त्या सधीचा फायदा घेऊन जनरल झिया-उल-हक यांनी राज्यक्राती घडवून आणली भुट्टो यांना अटक केली दोन वेळेला निवडणुका पुढे ढकलल्या शेवटी भुट्टो याच्यावर खुनाचा आरोप घालून त्याना फाशीची शिक्षा देण्याचा हुकुम दिला जगातल्या अनेक राष्ट्रीय नेत्यानी भुट्टो याना दया दाखवावी अशी केलेली विनती फेटाळून लावली भुट्टो याना फाशी देण्यात आली जनरल झिया हे उघडउघड हुकूमशाहीचे पुरस्कर्ते होते त्याच्याविरुद्ध पाकिस्तानातील जनतेला लोकशाही मागणारा एक विरोधी पक्ष उभा राहिला त्या पक्षाचे नेतृत्व भुट्टो याची कन्या बेनझीर भुट्टो यानी केले त्यांना पाठिंबा दिला तो सरहद्द गाधी याचे चिरजीव वलीखान यानी या सगळ्या कालखडाचा इतिहास वलीखान यानी आपल्या 'घटना या शुद्ध घटना असतात' या पुस्तकात पुराव्यानिशी माडलेल्या आहेत

ही सगळीच राजकीय परिस्थिती इतकी वाईट होती की, त्याचे वर्णन करताना पुण्यामध्ये श्री वलीखान म्हणाले, 'गावच्या विहिरीत कुत्रे मरून पडले' तर पाणी खराब होणारच त्या पाण्यात औषधे घालून हा प्रश्न सुटणार नाही त्यासाठी त्या मेलेल्या कुत्र्याचे मढे उचलून फेकून दिले पाहिजे पाकिस्तानातील हुकुमशाही ऐन जिनसी फेकून दिल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही, या संदर्भात 'पूर्वेची कन्या' या आपल्या आत्मचरित्रात बेनझीर भुट्टो यांनी आपण हुकूमशाहीविरोधी आघाडी कशी संघटित केली, सामान्य माणसाला, पर्दानशीन स्त्रियांना कसे जागृत केले, त्याचे फार स्पष्ट विवरण केले आहे याच काळात पाकिस्तानचे पतप्रधान जुनेजो हे पाकिस्तानच्या राजकीय क्षितिजावर उगवणारे नेतृत्व होते विरोधी पक्षाना तोंड देण्याकरिता झिया-उल-हक हे जुनेजो याचे बाहुले पुढे करीत होते १९८७ साली जुनेजो यानी आपला पक्ष म्हणजे पाकिस्तान मुस्लिम लीग संघटित केला आणि स्थानिक निवडणुकांत ते उतरले याच काळामध्ये बेनझीर भुट्टोंच्या पक्षात म्हणजे लोकशाही प्रस्थापनेसाठी संघटना (एम.आर.डी.) या पक्षातहि थोडे फार मतभेद दिसू लागले आहेत याच काळामध्ये कराचीमध्ये तेथील स्थानिक मुहाजिर आणि सरहद्द प्रांतांतील पठाण यांच्यात जातीय दंगली सुरू झाल्या यातूनच 'मुहाजिर कौमी' या चळवळीची स्थापना झाली ज्यावेळी हे दंगे काबूत आणणे शक्य झाले नाही त्यावेळी लष्कराला बोलवावे अशी सूचना जनरल झिया यानी केली या काळातच प्रथम जनरल झिया आणि जुनेजो यांच्यातले मतभेद जाहीरपणाने दिसू लागले प्रत्यक्ष मंत्रिमंडळात अंतर्गत संघर्ष सुरू झाला पतप्रधान जुनेजो याना एकदा जाहीर केलेले अंदाजपत्रक आठ दिवसात मागे घेऊन नवे अंदाजपत्रक पेश करावे लागले

हा राजकीय तणाव वाढत असतानाच अफगाणिस्तानमधील वेगळेच नाटक रंगात येत होते अफगाणिस्तानमध्ये लोकाचे राज्य यावे म्हणून रशियन फौजा दाखल झाल्या होत्या १९८६ च्या अखेरीला भारत आणि पाकिस्तान याच्या सैन्यात सियाचीन प्रश्नावरून पुन्हा एकदा संघर्ष उभा राहिला अफगाणिस्तानात असलेले प्रश्न रशियन हस्तक्षेपावाचून सुटावेत असे भारत आणि पाकिस्तान असे दोघानाही वाटत होते अर्थात याची कारणे फार वेगळी होती अफगाणिस्तानात सनातनी परंपरावादी राजवट यावी असे पाकिस्तानला वाटत होते तर अफगाणिस्तानमध्ये लोकशाहीवादी राजवट यावी असे भारताला मनापासून वाटत होते या पेचामध्येच पाकिस्तानने तयार केलेल्या इस्लामिक बॉम्बमुळे गुतागुत अधिक वाढली होती

अशा एका निर्णायक क्षणी पाकिस्तानचे अध्यक्ष झिया-उल-हक यांचा विमान अपघातात मृत्यु झाला तो अपघात होता का खून याची चौकशी चालू आहे पण एक मात्र खरे की झिया याच्या मरणामुळे विरोधी पक्षनेत्या बेनझीर भुट्टो याचा तारा क्षितिजावर आला. या संदर्भात पाकिस्तानच्या भूतपूर्व महामंत्री बेनझीर भुट्टो यानी लिहिलेल्या आत्मचरित्रातले काही उतारे महत्त्वाचे ठरावे त्या आधीची अकरा वर्षे लोकशाहीसाठी प्रचंड धडपड करणाऱ्या या पस्तीस वर्षांच्या तरुण स्त्रीने अचानकपणे इतिहासाचा उंबरठा ओलांडला आणि त्या पाकिस्तानच्या पहिल्या महामंत्री झाल्या त्यानी आपल्या

आत्मकथेला दिलेल्या नावाप्रमाणे ही ''पूर्वेची कन्या'' जागतिक राजकारणात भाग घेऊ लागली पाकिस्तानचे भवितव्य घडवणे त्याचबरोबर स्वतःचे भवितव्यहि घडवणे हे त्यांच्यापुढचे सगळ्यात मोठे आव्हान आहे. परंपरावादी धार्मिक देशात स्त्रीने पंतप्रधान होणे हे अवघड आहे शिवाय तिच्या वडिलांचा वारसा हा म्हटला तर बलस्थान, म्हटल तर ओझे अशी त्यांची स्थिती आहे. त्यांच्यात दोन मोठे गुण आहेत विलक्षण लोकप्रिय होण्याची शक्ती आणि धाडस बेनझिर भुट्टो आणि तिची आई नसरत या दोघी पंजाबी लोकांच्याविरुद्ध आहेत विरोधी पक्षियांकडून त्या भारताच्या बाजूने आहेत असे चित्र रंगविण्यात आले होते त्यामुळे त्यांची निवडणूक झाल्यानंतर लोकांच्या मनात प्रश्न उभे राहत होते ते असे पाकिस्तानात लोकशाही येणार असेल तर विरोधी पक्ष सबळ असायला हवा. पाकिस्तानी राजकारणात हुकमाचे पान असणारे लष्कर विरोधी पक्षाला सबळ होऊ देईल काय? सिंधी आणि पंजाबी हा तिढा सुटून सिंधी स्त्रीचे नेतृत्व पंजाब मानेल काय?

बेनझिर भुट्टो यांच्या आत्मकथेतील पुढील भाग त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पुष्कळ प्रकाश टाकतो

## 'पिंकी'ची कहाणी

पिंकी नावाची एक मुलगी होती. तिला दोन बहिणी, दोन भाऊ तिचे वडील मोठे पुढारी होते. आणि त्यांना फाशीची शिक्षा झाली होती. फाशी देण्यापूर्वी पिंकी वडिलांना भेटायला गेली बरोबर तिची आई होती आत गेल्याबरोबर वडिलांनी विचारले, ''आज तुम्ही दोघीजणी का आलात? आईने उत्तर दिले नाही, त्यांनी पुन्हा विचारले, ''ही आपली शेवटची भेट आहे का?'' पिंकी म्हणाली, 'कदाचित' शेजारी उभे असलेले तुरुंग अधिकारी मध्येच म्हणाले ''होय'' वडिलांनी पुन्हा विचारले, ''तारीख ठरली का?'' उत्तर आले, ''उद्या सकाळी'' ''किती वाजता?'' ''पहाटे पाच वाजता'' ''हे तुम्हाला केव्हा कळले?'' ''काल रात्री'' ''आम्हाला भेटायला किती वेळ'' ''अर्धा तास'' वडील म्हणाले ''मला आता दाढी, अंघोळ करून घेऊ दे. हे जग फार सुंदर आहे, आणि ते सोडताना मी शुद्ध, स्वच्छ असायला हवे ''

केवळ अर्धा तास । ज्या माणसावर आपण जन्मभर प्रेम केले त्याला अखेरच भेटायला फक्त अर्धा तास! पिंकीचे मन भरून आले आपण रडता कामा नये असे पिंकीला वाटले आपल्या रडण्यामुळे आपल्या वडिलांपुढचे दिव्य अधिकच अवघड होईल. आपल्याजवळ असलेली पुस्तके, मासिके पिंकीला दिली ''माझ्या माघारी माझ्या वस्तूंना या लोकांनी हात लावायला नको ''

त्यांना दिलेली सिगार तीहि त्यांनी परत केली ''मी एकच सिगार जवळ ठेवतो आजच्या रात्रीसाठी'' आणि ''शालीमार'' या सुगंधी अत्तराची बाटली त्यांनी जवळ ठेवून घेतली ते अंगठी काढून देऊ लागले पण आई म्हणाली, ''काढू नका ती शकुनाची आहे.''

''मी आता ठेवतो पण माझ्या माघारी ती पिंकीला दे.''

त्या फाशीच्या कोठडीत मद प्रकाश होता पिंकीला वडील नीटसे दिसत नव्हते. एरवी भेटीच्या वेळी त्याना एकत्र बसता येत होते आज वडील कोठडीच्या आत आणि बाहेर गजाला धरून पिंकी आणि तिची आई बसली होती

वडील म्हणाले, "मुलाना साग, त्यांचा निरोप घेता आला असता तर बरे वाटले असते" आई नुसतीच मान हलवीत होती, तिला बोलणेहि कठीण जात होते "तुम्ही दोघींनी माझ्यासाठी खूप सहन केले मला आज रात्री ते मारणार आहेत तुम्हालाही यातून मला मुक्त करावयाचे आहे वाटले तर हा देश सोडून जा माझे काहीच होणार नाही."

आई म्हणाली, "नाही, नाही, कधीच नाही आम्ही गेलो तर या जुलमी राजसत्तेला वाटेल की त्याचा जय झाला"

पिंकी म्हणाली, "मीहि कधी जाणार नाही"

मागून तो तुरुग अधिकारी म्हणाला, "वेळ सपली", पिंकीने गज घट्ट धरले ती ओरडली "दरवाजा उघडा मला माझ्या वडिलाना भेटायचे आहे. ही आमची शेवटची भेट आहे." पण तो तुरुग अधिकारी निर्विकार होता पिंकीने गजातून हात घालून वडिलाना स्पर्श करावयाचा प्रयत्न केला. त्याचे शरीर अशक्त, दुबळे झाले होते मलेरिया, अमाश आणि उपासमार याच्यामुळे पण तरीहि ते उठले पिंकीचा हात हातात घेतला म्हणाले, "आज रात्री मी मुक्त होणार आहे माझ्या पूर्वजाच्या घरी जाणार आहे"

पिंकीला स्वत:ला आवरता आले नाही ती मान फिरवून निघाली वडिलाचा तो निरोपाचा आवाज तिच्या मनात घुमत राहिला

"आज पिंकी पहिल्या प्रथम बुरखा घेणार आहे." पिंकीची आई वडिलाना सांगत होती वडील बराच वेळ गप्प राहिले मग म्हणाले, "तिला बुरखा घेण्याची काहीच गरज नाही प्रेषिताने स्वत:च सागितले आहे की माणसाच्या डोळ्यामागे असणारा बुरखा हाच खरा बुरखा तिचे मन आणि तिचे चारित्र्य हेच महत्त्वाचे आहे. चारित्र्य कपड्याने घडत नसते"

खानदानी कुटुबात बुरखा न घालण्याचा हा पहिलाच प्रसग पिंकीचा जन्म झाला पाकिस्तानात त्यामुळे तिला भारत देश कसा आहे हे माहीतच नव्हते जुन्या पिढीतल्या माणसांचा भारत आणि पाकिस्तान यासबधीच्या जुन्या भेदक आठवणी पिंकीला अजीबात माहीत नव्हत्या हा कडू भूतकाळ सपून केव्हातरी एकत्र राहणे, स्नेहाने राहणे शक्य आहे का असा प्रश्न पिंकीला पडे.

ती वडिलबरोबर भारत पाकिस्तान चर्चेच्यावेळी सिमल्याला आली होती. सिमल्याच्या चर्चेमध्ये वडील गुतलेले असताना ती सिमल्याच्या बाजारातून हिंडायची, फिरायची विलक्षण कौतुकाने लोक तिच्याकडे पाहात राहायचे. कराराचा मसुदा, त्यात दुरुस्त्या, सुधारणा हे सारे चालू होते हा करार होणार की मोडणार ? पाकिस्तानच्या शिष्टमडळाने एक परवलीचा शब्द ठरविला होता. चर्चा चालली होती करार झाला तर

मुलगा झाला म्हणावयाचे आणि चर्चा फिसकटली तर मुलगी झाली म्हणावयाचे हे वागणे स्त्रियांवर अन्याय करणारे आहे असे पिंकीचे मत होते पण तिचे कोण ऐकणार? लहान मुलगी ती! शेवटी वरून निरोप आला मुलगा झाला, करार झाला '

पिंकीच्या गावाचे नाव 'अलमूर्तझा' ती त्याची वाडी आहे घरात सदैव सूर्यप्रकाश, खळखळणारे हसणे आणि गमतजमत चालावयाची पिंकीच्या वडिलांना गाण्याचा नाद! फ्रँक सिनात्राची लोकप्रिय गाणी 'स्ट्रेंजर्स इन द नाईट' किंवा 'केसेरा, सेरा' हे गाणे लावले म्हणजे पिंकीचे वडील भान हरपून ऐकत राहात पिंकीला त्या गाण्याचे शब्द अजूनही आठवतात "काय घडावयाचे असेल ते घडेल ते घडणारच, भविष्यात काय आहे हे पाहणे हे आपले काम नाही"

उठाव झाला त्या दिवशी घराभोवती सैनिक आलेले पाहून दारावरच्या पोलिसाला शका आली तो हळूच पुढील दाराशी आला आणि म्हणाला "साहेबांना सागा की त्याना मारण्याकरिता सैन्य येत आहे त्याना लपायला सागा"

वडील शातपणाने म्हणाले, "माझे आयुष्य परमेश्वराच्या हातात आहे सैनिकाना मला मारावयाचे असेल तर ते मारतील लपून राहून मरण चुकणार नाही येऊ देत त्याना"

वडिलानी तितक्याच शातपणाने लष्करप्रमुख झिया उल हक याना फोन केला चार दिवसापूर्वी शाततेची बोलणी करणाऱ्या लष्कर प्रमुखाला एकदम गडबडल्यासारखे झाले झिया म्हणाले, "मला क्षमा करा, तुम्हाला पकडण्याचा हुकूम मला द्यावा लागला पण थोड्याच दिवसांत आम्ही निवडणुका घेऊ आणि पुन्हा तुम्हाला सलाम करायला मी येईन" हे शब्द ऐकताच हा कट आपल्याविरुद्ध आहे अशी पिंकीच्या वडिलांची खात्रीच झाली

न्यायमूर्तींनी पिंकीच्या वडिलाना देहान्त शासन ठोठावले. त्याना भेटायला तुरुगात आल्यानतर महिला पोलिसांनी पिंकीच्या डोक्यावर, अंगावर हात फिरवून तिची तपासणी केली. एकामागे एक असे तीन लोखंडी दरवाजे सोडून पिंकी एका अधाऱ्या कोठडीत आली आतून आवाज आला 'पिंकी तू आलीस काय?"

पिंकीने डोकावून पाहिले पण त्या अधाऱ्या जागेत तिला काहीच दिसेना, अधिकाऱ्याने दरवाजा उघडला पिंकी त्या फाशीच्या कोठडीत शिरली खोली इतकी दमट होती की तिथे कधीच सूर्यप्रकाश आला नसावा असे वाटत होते खोली लहान होती खाटेनेच अर्धी जागा व्यापली होती खाटसुद्धा लोखडी साखळी बाधून जमिनीला खिळवलेली होती इथेच शरीरशुद्धीची व्यवस्था! खोलीमध्ये दुर्गंधी भरलेली होती पिंकी म्हणाली, "पपा" वडिलांनी तिला जवळ घेतले अधाराची सवय झाल्यावर तिच्या डोळ्याना दिसले की डास-मच्छर खूप चावल्यामुळे त्यांच्या अगावर फोड आलेले होते पिंकी सागत होती "तुम्ही या शिक्षेविरुद्ध अपील करायला हवे" वडील म्हणाले, 'या न्यायालयात? ही न्यायालये म्हणजे नुसता तमाशा आहे मी निरपराध आहे ईश्वराला माहिती आहे तिथेच मी अपील करीन आणि त्याचाच निर्णय अखेरचा ठरेल तू आता

जा ''

सकाळी ११ वाजता पिंकी आणि तिची आई यांना उच्च न्यायालयाचा निर्णय कळला काहीतरी चमत्कार होईल असे त्या दोघींना वाटत होते परंतु ते घडायचे नव्हते आई गाडीत बसली आणि काय घडते हे कळायच्या आत गाडीत बसून निघाली. दोन दरवाज्यामधून ती आत गेली आणि पिंकीच्या वडिलाच्या कोठडीसमोर आली तिने वडिलांना सांगितले, ''तुमचे अपील फेटाळले आहे ''

एवढ्यात पोलिस आले आणि म्हणाले, ''तुम्हाला भेटायची परवानगी नाही ''

आई म्हणाली, ''हा निर्णय सांगायची संधि मी तुम्हाला मिळू दिलेली नाही आणि मिळू देणारही नाही ''

पिंकीला एकांतवासाची सजा झाली होती एकटेपणामुळे पुष्कळदा अंगाला ठणका लागल्यासारखे वाटे. डॉक्टर म्हणत ''हा भास आहे '' शेवटी पिंकीच्या आईचे पत्र आले तिने लिहिले होते, ''उकाडा फार आहे. दिवसातून दोन-तीन वेळा डोक्यावर पाणी ओतून घे आणि थोडे पाणी मानेवर आणि पाठीवर ओत अंगावरचे कपडे वाळव म्हणजे थोडातरी थंडावा वाटेल ''

आईचा हा उपचार पिंकीला तुरुंगात खूप उपयोगी पडला पिंकी तुरुंगात एकटी असताना तिच्या मनावर दडपण आणून ती वेडी होईल असेही प्रयत्न केले गेले रात्री कोठडीच्या भोवती वेडेवाकडे आवाज यायचे, कधी बाहेर ठेवलेला डबा आपोआप उघडायचा आणि बाहेर तर कोणी नसायचे तिथे असलेली एक पठाण राखणदार म्हणायची ''माझा नवरा इथेच रक्षक होता, त्याचा खून झाला खुनी कोण होता हे कधीच कळले नाही परतु माझा मेलेला नवरा इथेच वावरतो आहे '' पिंकीच्या मनावर काहीही परिणाम होत नाही हे पाहिल्यावर तीन-चार महिन्यानतर आवाज आपोआप थांबला.

पिंकीचा वर्गमित्र पीटर गालब्रेथ हा आता अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यात कामाला होता तो पाकिस्तानमध्ये आला परतु त्याला पिंकीला भेटता आले नाही परत गेल्यावर मानवी हक्कांच्या आधारावर तिच्या एकातवासाचा अमेरिकन सरकारने निषेध करावा अशी मागणी त्याने केली पीटर गालब्रेथची शिष्टाई सफल झाली.

तुरुंगात एक दिवस चालत असताना पिंकीला खालची जमीन वर येते असे वाटू लागले तिने भिंतीचा आधार घेतला, परतु चारही बाजूनी अंधार अंगावर येत आहे असे तिला वाटले आणि पिंकी बेशुद्ध झाली पिंकीला बघायला डॉक्टराना बोलवावे की नाही यावर चर्चा करून दोन-तीन तासांनी एक डॉक्टर आले आणि तिला तपासून म्हणाले ''हिची स्थिती गंभीर आहे तिला ताबडतोब कानाच्या डॉक्टराकडे नेले पाहिजे कारण तिच्या कानात दोष निर्माण झालेला आहे ''

अमेरिकी सरकारने दडपण आणल्यावर पिंकीची सुटका झाली नतर ती इंग्लडला गेली आणि पाकिस्तानी जनतेच्या लोकशाहीच्या मागणीला पाठिंबा मिळावा म्हणून तिने

इग्लड, अमेरिकेचा दौरा केला इंग्लडमध्ये शिकत असताना तिने अनेक भाषणे केली अमेरिकेत प्रेसक्लबपुढे बोलताना मात्र तिचे हात–पाय गळाले परंतु देशात चाललेला अन्याय आठवला आणि मन घट्ट करून पुन्हा तिने बोलायला सुरुवात केली देशामध्ये काय चालले आहे याच्या बातम्या कळाव्यात याकरिता यत्रणाच निर्माण केली विमानात येणारे–जाणारे लोक गुपचूप बातम्या पोचवायचे लंडनमध्ये 'अमल' नावाचे एक मासिकही सुरू करण्यात आले यातच एके दिवशी तिचा भाऊ शाहनवाझ याला अपघाती मृत्यु आला तो कसा आला हे कोणालाच ठाऊक नाही त्याच्या पत्नीलाही नाही वडिलापाठोपाठ हा दुसरा आघात होता

पिंकीने लग्न करावे असा सगळ्याचा आग्रह होता पिंकीला स्वत'चा विचार करायलाही वेळ नव्हता पण एका भोजन समारभात असिफची आणि तिची गाठ पडली पिंकीला वाटायचे राजकारणात गुंतलेल्या स्त्रीला ससाराकडे लक्ष द्यायला वेळ कुठे आहे? नवऱ्याला याचे काय वाटेल? पण शेवटी असीफ झरदारी याने पिंकीला सांगितले, "राजकीय नेतृत्व करणाऱ्या स्त्रीचा नवरा होणे म्हणजे किती अवघड आहे हे मी जाणतो आपले आयुष्य सुखी होईल असे मला वाटते "

पिंकी त्याला म्हणाली, "आपल्या पद्धतीप्रमाणे मी सासरी राहायला जायला हवे पण राजकारणामुळे ते शक्य होणार नाही " त्यालाही असीफने होय म्हटले एकदा असीफबरोबर गाडीतून येताना असीफच्या खेळकर स्वभावाची पिंकीला कल्पना आली आणि तिने लग्नाचा निर्णय केला

यानंतर देशाची ससद घाईगर्दीने बरखास्त करण्यात आली पुन्हा एकदा निवडणुकीचे वेध लागले. पिंकीला भय वाटले की, निवडणुका होणारच नाहीत लोकशाही उमलावयाची असेल तर त्याला राजकीय पक्षाचा आधार लागतो हुकूमशाहीच्या वाळवटात स्वातंत्र्य कधी फुलत नाही. पिंकी प्रार्थना करत राहिली. लोकाचे स्वातत्र्य अबाधित राहो म्हणून लढा देत राहिली

यापुढची गोष्ट सर्वांनाच माहिती आहे जनरल झिया यांचे अपघाती निधन झाले पिंकी महामत्री झाली. तिचे नाव बेनजीर भुट्टो आणि तिच्या आत्मकथेचे नाव 'पूर्वेची कन्या '

★ ★ ★

भारताबरोबर सबध सुधारणे ही काळाचीच गरज आहे. पण हे सबध सुधारताना पाकिस्तान इस्लामी बॉम्बचा हट्ट सोडेल काय? पाकिस्तानच्या आणि पर्यायाने आशियाच्या भवितव्यात बदल घडवून येईल अशी नवी दिशा बेनझीर भुट्टो याच्या निवडणुकीमुळे निर्माण झालेली आशा फोल ठरेल असे वातावरण हळूहळू निर्माण होऊ लागले बेनझिर भुट्टो याचे पति झरदारी याच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप जाहीरपणाने केले जाऊ लागले बेनझीर भुट्टो याना अतर्गत विरोध इतका तीव्र झाला की अतर्गत शाततेसाठी त्याना भारतविरोधी भूमिका घ्यावी लागली गटनिरपेक्ष देशाच्या सभेत

त्याच्या मातोश्री नसरत भुट्टो उघडउघड भारतविरोधी बोलू लागल्या. काश्मीरवर हक्क सागू लागल्या. त्यानतर पत्रकाराशी खासगी बोलताना त्या म्हणाल्या, ''सार्वजनिक उद्‌गार वेगळ्या श्रोत्याच्यासाठी आहेत'' काश्मीरबाबत बोलताना बेनझीर भुट्टो इतक्या पराकोटीला गेल्या की, त्यांनी 'आझाद काश्मीरसाठी' रक्त द्या काश्मीर हा पाकिस्तानचाच भाग आहे, असा पवित्रा घेतला. परतु पाकिस्तानच्या निवडणुकात मतदारानी बेनझीर भुट्टो याच्याविरुद्ध कौल दिला. नवाझ शरीफ याची महामत्री म्हणून निवड झाली

नवाझ शरीफ याना राजकारणात आणायला जन झिया जबाबदार आहेत या अर्थाने त्यांना झिया याचे मानसपुत्र मानायला हरकत नाही पाकिस्तानातली लोकशाही आणि इतर देशातली लोकशाही यात एक मूलभूत फरक आहे इतर देशाच्या महामत्र्याच्याइतके अधिकार पाकिस्तानी महामत्र्याना नाहीत पाकिस्तानात राष्ट्राध्यक्ष आणि त्याच्यामार्फत लष्कर आणि नोकरशाही यांनाही राजकारणात स्थान आहे पाकिस्तानच्या या विशिष्ट राजकीय रचनेची पूर्ण ओळख नवाझ शरीफ याना आहे यामुळे शरीफ यांची धोरणे पुष्कळदा बोटचेपी, क्वचित लांगूलचालनाची वाटतात पण अध्यक्षीय सत्तेमागचे लष्कराचे व नोकरशाहीचे बळ ओळखून शरीफ असे वागत असावे असे दिसते त्याच्या दृष्टीने महामत्री हा लष्करी सत्तेवर आधारलेल्या लोकशाहीचा फक्त मुखवटा आहे. या बधनातून शरीफ याना मुक्तता मिळेल का? त्यानी तयार केलेल्या मत्रिमडळात जनरल झिया याचे जुने लागेबाधे दिसतात त्यावरून हे शक्य होईल असे वाटत नाही. साहबजादा याकुब खान याची परराष्ट्रमंत्री म्हणून सहाव्या वेळेला नेमणूक झाली आहे सरताज अझीझ हे जुने अर्थशास्त्री नोकरशहा याना अर्थमंत्री करण्यात आले आहे जन झिया याचे चिरंजीव इजाज-उल-हक यानाही मत्री बनवण्यात आलेले आहे

नव्या राज्यात पजाब आणि काश्मीरविषयक धोरणात बदल होईल असे दिसत नाही. कारण तसे करणे नवाझ शरीफ याच्या लष्करी मित्रांना परवडणारे नाही देशाचे इस्लामीकरण करण्याची त्यानी घोषणा केली आहे पण त्याचा निश्चित अर्थ काय हे त्यानी सागितलेले नाही पाकिस्तानने आपल्या अण्वस्त्र कार्यक्रमाविषयी खात्री करून, अण्वस्त्राचा शाततेसाठीच उपयोग केला जाईल असे आश्वासन मिळेपर्यंत अमेरिकेने आपली शस्त्रास्त्रांची मदत थाबवली आहे आजसुद्धा पाकिस्तानात लोकशाहीच्या नावाखाली हुकूमशाही वावरत आहे

(केसरी)

# ५

# सुजलाम् सुफलाम्
# बांगला देश

बांगला देशात मी प्रथम गेलो तो ढाक्याच्या विमानतळावर उतरल्यापासून तो परत येईपर्यंत. मनावर ठसा उमटला तो त्या नवजात राष्ट्राच्या महत्त्वाकांक्षेचा, जमिनीच्या सुपीकतेचा, भरमसाट पूर येणाऱ्या नद्यांचा आणि हिरव्यागार निसर्गाचा. या चित्रासारख्या निसर्गसौंदर्याला सहज शोभून दिसेल अशा तऱ्हेने इथे बंगाली भाषा बोलली जाते इथे टेलिफोनला 'दूरालाप' म्हटले जाते आणि खरोखरच आलाप घ्यावेत, असे गोलाकार उच्चारांना झोके देत ही भाषा बोलली जाते. मी गेलो तो बांगला देशचे राष्ट्रपति न्या. अबू सैद चौधरी आणि पंतप्रधान शेख मुजिबर रहमान यांना भेटण्यासाठी त्या वेळी ढाक्यामधील वृत्तपत्रांना मुलाखत देताना मी म्हटले होते की, उगवत्या आशियाचे नेतृत्व मला तिथे दिसते आहे दुर्दैवाची गोष्ट अशी की परकीय शक्तींच्या प्रभावाखाली शेख मुजीबर याचा बळी घेतला गेला आणि बांगला देशची राजवटच बदलली तेव्हापासून तो आजतागायत बांगला देशात वरकरणी शांतता आहे. पण आतमध्ये विलक्षण अस्वस्थता आहे. सामाजिक रसायन उकळते आहे. काझी नसरुल इस्लाम याच्यासारख्या क्रांतिकारी कवीच्या शब्दावर ज्यांची देशभक्ति पोसली गेली त्यांना 'शोनार बांगला' किंवा बांगला देशच्या सुवर्णभूमीबद्दल अपरंपार अभिमान वाटावा यात नवल ते काय?

१७ व्या शतकामध्ये त्या काळच्या पूर्व बंगालमध्ये, अतिशय नाजूक अशी मलमल आणि रेशीम याचे उत्पादन होत होते एका अंगठीतून जावी अशी मलमलची साडी ही या देशाची कलाकारी रांगोळीला अल्पना म्हणून घरोघरी सुंदर रांगोळ्या काढणाऱ्या कलावंतांचा हा देश इथे इतकी चांगली आणि प्रचंड भातशेती आहे आणि इथल्या नदीत इतके चांगले भरपूर मासे मिळतात की शतकानुशतके या देशाला दुष्काळाची भीती असूच नये परंतु ब्रिटिशांच्या काळात पहिल्या प्रथम कापड विणण्याची यंत्रे आली आणि विणण्याची हस्तकला मरणोन्मुख

झाली. एकेकाळी समृद्ध असणाऱ्या देशाला, दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची अवकळा प्राप्त झाली १९४७ साली भारताची फाळणी झाल्यानतर पूर्व बगालचे रूपातर पूर्व-पाकिस्तानात झाले पाकिस्तानमधे लोकसख्येच्या दृष्टीने हा भाग मोठा. परतु भेदभावाच्या राजकारणाने उपेक्षिला गेलेला होता खुद्द पाकिस्तानात उर्दू भाषा आणि पंजाबी माणसे याचे प्राबल्य असल्याने पूर्व पाकिस्तान ही शोषणासाठी ठेवलेली एक वसाहत असेच त्याचे स्वरूप बनत गेले बगाली भाषेची गळचेपी आणि बहुसख्य जनतेवर होणारा अन्याय शिगेला गेलेला असताना १९७० साली डिसेंबरमध्ये निवडणुका आल्या यामध्ये आवामी लीग पक्षाचे प्रमुख शेख मुजीबर रहमान यांना निश्चित बहुमत मिळणार आणि त्यामुळे ते आपोआपच पाकिस्तानचे महामत्री होणार हे दिसू लागले. इकडे प पाकिस्तानात पीपल्स पार्टीचे नेते झुल्फिकार अली भुट्टो याना दुसऱ्या क्रमाकाचे बहुमत मिळाले आणि तणावाला सुरुवात झाली आपल्याला प्रादेशिक स्वायत्तता मिळावी असा आग्रह मुजीब यांनी धरला. पाकिस्तानचे लष्करप्रमुख आणि अध्यक्ष याह्याखान आणि भुट्टो याना आपल्या हातातून राजसत्ता निसटत चालली अशी दाट शंका येऊ लागली याह्याखान आणि मुजीब याची बोलणी फिसकटली २५ मार्च १९७१ रोजी पाकिस्तानी लष्कराने राज्याचा ताबा घेतला. खुद्द पूर्व पाकिस्तानात मुक्ति वाहिनीने उघडपणे बंडाचे निशाण उभारले. भारत बांगला [illegible] दिसू लागल्यावर अमेरिकेने आपले सातवे आरमार बंगालच्या उपसागरात आणून एक पोकळ धमकी दिली परतु भारताच्या महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी या धमकीला भीक घातली नाही. उलट दिल्लीवर पाकिस्तानी हवाई हल्ले होण्याची भीती असताना रामलीला मैदानावर इंदिरा गांधी यानी प्रचड सभा घेऊन बागला देशाच्या मुक्ती संग्रामाला भारताचा पाठिंबा दर्शविला भारतात आलेले लक्षावधि बांगला-देशी निर्वासितांमुळे या मुक्तिलढ्याला वेगळेच स्वरूप प्राप्त झाले. पण अखेर ढाक्याच्या रेसकोर्स मैदानावर पाकिस्तानी सैन्याने शस्त्रे खाली ठेवून शरणागती पत्करली लक्षावधी पाकिस्तानी सैनिक युद्ध कैदी म्हणून भारतात आणले गेले आणि [illegible] केला.

स्वातंत्र्यानंतर बांगला देशाने ससदीय लोकशाहीचा स्वीकार केला आणि मुजीब हे महामंत्री झाले परंतु नंतर ससदीय लोकशाही बदलून त्या जागी एकपक्षीय राष्ट्रपती पद्धत सुरू झाली. शेख मुजीब यांचे सरकार सत्ताच्युत करण्यात आले (१५ ऑगस्ट १९७५) लष्करी सत्तेने राजसत्ता घेतली आणि मुजीब यांचा खून झाला. त्यांच्यानतर एकेकाळी नागपूरचे असलेले खांडकर मुस्ताक अहमद हे राष्ट्रपती झाले. १९७५ साली प्रमुख न्यायमूर्ती ए. एम. सईम यांना राष्ट्रपती करण्यात आले परंतु खरी सत्ता झिया उल् रहमान यांच्याच हातात राहिली १९७७ साली झिया उल् रहमान राष्ट्रपती झाले जून १९७८ मध्ये त्यांनी लष्करी पदाचा राजीनामा दिला व ते पाच वर्षांकरता राष्ट्रपती झाले ३० मे १९८१ रोजी चितगाव येथे लष्करी नेत्यांनी

झिया उल् रहमान याचा खून केला त्यानंतर उपराष्ट्रपती अब्दुस सतार काही काळ राष्ट्रपती झाले, पण नंतर एका रक्तहीन क्रांतीमध्ये त्यांचेहि राज्य उलथवून लष्करप्रमुख जनरल एच. एम. इर्शाद यांनी राजसत्ता घेतली. ते प्रथम मार्शल लॉचे प्रमुख प्रशासक झाले आणि त्यानंतर राष्ट्रपती झाले. ७ मे १९८६ला त्यांनी निवडणुका घेतल्या आणि इर्शाद यांच्या जातीय पक्षाला (बंगालीमध्ये जातीय म्हणजे राष्ट्रीय) बहुमत मिळाले. इर्शाद यांनी लष्करी पदाचा राजीनामा दिला. १५ ऑक्टोबर १९८६ रोजी ते राष्ट्रपती झाले.

## बांगला देशाचे अर्थकारण

बांगला देशामध्ये मुख्य उद्योग म्हणजे ताग, कागद, कापड, लोखंड, साखर आणि सिमेंट. 'शेती' हा सगळ्यात महत्त्वाचा उद्योग. दरवर्षी बांगला देशात अनेक प्रवासी येतात आणि बांगला देशातील निसर्गाचे वैभव बघून तृप्त होतात.

बांगला देशाच्या बाबतीत ग्रामीण गरिबी, लोकसंख्या आणि निरक्षरता हे मोठे प्रश्न आहेत. बांगला देशामध्ये आर्थिक प्रगती करण्याकरता, उद्योगधंद्याच्या वाढीकरता खूप प्रयत्न झाले. परंतु अजूनहि दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. आर्थिक वाढ केवळ अडीच टक्के आहे. प्रगती झाली नाही याचे एक कारण बांगला देशात नद्यांना येणारा वारंवार पूर असे सांगण्यात येते. पण प्रत्यक्षात ते कारण पटण्यासारखे वाटत नाही १९८२ पासून राष्ट्रीयीकरण झालेले उद्योगधंदे खासगी क्षेत्राकडे वळवण्यात आले परंतु यामधून काही उद्योगपती श्रीमंत झाले तरी देशाचे एकूण उत्पन्न किंवा दरडोई उत्पन्न मात्र वाढले नाही दरवर्षी परदेशी मदत आणि कर्ज घेण्याचे प्रमाण मात्र वाढतेच आहे. अमेरिकेकडून अडीचशे दशलक्ष डॉलर्स इतकी मदत घेण्यात आलेली आहे आंतरराष्ट्रीय राजकारणात बांगला देशाने पुष्कळ पुढाकार घेतला आहे. अलीकडे जागतिक इस्लामी चळवळ वाढवण्यात त्यांचा मोठा हात आहे. सार्क चळीवळीतही बांगला देश पुष्कळ दूरवर आहे भारत आणि बांगला देश यांच्यात गंगेच्या पाण्याचा प्रश्न कित्येक वर्षे लोंबकळत पडत आहे. या कामी नेपाळचे सहकार्य घ्यावे म्हणून प्रयत्न केले जात आहेत. १९८६ साली दिल्लीमध्ये राजीव गांधी आणि इर्शाद यांनी हा प्रश्न सोडविण्याची दिशा निश्चित केली परंतु बांगला देशाला मात्र असे वाटत आले आहे की, भारत दिवसेंदिवस बांगला देशाशी असणारे संबंध अधिकाधिक कठोर करीत आहेत चितगावच्या डोंगराळ प्रदेशात असणाऱ्या चकमा आदिवासींना भारताचा अप्रत्यक्ष पाठिंबा आहे, असेहि बांगला देशाचे काही नेते म्हणतात बांगला देश स्वतंत्र झाल्यानंतर इंदिरा गांधी आणि शेख मुजीबर रहमान यांनी केलेल्या कराराप्रमाणे गंगेचा प्रश्न, बांगला देशाला 'तीनबिघा' नावाचा भूपट्टा देण्याचा प्रश्न, अलीकडेच वर आलेल्या तळपट्टी नावाच्या नवीन बेटाची लांबी आणि सागरी सीमा निश्चित करण्याचा प्रश्न हे चार प्रश्न तसेच आजवर लोंबकळत पडलेले आहेत गेल्या काही वर्षांत

बांगला देशचे राजकारण हे गूढ बनत चाललेले आहे. कारण देशात अध्यक्षीय हुकुमशाही, पक्षापक्षातील मतभेद, एकीकडे वाढणारी श्रीमती आणि दुसरीकडे वाढत जाणारी गरिबी इस्लामी चळवळीकडे ओढा व सार्कचे नेतृत्व करण्याची हौस अशा परस्परविरोधी गोष्टींमुळे समृद्ध शेतीमधून उगवणारी गरिबी यामुळे बांगला देशचे अर्थकारण, बांगला देशचे राजकारण हे अनेक अर्थाने गौडबंगाल झालेले आहे.

बांगला देशातील मार्शल लॉ नोव्हेंबर ८६ मध्ये उठविण्यात आला. नवीन नागरी राज्य शासन अस्तित्वात आले. लोकसभेत जबरदस्त विरोधक मोठ्या संख्येने निवडून आले आणि याचा १९८७ पासून अध्यक्ष इर्शाद याना विरोधी लोकमताला तोंड देण्याची पाळी आली विरोधी पक्षात परस्परांविषयी असणारा अविश्वास व एकमेकांविषयी संशय यामुळे समर्थ असा एक राष्ट्रीय पक्ष उभाच राहू शकला नाही १९८७ च्या सुरुवातीला बांगला देशातील दोन महत्त्वाचे पक्ष म्हणजे बांगला देश नॅशनॅलिस्ट लीग आणि आवामी लीग हे एकमेकासमोर कलहाच्या पवित्र्यात उभे राहिले बी एन पी च्या अध्यक्षा बेगम खलिदा झिया यांनी आवामी लीगच्या नेत्या शेख हसिना यांच्यावर असा आरोप केला की निवडणुकात भाग घेऊन त्यानी लोकांचा विश्वास गमावलेला आहे याउलट बेगम हसिना ह्या बेगम खलिदा झिया यांचे वर्णन "जनरल बेगम" असे करू लागल्या. (त्या जनरल झिया उल् रहमान यांच्या विधवा पत्नी आहेत ) आणि त्या लोकशाहीचा बळी घेत आहेत असा प्रचार चालविला संसदेचे विसर्जन करावे म्हणजेच जातीय पक्ष सत्तेवरून हलेल असे धोरण बी एन पी चे आहे. १९८७ साली जनरल इर्शाद याच्या अभिभाषणावर प्रथमच विरोधी पक्षानी बहिष्कार घालून सभात्याग केला त्यानी ढाक्यामध्ये प्रचंड सभा बोलाविली. पोलिसांनी ती सभा उधळून लावली ढाक्यात जाळपोळ, लुटालूट सुरू झाली येथून बांगला देशातील हुकूमशाही सरकारला हादरे बसू लागले. २१ फेब्रुवारीला हुतात्मा दिन पाळण्यात आला आणि देशात थोडा काळ शांतता पाळण्यात आली देशातील ३१ बुद्धिवादी लोकानी बिनपक्षीय सरकारची मागणी केली. १० एप्रिलला बेगम हसिना यानी हे पत्रक आणि मागणी पोरकटपणाची आहे, असे जाहीर केले ह्या प्रश्नाला जनरल इर्शाद यानी काहीहि मत व्यक्त केले नाही, पण महामंत्री चौधरी यांनी घटनेत अशा स्वरूपाची तरतूद नाही असे म्हणून हा प्रश्न डावलून टाकला. स्थानिक स्वराज्य संस्थाबाबत लोकसभेत जो कायदा मांडण्यात आला त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मंडळावर लष्करी प्रतिनिधी पाठविण्याची तरतूद केली होती विरोधी पक्षांनी याला कडाडून विरोध केला आणि चोपन्न तासांचा राष्ट्रीय संप पुकारला आवामी लीग आणि इतर आठ पक्ष यानी आपली स्वतंत्र आघाडी उघडून विरोधाला सुरुवात केली १९७५ च्या राज्यक्रांतीमध्ये ज्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला ते कर्नल फरुख रहमान आणि अब्दुल रशीद यानी देशांतर करून लिबियात आश्रय घेतला खोटे पारपत्र घेऊन फरुख बांगला देशात परत आले त्याना ८५ साली

अटक केली, परतु ८६ साली त्यांना अध्यक्षीय निवडणुकीत उभे राहायची परवानगी दिली बेगम हसिना याच्या मते कर्नल फरुख हे शेख मुजीबर यांचे खुनी असून त्याच्यावर त्यासाठी खटला भरला पाहिजे याच्या उल्ट बेगम हसिना या भारत आणि रशियाच्या हस्तक आहेत, असा कर्नल फरुख यांचा आरोप आहे या सगळ्या प्रकारात या दोन महत्त्वाच्या पक्षात कायम सघर्ष कसा ठेवता येईल हेच धोरण अध्यक्ष इर्शाद यानी चालवलेले दिसते विरोधी पक्षानी मात्र इर्शादाचा राजीनामा मागणारी चळवळ चालू ठेवलीच आहे मात्र लोकसभेच्या निवडणुका होतील असे इर्शाद यानी जाहीर केले आणि इर्शादविरोधी चळवळ थोडी थडावल्यासारखी झाली. बांगला देशाच्या परराष्ट्रीय धोरणाचा ओघ आजही चीनच्या दिशेने वहात असला तरी भारत–चीन मैत्रीनतर या संबंधाला पुष्कळच वास्तववादी वळण लागलेले आहे सीमेवर वावरणाऱ्या चकमा आदिवासींचा प्रश्न आणि भारत–बागला देश यांच्यातील पाणीवाटपाचा प्रश्न, हे प्रश्न अजूनहि थोड्या फार प्रमाणात अस्वस्थ करणारे आहेत पाकिस्तानच्या बाबतीत २ लक्ष पन्नास हजार बिहारी नागरिकाचा प्रश्न असाच लोंबकळत पडला आहे.

## बांगला देशाचे राजकारण

बागला देशातली वरकरणी दिसणारी शांतता किती तकलादू आहे याची कल्पना अलीकडच्या गेल्या दोन महिन्यातील घटनावरून दिसू लागली आहे. जन इर्शाद याच्या सत्तेविरुद्ध, हुकूमशाहीविरुद्धचा लढा शेख हसीना यानी सुरू केला १९८२ साली सत्तेवर आलेल्या हुकूमशहांविरोधी आघाडीला आपला जम बसवायला ८ वर्षे लागली. बांगला देशात लोकशाहीची प्रस्थापना व्हावी म्हणून युवकांनी रक्त सांडले. विरोधकांच्या हे लक्षात आले की सर्व विरोधी गट एकत्र आल्यावाचून इर्शादविरोधी चळवळीला धार येणार नाही ऑक्टोबर दहाला बैतुल मुकर्रम मशिदी, गुलिस्तान चौक आणि मोती झील भागात जी निदर्शने झाली त्यात पाच ठार, दोनशे जखमी झाले. आठ पक्षानी एकत्र येऊन संघटित केलेली आवामी लीग आघाडी, सात पक्ष मिळून झालेली बागला देश नॅशनल पार्टी आणि पाच पक्षाची डावी आंघाडी या सर्वांनी एकत्र येऊन बागला देशात प्रत्येक जिल्ह्यात चळवळ नेण्याचा, निदर्शने करण्याचा निर्णय केला. ऑल पार्टी स्टुडंटस् युनियन (ऐपिएसयु) यांनी हरताळ, घेराव आणि बदला सुरुवात केली आणि चळवळीचे लोण खेड्याखेड्यात पोचले ढाका विद्यापीठ बेमुदत बद करण्यात आले. सरकारने सर्व विरोधी नेत्यांची धरपकड सुरू केली आवामी पक्षाचे पंकज भट्टाचार्य याना तुरुगात टाकले. सरकारविरोधी वृत्तपत्रे जाळण्यास उत्तेजन दिले गेले नोव्हेंबरमध्ये जागतिक बॅंक, आतरराष्ट्रीय नाणेनिधि याची समिति बांगला देशात गेली असताना शेख हसिना आणि खलिदा झिया या दोन्ही स्त्रीनेत्यानी उघडपणे तक्रार केली की आंतरराष्ट्रीय मदतीचा दुरुपयोग बांगला देशाच्या सत्तेने केलेला आहे. “भाववाढीने ग्रस्त झालेल्या जनतेचा क्षोभ अनावार आहे त्यात इर्शाद–सत्तेची राखरागोळी होणार” अशा घोषणा दिल्या गेल्या बी एन पी च्या नेत्या बेगम खलिदा झिया म्हणाल्या की, लढा

लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी आहे, सत्तेसाठी नाही.

यानंतर घटना विलक्षत वेगाने घडल्या. निवडणुका जाहीर झाल्या. तात्पुरते अध्यक्ष नेमले गेले. जन इर्शाद यानी राजीनामा दिला आता त्यांना घरातच अटक केली गेली असून त्यांच्यावर खटला भरण्यात येणार आहे. निवडणुका कशा होणार? विरोधी आघाडी एकत्र राहणार का? लोकशाही स्थापन होणार का? या प्रश्नाची उत्तरे बांगला देशातील मतदारांनी द्यायची आहेत

## बांगला देशापुढचे प्रश्नचिन्ह

गेल्या आठवड्यात, १९९०च्या अखेरच्या पर्वात गेली १५ वर्षे विजनवासात राहणारे बांगला देशी नेते 'टायगर' सिद्दिकी, ढाक्याला परत आले १९७१च्या मुक्तीसग्रामात आघाडीचे नेते असलेले सिद्दिकी यांच्या स्वागताला लक्षावधी लोक जमले होते विमानतळावरच्या भाषणात सिद्दिकी यांनी आपल्याला मिळालेल्या पाठबळाबद्दल भारताचे आभार मानले. त्याना भारताचे हस्तक म्हणणाऱ्याच्यावर कडाडून हल्ला केला. हे सारे दूरदर्शनवर पहाताना मला पाकिस्तानी तुरुगातून सुटून परत आलेल्या शेख मुजीबर यांच्या झालेल्या स्वागताची आठवण झाली. त्यांना पाकिस्तानातील तुरुगातून सोडल्यावर लडनला नेण्यात आले होते. पण त्यानी नव्या दिल्लीला जाऊन मग ढाक्याला परत जाण्याचा आग्रह धरला होता. त्याच्या स्वागताला असेच लक्षावधी लोक जमले होते मला आठवण येते ती आणखी दोन मित्राची बांगला देश स्वतत्र होण्यापूर्वी सयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालयात मला एक भारतीय दिसणारे गृहस्थ भेटायला आले आम्ही एकत्र जेवलो. गप्पा मारताना कळले की हे न्यायमूर्ति अबू सैद चौधरी, बांगला देशाच्या स्वातंत्र्याला, आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवण्यासाठी ते न्यूयॉर्कला आले होते नंतर ते मला दुसऱ्या एका मित्राकडे घेऊन गेले त्यांचे नाव श्री. किब्रिया. पाकिस्तानचे राजदूत होते. पण बांगला देशी. त्यांनी देशासाठी राजदूतपद सोडले आणि आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवला. नंतर न्या अबू सैद चौधरी हे बांगला देशाचे अध्यक्ष झाले. अचानक त्याचे पत्र आले की बांगला देशाला यायचे निमंत्रण देतो आहे. श्री किब्रिया हे सयुक्त राष्ट्रसघात आशिया पॅसिफिक विभागाचे प्रमुख झाले टायगर सिद्दिकी याचे भाषण ऐकताना या साऱ्या आठवणी जाग्या झाल्या त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की राष्ट्रपित्याच्या खून करणाऱ्या मेजर दालीम यांच्यावर खुनाचा खटला भरला जाईल. शेख मुजीबर यांच्या हत्येचा प्रतिशोध घेतला जाईल आज कित्येक वर्षांनी शेख मुजीबर यांच्या प्रचड प्रतिमेच्या मिरवणुकी काढण्यात येत आहेत

बंगबधू शेख मुजीबर याच्या प्रतिमेची पुनर्स्थापना करण्याच्या चळवळीचा सर्वात जास्त फायदा त्यांची कन्या शेख हसिना वाजेद यानाच होणार आहे. बगबधू याच्या प्रतिमेच्या छायेत आवामी लीगच्या भविष्यकाळ उजळणार, असे आज तरी वाटते आहे नव्या लोकशाही रचनेत, ससदेच्या २७ फेब्रुवारी ९१ मध्ये

होणाऱ्या निवडणुकात टायगर सिद्दिकी यांची महत्त्वाची भूमिका असणार आहे ३०० सदस्य असलेल्या जातीय ससदेत (राष्ट्रीय ससदेत) बहुमत मिळण्याची शक्यता आता निर्माण झालेली दिसते.

## भारत-बांगला देश संबंध

या निवडणुकाच्यानतर बागला देशात जर लोकशाही निर्माण झाली तर ढाका आणि दिल्ली याच्या सबधात क्रांतिकारी बदल होण्याचा सभव आहे हे सबध सुधारण्यात शेख मुजीबर याच्या ऐतिहासिक भारत-स्नेहवर्धनाचा आहे. शेख मुजीबर याच्या हत्येनतर, भारत बागला देश संबध भक्कम पायावर उभारण्याचा मोठा प्रयत्न झालाच नाही, यामुळे झिया उर रहमान आणि जन इर्शाद या आपल्या महाकाय शेजाऱ्यावर सपूर्ण विश्वास कधीच ठेवला नाही जन इर्शाद याचे भारताशी सबध स्थिर होते, पण त्या स्थैर्यामागे एक तणावाचा, अस्वस्थतेचा भाग होता त्याच्या आठ वर्षांच्या कालखडात भारत बांगला देश यातील कोणतेच प्रश्न सुटायच्या मार्गाला लागले नाही झिया उर रहमान याच्या काळात मोरारजी देसाई याच्या कारकीर्दीत १९७७ साली पाण्याबाबत करार करण्यात आला, पण तेव्हापासून पाण्याच्या वाटणीबाबत पाऊल पुढे पडलेच नाही

जन इर्शाद याची ठाम खात्री होती की चित्तगाव जिल्ह्यामधील शांतिवाहिनी - या आदिवासी बंडखोराच्या संघटनेला भारताचा गुप्त पाठिंबा होता. याच्या उलट त्रिपुरा येथील बडखोराना बागला देशाचे गुप्त पाठबळ आहे, अशी भारताची धारणा होती तीन बिघा भूभागाचा हस्तांतराचा प्रश्न भारताच्या सर्वोच्च न्यायालयापुढे लोंबकळत पडलेला आहे लोकशाहीच्या स्थापनेनतर हा प्रश्न सोडवता आला तर हे सबध सुधारायला निश्चित मदत होईल. नेहमी भारताच्या विरोधी भूमिका घेणाऱ्या बागला देश नॅशनल पार्टीच्या नेत्या आणि जन झिया याच्या विधवा पत्नी, बेगम खलिदा झिया यासुद्धा आता भारताने पुढाकार घेऊन हे सबध सुधारायला सुरुवात करावी असे म्हणू लागल्या आहेत. गेल्या काही महिन्यातल्या घडामोडी विरोधी पक्षाची बळकटी वाढते आहे हेच दाखवतात. यामुळेच शेख हसिना यांनी बागला देशाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा आणि काळजीवाहू सरकार स्थापन करावे अशी मागणी केली बागला देशाच्या घटनेच्या कलम ५१ प्रमाणे अशी तरतूद आहे. पण राष्ट्राचे उपाध्यक्ष मौदूद अहमद यानी ही मागणी 'पोरकटपणाची' आहे आणि त्यामुळे हसिना यांची 'अप्रगल्भ' दृष्टी दिसून येते अशी टीका केली. याच्या उलट इर्शाद यांनी 'मी सत्तेवर आहे तोवर जनतेला माझ्याशीच सवाद साधावा लागेल' असे उर्मट उत्तर दिले ऑक्टोबर अखेर भारतात रामजन्मभूमि-बाबरी मशिद वादामुळे अयोध्येत जे घडले त्याचा प्रतिसाद बांगला देशातही उमटला. हिंदू देवळे, दुकाने यावर हल्ला झाला. ढाक्यात लष्कराला पाचारण करावे लागले बागला देशातील दोन कोटी अल्पसख्याकांना सरकारने शाब्दिक अभय दिले. परतु हा हिंसाचार काही मत्र्यानीच घडवून आणला असा जाहीर आरोप शेख हसीना यानी केला पण या विरोधाच्या

वावटळीत इर्शाद यांचे सरकार मात्र कोसळले

लोकशाहीला पोषक असे वातावरण निर्माण झाल्यामुळे भारतविरोधी प्रचाराला ओहोटी लागली आहे जमात-ए-इस्लामी ही चळवळ खेड्यापाड्यात पसरली आहे. पण कट्टर भारतविरोधी मौलाना अब्दुल भशानी याच्या मरणानंतर या पक्षाच्या प्रचारातला भारतविरोधी विखार कमी झाला आहे. पण अलीकडे भारतात सुरू झालेल्या जातीय दंगली आणि आक्रमक जातीयवादाचा उपयोग करून हा पक्ष पुन्हा आपली पाळेमुळे बळकट करण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यामुळे येत्या निवडणुकात लोकशाही रचना पुनर्स्थापित होणार का पुन्हा जातीय हुकूमशाही येणार यावरच भारत-बांगला देश संबधाचे भवितव्य अवलंबून आहे

(केसरी)

[library stamp: ५३९ २६३९२ २२।६।९१]

# ६

## हिमालयाच्या छायेतील देश

# नेपाळ

शाळेमध्ये कुमारसभवम् शिकत असताना कालिदासाने केलेले हिमालयाचे वर्णन म्हणजे ''अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराज'' उत्तरेच्या दिशेला, ज्याच्या अंत करणात देवता वसतात असा हिमालय नावाचा पर्वतांचा राजा आहे, या वर्णनाने मला अंतरी देवता वागविणाऱ्या या पर्वत राजाविषयी आणि त्याच्या छायेतील नेपाळच्या राजाविषयी फार कुतूहल निर्माण केले होते एकुलता एक हिंदू सम्राट म्हणून नेपाळ नरेशाचा गौरव स्वा सावरकरांच्या भाषणातून अनेकदा ऐकला होता दुसऱ्या एका ठिकाणी मेघदूतात हिमालयाच्या शुभ्र शिखराचे वर्णन करताना कालिदासाने शंकरस्य अट्टहास्य असे वर्णन केले आहे शिवशंकराचे प्रसन्न हास्य इतके निर्मळ की ते जर गोठून घट्ट झाले तर त्याचा स्फटिकशुभ्र बर्फच होणार असे मला वाटते पारिजातकाच्या फुलांसारखा बर्फ भुरुभुरु पडत राहिला तर त्यातून पर्वताच्या अंगावर रोमांच उभा करणारा किंवा पृथ्वी मोजण्यासाठी केलेल्या मापनाचा दंड, ''पृथिव्या इव मानदंड'' असं ज्याचे वर्णन केले जाते अशा हिमालयाची हाक माझ्या मनात फार वर्षे घुमत होती. त्यामुळे नेपाळ शासनाने सल्लागार म्हणून बोलावणे केल्यानंतर, फार अगत्याने आणि आदराने ते निमंत्रण मी स्वीकारले दिल्लीहून काठमांडूला त्रिभुवन विमानतळावर पोचलो आणि एका वेगळ्या जगात आल्याची सुखद जाणीव मनाला मोहरून गेली. ज्याला हिंदू राज्य म्हणता येईल असे जगातील ते एक एकुलते एक राष्ट्र, ज्याचा राष्ट्रीय धर्म हिंदू आहे, असे हिमालयाच्या कुशीत राहिलेले हे चिमुकले राष्ट्र याची जाणीव सदैव मनात होती विमानतळावर घ्यायला आलेले समाजकल्याणचे सचिव, श्री मानंधर, सैल सुरवारीसारखा पायजमा, खमीज त्यावर ओपन कॉलर असणारा कोट आणि डोक्याला गुरख्याची तिरकी टोपी. कमरेला कुकरी नव्हती एवढेच. हा बुटका चष्मा लावलेला गुरखा माणूस एका शासनाचा सचिव असेल असे वाटत नव्हते पण

हा गृहस्थ बोलू लागला म्हणजे वाणीचा प्रवाह असा अस्खलीत वहात असे की, ज्यामधून त्यांचा संस्कृत, इंग्रजी आणि फ्रेंच भाषेचा अभ्यास सहजपणाने प्रगट होतो. विचार धारदार आणि विश्लेषक बुद्धि यामुळे आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळवलेले राष्ट्र बँकेचे अध्यक्ष डॉ पंत, विश्वविद्यालयाचे कुलगुरु डॉ. उपरेति असे अनेक मित्र मिळाले. मानधर नेपाळ शासनाचे पुढे प्रमुख सचिव झाले. श्री मानधर आणि माझे दुसरे मित्र समाजकल्याणाचे संचालक श्री. चंद्रबीर गुरंग यांनी मला नेपाळची खरी खरी ओळख करून दिली

काठमांडू किंवा "काष्टमंडपम्" हे गाव खरोखरच लाकडाचे मांडव, देवळे, गोपुरे आणि शिखरे यानी नटलेला आहे अलीकडे तेथे पंचतारांकित हॉटेल्स झाल्यामुळे काठमांडू शहराला थोडेसे वेगळेपण आलेले आहे पण तो शहरी भाग सोडला तर शासनाचे पत्रालयसुद्धा जुन्या काळी बांधलेल्या लाकडी इमारतीमध्ये, "दरबारा"मध्ये सामावलेले होते ओळख झाल्यानंतर पहिल्या शनिवारी गुरंग मला म्हणाले की, आपण गाडीने वर हिमालयात, जवळ जवळ तिबेटच्या सरहद्दीपर्यंत जाऊ या आम्ही गाडीने तेथे गेलो आणि संध्याकाळी ५ ते ५॥ च्या सुमाराला त्या कड्यावर बसलो. आमच्या पाठीमागे बर्फाचा आरशासारखा स्वच्छ डोंगर आणि समोर खाली प्रचंड खोरे. दाट हिरवे रान आणि धनगडींने भरलेली दरी सूर्यास्त होण्याची वेळ होती आणि क्षितिजाच्या काठावर आलेला सूर्य आता लाल दिसत होता आमच्या पाठीमागे असलेल्या बर्फाच्या डोंगरावर तो प्रकाश परावर्तित होत होता त्यामुळे पाठीमागे हिमकडे जे आधी उन्हात चांदीसारखे चमचम करीत होते ते हळूहळू जाळासारखे लाल होऊ लागले होते याच रंगाचे जांभळे प्रतिबिंब खाली दरीत पडू लागले होते प्रथम हिरवी वाटणारी झाडी आता किंचित काळसर दिसू लागली होती हळूहळू सूर्य खाली जाताना, मागला बर्फाचा चंदेरी आरसा हळूहळू जांभळा, निळा होत होत काळा झाला समोरची दरी अंधाराने भरून गेली आणि काजळ लावलेला आरसा पाठीमागे असावा अशा अवस्थेत आम्ही किती वेळ तेथे बसलो याचे भान देखील उरले नाही प्रकाशाच्या त्या विस्मयकारी अशा जादूने आणि तिबेटच्या हद्दीकडून येणाऱ्या थंडगार वाऱ्याने मनोमन असे वाटत राहिले की, खरी शुद्ध हवा, खरा प्रकाश, खरी शांति जर कुठे असेल तर ती इथेच या हिमालयाच्या कुशीतच आहे आता रात्र होत आली डोंगरावर थांबण्यात अर्थ नाही कारण हवा थंड होत होती, बर्फ पडायला सुरुवात होईल या भीतीने आम्ही काठमांडूकडे परत यायला निघालो. एकदा हिमालयाच्या कुशीत जाऊन विसावल्यानंतर पुन्हा परत येऊ नये असे वाटते ही अवस्था अनेक योगीजनानी अनेक आध्यात्मिकांनी अनुभवलेली आहे. त्यामुळेच पुष्कळदा हिमालय आणि गंगा याना उद्देशून असे म्हटले गेले, "यत् गत्वा न निवर्तन्ते, तद् धाम परमम पदम्" जिथे गेले असताना परत येण्याचा संभव उरत नाही असे ते घर, ते परमधाम म्हणजेच मोक्ष अर्थात या प्रत्ययकारी मोक्ष कल्पनेतून उतरून कामाकरिता खाली यायलाच हवे त्याप्रमाणे आम्ही काठमांडूला परतलो

## नेपाळ : राजकारणाच्या चौकात

नेपाळ हे आणखी एका अर्थाने जागतिक राजकारणाच्या चौकात असलेले राष्ट्र आहे. जरीपट्क्याप्रमाणे दोन त्रिकोण जोडून असलेला याचा ध्वज आहे, देशाच्या बाजूला तिबेटची किंवा चीनची सरहद्द, पूर्वेला सिक्कीम आणि बंगाल, दक्षिणेला बिहार आणि उत्तर प्रदेश आणि एका बाजूला रशियाची सरहद्द अशा ऐन चौकामध्ये वसलेला हा देश आहे. याच देशामध्ये सरासरी ५५ हजार चौ मैलात आणि समुद्रसपाटीपासून हजारो फूट उंच प्रदेशात वसलेला हा चिमुकला देश आहे याच देशात जिथे बुद्धाचा जन्म झाला ते लुंबिनी शहर आहे. एक आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक स्थान म्हणून युनेस्कोने लुंबिनी पार्कवर प्रचंड खर्च केलेला आहे बुद्ध आणि हिंदू धर्म यांचा एक संमिश्र ठसा या लोकांवर पडलेला आहे. रशिया आणि चीन यांना नेपाळमध्ये आणि त्याच्या विकासामध्ये खूप रस आहे. याचे कारण नेपाळला असलेले राजकीय महत्त्व. पावसाळ्यात तेथे खूप पाऊस पडतो बर्फ पडला तरी पर्वतावर पडतो. परंतु खालच्या दरीत सर्वसाधारणपणे हवामान फार चांगले असते. ज्याला डोंगर दरीत हिंडण्याची अतिशय आवड आहे, ज्याना पर्वतारोहणाची आवड आहे त्यांना नेपाळसारखे दुसरे ठिकाण नाही काठमांडूला खास भारतीय तऱ्हेचे नाजूक शिल्पकाम असलेली देवळे आणि त्यांची उभ्या त्रिकोणासारखी, लाल रंगाचे गंध व डोळे रंगवलेली पांढरी शिखरे आहेत. रशियन स्थापत्याचा ठळक परिणाम दाखवणारी चर्चची बुटकी गोल शिखरे आहेत आणि त्याच्याबरोबर पालथ्या कळशीसारखे महाकाय स्तूप आणि बुद्धधर्मियांच्या गुफा आहेत आदिनाथाचा स्तूप हा अत्यंत मोठा आहे. इथल्या गुफामधून बौद्ध भिक्षु, धर्मचक्र फिरवीत, समोरच्या पोथ्याचे अखंड पठण करीत असतात. एका सुरात आणि खालच्या आवाजात म्हटल्यामुळे त्याच्या या स्तोत्रपठणाला तबोऱ्याच्या खर्जाची धार येते. ऐकणाऱ्याला मात्र या एकसुरी नादाने गुंगी येते. वेगवेगळी प्रार्थना मंदिरे, वेगवेगळ्या देशाचे पर्यटक आणि गावरान साधेपणात राहून आंतरराष्ट्रीय राजकारण करणारे नेपाळी नेते यामुळे नेपाळचा इतिहास आणि सध्याचे राजकारणसुद्धा एका प्रकारे आध्यात्मिक आणि गूढ वाटू लागले.

## नेपाळमधील राजसत्ता

इथल्या राजांबद्दल किंवा त्यांना संबोधतांना 'श्री' 'श्री' असे पाच वेळा लिहावे लागते आणि आजसुद्धा प्रत्येक सरकारी आज्ञेच्या वर 'श्री पशुपतिनाथ आमचे रक्षण करो' अशी प्रार्थना असते. एके काळी मारवाड किंवा राजपुतान्यातून आलेल्या या राजांनी आपले अमात्यपद तेथील राणावंशातील मंडळींना दिले राणा महामंत्र्यानी राजसत्तेचे आणि धर्मसत्तेचे सर्वाधिकार आपल्याकडे घेतले. शेवटी प्रत्यक्ष राजाला त्याच्याविरुद्ध युद्ध पुकारून राजसत्ता परत मिळवावी लागली लोकशाहीचा पहिला झगडा नेपाळमध्ये ज्या वेळी सुरू झाला त्या वेळी आपल्या सरकारने नेपाळी जनतेला

पाठिंबा दिला परंतु लोकशाहीचा तो प्रयोग पूर्ण यशस्वी झाला असे म्हणवत नाही. कारण नतर महामत्र्याना पदच्युत करून राजाने महामत्री नेमण्याची पद्धत सुरू झाली आज राजघराण्यातील मुलांना राणा घराण्यातील मुली दिल्या जातात. त्यामुळे पुष्कळदा राजे कुटुबातील भावाभावांचे राणा कुटुबातील बहिणीबहिणींशी विवाह झालेले आहेत त्यामुळे नेपाळमध्ये राजसत्ता, धर्मसत्ता आणि त्याचबरोबर आता अर्थसत्तासुद्धा केंद्रित झालेली आहे.

पण नेपाळचा इतिहास पाहिला तर असे दिसते की, येथील राजे आणि लष्करी सेनापती असणारे राणा या दोन सामाजिक गटानी नेपाळची सारी समृद्धी ओरबाडून आपल्याकडे घेतली. त्यामुळे नेपाळमधील सामान्य माणूस हा अजूनहि गरीबच राहिलेला आहे. बर्फाने झाकलेल्या पर्वतशिखराच्या छायेमध्ये असलेल्या नेपाळमध्ये दोन गोष्टींबद्दल फार जिज्ञासा दिसते एक म्हणजे क्वचित दिसणारा प्राणी ''याक'' आणि ज्या हिममानवाबद्दल अनेक समज आणि गैरसमज प्रचलित आहेत तो यती किंवा हिममानव. याक हा केसाळ प्राणी असून अनेकानी पाहिलेला आहे. परतु प्रचंड पावलाचे ठसे उमटवीत जाणारा हिममानव किंवा यती याच्या पावलाचे ठसे पाहिल्याचे अनेक लोकानी सागितले तरी हे महामानव मात्र कुणीही पाहिलेले नाहीत खूप उंचीवर जाणारे शेरपा यति पाहिल्याचे सागतात हा यति म्हणजे माणूस आणि माकड यातला दुवा आहे असे ते मानतात पण त्यांच्या अस्तित्वाचा प्रत्यक्ष पुरावा नाही. त्यामुळे आजसुद्धा ''यती'' ही केवळ कविकल्पना आहे असेच अनेक लोक म्हणतात.

## शिखरे आणि उद्याने :

नेपाळमध्ये आल्यानतर तिथे असणाऱ्या बर्फाची शिखरे पाहणे हा अलौकिक अनुभव आहे. त्यासाठी नेपाळ एअरलाइन्सचे विमान किंवा हेलिकॉप्टर आपल्याला वर घेऊन जाते आणि चक्राकार रितीने क्षितिजाच्या गोलाकार परिघाभोवती हिंडून आपल्याला गौरीशकरसकट सर्व शिखरे दाखविली जातात. स्वित्झर्लंडवरून विमानाने येताना अनेक वेळा आल्पस्चे विलक्षण सौंदर्य मी पाहिले आहे. विशेषत· सूर्यप्रकाशात चमकणारे ते हिमखड पाहून तेथे उतरावे, त्या रुपेरी बर्फात लोळावे असा मोह अनेकदा झालेला आहे. परंतु नेपाळमध्ये क्षितिजावर जाऊन ही हिमशिखरे पाहताना मात्र त्या रुद्र दर्शनाने मनामध्ये उत्पन्न होतो तो भाव फक्त आदराचा किंवा भीतीचा. तेथे उतरावे असे मात्र वाटत नाही त्या हिमशिखराची एक आदरयुक्त भीतीच मनात दाटून राहते विमानात बसल्यावर आपल्याला एक गोलाकार नकाशा देतात. त्या नकाशावर हिमालयाची सर्व शिखरे दाखवलेली असतात कैलास, काचनगगा, गंगोत्री ज्याच्या नावानेसुद्धा मनात एक अध्यात्मिक ओढ निर्माण होते. ती शिखरे जवळून मात्र मनात भय उत्पन्न करतात जुन्या काळी, वडिलाबद्दल अव्यक्त आदर, भीती आणि ओढ असे तसाच काहीसा हा प्रकार आहे

याखेरीज चितवन राष्ट्रीय उद्यानात हिंडणे हाही एक वेगळा अनुभव आहे यामध्ये वाघ, हत्ती यासारखी तर जनावरे आहेतच, पण इतक्या तऱ्हेचे पक्षी या रानात दिसतात की, विचारायची सोय नाही या ठिकाणी राहण्याकरिता एक वेगळेच हॉटेल आहे. त्याचे नाव ''ट्री टॉप'' आहे. उच झाडाच्या दुबेळक्यामध्ये फळ्या बाधून त्यावर गोल मजला करून हे हॉटेल बाधलेले आहे. फार महागडे आहे पण आयुष्यात एकदा तरी वृक्षाच्या मध्यावर बाधलेल्या या हॉटेलात राहावे असा माझा सल्ला आहे शिडीवरून हॉटेलात जायचे इतर हॉटेलपेक्षा वेगळा भाग म्हणजे रात्री अजिबात आवाज करायचा नाही कारण रात्रीच्या वेळी आपल्याच पायथ्याशी, वृक्षाच्या बुध्याशी एखादा वाघोबा, एखादा साबरांचा कळप किंवा एखादा हत्ती आपल्याला आढळतो बर्फात राहणारे चित्ते किंवा जगली बोकड, तऱ्हेतऱ्हेची हरणे यांनी भरलेले हे जगल आहे ३६० किलोमीटर पसरलेल्या या राष्ट्रीय उद्यानात एवढे प्रचड वृक्ष आहेत की ह्या रानातून हिंडताना त्या प्रचंड निसर्गापुढे आपले अस्तित्व खुरटे खुरटे होत जावे शेवटी या जगलाच्या मानाने आपण किती क्षुद्र, किती दुबळे आहोत याची जाणीव होते पण लगेच वाटू लागते की, माणसाला बुद्धि आहे, सौंदर्यदृष्टि आहे म्हणूनच आपण या जगलाची शोभा पाहू शकतो या जगलाचे अभयारण्य करू शकतो. या प्राणीमात्राकडे, पक्ष्यांकडे कौतुकाने पाहू शकतो काठमांडूला, दरीत ''राणीतल'' नावाचे फार मोठे तळे आहे. या ठिकाणी जाणे किंवा नारायणी नदीमधून बोटीने खाली येणे हाहि वेगळाच अनुभव आहे. पुष्कळवेळा नदीमध्ये अनेक वेळेला सुसरी दिसतात त्याना भ्यायचे कारण नाही असे नावाडी पुन·पुन्हा सागत असला तरी त्यांची भीती वाटल्यावाचून मात्र राहात नाही कारण ''सुसरबाई तुझीच पाठ मऊ'' हे त्या सुसरीला माहीत असेलच अशी मला खात्री नव्हती.

## तांत्रिक विद्या आणि मंदिरे

नेपाळच्या भूगोलाचा परिणाम म्हणून म्हणा किंवा हिमालयाच्या सान्निध्याचा परिणाम म्हणून म्हणा येथे जे जे घडते ते ते अतिशय उत्कटतेने घडते या रुद्र, भव्य एकातामध्ये उत्कटता नसली तरच आश्चर्य त्यामुळे असेल कदाचित परतु नेपाळमध्ये तांत्रिक विद्येचा प्रसार मोठ्या प्रमाणात आढळतो वेगवेगळी चक्रे, चिन्हे, कुंडलिनीचे आकार याची पूजा-अर्चा दिसते. गुरखा सैनिक भद्रकालीच्या देवळात येऊन अटेन्शनच्या पावित्र्यात उभा राहतो देवीला सॅल्यूट करतो किंवा पशुपतिनाथाला रेड्याचा किंवा बकऱ्याचा बळी दिला जातो 'शाभवी' किंवा 'भाग' याला इथे धार्मिक मान्यता आहे एके काळी नेपाळमध्ये खूप अफू पिकवली जात असल्या कारणाने असेल, अनेक देशातून हिप्पी झालेली माणसेहि येथे जमा होत असतात येथे शृगारसुद्धा धार्मिक अधिष्ठान घेऊन प्रकट होतो शकराच्या पिंडीची पूजाहि मूळ लिंगपूजा आहे इतकेच नव्हे तर महायोनेश्वरीच्या देवळात महायोनीसुद्धा आहे भैरव आणि भैरवीची अनेक रूपे लाकडावर किंवा दगडावर

कोरली गेली आहेत. त्यामुळे भैरवीच्या कमरेला दोन्ही पायांचा विळखा घालून सुरतकर्म करीत तांडवनृत्य करणाऱ्या भैरवाची मूर्ति येथेच सापडते येथील गणपतिसुद्धा दशभुजा आणि नृत्य करणारा आढळतो. काठमांडूपासून जवळच पाटण गावी गेल्यानतर रस्त्याच्या दोन्ही बाजूला जी जुनी घरे दिसतात. त्यांच्या खिडक्या, छपरांना आधार देणाऱ्या तुळया आणि त्याला तिरके दिलेले टेकू या साऱ्यांवर फारच सुंदर लाकडी कोरीवकाम केलेले आहे भगवान शकराला किती किती तऱ्हेने प्रकट करावा हेच शिल्पकाराला कोडे पडले असावे इतक्या तऱ्हेच्या मूर्ति येथे आढळतात शेकडो वर्षांपूर्वी अनामिक शिल्पकारांनी कोरलेल्या भैरव-भैरवीच्या शृंगाराच्या किंवा सिद्धि देवतांच्या मूर्ति, चित्रे, शिल्पे यातून नेपाळी सस्कृति सपन्न झाली आहे

नृसिंह मल्लाच्या काळात दरबार चौकात कोरलेल्या बुद्धाच्या मूर्ति त्या काळातील बुद्धभक्तीची साक्ष अजूनही देत आहेत. सोनेरी पाने लावून झळाळणारी देवळांची शिखरे पाहिली म्हणजे ज्वालाखेल, पाटण आणि ललितपूर या ठिकाणी एकेकाळी नादत असलेल्या समृद्ध सस्कृतीची ओळख पटते या समाजाचा ताणाबाणा चीन, रशिया, तिबेट आणि हिंदुस्थान या साऱ्याच्या रेशीमधाग्यांनी विणलेला आहे. काठमांडूच्या बाहेरच्या बाजूला एका देवळात शेषशायी नागावर पहुडलेल्या नारायणाचे मदिर आहे. एका भल्या मोठ्या तळ्यात निजलेल्या मूर्तीचे उलटे पण संपूर्ण प्रतिबिंब पाण्यात दिसू शकते. पाण्यावर कमळे उगवली तर त्यांचे प्रतिबिंबही दिसते पण नेहमी प्रतिबिंबात कमळाचा खालचा भाग दिसतो आभाळाकडे तोंड केलेले पराग दिसत नाहीत पण या उलट नारायणाच्या मूर्तीच्या मुकुटाचे समोरचे टोकसुद्धा या प्रतिबिंबात दिसते हा नेत्रभ्रम आहे का? हे कसे घडविले असेल ते केवळ त्या कलाकारालाच ठाऊक! राजा हा नारायणाचा दुसरा अवतार असल्यामुळे नेपाळचे राजे या देवदर्शनाला येत नाहीत. त्यांच्या पूजेसाठी अशाच तऱ्हेचे मदिर दुसरीकडे बनवून ठेवले आहे.

एक लोककथा अशी आहे की, मांचुरियात तपश्चर्या करणारा बोधिसत्त्व (हिंदु लोककथेमध्ये तोच विष्णूचा अवतार होतो). याने आपल्या खड्गाने हिमालयाचा बांध फोडून काठमांडूच्या दरीत पाणी आणले. पाण्याबरोबर अनेक साप, सुसरी, मोठे जलचर आले बांधाच्या वरच्या बाजूला पाण्याच्या रक्षणाकरिता कर्कोटक नावाच्या जलनागाला तथे ठेवण्यात आले आहे. खाली आलेल्या हिंस्र जलचरांना बोधिसत्त्वाने किंवा विष्णूने घालवून दिले. दरीला शातता आणि अभय मिळाले नेपाळी शेतकऱ्याला स्वच्छ पाणी मिळाले इथल्या तळ्यामध्ये पुष्कळ कमळे आहेत एक दिवस एका कमलकलिकेमधून एक ज्वाला वर आली. त्या ज्वालेचे फूल झाले ते ज्वालाकमल म्हणजेच भगवान बुद्धाच्या चिरतन तपस्येचे किंवा भगवताच्या, नारायणाच्या कृपाछत्राचे प्रतीक असे आजहि मानले जाते नेपाळमधली त्रिकोणी शिखरे आणि भव्य स्तूप आजही भगवान शकर-पार्वतीचा शृंगार, भगवान बुद्धाची तपश्चर्या आणि साक्षात नारायणाचा अभय

आशीर्वाद यांची आठवण करून देत राहतात.

नेपाळचे राजे वीरेंद्र यांनी नेपाळमध्ये बहुपक्षीय लोकशाही स्थापन करण्याला मान्यता दिली आहे नेपाळमधील लोकेच्छेला मान देऊन त्यांनी घटनेच्या प्रास्ताविकात लोकशाहीमागे असलेला पक्षविरहित हा शब्द गाळण्याला आणि पक्षविरहित पचायतपद्धतीविषयीची सर्व कलमे घटनेतून रद्द करण्याला मान्यता दिली याचबरोबर नेपाळमधील पक्षबदीचा कायदा रद्द झाला राजे वीरेंद्र यांनी सर्व विरोधी पक्षनेत्याशी चर्चा करून ३६ वर्षानतर राजकीय पक्षावरची बदी उठवली. नेपाळी कॉंग्रेसचे अध्यक्ष कृष्णप्रसाद भट्टाराय यानी लोकशाहीच्या मागणीची १४ फेब्रुवारीला सुरू केलेली चळवळ मागे घेतली या चर्चेच्या वेळी नेपाळचे महामत्री लोकेंद्र बहादूर चांद आणि इतर सर्व राजकीय नेते उपस्थित होते. आजवर नेपाळमध्ये प्रचलित असलेली पक्षविरहित पचायत पद्धति हे लोकशाहीचे खोटे नाटक होते. हीच खरी लोकशाही आहे असा आग्रह नेपाळ सरकारने फार काळ धरलेला होता परतु ज्या पंचायत पद्धतीमध्ये सामान्य माणसाला राजकीय निर्णय करण्याचा हक्क नाही ती लोकशाही नसून लोकशाहीची थट्टा आहे, असेच नेपाळी जनतेला वाटत राहिले. यामुळेच नेपाळी जनतेने लोकशाहीच्या मागणीसाठी चळवळ सुरू केली. या चळवळीला भारतातून राजकीय स्वार्थापोटी पाठिंबा दिला जात आहे. अशी कागावखोर ओरड नेपाळ सरकारने केली. इतकेच नव्हे तर नेपाळच्या अंतर्गत प्रश्नांत भारत ढवळाढवळ करीत आहे, अशीहि नेपाळने हाकाटी सुरू केली. चीन आणि पाकिस्तान यानी सुरुवातीच्या काळात आपल्या स्वार्थासाठी या हाकाटीला पाठबळ दिले, परतु लवकरच त्यांच्याहि लक्षात आले की असा पाठिंबा म्हणजे लोकशाहीला विरोध असेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मानले जाणार आहे. हे लक्षात आल्यानतर नेपाळ आणि चीन यांच्यात हवाई पूल बाधण्याचे आणि पाकिस्तान आणि नेपाळ यामध्ये राजकीय राजरस्ते निर्माण करण्याचे त्याचे मनसुबे विरून गेले. नेपाळमधील लोकांच्या चळवळीला नेपाळमधील सर्व विचारवतानी, विद्यापीठातील प्राध्यापकांनी आणि जागृत पत्रकार आणि लेखकांनी प्रत्यक्ष पाठिंबा दिला या चळवळीत शेकडो लोकाची हत्या झाली, काठमाडूला लाठीमार झाला, छळवाद, अटकसत्र यांना सीमा उरली नाही. वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्नहि झाला. परतु शेवटी कायदा आणि सुव्यवस्था राखता न आल्याने महामंत्री मरीच मानसिंग श्रेष्ठ यांची हकालपट्टी करण्यात आली आणि त्यांच्या जागी कृष्णप्रसाद भट्टराय यांना नवीन महामंत्री नेमण्यात आले

## नेपाळी शाही राजकारण

एकेकाळी एकमेव हिंदु राज्य, एकमेव हिंदुसम्राट या नावाखाली राजे वीरेंद्र यानी भारतीय जनतेची सहानुभूति मिळविली होती. खुद्द नेपाळमधल्या गरीब जनतेला त्याचा राजा हा परमेश्वरी अवतार वाटत होता याच भ्रमात राजे वीरेंद्र होते, चळवळीच्या या प्रक्षोभात मात्र राजे वीरेंद्र याना एका कटु सत्याला सामोरे जावे लागले ते म्हणजे नेपाळी जनतेच्या मनातील राजे वीरेंद्र आणि त्याच्या पत्नी महाराणी ऐश्वर्या याच्याविषयी निर्माण झालेली एक विलक्षण कटुतेची भावना, दऱ्याखोऱ्यात, खेड्यापाड्यात ज्या घोषणा दिल्या

जात होत्या त्या अशा होत्या 'वीर चोर, देश छोड' बायको लठ्ठ आहे. नवरा मूर्ख आहे. सगळ्यात मोठी घोषणा होती 'पम्फादेवी हाय हाय, वीरेंद्र बाय बाय' या घोषणेनतर राजसत्तेने चिडून जाऊन क्रूर दडपशाहीला सुरुवात केली होती. लोकशक्तीचा क्षोभ इतका वाढला होता की, वीरेंद्र याना शरणागति पत्करून जनतेच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या.

राणी ऐश्वर्या याची माझी थोरल्या वाड्यावर भेट झाली त्या वेळी नेपाळमधील सामाजिक आर्थिक व शिक्षण सस्थांवर त्यांचा केवढा ताबा आहे, याची मला जाणीव आहे. कुटुंबनियोजन, बालक कल्याण, कुष्ठरोग या सर्वांवर त्यांचा ताबा आहे. ऐश्वर्या, कोमान आणि प्रेक्षा या तीन बहिणी, त्याचे तजमान राजे आणि त्याचे भाऊ या कुटुंबात मिळून काठमांडूमधील सोऑल्टी हॉटेल, हिमाल चहाचे मळे, ट्रक उत्पादनाचा कारखाना, बिस्किटे आणि काड्यापेट्या कारखाना, मिठाचा व्यापार असे सारेच या कुटुबात वाटले गेले आहे.

राजे नेपाळमध्ये दौऱ्यावर जातात त्या वेळी त्यांचा रोजचा खर्च एक लाख नेपाळी रुपये असतो अनेक परदेशी हॉटेल्स आणि इमारती यात त्यांची गुंतवणूक असावी असे बोलले जाते. राजे यांचे एक बधू धीरेंद्र हे सध्या लडनमध्ये राहातात. त्यांचे सर्व अधिकार काढून घेण्यात आलेले आहेत. सध्या तरी राजे वीरेंद्र हे नेपाळच्या डावात आता बिनहुकमी राजाचे पान ठरले आहे.

निवृत्त झालेले सर्व महामत्री, राष्ट्रीय पचायतीचे अनेक सदस्य या सर्वांनीच या चळवळीला पाठिंबा देऊन मागणी केली की नेपाळी सरकारने पोलिस अत्याचार थांबवावेत, सर्व राजकीय कैदी सोडावेत, तात्पुरते नवे सरकार स्थापन करावे, बेफाम वागणारे लष्कर परत बोलवावे या मागण्या वरकरणी सौम्य दिसल्या तरी त्या मागे नेपाळमधील लोकशाहीच्या राजकीय प्रवासाचा इतिहास आहे. आजवर नेपाळमध्ये चांगला महामत्री कोण याचा निकष पाहताना जो भारतविरोधी अधिक भूमिका घेईल तो महामंत्री चांगला, अशी भूमिका राजे वीरेंद्र यांनी घेतल्यामुळे भारतात राहणाऱ्या गुरखा समाजालाहि नेपाळी राजवटीबद्दल आपुलकी वाटेनाशी झाली. खुद्द नेपाळमध्ये गरीब जनतेची कोंडी भारत करीत आहे, नेपाळी जनतेला मीठ आणि रॉकेलसारख्या वस्तु मिळू नयेत यासाठी भारत व्यापारी करार रद्द करीत आहे, असाहि कटु प्रचार करण्यात आला. राणा मंडळींनी भारतात प्रचंड प्रमाणावर जमिनी विकत घेतल्या. राजघराण्यातील मंडळींनी भारतात आणि परदेशात एकामागून एक हॉटेल्स आणि इमारती यामध्ये पैसे गुंतवायला सुरुवात केली परतु ज्या वेळी नेपाळी प्रशासन बहुमूल्य असे परदेशी चलन मीठ अथवा पेट्रोल घेण्याऐवजी व्हिस्की, रेशीम आणि उतारे यासारख्या चैनीच्या वस्तूवर खर्च करीत आहे, असे भारताने दाखवून दिले त्या वेळी नेपाळी जनतेचे डोळे उघडले आणि सामान्य माणसानी रस्त्यावर येऊन लोकशाहीच्या हक्काची मागणी केली नेपाळमधील परदेशी प्रवाशाना परत जायला सांगण्यात आले या राजकीय पार्श्वभूमीवर नेपाळमधील परिस्थिति बघायला हवी नेपाळमध्ये काठमाडू, पाटण, ललितपूर

यासारख्या मोठ्या शहरात संचारबंदी जारी केली गेली. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय गोळा होत असे त्या ठिकाणी हेलिकॉप्टरमधून गोळीबार करण्यात आला. या पार्श्वभूमीवर राजे वीरेंद्र यांनी विरोधी पक्षीयाच्याबरोबर दि. ४ एप्रिलला ५ तास चर्चा केली परतु लोकशाहीविरोधी असणाऱ्या मरीच मानसिंग श्रेष्ठ यानाच नवे मत्रिमडळ बनवण्यास त्यानी सांगितले श्रेष्ठाचा लोकशाहीला इतका विरोध की ४८ तासातच ते मत्रिमडळ बरखास्त करावे लागले नवीन महामत्री नेमावे लागले पूर्वी नेपाळी कॉंग्रेस आणि सरकार याच्यामध्ये मध्यस्थी करणारे पशुपति राणा याचा या नव्या मत्रिमडळात समावेश झाला ही आशादायक घटना घडली आणि अगतिक होऊन पक्षविरहित लोकशाही जनतेला देण्याची घोषणा राजे वीरेंद्र यानी केली ही घोषणा कितीही स्वागतार्ह असली तरी हे नवे नाटक नसावे इतकीच नेपाळी जनतेची अपेक्षा आहे. लोकशाही राज्यपद्धति ही वरून अवतरत नसते, तर ती गावपातळीवरून उमलून यावी लागते राजे वीरेंद्र याची लोकाना सत्ता देण्याबाबतची वृत्ति द्विधा आहे.

## भारताची भूमिका

नेपाळबाबत भारतातील राजकीय नेत्यांनी आजवर नि:संदिग्धपणे एकच भूमिका घेतलेली आहे. ती नेपाळी जनतेच्या लोकशाहीच्या मागणीला पाठिंबा देणारी आहे. पूर्वीच्या काळी जयप्रकाश नारायण यांनी नेपाळचे पदच्युत महामत्री बी. पी कोयराला याना वाराणसी येथे राहून नेपाळी चळवळ वाढवायला मदत केली होती पडित नेहरू यानीहि स्पष्ट शब्दात नेपाळी जनतेचे प्रश्न पहिल्या आशियाई परिषदेत माडले होते नव्या जनता आघाडीच्या सरकारच्या काळात आणि नतर महामत्री चद्रशेखर यानीहि नेपाळमध्ये चाललेल्या दडपशाहीबद्दल आपण उदासीन राहून चालणार नाही, अशीच भूमिका घेतली आहे नेपाळमध्ये होणारा राजकीय बदल आणि नेपाळचे भू-राजकीय स्थान लक्षात घेऊन भारताने गतिशील धोरण ठेवायला हवे नेपाळ आणि भारताचे ऐतिहासिक संबंध भारताला उदासीन राहू देणार नाहीत आपल्या शेजारी असणाऱ्या चीन आणि पाकिस्तान या देशाना नेपाळमध्ये लोकशाही राजवट येणे रुचणारे नाही. परतु अलीकडे भारताची वाढलेली लष्करी शक्ती लक्षात घेऊन चीनने हा प्रश्न भारत आणि नेपाळ यांनी परस्पर चर्चेतूनच सोडवावा, असे सुचवून आपले अंग या प्रकरणातून काढून घेतले. पाकिस्तानने मात्र तसे करायचे नाकारलेले दिसते पाकिस्तानच्या भारतविरोधी भूमिकेला साजेसेच हे धोरण आहे परतु ते नेपाळी जनतेच्या हिताचे खास नाही.

## नेपाळ-भारत संबंधांचा पुनर्विचार हवा

भारत-नेपाळ सबध हा अनेक दृष्टीने गुतागुंतीचा सबध आहे जयप्रकाश नारायण यांना पडित नेहरूनी लिहिलेल्या पत्रात एक उल्लेख असा आहे "नेपाळ हा निश्चितपणे भारत-खडाचा भाग आहे. पण ते एक स्वतत्र राष्ट्र आहे" या एका वाक्यातच या प्रश्नाचा साराश आहे त्यामुळेच नेपाळ हा 'भूवलयाकित' (लँड लॉक्ड) देश आहे असे सर्वत्र म्हटले गेले तरी नेपाळ हा "भारतवलयाकित" (इडिया लॉक्ड) देश आहे असे नेपाळी

लोक मानतात. नेपाळच्या उत्तरेला चीन आणि पूर्व, पश्चिम, दक्षिणेला भारत आहे. पण त्यांच्या खांद्यावरून रशियासारख्या किंवा पाकिस्तानला या प्रकरणात रस आहे. राजे वीरेंद्र याचे शिक्षण भारत, इंग्लड, अमेरिका, जपान इथे झाले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून लोकशाही विचारांची अपेक्षा होती पण तसे घडले नाही त्यांच्या कारकीर्दीत दोनदा १९७९ आणि १९८९ या दोन वर्षी त्याना प्रजेच्या उठावाला तोंड द्यावे लागले पहिल्या खेपेला त्यांनी लोकमत अजमावण्याचा प्रयत्न केला आणि त्यात बहुपक्षीय लोकशाहीवाद्यांचा थोडक्या मतानी पराभव झाला पण १९९० साली मात्र हा प्रश्न घसाला लागला. भारत–नेपाळ व्यापारी कराराची मुदत अस्थायी स्वरूपात दोनदा वाढवली गेली होती; त्याचा विचार ऑक्टोबर १९८८ मध्ये सुरू झाला. तत्त्वतः मान्यता मिळाली पण नेपाळी प्रतिनिधी मंडळ खाटमांडूला परत गेले आणि कराराला मान्यता कळवू शकले नाही. उलट तिबेटमार्गे येणाऱ्या चिनी मालाला, नवा अग्रक्रम मिळाला नेपाळ सरकारला याच्या आर्थिक परिणामांची कल्पना आली नसावी, पण यातूनच प्रजेच्या अस्वस्थतेतून लोकशाही लढा उभारला गेला. आज पुन्हा नेपाळ इतिहासाच्या चौरस्त्यावर उभा आहे. फरक इतकाच की राजकीय हक्कांबरोबरच तो आर्थिक हक्काची मागणी सामान्य प्रजानन करतो आहे भारताच्या सुरक्षाविषयक धोरणाची भारत–नेपाळ संबंधावर दाट छाया आहे. केवळ अत्याधुनिक शस्त्रे चीन किंवा पाकिस्तानकडून विकत घेतली तर सुरक्षा पूर्ण होईल हे नेपाळी धोरण भ्रममूलक आहे म्हणूनच या संबंधांतली कठोर वास्तवता लक्षात घेणे हेच नेपाळच्या हिताचे आहे

(केसरी)

❀ ❀ ❀

# ७

## कानी कुंडल मोतीहार

# इंडोनेशिया

जगामध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने इंडोनेशिया हा पाचवा महत्त्वाचा देश आहे चीन, भारत, रशिया आणि अमेरिका यांच्यानतर इंडोनेशियाचाच क्रमाक लागतो. येथे जवळजवळ १६५ दशलक्ष लोक राहातात. बौद्ध, हिंदू, मुसलमान अशा सर्व धर्मांची माणसे एकाच घरात असण्याची शक्यता फक्त इडोनेशियात आहे केवळ लोकसंख्या जास्त आहे हे इडोनेशियाचे वैशिष्ट्य नाही. त्याचा भौगोलिक आकार हे इडोनेशियाचे खरेखुरे वैशिष्ट्य पूर्व-पश्चिम आणि दक्षिणोत्तर जाणाऱ्या बेटांची प्रचड साखळी म्हणजे इंडोनेशिया. या बेटांच्या मालिकेत तेरा हजार सहाशे सत्त्याहत्तर बेट आहेत या साडेतेरा हजार बेटांपैकी फक्त तीन हजार बेटावर लोकवस्ती आहेत. ही बेटांची साखळी इतकी लाब आहे की केवळ नकाशात बघून आपल्याला याची पूर्ण कल्पना येत नाही दक्षिणेकडे ऑस्ट्रेलियाला भिडणारी रेषा पश्चिमेकडे वळण उत्तरेला भिडते ती निकोबार या भारतीय बेटाच्या खाली. या बेटाच्या साखळीमधून विषुववृत्त गेलेले आहे. साखळीच्या एका बाजूला हिंदी महासागर तर दुसऱ्या बाजूला प्रशांत महासागर आहे. याशिवाय इडोनेशियाच्या किनाऱ्यावर जावा, द. चायना, सुलावेसी, मलाक्का अशा नावाच्या समुद्रांच्या लाटा सदैव धडकत असतात. या प्रत्येक नावाला दर्यावर्दी साहसाचा सुगंध आहे. भारतीय, इंग्रज, डच, स्पॅनिश अनेक खलाशानी समृद्धीच्या शोधात या किनाऱ्याला गलबतं लावलेली आहेत या एकूण साखळीची लांबी पाच हजार एकशेवीस किलोमीटर लाब म्हणजे जवळ जवळ जिनिव्हापासून न्यूयॉर्कपर्यंतचे अंतर इतकी मोठी आहे इथल्या अनेक बेटावर टपाल फक्त नावातून जाते आणि आठ-आठ, दहा-दहा दिवस पत्र पोचायला लागतात

पहिल्या प्रथम ज्या वेळी मी जकार्ताला पोहोचलो त्या वेळी मनावर परिणाम झाला तो फक्त तिथला उकाडा, रस्त्यावरची प्रचड गर्दी, खूप नाजूक अशी लाकडावर केलेली कलाकुसर आणि देवदेवताचा सुकाळ या भाषेमधले सस्कृत शब्द आणि सगीतामध्ये

मधूनच येणारा भारतीय हेल्कावा. इथल्या मूळ संस्कृत नावाची अपभ्रष्ट रूपे ऐकताना या भूमीशी असणारे भारताचे जन्मजन्मांतरीचे लागेबांधे, काही अव्यक्त सांस्कृतिक नातीगोती आपल्या भावनांना स्पर्श करून जातात इथल्या रिक्षांना चक्क बजाज असे म्हणतात. कारण त्या पुण्याच्या बजाज कारखान्यात तयार होतात 'तुझ्यासाठी बजाज बोलवू का?' असे विचारल्यावर 'बजाज' या विशेष नावाचे सामान्य नांव झाल्याचे चटकन लक्षात आले नाही इथल्या पंचतारांकित हॉटेलची नावेसुद्धा 'बोरबदूर' (हे कांम्पुचियामधील प्रख्यात हिंदू मंदिर आहेत ) किंवा दुसरे हॉटेल 'रामायण' नावाचे आहे. तिथे 'शतनु' नावाचे रूपांतर 'शांतोने' असे होते तर गरुडपुत्र या नावाचे गढे पुत्त असे रूपांतर होते इथली प्रख्यात गायिका ही संस्कृत मालती पण इंडोनेशियन मालोती झालेली आहे.

ज्या वेळी मी जकार्ता सोडून बालीमध्ये गेलो त्या वेळी मात्र खरोखरी रामायणाच्या घरात गेल्यासारखे वाटले इंडोनेशियात आल्यानंतर तिथल्या ज्या राजकीय नेत्याशी परिचय झाला त्यामधील इंडोनेशियाचे त्या वेळचे परराष्ट्रमंत्री अलताश, समाजकल्याणमंत्री कुसुमात्मजो आणि लष्करातील निवृत्त जनरल नासुतियान अशी अनेक माणसे होती इंडोनेशियाचे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश ओमर सेनो आदजी हेहि चांगले मित्र झाले मी संपादित केलेल्या एका इंग्रजी पुस्तकात त्यांनी इंडोनेशियन न्यायपद्धतीवर एक लेखहि दिला होता या गृहस्थाची गमत अशी की त्यांचे लेखन चांगल्या विचारांनी भरलेले पण भाषा भारी क्लिष्ट. याबद्दल बोलताना ते म्हणाले की, मी डच भाषेत विचार करतो, मग त्याचे इंडोनेशियन भाषेत भाषांतर करतो आणि मग ते इंग्रजीत मांडतो अर्थात तीन भाषा मिळून झालेला हा गोंधळ सावरताना दोघां संपादकांची पार तिरपीट उडाली होती इंडोनेशियावर डचांचे आधिराज्य फार वर्षे होते, त्यामुळे इथे डच संस्कृतीचा पगडा फार मोठा आहे. परिणामी आजही लक्षावधी इंडोनेशियन माणसे डच नागरिक म्हणून हॉलंडमध्ये स्थिर झालेले आहेत इंडोनेशियन भाषेचे नाव 'भासा इंडोनेशिया' असे आहे येथील संस्कृति अत्यंत पुरातन आहे बेटावर राहिल्यामुळे जो आपोआप अलिप्तपणा येतो त्यामुळे असेल कदाचित, पण बहुतांशी मूळ स्वरूपातच ही 'संस्कृति इथे पहायला मिळते. राम हा आपला राजा आहे देव आहे आणि रामायण इथेच इंडोनेशियात घडले अशी थाय लोकांप्रमाणे इंडोनेशियन लोकांचीहि पूर्ण खात्री आहे

**थोडा इतिहास**

विशेषत: जावा आणि सुमात्रा या भागात बौद्ध आणि हिंदू संस्कृती एकेकाळी फार भरभराटीला आली पण चौदाव्या शतकापासून इथे इस्लामी संस्कृती रुजू लागली. १५००च्या सुमाराला पोर्तुगीज लोक सुगंधी मसाला आणि भारत नावाच्या सुवर्णभूमीच्या शोधात इथे आले मलाक्काच्या किनाऱ्यावर पोचल्यावर त्यांना वाटले, आपण भारतातच आलो तेथे त्यांनी अनेक किल्ले बांधले त्यानंतर १६००च्या सुमारास डच लोकांनी येऊन पोर्तुगीजांचा पराभव केला आणि स्वत राज्य करायला सुरुवात केली., डच राज्यकर्त्यांनी इंडोनेशियाचे आर्थिक शोषण भरपूर केले पण त्यांना इंडोनेशियन संस्कृतीवर आपला पाश्चात्य प्रभाव पाडता आला नाही डच लोकांनी प्रथम उसासारखी नगदी पिके

घ्यायला सुरुवात केली १९४२ साली जपानी सैन्यानी आक्रमण करून डच लोकाना हाकलून दिले. या जपानी सैनिकांच्या मदतीने इडोनेशियन लोकानी उठाव करून इंडोनेशिया हे १७ ऑगस्ट १९४५ ला स्वतत्र झाल्याचे जाहीर केले इडोनेशियाच्या स्वातत्र्यलढ्याशी भारताचा खूप जवळचा सबध होता पडित नेहरू या सघर्षाच्या मागे उभे होते. त्याचे आणि सुकार्नो याचे स्नेहसबध होते इतकेच नाही तर तिथले काही नेते परकीयाच्या हाती सापडू नयेत म्हणून आसामचे पटनाईक यानी आपल्या विमानातून त्यांना इडोनेशियातून बाहेर आणले होते स्वातत्र्यप्राप्तीनतर जनरल सुकार्नो हे पहिले राष्ट्रपती झाले. १९५० साली सपूर्ण स्वातत्र्य मिळेपर्यंत त्याना डच राज्यकर्त्यांबरोबर खूपच झगडावे लागले सुकार्नो याचे देशातील कम्युनिस्ट आणि चीन याच्याबरोबरचे स्वार्थी सबध, त्याचा मलेशियाशी सघर्ष आणि त्याचे भ्रष्ट प्रशासन याला कटाळून लोकानी राज्यक्रांती घडवून आणली आणि १९६६ साली जनरल सुहार्तो यानी सूत्रे हाती घेतली. १९६८ साली सुहार्तो हे राष्ट्रपती झाले त्याची राजवट अजूनही चालू आहे सुरुवातीपासूनच डचाच्या ताब्यात असलेले सर्व देश इडोनेशियात समाविष्ट करण्याचा बेत इंडोनेशियन सरकारने केला प्रथम पश्चिम न्यू गिनी नंतर १९६३ साली इरियन जावा, १९७६ साली तिमोर बेटांचा प्रदेश इडोनेशियात सामील करण्यात आला आशियामधल्या समर्थ आणि महत्त्वाकाक्षी देशात चीन आणि भारताच्या बरोबरीने इंडोनेशियाचे नाव घ्यावे लागते आसियन राष्ट्र सघटनेत आणि अलिप्ततावादी गटनिरपेक्ष चळवळीवर इडोनेशियाने आपली छाप ठेवली आहे

इडोनेशियाच्या राजकारणाला १९८९ पासून वेगळे वळण लागले आहे सुहार्तो यांची अध्यक्षपदी निवड १९८८ साली झाली ती पाच वर्षांकरिता पण १९८९ साली सुहार्तो किती दिवस अध्यक्ष राहणार असे प्रश्न जाहीरपणाने विचारले जाऊ लागले इडोनेशियाच्या राज्यपद्धतीत बदल व्हायला हवा आणि हा बदल फक्त तरुण नेतृत्वच आणू शकेल अशी हाकाटी सुरू झाली लष्कराचा पाठिंबा असलेला 'गोल्कर' पक्ष ताब्यात घेण्यासाठी लष्कराने प्रयत्न केला आणि पूर्वीचे उपाध्यक्ष सुधर्मनो यांचा पक्षात पराभव झाला त्यामुळे ते उपाध्यक्ष राहिले तरी त्यांचे राजकीय महत्त्व खूपच कमी झाले सत्ताबदल हवा असे मागणाऱ्याना उद्देशून सुहार्तो म्हणाले, "कोण अध्यक्ष होणार हे लोकसभेने - पीपल्स कन्सल्टेटिव्ह असेंब्लीने - ठरवायचे आहे. मी किती काळ अध्यक्ष रहावे हे घटनेत सांगितलेले नाही" परतु तळागळाच्या लोकाचे प्रश्न घेऊन आता विद्यार्थ्यांनी व स्वयसेवी सघटनांनी चळवळ उभारलेली आहे सुहार्तो यांची मुदत संपायला आणखी तीन वर्षे आहेत परतु बदलाची मागणी आतल्या आत धुमसते आहे सुहार्तोना भारताचा आणि रशियाचा अतरावरून पाठिंबा आहे झपाट्याने सुधारत जाणारी अर्थव्यवस्था, असियान राजकारणात वर्चस्व आणि वेगाने वाढणारे लष्करी समर्थ्य हा आजच्या इडोनेशियाचा विशेष आहे

## देवभूमि

पण या सगळ्यापेक्षा माझ्या मनावर जो ठसा उमटला आहे तो या देशाच्या समृद्ध

संस्कृतीचा, हिरव्यागार वनराईचा आणि इथल्या माणसाचा  इथली माणसे खूप रसिक, परंपरा जतन करणारी, खाण्या-पिण्यात आणि नाच-गाण्यात स्वत:ला झोकून देणारी आहेत  इथे इतकी देवळे आहेत, इतकी शिल्पे आहेत आणि इतक्या मूर्ती आहेत की मी माझ्या इंडोनेशियन मित्राला म्हणालो, "याला देवळांचा देश म्हटले पाहिजे " तो मित्र म्हणाला, "तुम्ही चुकता याला आम्ही देवभूमि म्हणतो आणि या देवभूमीचा आम्हाला खूप अभिमान आहे "

या देवभूमीत सुद्धा स्वर्गात आणखी विशेष स्वर्ग असावा तसा बालि प्रदेश आहे एक दंतकथा अशी आहे की, इंडोनेशियात एक राजा आपल्या मुलावर रागवला  त्याने आपल्या मुलाला पार दक्षिणेकडे एका बेटावर नेले आणि सांगितले की पुन्हा माझ्या राज्यात येऊ नको  तो मुलगा क्षितिजापाशी दिसेनासा झाला तेव्हा त्या राजाने तिथेच पृथ्वीवर एक रेघ ओढली आणि बेटाचे दोन भाग केले  याच ठिकाणी हिंदी महासागर आणि जावाचा समुद्र यांच्या तीर्थस्थानी एक नवीन बेट निर्माण झाले  पूर्वी जावा आणि बाली ही दोन्ही बेटे एकमेकाना जोडलेली होती  ती वेगळी होऊन बालीचा स्वतंत्र देश झाला  बालीमध्ये खरे म्हणाल तर ऋतु दोनच. पावसाळा आणि किंचितसा हिवाळा  बालीचे वैशिष्ट्य असे आहे की, इथले निसर्ग सौंदर्य नष्ट न करता माणसानी या ठिकाणी देवळे, घरे बांधलेली आहेत  त्यामुळे बालीमधली माणसाची घरे, देवाची देवळे भोवतालच्या निसर्गाशी अगदी एकरूप होऊन गेलेली आहेत  इथली सगळी शेती ही डोंगरावर वेगवेगळ्या पातळीवर पायऱ्या पायऱ्या करून केलेली आहे. त्यामुळे लांबून, डोंगर हिरव्यागार किनारी लावलेल्या घागरीसारखा दिसतो  या भागाला ऊलाऊ देवता किंवा प्रकाशाचे बेट असे म्हणतात  खरे म्हणजे इथे माणसे राहतात हे चटकन लक्षातच येत नाही  झाडाझुडपात घरे लपलेली असतात. कमरेला लुंगीसारखा पेहराव आणि वर काही नाही अशा युवतींचा घोळका डोक्यावर गवताचे भारे घेऊन तालबद्ध चालत आला म्हणजेच जवळपास खेडे आहे, असे समजावयाचे  अशी गोष्ट सांगतात की, अशा युवतींचा एक अमेरिकन पर्यटक फटाफट फोटो घेऊ लागला तेव्हा त्या सगळ्या मुली झऱ्यासारख्या खळखळत हसत म्हणाल्या, "वेडपट माणसे आहेत  यांच्या देशात यानी कधी गवताचे भारे पाहिलेलेच दिसत नाहीत "

क्वचित प्रसंगी लांबवरून आपल्याकडे दक्षिणेकडे घुमट नावाचे वाद्य आहे. तशा सारख्या वाद्यांची थाप ऐकू येते  पाठोपाठ कोणीतरी पाव्यावर न कळणारी धून वाजवतो आणि मग घुंगरांचा आवाज येऊन कुठेतरी लोकनृत्य किंवा देवपूजा चालू होत आहे हे जाणवते  पण एरवी मनावर ठसा आहे तो डोंगर आणि झाडे यांचाच  पंडित जवाहरलाल नेहरू येथे आले तेव्हा त्यानी या प्रदेशाला 'जगाचा उष:काल' असे नाव दिले  बालीचा हा सर्व प्रदेश ज्वालामुखी पर्वताचा प्रदेश आहे  कदाचित यामुळेच असेल पण इथली जमीन इतकी सुपीक आहे की, खरोखर फिरायला जायची काठी जमिनीत टेकून उभे राहिले तर थोड्या वेळाने काठीला सुद्धा फुले फुलतील असे गमतीने म्हणतात  बालीचे लोक डोंगरानाच देवता मानतात  असे म्हणतात की पूर्वी हा प्रदेश सपाट होता  परंतु जावामधून

ज्या हिंदु देवदेवता इथे आल्या त्यानी आपल्यासाठी ही उचउच घरे किंवा देवगृहे तयार केली यापैकी सगळ्यात उच ज्वालामुखी आहे त्याला 'गुणगअगुग' असे म्हणतात याचा अर्थ पृथ्वीची नाभी पर्वतावर ज्वालामुखीचा जो खड्डा आहे तो खरोखर बेंबीसारखा आहे. या पर्वताला महादेवाचे वसतिस्थान मानले जाते त्यासाठी इथे एक सुंदर मदिरही बाधण्यात आलेले आहे. त्या भागात "एकादशरुद्र" नावाचा उत्सव दर शभर वर्षांनी एकदा केला जातो बोलून चालून भैरव नाथाचा उत्सव आणि या उत्सवाची तयारी सुरू असताना भगवताने खरोखरच रुद्र रूप धारण करावयाचे ठरविले त्या ज्वालामुखीच्या पोटात गडगडाट होऊ लागला तिथल्या उपाध्यायाने सांगितले की, हा ईश्वरी प्रसाद आहे. परंतु ८ मार्च १९६३ला त्या ज्वालामुखीचा एवढा भयानक उद्रेक झाला की ते वैशाखी मदिर आणि बेटाचा जवळजवळ एक पचमाश भाग आणि त्याच्याबरोबर १५०० लोक गाडले गेले. साऱ्या बालीवर राखेचा पाऊस पडला असे सागतात २५० किलोमीटरवर असलेल्या सूरबाया बेटावर सपूर्ण अंधार पडला त्याच्यापूर्वी असा उद्रेक १९१७ साली झाला होता. मला वाटते की, कायम मरणाच्या रुद्र छायेत राहणारी ही माणसे खरोखरच जीवनोन्मुख होत असतात असलेला प्रत्येक क्षण आनदाने जगावयाचा मला आमचे मित्र मगेश पाडगावकर यांची एक कविता आठवते, "फुलून येता फूल बोलले मी मरणावर हृदय तोलले, नव्हते नतर, परि निरतर, गंधित झाली माती" त्याप्रमाणे कायम मरणावर आयुष्य तोलणाऱ्या ह्या माणसाना जीवनातला आनद कसा घ्यावा याची कला जन्मतःच अवगत झाल्यासारखी दिसते आणि त्यामुळेच बालीला एकदा जाऊन आल्यावर त्या गधमयी मातीचा दरवळ आपल्या स्मृतीला कायमचा लागतो

इथे खूप मोठी सरोवरे आहेत सागाचे खूप उच उंच वृक्ष आहेत. सोनेरी पिवळ्या रगाचे बाबू आहेत त्याच बाबूची घरे करावयाची, त्याच बाबूचा पावा करावयाचा आणि जुन्या पोथ्यांना वेष्टनेही बांबूचीच करावयाची इथे नारळ खूप आहे आणि खोबरे हा निर्यातीचा मोठा भाग आहे याशिवाय इथे हजारो तऱ्हेची फुले फुलतात शिरीषासारखी मोठी पाढरी फुले हे तर बालीचे वैभव आहे. ही फुले मुद्दाम वेचून शकराला अर्पण केली जातात या ठिकाणी पवित्र मानली गेलेली माकडे खूप आहेत. क्वचित एखाद दुसरा वाघहि असेल मला असे वाटते की, बाली हा असा एकच देश आहे की ह्या ठिकाणी घरे बाधताना समुद्राकडे पाठ फिरवून आणि डोंगराकडे तोंड करून घरे बाधली जातात बालीमधल्या लोकांची एक कल्पना अशी आहे की, डोंगरात देव-देवता राहतात आणि मृतात्मे हे समुद्रात राहतात, त्यामुळे मृतात्मे, भूत-पिशाच्च यांपासून त्रास होऊ नये म्हणून किनाऱ्याकडे घराची पाठ करायची आणि समुद्रकिनाऱ्यावर जागोजागी वरुण देवाची मदिरे बांधायची बालीचे बहुतेक सर्व ठिकाणचे किनारे फार देखणे आहेत परतु सर्वच ठिकाणी पोहणे शक्य नाही. कारण धारदार प्रवाह, प्रवाळांची बेटे आणि तिथे असणारे शार्क मासे यामुळे इथे तरी पोहणे अवघड वाटे. या भागाला देवभूमि असे जरी हे लोक मानत असले तरी इथे मनुष्यवस्ती फार पूर्वीपासून असावी इथल्या लोकभाषेत उपलब्ध असणाऱ्या दतकथा लक्षात घेतल्या तर इथल्या भारतीय सस्कृतीच्या प्रभावाची पूर्ण जाणीव होते

इथली नावे, इथली गाणी, इथले नृत्यप्रकार, इथले शिल्प या साऱ्यावर भारतीय संस्कार आहेत. वराहाचे मस्तक असणाऱ्या एका राजाची कथा सांगितली जाते. या ठिकाणी देवळादेवळातून जी शिल्पे आहेत. त्यामध्ये रामायणातल्या वेगवेगळ्या कथा कोरलेल्या आहेत याशिवाय वराह अवतार किंवा वायूपुत्र हनुमान याचीहि अनेक शिल्पे आहेत मी त्याना काळाच्या पलीकडील शिल्पे म्हणतो इथेच प्रथम मी मूर्तींना आधुनिक पद्धतीचे कपडे नेसविलेले पाहिले आपल्याकडे देवदेवताना पूजेच्या वेळी वस्त्र देण्याची पद्धत आहे. परंतु इथे मात्र देवाला मॉडर्न कपडे घालायची पद्धत आढळली देवाला जो नैवेद्य दाखवायचा तो सुद्धा इतक्या सुंदरतेने मिरवत नेला जातो की ही मिरवणूक बघत रहावेसे वाटते. बांबूच्या फार नाजूक विणलेल्या टोपल्या त्यावर अर्धे कापलेले बांबू उभे करून फळे आणि फुले याची एखाद्या किरीटासारखी रचना केली जाते आणि त्यावर सर्वांत लाल, निळी, पांढरी फुले पिसाऱ्यासारखी बांधलेली असतात इथे सौंदर्य हे निसर्गदत्त आहे, असे वाटते पुरुषाना सुद्धा हे सौंदर्याचे वरदान आहे, असे वाटते गोलसर चेहरा, लांबलचक भुवया आणि चमकणारे डोळे हे बालीमधल्या नृत्यांगनाचे वैशिष्ट्य आहे कपड्यावर नक्षीकाम करून ज्याला 'नाटिक' चित्रकला म्हणता येईल अशा तऱ्हेने रंगविलेली वस्त्रे म्हणजे स्त्रियाचे 'केन' आणि पुरुषांचे 'सरांग' रोजच्या वापरात सुद्धा या लोकाना रंगीबेरंगी वस्त्रे वापरण्याची हौस समारंभाच्या वेळी जरीकाम केलेली वस्त्रे वापरतात. कुंकू वेगवेगळ्या रंगात, आकारात लावतात आणि केसात भरघोस फुले घातल्याशिवाय स्त्रिया बाहेर पडत नाहीत. केसांचा उंच आंबाडा घालून त्यात आकड्याऐवजी क्रीस नावाचा एक जंबियासारखा आकडा घातला जातो अलीकडे स्त्रिया सिल्कचा ब्लाऊज व पुरुष रंगीत बुशशर्ट घालू लागलेले आहेत

हिंदूच्याबरोबर इथे जाती संस्था आलेली होती परंतु आता इथे जातीभेद आणि धर्मभेद उरलेले नाहीत. गावामध्ये उत्सव देवाचा असो किंवा पतंग उडविण्याचा असो, शेत नांगरण्याचा असो किंवा अन्त्यविधीचा असो प्रत्येक समारंभात नटणे, सजणे, वाजंत्री मिरवणुका, फुले हे असणारच इथल्या खेड्यातून कोंबड्या झुंजवणे हा एक आवडीचा खेळ आहे प्रत्येक खेड्यामध्ये वडाच्या झाडाखाली बसून गप्पा मारण्याची पद्धत आपल्यासारखी आहे इथे तेंगानग नावाच्या उत्सवात एक खेळ खेळला जातो एका हातात ढाल आणि दुसऱ्या हातात एखाद्या झाडाचा काटेरी फणा प्रतिदक्षाचा पाठलाग करून त्याची पाठ त्या नागफणीने ओरबाडायची असा हा खेळ आहे याशिवाय उत्सवामध्ये बैलाच्या शर्यतीही लावल्या जातात इथल्या दैनंदिन जीवनात धर्माला फार महत्त्वाचे स्थान आहे. इथे प्रचंड देवळे आणि शिल्पे असल्यामुळे दगडावर, लाकडावर बारीक बारीक कलाकुसर करणारे कलाकार, भिंतीवर रंगकाम करणारे चित्रकार, देवळासमोर नृत्य करणाऱ्या नृत्यांगना, देवळाच्या सभामंडपात वेगवेगळी वाद्ये वाजविणारे कलाकार, छायानृत्यकार असे अनेक कलाकार प्रत्येक खेड्यात असतात कापड विणताना सुद्धा त्यावर नक्षीकाम करून एखादी रामकथा दाखवायची किंवा रामाय॰ नृत्य-नाट्य करावयाचे याचीही आवड सर्वांना आहे बोलताना इथला माणूस

फ्रेंच माणसाप्रमाणे हातवारे, मुद्राभिनय खूप करतो. तोंडाने शब्द बोलण्याआधीच आपल्या आविर्भावातून तो पुष्कळसे सांगून जातो ज्ञानेश्वरानी म्हटल्याप्रमाणे "शब्द पाठी अवतरे कृपा आधी" त्याप्रमाणे "शब्द पाठी अवतरे कथा आधी" अशी इथल्या सवादाची, नाटकाची स्थिति आहे शकराला इथे महादेव आणि त्रिशक्ति आणि बाली भाषेमध्ये "इदासांग ह्याग विदीवश" असे म्हणतात बालीमध्ये परमेश्वराचे अस्तित्व साऱ्या जीवनाला व्यापून राहिलेले असल्यामुळे इथली देवळे हाही इथल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मात्र इथल्या नैवेद्यात देवाला भाताबरोबर सर्व तऱ्हेचे मास देतात ईश्वरी कृपा म्हणून विस्तवावरून चालून जाण्याचे प्रकार इथे होतात. रामायणातल्या वानराच्या नृत्यप्रकाराचे केचक म्हणून वर्णन केले जाते, तो नृत्यप्रकार एकदा पाहिल्यावर पुन्हा विसरणे अशक्य आहे. सध्याकाळी परमेश्वराला नैवेद्य दाखविल्यावर देवळाच्या सभागृहाभोवती मशाली लावल्या जातात अगणाच्या मध्यभागी एक प्रचड मेणबत्त्याची एक महाकाय दीममाळ असते भोवती किर्र शातता असते आणि एकाएकी शभरएक माणसे रंगभूमीवर म्हणजे मधल्या अगणात तोंडाने चक् चक् चक् आवाज करीत धावत येतात काळा आणि पाढरा सराग घातलेले, कपाळावर पांढरे ठिपके रंगविलेल्या अशा थाटात ही वानरसेना येते त्याच्या कानावर पांढरी फुले खोचलेली असतात ते ह्या दिव्याभोवती फेर धरतात. नाचत नाचत फेराचे वर्तुळ बारीक करावयाचे आणि पुन्हा फेर मोठा करून विस्तारायचे असे हे दृश्य पाहात असताना एखादा प्रचड शिंपला उघडावा आणि मिटावा असे आपल्याला वाटू लागते आणि चक् चक् आवाजाचा नाद केचक असा होऊ लागतो. कुठलेही वाद्यसगीत नसलेला हा एक नादब्रह्माचा सोहळा आहे एकसारख्या येणाऱ्या या आवाजाची एक धुदी आहे आणि ही धुंदी वाढत आपण भोवतालचे देऊळ, मशाली सगळे विसरून जातो आणि कैदेत रामाचा धावा करणारी सीतामाई, हनुमंताने केलेली तिची सोडवणूक, राम-रावणाचे युद्ध सारेच खरे वाटू लागते मग ते देवळात असो किंवा छायानाट्यात असो

इडोनेशियातले काम संपले भारताकडे झेप घेताना मनात उठले त्या सुंदर फुलानी भरलेल्या हिरव्यागार प्रदेशाचे सौंदर्य आणि कानात लालकुडल घालावे तसे हिंद महासागरात दिसणाऱ्या त्या हिरव्या कंच पाचूचे सागरलहरींवर डोलणारे एक कुडल

जोगनकार्ताला राहणारी सगळी माणसे ही तेथील पर्वतराज मेरापी नावाच्या महाकाय ज्वालामुखीच्या छायेतच रहात असतात सकाळी धुक्यातून दिसणारे पूर्ण कोनाचे टोक असणारे शिखर पहाताना लोकांच्या मनात भीतीपेक्षा आदराचीच भावना जास्त असते हे शिखर ९ हजार फूट उच आहे. इडोनेशियात १२८ ज्वालामुखी आहेत, पण 'मेरापी' हा सर्वांत चंचल, अस्थिर स्वभावाचा ज्वालामुखी आहे, इतकेच नाही जगातील सर्व ज्वालामुखीत तो सर्वात जास्त भीतिदायक आहे पण इथल्या लोकाच्या दृष्टीने भीति वाटली तरी तो आजोबाच्या सारखा प्रेमळ आहे. त्याला पितामह मानले जाते या प्रदेशाची समृद्धी मेरापीच्या कृपेवर अवलबून आहे ज्वालामुखीतील सकस राखेमुळे सारा सुपीक झाला आहे कितीही पिके घ्या, कोणतेही पीक घ्या, भरपूर उत्पन्न येणार. पण या पितामह

पर्वताच्या रागाला बळी पडले नाही असे एकही कुटुंब नाही. केव्हा ना केव्हा तरी या उद्रेकात घरातील कोणीतरी बळी गेलेलेच असते. यामुळे या पितामहाचे प्रेम आणि भय एकसाथ वाटत असते.

मेरापीच्या तोंडातून धुराची वलये कायम निघत असतात. पण स्फोट होण्यापूर्वी तापलेली मऊ राख टनावारी बाहेर फेकली जाते. सूर्य झाकला जातो. पृथ्वी वेडीवाकडी डळमळायला लागते आणि तापलेल्या लाव्हा रसाचा उद्रेक मरणाचे बो लावणे घेऊन येतो. माणसे सैरावैरा पळतात. देवाचा धावा करतात. उद्रेक प्रचंड असेल तर मेराकीच्या मुखातून प्रचंड मोठ्या दगडांचा वर्षाव होतो. लाव्हा रसाच्याबरोबर ज्वालाच्या जिभल्या लवलवतात आणि त्या तप्त रसाच्या प्रवाहात, वाटेत जे सोडेल ते, घरेदारे शेतीवाडी, माणसे राख होऊन जातात. खाली उरते ते राखेने भरलेले तांडवानतरचे स्मशान आणि तापलेल्या डागाच्या आठवणी. मेरापीपासून चाळीस किलोमीटरच्या अंतरावर 'बोरबदूर' हे प्रचंड मंदिर आहे. जगातले आठवे आश्चर्य असा लौकिक असणारे हे मंदिर सहाव्या शतकात बांधले गेले आणि बाराव्या शतकात ती सारी वस्ती ओसाड झाली. हे का घडले भगवान रुद्राला माहिती. पण इतके बारीक शिल्पकाम आणि इतक्या मूर्ति एकत्र असणारे हे अलौकिक पाषाण–काव्य आहे.

अलीकडेच "मेरापी उद्रेक" प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली आहे. या प्रकल्पात मेरापी पर्वताला माणसाळवण्याचा प्रयत्न नाही, तर या उद्रेकाच्या छायेत राहणाऱ्या लोकांच्या संरक्षणाचा, पुनर्वसनाचा आणि मेरापीच्या ज्वलत प्रसादातून शेती उत्पादन वाढवण्याचा हा प्रकल्प आहे. या पर्वताबरोबर या लोकांचे असणारे प्रेम आणि भीति, आदर आणि राग – याच्या संबंधाचे विश्लेषण करणे अशक्य आहे. इथे राहणाऱ्या लोकांच्या जीवनाचा तो अतूट भाग आहे. बाहेरच्यांना ते उमगायचे नाही. माझा मित्र गरुडपुत्र कामयाना म्हणणारा "आमच्या पूर्वजाच्या दृष्टीने या ज्वालामुखीच्या रुपाने आमच्यापुढे स्वर्ग आणि संहारक नरक याचे दर्शन घडते. मानवी जीवनाबद्दल हा ज्वालामुखी पुष्कळ सांगून जातो. आपल्याला जे ऐकायला आवडत नाही ते सुद्धा तो सांगतो. मानवी जीवनाच्या प्रकाशमय आणि अंधकारमय रुपाचे दर्शन घडवणारा तो ईश्वरी आरसा आहे." याचा नीटसा अर्थ मला त्या वेळी कळला नाही, पण ईश्वरी आरशाचे कवडसे अचानक केव्हा तरी मनात पडत राहतात हे मात्र खरे.

(केसरी)

❀ ❀ ❀

# ८

## सुगंधी बंदराचे भवितव्य

# हाँगकाँग

हाँगकाँगला किती वेळा गेलो, गणती नाही पूर्वेकडे जाताना, येताना थांबावे लागे हाँगकाँग हे एक जगावेगळे शहर आहे. विमानातून उतरताना, ठिपक्यासारखी अनेक बेटे दिसू लागतात. जवळ आल्यावर डोंगराच्या उतरणीवर २०पासून ७० मजल्यापर्यंतच्या उंच चिंचोळ्या इमारती दाटीदाटीने उभ्या राहिलेल्या दिसतात. प्रत्यक्ष विमान उतरताना, दोन बाजूला समुद्र असणाऱ्या बारीक पट्टीवर विमान टेकते 'काय टाक' विमानतळावरचे चिनी अधिकारी बारीक डोळ्यातून आपल्याकडे संशयाने पहात आहेत का प्रेमाने पहात आहेत हे कळत नाही पण मनावर ठसा उमटतो तो त्यांच्या 'एफिशियन्सी'चा कार्यकुशलतेचा आणि त्यांच्या खास इंग्रजी उच्चाराचा विमानतळातून बाहेर पडलो की एकदम माणसाचा महासागर अंगावर लोटतो आहे, इतकी गर्दी दिसते सगळ्या चिनी चेहऱ्यात मधेच एखादा सरदाजीचा चेहरा दिसतो, तर मधेच थेट दाक्षिणात्य साडी झळकते या गर्दीतच हाँगकाँगच्या गरम हवेची पर्वा न करता पिनस्ट्रीपचा निळा सूट, बॉऊलर हॅट आणि छत्री घेतलेला इंग्रज नोकरशहा, आपण जणू या गावचेच नाही अशी मुद्रा करून चालत असतो यातच अनेक अमेरिकन म्हातारे आणि म्हाताऱ्या, खांद्यावर कॅमेरे, दुर्बिणी, पिशव्या सभाळत, खळखळा हसत, काय घ्यावे, न काय घ्यावे अशा संभ्रमात चालताना दिसतात. अर्ध्याविजारीवर उघडे असे ऑस्ट्रेलियन, हाताखांद्यावर गोंदलेली शृंगारिक चित्रे मिरवणारे ब्रिटिश वा रशियन नौसैनिक सापडतात मधेच "अय्या, मला कल्पनाच नव्हती पण क्लबमधल्या उघड्यावाघड्या 'बनी' मुलींच्याकडे किती टक लावून तुम्ही पहात होता?" हे थेट मराठी ऐकून मान वळवली तर खास पुणेरी दांपत्य दिसते. नवऱ्याला जिवाचे हाँगकाँग करायचे असते तर बायकोला ही विदेशी तुळशीबाग, लक्ष्मी रोडची बाजारपेठ खुणावत असते. रस्त्याला लागलो की सायंकाळी प्रचंड रंगीबेरंगी 'निऑन साइन्स'च्या जाहिराती, गॅलरीतून बाहेर काठ्यावर कपडे वाळत

घातलेले आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला अखंड वाहत राहाणारा माणसाचा प्रवाह दिसतो. इतकी माणसे कोठून येतात, कोठे जातात सागणे कठीण. पण कायम धावपळ करीत राहणारा हा जनप्रवाह आहे. भोवतालच्या दुकानात काही मिळत नाही असे नाही भरगच्च भरलेल्या दुकानातून कपडे, कलाकुसरीच्या वस्तु आणि त्यापेक्षाही सौंदर्यप्रसाधनांच्या बरोबरीने इलेक्ट्रॉनिक वस्तु – टी व्ही , कॅमेरे, टेपरेकॉर्डर मांडलेले दिसतात बाजार ओतप्रोत भरून वाहतो आहे मला आठवते, मी प्रथम आलो त्या वेळी माझे मित्र आमदार वाय एफ हुई यांना मी विचारले, "इथे चागली घड्याळे कुठे मिळतील?" त्याने दोन्ही हात उचावले. म्हणाला, कुठेही फक्त घासाघीस करायची तयारी पाहिजे. या दुकानातून हत्तीपासून टाचणीपर्यंत काहीही मिळेल फक्त हत्ती खरा आहे हे पारखून घ्यावे लागेल कारण इथे फसले जाण्याचाही सभव असतो मोठ्या उत्तम दुकानात मालाची खात्री. पण किमतीच्या बाबतीत घासाघीस करता येत नाही हॉंगकॉंग हा कायम उघडा बाजार आहे

दिवसा दिसणारे हॉंगकॉंग आणि रात्रीचे हॉंगकॉंग अगदी वेगवेगळी रूपे आहेत. रात्र पडू लागली की माणसाच्या झुडीच्या झुंडी बाहेर पडतात – जेवणासाठी आणि त्यानतर करमणुकीसाठी या शहरात जगातल्या सर्व पद्धतीचे जेवण मिळते चिनी तर इथलेच पण चीनमधल्या प्रत्येक राज्याचे जेवण वेगळे आहे शिवाय जपानी, व्हिएटनामी, फ्रेंच, जर्मन, भारतीय, मागाल त्या पद्धतीचे रेस्तरॉं उपलब्ध आहे आमचा मित्र 'वाय. एफ.' हा खरा खवय्या. स्वत· उत्तम जेवण बनवू शकतो. रसिकपणाने कसे जेवावे हे त्याच्याकडून शिकावे पानात मासा पडला की इतक्या कुशलतेने त्यातल्या हाडाची जाळी बाजूला काढतो की कैक वेळा मनात येते की हा मासा जिवत असता तरीही त्याला कळले नसते. गाण्यात जसे द्रुत आणि बिलपत तसे खाण्यातही आहे. चिनी जेवण बिलपत सावकाश चवीचवीने दहा–अकरा कोर्सेसचे जेवण तीन–चार तास चालते. तादुळाच्या वाईनचे छोटे ग्लास एकमेकांना दाखवून म्हणायचे "काम्पे" म्हणजे ग्लास पिवून, सपल्याचे पालथा करून दाखवायचे. प्रत्येक मित्राबरोबर आणि प्रत्येक कोर्सबरोबर "काम्पे" म्हणजे अवघड प्रकार आहे. एका चिनी उपहारगृहात एका कुशल बल्लवाने, नूडल्स् किंवा शेवया कशा करतात याचा प्रयोग दाखवला. पीठ मळून त्याच्या गोळ्यापासून, नर्तकासारखी बोटे आणि चॉपस्टिक्सच्या सहाय्याने त्याने त्यातून मजसूत शेवया केल्या. एका काठीवर लटकावून दाराला पूर्वी मणिपुक्रण्यांचा पडदा करत तसा पडदा तयार केला त्याच्या हातात आणि बोटात कुशल नर्तकाचे कौशल्य होते चॉपस्टिक्सने जेवायला मी इथेच शिकलो. इथल्या स्वयपाकाला कच्च्या मालाचे बंधन नाही. मासे, कोंबडी, बकरा, झालेच पण 'वाय. एफ.'ने चिमण्या कासव, पाणसाप, बदक, बांबूची नाजूक फुले, अस्परगस या सर्वांची बेरीज वजाबाकी सांगितली जे जे चालते, उडते वा पोहोते ते सर्व खायला हरकत नाही हे त्यांचे सूत्र आहे. प्रत्येक कोर्सनतर चिनी चहा प्यायचा म्हणजे पहिली चव निघून

जाते. समुद्रात तरंगणारे 'जम्बो' नांवाचे विश्रांतिगृह आहे किंवा 'टायफून शेल्टर' नावाच्या भागात छोट्या 'जंक' नावाच्या शीडाच्या बोटीत जायचे. मग आपल्या भोवती छोट्या छोट्या नावा येऊन खाद्यपदार्थ विकतात. ते घ्यायचे. कशाचे आहे विचारायचे नाही. चांगले लागते ना? एवढाच प्रश्न विचारायचा चीनच्या सरहद्दीवर फिशिंग व्हिलेजमध्ये गेलो तर पाण्याच्या टाक्यात जिवंत मासे ठेवलेले असतात त्यातून आपल्याला आवडणारा 'गरुपा', 'पॅरटफिश' निवडायचा. तो शिजवून टेबलावर आणला जातो फारच सोफिस्टिकेटेड जेवण असले तर गावाबाहेर कंट्रीक्लबमध्ये जायचे मनसोक्त पोहायचे. मग जेवायचे भाषणे वगैरे असतील तर टर्फ क्लब आणि रसिक मित्र असतील तर वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या हेल्थ क्लबमध्ये जायचे मालिश करवून घ्यायचे, सावना घ्यायचा मग जेवण. चिनी करमणुकीमधे चिनी पारंपरिक ऑपेरा हॉंगकॉंगमधे प्रसिद्ध नाही इथे पाश्चात्य रॉक अँड रोल, शेक आणि जर्क, ट्विस्ट असे नृत्यप्रकार आणि रंजक करमणुकीमधे जादू आणि कसरतीचे प्रयोग हे फार लोकप्रिय आहेत. हॉंगकॉंगचा चेहरामोहरा असा विविधरंगी जत्रेसारखा आहे.

हॉंगकॉंग आणि कावलून या बेटांना जोडणारा एक प्रचंड बोगदा आहे. शिवाय 'मास ट्रँझिट' नावाची भुयारी गाडी आहे शिवाय दर पाचदहा मिनिटांनी बोट 'स्टार फेरी' आहेच. हॉंगकॉंगमध्ये इतकी दुकाने आणि बाजारपेठा आहेत की हे दुकानदार कुठे राहात असतील असा प्रश्न पडावा. दुतर्फा दुकानांच्या रांगाच रांगा आहेत. जुन्या हॉंगकॉंगमधे मात्र लांबवर बांधलेली, श्रीमंतांची डोंगरावरची घरे आहेत सामान्य माणसे गर्दीगर्दीने उंच इमारतीत एक खोली, दोन खोल्या भाड्याने घेऊन राहतात. हॉंगकॉंगजवळ स्वतःचे असे काही नाही पाणी चीनमधून आणावे लागते दूध, भाजीपाला आयात करावा लागतो इथे आहे फक्त एकच प्रचंड कल्पकता आणि प्रचंड उद्योजकता इथे ठायी ठायी नाणेबाजार आहे कोणत्याही देशाचे चलन असो इथे घेतले जाते बदलले जाते भले दर काहीही असो 'मनि एक्स्चेंज' अशा पाट्या दर चार दुकानामागे एकावर असते दुकानात, हॉटेलात कोणतेही चलन घेतले जाते इथल्या लोकाना विकावे कसे याची विद्या जन्मतात असते. हे लोक 'एस्कीमोला बर्फ विकतील आणि भारतीयाला तत्त्वज्ञान सांगतील अशी त्यांची कीर्ति आहे. आमचे मित्र प्रख्यात शल्यशास्त्रज्ञ डॉ हॅरी फँग यांना मी म्हणालो की चिनी माणसापेक्षा ज्यू मंडळी जास्त चलाख असावी यावर हॅरीने एक गोष्ट सांगितली ती अशी हॉंगकॉंगमधे एका इंग्रज माणसाकडून एका ज्यूने व एका चिन्याने पन्नास पन्नास डॉलर्स उसने घेतले सावकार म्हातारा होता. पैसे कशाला द्यायचे असा दोघांचा विचार होता. पण तो म्हातारा मेला, तेव्हा यांना भीती वाटू लागली की हा भूत झाला आणि मानगुटीवर बसला तर काय होईल. म्हणून त्यानी इंग्रजांचे पैसे परत करायचे आणि त्याच्या शवपेटीवर ठेवायचे ठरवले दोघेही स्मशानात गेले. चिनी माणूस ज्यूला म्हणाला, तू प्रथम पैसे दे. त्याने त्या शवावर ५० डॉलर्स रोख

ठेवले चिनी माणसाने शभर डॉलर्सचा चेक ठेवला आणि ५० रोख डॉलर्सची मोड उचलून घेतली हॅरि म्हणाला, तूच साग या दोघात चलाख कोण? हाँगकाँग हे अशा चलाख लोकाचे शहर आहे.

हाँगकाँगमधे प्रचड श्रीमत लोक आहेत टेक्सासला जाऊन कॅसिनोत जुगार खेळून लक्षलक्ष डॉलर्स एका सायकाळी घालवू शकणारे लोक आहेत. चिनी माणूस जात्याच जुगारी रिकामपण असले तर जेवताना कोणाच्या ताटावर किती माशा बसणार यावरही पैजा लावतील पण चेहऱ्यामोहऱ्यावरून कोण काय करतो हे कळणे कठीण एकदा समुद्रसफरीला वाय. एफ च्या एका मित्राबरोबर गेलो. एअरकंडिशन्ड अशी 'याट' होती आत सर्व सुविधा, तीन बेडरूम्स, किचन, बोट कसची ते एक प्रचड तरगते घरच होते त्यावर राहणारा कायमचा स्टाफ होता. मी विचारले, 'काय करता' तो मित्र म्हणाला, विशेष नाही. विमाने विकतो. होपणारेहि विकत असावा. चिनी चेहऱ्यावरून त्याच्या उद्योगाची कल्पनाच करणे कठीण

हाँगकाँग हे सुंदर बदर चीनच्या दक्षिणेला एका किनाऱ्याला आहे. हाँगकाँगचा शब्दश: अर्थ सुगंधी बदर, हाँगकाँगचे दोन भाग आहेत एक हाँगकाँग, दुसरा कावलून. कावलून हा चीनच्या विस्तारित भूभागाचा एक छोटा तुकडा आहे. एकेकाळी ज्याप्रमाणे कोणा इंग्रज राजाने मुंबई बंदर आपल्या मुलीच्या लग्नात आदण म्हणून दिले. त्याचप्रमाणे हाँगकाँग बदरावर ब्रिटिश सरकारचा ताबा आला चीनबरोबर केलेल्या एका करारानुसार ब्रिटिश राज्याची अधिसत्ता या बदरावर फार वर्षे चालू आहे. चीनचे सरकार हा करार मानायला तयार नाही. या अधिसत्तेचा शेवट १९९७ साली व्हायचा आहे. त्यानंतर काय होणार? मनमोकळी बाजारपेठ आणि अर्थव्यवस्था चालू राहाणार, की हाँगकाँग कम्युनिस्ट चौकटीचा एक भाग बनणार? या अनेक प्रश्नानी हाँगकाँगमधील लोकाची मन सभ्रमित झालेली आहेत काही वर्षांपूर्वी ब्रिटनच्या पतप्रधान सौ. मार्गारेट थॅचर यानी चीनला भेट दिली चीनच्या या राजकीय भेटीत अर्थातच हाँगकाँगच्या भवितव्याचा प्रश्न मुख्यत: चर्चिला गेला. त्यानतर ब्रिटनच्या वसाहत मत्र्यांनी हाँगकाँगला भेट दिली. गेल्याच महिन्यात [illegible] हाँगकाँगला येऊन पाहणी करून गेले पाहणीचा उद्देश हाँगकाँगमधील प्रगत पोलीस यंत्रणेची पाहणी करणे हा वरकरणी सांगितला गेला असला तरी या दोन्ही भेटीगाठीतून वेगळाच राजकीय अर्थ काढला जात आहे.

## हाँगकाँगचे भवितव्य

गेल्या २५ वर्षांत हाँगकाँगमध्ये अनेक मूलगामी बदल झाले. हाँगकाँग हा सदैव बदलत राहाणारा पाऱ्यासारखा चंचल समाज आहे पाच वर्षांपूर्वी तेथे जिल्हा मंडळे नव्हती. १० वर्षांपूर्वी हाँगकाँगच्या चलनाचे नाते ब्रिटिश पौंडाशी

जोडण्यात आले. २० वर्षांपूर्वी समाजकल्याणाचा विस्तार झाला. पाच वर्षांपूर्वी सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू झाले गेल्या १० वर्षांत नवीन उपनगरे स्थापन झाली. नवीन उद्योग सुरू झाले आणि हे सारे कोणाच्याहि नियोजनामुळे झाले नाही, तर हाँगकाँगच्या विशिष्ट भू-राजकीय परिस्थितीने दिलेल्या संधीचा योग्य वेळी फायदा घेतल्यामुळे घडले आहे.

हाँगकाँगच्या लोकांच्या दृष्टीने स्वायत्तता याचा अर्थ अत्यत लवचिक असे प्रशासन, परिस्थितीनुरूप सदैव बदल राहणारे अर्थकारण आणि मुक्त अर्थव्यवस्था असा केला जातो. त्यामुळे हाँगकाँगच्या लोकांना चीनमध्ये विलीन होण्यात भीती वाटते ती कम्युनिस्ट विचारांची नव्हे तर साम्यवादी शासनातून येणाऱ्या पोलादी आर्थिक चौकटीची. १९९७ नतर बदल घडून येणार हे निश्चित पण हा बदल कसा घडून येतो हे पहाण्याची उत्सुकता आशियातील राजनीतीच्या आणि अर्थव्यवस्थेच्या सर्व अभ्यासकाना वाटते आहे

एका अर्थाने हाँगकाँगचे भवितव्य काय या प्रश्नाला निश्चित उत्तर मिळालेले आहे. ते उत्तर असे की, हाँगकाँग आज ब्रिटिश वसाहत आहे १९९७ नंतर ती निश्चितपणे वसाहत रहाणार नाही. म्हणजे काय होणार? हा केवळ तपशीलाचा नव्हे तर एका अर्थाने तत्त्वाचा प्रश्न आहे. आज हाँगकाँगमधील समाज जे आर्थिक स्वातंत्र्य उपभोगत आहे, ते आर्थिक स्वातत्र्य टिकणार का? व्यापारासाठी परदेशी चलनाची ती मुक्त देवाण-घेवाण होत असते ती अशीच अनिर्बंधपणे चालणार का? थोडक्यात म्हणजे हाँगकाँग हे "मुक्त बदर" (फ्री पोर्ट) आणि मुक्त बाजारपेठ राहणार का? खुली चलनव्यवस्था अशीच चालू राहाणार का? खुल्या बाजारपेठेच्या या आर्थिक रचनेतून हाँगकाँगच्या लोकजीवनात पौर्वात्य व पाश्चिमात्य जीवनातील भौतिकवाद आणि सौंदर्यवाद याचा जो सुदर मिलाफ झाला आहे तो असाच राहील का? ब्रिटिश वसाहतीच्या राज्य कारभारात आज प्रत्यक्ष लोकशाही नसली तरी लोकशाही नको, असे जाहीरपणे कधीच म्हटले जात नाही. नियुक्त सदस्यांची नाममात्र का होईना पण एक विधानसभा तिथे आहे यापुढे कोणत्या स्वरूपाची लोकशाही राहील? हा खरा प्रश्न आहे हाँगकाँग जर कम्युनिस्ट चीनच्या ताब्यात गेले तर बांबूच्या पडद्याआड गेल्यावर हाँगकाँगने राजकीय वा सामाजिक स्वरूप किती बदलेल? हाँगकाँगमध्ये आज अनेक देशातील अनेक जाती धर्मांची माणसे एक पुढारलेले जीवन जगत आहेत हे जगावेगळे असलेले हे सामाजिक मिश्रण साम्यवादी राजवटीत नष्ट होईल, ही भीती लोकाच्या मनात आहे

हाँगकाँगची लोकसख्या मुख्यत: चिनी आहे आणि त्यांना फार अवघड वाटू नये म्हणून काही उघड तर काही छुपी आश्वासने दिली जात आहेत. एक आश्वासन असे की, यापुढे हाँगकाँगचा कारभार लंडनमधील व्हाईट हॉलमधून न होता हाँगकाँगमधील लोकांच्या हातात येईल. दुसरे आश्वासन असे दिले जाते, की कम्युनिस्ट चीनच्या ताब्यात गेल्यावर सुद्धा आजची हाँगकाँगची समृद्धी, खासगी

भांडवलदारी आणि व्यापाराचे स्वातंत्र्य कायम राहू शकेल.

या सर्व प्रश्नाची चर्चा करण्यात आज हाँगकाँगमधील लोक गुंतले आहेत जमिनीच्या किमती कोसळत आहेत भांडवली गुंतवणुकीचे प्रमाण कमी होत आहे हाँगकाँगमधले श्रीमंत धनवंत लोक आपले ब्रिटिश नागरिकत्व कसे जतन करता येईल किंवा अमेरिका, कॅनडात कसे जाता येईल याचा मनोमन विचार करत आहेत नव्यानेच श्रीमंत झालेला वर्ग दुसऱ्या देशाचे नागरिकत्व मिळवता येईल का? आपला पैसा अडका गुपचुप बाहेर काढता येईल का? याची गुपचुप चर्चा करीत आहेत जाहीरपणे मात्र याविषयी फारसे कोणी बोलत नाही पण चर्चेच्या आणि अफवांच्या या गदारोळात हाँगकाँगचे काय होणार, या प्रश्नाला आपोआप उत्तर मिळाल्यासारखे झाले आहे

## कम्युनिस्टांचे प्रोत्साहन

कम्युनिस्ट चिनी सरकारने हाँगकाँगभोवती विशेष औद्योगिक केंद्रे स्थापन करून तेथे व्यापार उद्योगास अधिक प्रोत्साहन देण्याचे ठरविले आहे अशा तऱ्हेचे आर्थिक आणि व्यापारी उद्योगकेंद्राचे एक कडे हाँगकाँगभोवती उभारण्याची चीनची योजना दिसते. पण चीन सरकार हाँगकाँगला विशेष प्रशासकीय प्रदेशाचा दर्जा देणार, की हाँगकाँगच्या अर्थव्यवहाराच्या स्वायत्ततेसाठी दुसरी काही योजना अमलात आणणार हे अजून तरी स्पष्ट झालेले नाही. परंतु १९९७ नंतर हाँगकाँगमध्ये ब्रिटिश राज्यसत्ता राहाणार नाही, हे मात्र निश्चित आहे. त्यामुळे आता पुढे काय होणार याची चर्चा करण्यापेक्षा ते कसे घडणार याचीच तपशीलवार चर्चा करताना लोक दिसतात.

ब्रिटिश राज्यसत्तेने वसाहतमंत्र्यांच्याकरवी अशी घोषणा केली की हाँगकाँगमधील तरुण उद्योजक, व्यापारी आणि वैज्ञानिक यांना हाँगकाँगचे भवितव्य घडविण्याची एक नवी संधी दिली जाणार आहे. हाँगकाँगच्या [illegible] समाजात [illegible] केला जात आहे त्यावरून असे दिसते की, हाँगकाँगच्या आजच्या आर्थिक सुस्थितीचा पाया पुढच्या काळात कितपत स्थिर राहील यानेच सारे शंकीत झालेले वाटतात. याबद्दल ब्रिटिश सरकार किंवा कम्युनिस्ट चीन कोणीच स्पष्टपणे आणि तपशीलवार बोलत नसल्यामुळे अफवांना खूप ऊत आलेला आहे.

हाँगकाँगचा कारभार हाँगकाँगमधील लोकांच्या हाती असावा, ही भूमिका तर्कशुद्ध आणि योग्य आहे, परंतु हे कितपत आणि कसे घडेल हाच खरा प्रश्न आहे. हाँगकाँगमधील शहरव्यवस्था, बँकव्यवस्था, घरबांधणी, बाजारपेठ, आंतरराष्ट्रीय दळणवळण अतिशय चांगले आहे अतिशय धूर्त अशा व्यवहारी वृत्तीने हाँगकाँगचे व्यापारी वैभव वाढविण्यात गुंतले आहेत. त्यामुळेच चीनमधून येणाऱ्या निर्वासितांचा लोंढा अव्याहत येत असूनही सरकारी अंदाजपत्रक नेहमीच फायद्याचे राहिले आहे.

लोकांना असे जरूर वाटते की, ब्रिटिश वसाहत म्हणू राहून नियोजन किंवा राज्य कारभारात मूलभूत सुधारणा करणे अशक्य आहे. पुष्कळ लोकांना असेही वाटते, की एकदा हाँगकाँगमध्ये लोकशाही पद्धतीने कायदेमंडळ निवडता आले की हाँगकाँगमधील आर्थिक अन्याय, सामाजिक विषमता दूर होतील, एकदा इथे मजूर संघटना उभी राहायला परवानगी मिळाली, तर श्रमजीवी वर्गाला सामुदायिक सौदा करण्याचं संपाचे स्वातंत्र्य मिळेल अर्थातच अशा तऱ्हेचे संपाचे स्वातंत्र्य हे ज्याप्रमाणे इंग्रज राजसत्तेला मंजूर नाही त्याचप्रमाणे बीजिंगच्या राज्यकर्त्यांना मानवणार नाही.

## चीन अलिप्त राहाणे अशक्य

ब्रिटिश सरकार त्रयस्थ दृष्टीने हाँगकाँगकडे पहाते, पण चीनचे सरकार त्या अलिप्तपणाने वागू शकणार नाही हे उघडपणाने दिसत आहे त्यामुळेच आपल्या आर्थिक स्वातंत्र्याचा किती संकोच होणार आहे हा प्रश्न लोकांना भेडसावतो आहे. हाँगकाँग हा ब्रिटिशांनी बळकावलेला चीनचाच भूभाग आहे. अशी चीनची भूमिका असल्यामुळे हाँगकाँगमधील चिनी लोकांना मिळालेल्या आर्थिक स्वातंत्र्याचा मुख्य चीनच्या जनतेवर काय आणि कसा परिणाम होईल हा त्यांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रश्न आहे ब्रिटिशांच्या राजनीतीचा एक भाग असा होता की हाँगकाँगला संपूर्ण स्वायत्तता कधीच द्यावयाची नाही. पण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वायत्ततेचा आभास मात्र निर्माण करावयाचा. अशा तऱ्हेची एक दूरनियंत्रित (रिमोट कंट्रोल) राज्य करण्याची पद्धती ब्रिटिशानी स्वीकारली आहे. परंतु चीनच्या राजनीतीला हा दूर-नियंत्रित कारभार आवडणे शक्य नाही. कारण हाँगकाँगची वस्ती मुख्यतः चिनी आहे. अशा परिस्थितीत हाँगकाँगला किती स्वायत्तता देता येईल, हा एक डोकेदुखी ठरणारा प्रश्न चिनी शासनासमोर आहे. त्यामुळेच गव्हर्नर वा तत्सम पदावर हाँगकाँगच्या चिनी नागरिकाला नेमला येईल का? त्या गव्हर्नरला कितपत स्वातंत्र्य देण्यात येईल याबाबत उलटसुलट चर्चा चालताना दिसते. हाँगकाँगमधली ब्रिटिश राजसत्ता एका अर्थाने मोकळी, परस्परांचे मतभेद आणि आंतरराष्ट्रीय विविधता सामावून घेणारी आहे, पण याउलट चीनची राजसत्ता ही एक वेगळीच साम्यवादी चौकट आहे. त्या राजसत्तेत मतभेद चालतील का? आणि मतभेदांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्याच्या जवळ काही यंत्रणा आहे का? हाँगकाँगच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करायची नाही, असे चीनने यदाकदाचित ठरविले तरीसुद्धा चीनमधील जनता व हाँगकाँगमधील जनता यांना एकाच पातळीवर आणता येईल आणि एका पातळीवर आणताना हाँगकाँगची समृद्धी नष्ट होणार नाही ना? आज लाजेखातर का होईना, ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हाँगकाँगबाबत एक अलिप्त पण संरक्षक आणि त्याच वेळी स्वार्थी भूमिका घेतली आहे. त्यामुळे हाँगकाँगच्या गव्हर्नरला रोखठोक सांगण्यात येते, की हाँगकाँगमध्ये दंगल होणे, समाजविरोधी कृत्ये घडणे, दारिद्र्य वाढणे ब्रिटनला पसंत नाही कारण त्यामुळे ब्रिटिशांची आंतरराष्ट्रीय प्रतीमा डागळेल चीनला अशा तऱ्हेची वृत्ती ठेवणे अशक्य आहे. कारण चीनला आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी, अर्थार्जनासाठी हाँगकाँगची खिडकी उघडी ठेवायला हवी आहे, पण चीनला आर्थिक स्वातंत्र्य आणि लोकशाही नको आहे

हॉंगकॉंगमध्ये आज अनेक तरुण माणसे देशीविदेशी पदव्या घेऊन आतरराष्ट्रीय व्यावसायिक अनुभव घेत आहेत ही माणसे उत्कृष्ट प्रशासक आहेत पण उद्या हॉंगकॉंगचे प्रशासन केवळ व्यावसायिक उत्कृष्टतेवर चालवता येईल का? या प्रश्नाला चिनी सरकारचे नकारार्थी उत्तर आहे. त्यांच्या दृष्टीने त्या वेळी गरज लागेल ती एका विशिष्ट ध्येयवादाची, दूरदृष्टीची आणि नेतृत्वाची. केवळ पगारी प्रशासक हे काम करू शकणार नाहीत. यामुळे परक्याच्या शासकीय यंत्रणेत उत्कृष्ट ठरलेले प्रशासक हे स्वत च्या देशाचे प्रशासक म्हणून कितपत यशस्वी होतील याची शंका चीन सरकारला वाटत असावी असे दिसते.

याखेरीज दुसरी मोठी गरज आहे ती राजकीय विचारांची. हॉंगकॉंगमध्ये आज भरपूर नफा कमावणारे व्यावसायिक आहेत उत्तम प्रशासक आहेत पण राजकारणी माणसे व पुढारी नाही हॉंगकॉंगच्या क्षितिजावर अशा दूरदृष्टीने विचार करणारा कोणी माणूस आज तरी उघडपणाने पुढारी म्हणून वावरताना दिसत नाही. समाजातील काही उद्योगांचे, काही गटांचे हे नेते असतील पण राजकीय पुढारी कोणीच नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे ब्रिटिशाच्या निर्गमनाबरोबर हॉंगकॉंगच्या वसाहतीचा ध्वज बदलेल अनेक संस्थांच्या पाठीमागे असलेले रॉयल हे विरुद्ध जाईल. आज चीनने दिलेल्या अलिखित आश्वासनाप्रमाणे चीनकडे ताबा आल्यावरसुद्धा स्वतत्र शेअरबाजार, रेसकोर्स, चलनाचा व्यापार, नृत्यगृहे चालत राहतील पण हे आश्वासन पाळताना हॉंगकॉंग आणि चीन येथील लोकांच्या जीवनमानात जो अन्यायकारक फरक राहील त्याचे राजकीय परिणाम काय होतील यावर हे आश्वासन पाळले जाईल किंवा नाही हे अवलबून राहील

हॉंगकॉंगची आर्थिक व्यवस्था आज समृद्ध आहे. पण या अर्थव्यवस्थेवर नियत्रण करणे आजवर कोणालाच शक्य झालेले नाही अशा स्थितीत चीनसारख्या मध्यवर्ती नियोजन असणाऱ्या देशाला या मुक्त अर्थव्यवस्थेची चौकट कशी सांभाळता येईल हे सांगणे आज तरी कठीण आहे

## राजकीय पेच

हॉंगकॉंगचे आतरराष्ट्रीय महत्त्व व अर्थव्यवहार हे तर टिकवायचे आणि त्याचबरोबर हॉंगकॉंग हा कम्युनिस्ट चीनचाच अविभाज्य भाग मानायचे, अशा राजकीय पेचात चीन, ब्रिटन आणि हॉंगकॉंग सापडलेले आहेत हॉंगकॉंगमध्ये बदल घडतो तो बहुधा रक्तरजित नसतो, त्यामुळे १० वर्षांपूर्वी झालेले दंगे सोडले तर हॉंगकॉंगमध्ये राज्यक्रांती होण्याचा कसलाच सभव नाही हॉंगकॉंग ही जगाकडे बघण्याची 'खिडकी' ही चीनची जुनी भूमिका बदलून, हॉंगकॉंग हा चिनी भूमीचा अविभाज्य भाग असला पाहिजे आणि तेथील राज्ययंत्रणा चीनच्या विचारप्रणालीशी सुसबंधित असली पाहिजे या विचारांकडे चीनची जी वाटचाल चालू झाली आहे, त्यामुळे होणारे राजकीय आणि आर्थिक बदल चीनमध्ये सुद्धा जाणवल्याशिवाय राहाणार नाहीत चीनच्या दृष्टीने ही तारेवरची कसरत आहे पण दग शिया पिंग याच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाने हा

समतोल साधता येईल, असे महामंत्री ली फग मला म्हणाले

चीन सरकारचे आजचे धोरण हे हाँगकाँगचा उपयोग चिनी अर्थव्यवस्थेला परदेशी चलन मिळवून देण्यासाठी करायचा आहे, यामुळे हाँगकाँग भोवताली निर्माण केलेल्या औद्योगिक टापूत, स्वस्त रोजगारीवर मिळणाऱ्या, चिनी मजुरांच्या श्रमाने प्रचड उत्पादन यत्रणा उभारायची आणि अमेरिकन, जपानी मालाच्या तुलनेने स्वस्त दरात हा माल जगभर विकायचा अशी ही योजना आहे. पण आपली पिळवणूक हे चिनी मजूर सदासर्वकाळ चालू देतील का? आजसुद्धा रोज शे-दोनशे लोक रोज चोरूनमारून, पोहून, बोटीतून चीन सोडून हाँगकाँगमध्ये येत असतात. त्याना निर्वासित म्हणून पकडले जाते आणि रोजच्या रोज परत पाठवले जाते १९९७ नतर चीनमधील राहणीमान आणि हाँगकाँगमधील राहणीमान यातला फरक निर्दय वाटेल इतका आहे हे लक्षात आल्यावर चीनमधील जनता गप्प बसेल का? दग शिया यांचे मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण या चिनी जनतेला काबूत कसे ठेवणार? परकीय चलन मिळवण्यासाठी बँक व्यवसायावर सरकारी नियंत्रण चीनला हवे आहे, पण चीनच्या या मनोराज्याला हाँगकाँग आणि शाघाय कार्पोरेशनच्या निर्णयाने प्रचड हादरा बसला आहे या कॉर्पोरेशनने, त्याच्या अर्थसस्था, बँका यांची मालमत्ता एका ब्रिटिश कंपनीकडे हस्तांतरित करून परदेशी पाठवण्याचे ठरवले आहे. हाँगकाँगमधील बँक-व्यवसायावर असणाऱ्या विश्वासाला यामुळे तडा गेला आहे हाँगकाँग बँक सर्वात मोठी बँक. तिने आपली मिडलँड बँकमधली गुतवणूक १४ ९ टक्केने वाढवण्याचा निर्णय बदलला आहे. यामुळे या बँकेचे नियंत्रण इग्लडमध्ये जाण्याचा सभव होता. पण हाँगकाँग शाघाय कॉर्पोरेशनच्या या नव्या निर्णयाने सर्वच चित्र पालटले आहे हाँगकाँगच्या बँकिंग व्यवसायावरचे वर्चस्व आता परदेशी राहणार आहे. गेल्या महिन्यातील चीन भेटीच्या वेळी झालेल्या चर्चेत चिनी मंत्री उसन्या अवसानाने म्हणाले की या साऱ्याचा चिनी अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार नाही पण हाँगकाँगमधल्या चिनी व्यापाऱ्याचे मात्र हातपाय गळल्यासारखे झाले आहे.

आंतरराष्ट्रीय दृष्टीने विचार केला तर या घडामोडीमुळे सिंगापूरचे महत्त्व वाढेल का? लष्करी दृष्टीने विचार केला तर ब्रिटिश सत्तेला हे रुजलेले पाऊल सपूर्णपणे काढणे शक्य आहे का? असे अनेक प्रश्न उभे राहातात या आर्थिक चढाओढीत पुढे जावे, हाँगकाँगची पोकळी आपण भरावी यासाठी सिंगापूरचे जिवापाड प्रयत्न चालू आहेत ब्रिटिश राजसत्तेने हिंदी सागरी विभागात दिओ गार्सीयासारखा आरमारी तळ, हवाई तळ संपादन केला आहे तो याकरताच हाँगकाँगमधील भारतीयांच्या शिष्टमंडळाने भूतपूर्व महामंत्री राजीव गांधी याना सुचवले होते की अंदमानमध्ये हाँगकाँगसारखी मुक्त व्यापारपेठ उभारावी पण अदमानचे उपराज्यपाल मला म्हणाले की, लष्करी दृष्टीने हे शक्य होणारे नाही. पण कोठे तरी नवी मुक्त बाजारपेठ उभारण्याची भारताला आता मोठी सधी आहे यात शका नाही. मुंबईतील "सिब्ज" ही औद्योगिक वसाहत हाँगकाँगच्या मानाने अयशस्वी आहे. भारतीय

औद्योगिक धोरणामुळे हाँगकाँगमधील श्रीमंत भारतीय व्यापार - इतर देशात - मग तो द. कोरिया असो, तायवान असो वा कॅनडा/अमेरिका असो तिकडे झुकतो आहे. हाँगकाँगच्या सर्वसामान्य माणसाला ब्रिटनने आपल्याला फसवले असे वाटते आहे.

आज सगळीच परिस्थिती अस्थिर आहे. प्रत्येक राजकीय विचारवंत आपल्यापरीने या चीन-ब्रिटन संबंधाचा अन्वयार्थ लावत आहेत तेव्हा या सुगंध बंदराचा सुगंध कायम राहाणार, की उद्‌बत्ती जळून संपुष्टात यावी तसे येथील वैभवाचे होणार?

(केसरी)

❀ ❀ ❀

# ९

## एकांतवासातला

# ब्रह्मदेश

'मायनामार' हे ब्रह्मदेशाचे नवे नाव. पण ब्रह्मदेशाचे नांव घेतले की, आठवण येते ती मंडालेची! लोकमान्य टिळकांना सहा वर्षे मंडालेत राहावे लागले. त्या ठिकाणी गीतारहस्यासारखा अपूर्व ग्रंथ निर्माण झाला दुसरी आठवण होते ती रत्नागिरीला आणून ठेवलेल्या 'थिबा' राजाची आणि दोन्ही आठवणीतून मनात बोच येते एकांतवासाची

ब्रह्मदेशात जायचे ठरले, त्यावेळी आपल्यावर ओढवून घेतलेल्या राजकीय एकांतवासात राहणाऱ्या या लोकाची स्थिति काय असेल? एकेकाळी भारताशी अगदी जवळचे संबंध असणारा हा देश आज एकदम परका वाटावा इतका लांब गेल्यासारखा का वाटतो? तिथे प्रत्यक्ष परिस्थिती काय असेल? असे नाना प्रश्न मनात घोळवत मी रगूनला निघालो.

४ जानेवारी १९४८ नतर ब्रह्मदेश स्वतत्र झाला. ब्रह्मदेशात ब्रह्मी, मॉन, कारेन, शान, काचीन या मोठ्या जमाती आहेत आपल्यावर ब्रह्मी समाजाचे वर्चस्व राहू नये म्हणून कारेनसारख्या आदिवासी जमातींनी बंडाळी उभारली या बंडाळीतून ब्रह्मदेशाचे तुकडे तुकडे होतील या भीतीने २ मार्च १९६२ साली उ नू यांचे सरकार लष्कराने पदच्युत केले आणि जनरल ने विन यांचे राज्य सुरू झाले

त्या दिवसापासून ब्रह्मदेशाचा एकातवास सुरू झाला अगदी आवश्यक असेल तरच या सरकारचे प्रतिनिधी परदेशी जातात अगदी गरज असेल तरच ब्रह्मी सरकार परदेशी पाहुण्याचे स्वागत करते. सर्वसामान्यपणे ब्रह्मदेशाच्या नागरिकाना परदेशी जाण्याची सधी फारशी मिळतच नाही १९७४ साली ब्रह्मदेशात समाजवादी लोकसत्ताक सरकार स्थापन झाले. नवी समाजवादी घटना तयार केली. मार्च १९८२ मध्ये या सरकारची मुदत संपत होती परतु जनरल ने विन हे निवृत्त झाल्याने ८१ साली

निवडणुका घेण्यात आल्या आणि सान यू याची अध्यक्ष म्हणून निवड झाली. ८६ साली त्यांची पुन्हा एकदा निवड झाली ब्रह्मदेशच्या समाजवादी कार्यक्रम समितीचे अध्यक्ष म्हणून जनरल ने विन काम पाहत असतात परंतु व्यवहारात त्याचे अधिकार आणि सत्ता अध्यक्षांपेक्षाही जास्त होत्या ब्रह्मदेशला थायलंड, लाओस, चीन, भारत व बांगला देश याच्या सीमा भिडलेल्या आहेत आणि आजही हा देश वेगळ्या प्रकाराने एकांतवासातच राहतो आहे

## घाई नसलेला समाज

रंगूनला विमानातून उतरताच लक्षात असे आले की, ब्रह्मदेशाची वेळ मोजण्याची पद्धत काही तरी वेगळीच आहे. एकूण सगळे वागणेच असे की, शिष्टाचार तर सुटू नये पण वेळेचे कोणालाही ओझे होऊ नये. विमानतळावर आल्यावर असंख्य फॉर्म्स भरावे लागतात लांब रांगेत उभे राहावे लागते आपला नंबर लागला तर समोरचा अधिकारी फॉर्मवरचा प्रत्येक कलम सावकाश सावकाश तपासत राहतो आणि मध्येच मान वर करून सांगतो, ''तशी काहीच घाई नाही, काळजी करू नका.''

विमानतळावरून गावात जाताना रस्त्यांमध्ये रंगीबेरंगी लुंग्या घातलेले स्त्री-पुरुष दिसू लागतात दक्षिण भारतीय माणसांप्रमाणे वारंवार लुंगीची गाठ सोडणे, पंखाप्रमाणे वर उचलून पुन्हा बांधणे, पुन्हा सोडणे ही क्रिया बोलताना-चालताना चालूच असते. रस्त्यात समोरच श्वडगॉन-श्वेतगहन-पॅगोडा समोरच दिसतो. त्याचे सोनेरी शिखर निळ्या आभाळात एखाद्या दीपशिखेसारखे दिसते त्या देवळाचे घुमट आणि ती शिखरे यातून एक सोनेरी प्रकाश भोवतालच्या संगमरवरी जिन्यावर आणि चबुतऱ्यावर पडतो.

न्यूयॉर्क, मुंबई, लंडन अशा गजबजलेल्या शहरात राहायची सवय असणाऱ्या माणसांना ब्रह्मदेशातील गतिहिनता, शांतता, घड्याळ आणि काळ भिरकावून देण्याची प्रवृत्ति याचे हळूहळू एक वेगळेच आकर्षण वाटू लागते ब्रह्मदेशात पर्यटकांचे प्रमाण फार कमी आहे कदाचित त्याचाही हा परिणाम असेल. रंगून शहर राजधानी झाल्याला शंभरएक वर्षे झाली असतील तिथले मुख्य रस्ते खूप रुंद आहेत. दोन्ही बाजूला झाडे आणि दगडी इमारती आहेत इंग्रजांच्या काळात रंगूननगरीला 'पूर्वेची राणी' असे संबोधत असत त्या काळात सर जॉर्ज स्कॉटसारख्या माणसाला वाटले होते की विसाव्या शतकात हे शहर मुंबई-कलकत्त्यापेक्षा अधिक भरभराटीला येईल, पण यातले काही घडले नाही जुने मोठे रस्ते राहिले, पण दोन्ही बाजूला आता वेडीवाकडी घरे बांधलेली आहेत छोट्या-छोट्या दुकानांतून सर्व काही विकत मिळू शकते जुन्यापुराण्या कादंबऱ्या, भांडी याबरोबर एखादा व्हिक्टोरियन फर्निचरचा नमुनाही दिसतो मुंबईप्रमाणेच चित्रपटांची रंगवलेली पोस्टर्स रस्त्यारस्त्याला दिसतात पण रस्त्यावर गर्दी गोंधळ नसतो

रंगून शहराबाहेर गेले की, काळीभोर जमीन आणि त्यात लाकडी नांगराला जोडलेली बैलजोडी दिसते हिरवीगार भातशेती, चिंचेची डेरेदार झाडे आणि सर्वांगाने उमलून आलेला गुलमोहोर दिसू लागतो एक-दोन मैल गेले की, पुन्हा एखादी पॅगोडाची

सुदर इमारत व शिखरे दिसतात बरोबर असणारे ब्रह्मी स्त्री–पुरुष लुगी आणि ब्लाऊज किंवा लुंगी आणि शर्ट घालतात आणि बहुतेकजण चंदनाचा सुगधी टीळक लावतात. रगीत कपडे घातल्याशिवाय आणि डोक्यात फुले माळल्याशिवाय स्त्रियांची वेशभूषा पूर्ण होतच नाही. थोडे उत्तरेकडे गेले की, इरावती नदीच्या काठी असलेले 'पॅगान' हे जुन्या राजधानीचे शहर लागते. इरावतीच्या काठावर अनेक राजप्रासाद आहेत आणि इरावतीच्या भव्य प्रवाहातून माल भरलेल्या नावा घेऊन जाणारे नावाडी शतकानुशतके त्याच दारिद्र्यात तीच लोकगीते म्हणत जात आहेत. भोवतालचे जग किती बदलले आहे याचा त्यांना पत्ताच नाही.

याच रस्त्याने पुढे गेले की, पठारावर असलेले मंडाले शहर लागते याच मंडालेच्या किल्ल्यात लोकमान्य टिळकांना बदिवासात राहावे लागले होते. मंडालेच्या आग्नेयेला 'शाल' डोंगराच्या पठारावर 'इलले' सरोवर आहे. हे सरोवर एखाद्या आरशासारखे निर्मळ आहे. त्यावर सकाळचा सूर्यप्रकाश पडला की, एखाद्या जादूने या पाण्याची चादी झाल्यासारखे वाटते. या सरोवराभोवतीचे वातावरण एखाद्या चेटकाने भारल्यासारखे आहे. इथे राहणाऱ्याना 'इन्था' म्हणतात. ते तळ्यात नावेतच राहतात या 'इन्था' लोकाचे एक वैशिष्ट्य असे की, नाव चालवताना वल्ह्याचा उपयोग न करता ते आपल्या पायांचा उपयोग करतात पायांनी नाव वल्हवण्याचा हा प्रकार मी जगात प्रथमच पाहिला. या लोकाच्या बोटींच्या शर्यती फार मजेशीर दिसतात.

## राजकीय विरोधाभास

ब्रह्मदेशात विरोधाभास खूप आहे एरवी शात वाटणाऱ्या या माणसांचा इतिहास रक्तरंजित लढ्यानी भरलेला आहे. आजही ब्रह्मदेशाचे अर्थकारण दोन तऱ्हेचे आहे. एक सरकारमान्य व्यवहाराचे, दुसरे काळ्या बाजाराचे एरवी शात दिसणारी ही माणसे ब्रह्मदेशाच्या सीमेवर अफूच्या व्यवहारात वावरताना वेगळीच दिसतात त्यामुळे राज्यक्रांति हा ब्रह्मदेशाचा स्थायीभाव झालेला आहे.

ब्रह्मदेशाचा विचार करताना या देशाच्या इतिहासावर भूगोलाने केवढा परिणाम केला आहे याची जाणीव होते. देशाच्या तीन बाजूला डोंगर, जगले आणि चौथ्या बाजूला समुद्र. यामुळे आपोआपच एकांतवास निर्माण होतो. इथे जे लोक आले ते इथली सुपीक जमीन आणि चागले हवापाणी पाहून इथेच रुजले, स्थिर झाले. कदाचित या एकातवासामुळेच बौद्ध धर्माचा प्रभाव खूप पडला थेरवडा बौद्ध धर्म नावाचा पथ इथे वाढीला लागला. ब्रह्मदेश हा आशियात कोठेही जायचे असले तरी त्या रस्त्यावर एक महत्त्वाचे ठिकाण आहे. याची जाणीव ब्रिटिशांना प्रथम झाली. इरावती नदीतून चीनच्या मागच्या दारात जाण्याची सोय आहे, हे त्याच्या लक्षात आले. त्यामुळे ब्रह्मदेशात त्यानी आपली सत्ता स्थिर केली

पाच हजार वर्षांच्या इतिहासात अनेक टोळ्या, जमाती इथे येत राहिल्या. थायलंडमधून मॉन आले, तिबेटच्या बाजूने ब्रह्मी आले, दक्षिणेकडून प्यू आले,

आराकानच्या बाजूने भारतीय आले आणि इथे प्रथम 'श्रीक्षेत्र' नावाची राजधानी स्थापन झाली आराकानच्या मार्गावर असलेल्या धनवती नगरीत भगवान बुद्धाने एक आठवडा वास्तव्य केले असे म्हणतात. त्यावेळी इथला राजा चद्रसूर्य याने बुद्धाची प्रार्थना केली 'तू तर तिन्ही जगाचा स्वामी तूच येथून गेल्यावर आम्ही करुणा तरी कोणाची भाकायची, तेव्हा निदान तू तुझी मूर्ति तरी इथे ठेवून जा' या प्रार्थनेला उत्तर म्हणून यानतर एका देवदूताने महामुनि म्हणून प्रख्यात असलेली सुवर्णमूर्ति तयार केली या साऱ्या हकीकती भूर्जपत्रावर लिहून ठेवलेल्या अजूनहि आढळतात या मूर्तीच्या दर्शनाला भारताचा सम्राट अशोक येऊन गेला, असेहि सांगतात भारतावर इंग्रजाचे राज्य आल्यानंतर पाश्चात्त्य विचारांचा प्रभाव ब्रह्मी लोकांवर पडू लागला पोर्तुगीज व्यापारी गोव्याला आल्यानतर त्यानी तेथून ब्रह्मदेशाशी सबध जोडला होता, असे दिसते १८ व्या शतकात इंग्रजांबरोबर फ्रेंच, डच आणि पोर्तुगीज व्यापारी भारतात आले त्यानी आपले राज्य भारताच्या सीमेपर्यंत न ठेवता ब्रह्मदेशातही घुसण्याचाहि प्रयत्न केला होता

पूर्व हिमालयात उगम पावलेल्या इरावती नदीचा या देशाच्या इतिहासावर आणि भूगोलावर खूप प्रभाव पडला आहे. एक हजार मैल वाहात जाणारी ही नदी हिचा उपयोग व्यापार, वाहतूक, शेती या बरोबरच राजकारणासाठी केला गेला या नदीतच इग्रज आणि ब्रह्मी यांच्या अनेक लढाया झाल्या. दुसऱ्या महायुद्धात सुद्धा या नदीच्या लष्करी उपयोगाची जाणीव लॉर्ड माऊटबॅटन यांना झाली होती ब्रह्मदेशाच्या या जगलातच 'चिंदवित तुकड्या' या विद्युत्गतीने हालचाल करणाऱ्या लष्करी तुकड्यानी जपानला 'दे माय, धरणी ठाय' करून सोडले.

ब्रह्मदेशाच्या विरोधाभासाचा आणखी एक भाग म्हणजे अहिंसा. कोणालाही मारायचे नाही हा बौद्ध धर्माचा नियम पण ब्रह्मी लोकानी त्यातून पळवाट अशी काढली की, इरावतीतील मासे आपण मारले नाहीत म्हणजे झाले. दुसऱ्याने मारले, तर खायला काय हरकत आहे. याच विचारातून कोंबड्या, बकरे, गायी सर्व खायला सुरुवात झाली. हे प्राणी मारणारे खाटीक मात्र मुसलमान किंवा चिनी आहेत खाटकांना समाजात अगदी तळाचे स्थान दिलेले आहे समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील न झालेले लोक म्हणजे ब्रह्मदेशातील सहा मुख्य आदिवासी जमाती. त्यापैकी बहुसख्य लोक ब्रह्मी आहेत त्यापैकी एक जमात म्हणजे मॉन, दुसरी कारेन, तिसरी 'प्यू' ! मुख्य प्रवाहात सामील न झाल्यामुळे यातील पुष्कळ लोक सरहद्दीजवळ राहतात आणि अफूसारख्या उद्योगात तरी पडतात किंवा पारंपरिक उद्योगधंदे करीत राहतात

## ब्रह्मदेशातील धर्मविचार

हीनयान किंवा थेरवडा पंथ थोडा वेगळा आहे. त्या काळात प्राणिपूजा, तांत्रिक आणि जारण-मारण याचा इतका पगडा होता की, तो पगडा लोकांच्या मनावरून सपूर्णपणे काढणे अशक्य होते, म्हणून राजा अनव्रताने पिशाच्च योनीतील 'नाट' यांचा देवतास्वरूपात समावेश करून घेतला. या पथाच्या मताप्रमाणे ब्रह्मदेशातील मेरु पर्वत हा

पृथ्वीचा मध्यबिंदू आहे मानदंडाचा अर्धा भाग पाण्यात आणि अर्धा जमिनीत आहे. या पर्वताच्या उतारावर असलेल्या सात शिखरांवर किंवा शिंगावर रूपदेवता राहतात असे मानतात या लोकांचा कर्मावर विश्वास आहे. या पथात भारतातील मुंजीप्रमाणे दीक्षा समारंभ होतो मुलाला धार्मिक शिक्षण घ्यायला सुरुवात करण्यापूर्वी त्याला नटून-सजवून त्याची मिरवणूक काढली जाते आपल्या भिक्षावळीप्रमाणेच हा विधि असतो ही मिरवणूक संपली की, मुलाच्या डोक्यावरचे सर्व केस काढले जातात. त्याला भगवी वस्त्रे घातली जातात धार्मिक अभ्यास झाल्यानंतर ज्याला भिक्षू व्हायचे असेल तो भिक्षू होतो. बाकीचे प्रपंच करतात येथे जातीभेद नाही, स्त्रियांना समाजात समानतेचे स्थान आहे

ब्रह्मी माणसांना उत्सवाची अतिशय हौस आहे. उत्सवात प्रत्येक संध्याकाळी नाटक केलेच जाते ब्रह्मी माणसांना चिरूट ओढण्याची खूप आवड आहे. ब्रह्मी नाटकामध्ये प्रहसने आणि नाटके असे मुख्य भाग असतात त्यांच्याकडे रंगपंचमी सारखाहि सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. शेकडो लोक पाण्याची भांडी आणि कळशा घेऊन रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्यावर पाणी ओततात हा सण एप्रिलच्या सुरुवातीला येतो.

ब्रह्मी जेवणात भाज्या, फळे यांचा पुष्कळ वापर असतो. लोणच्यासारख्या खारवलेला चहापत्तीचा चहा ब्रह्मी लोकांना फार आवडतो खासगीत म्हणून सांगतो मला काही तो आवडला नाही

## अफूचे राजकारण

ब्रह्मदेश, थायलंड आणि लाओस यांच्या सीमा जिथे मिळतात त्याला सोनेरी त्रिकोण (गोल्डन ट्रँगल) असे म्हणतात कारण या भागात अपरंपार किंमत देणारी 'अफू' पिकवली जाते सध्याच्या ब्रह्मदेशाच्या सरकारशी कायम भांडत असलेल्या 'शान' या आदिवासी जमातीच्या लोकांनी शान युनायटेड आर्मी नावाची निमलष्करी संघटना उभी केली बेकायदा अफूचा व्यापार करणे आणि चीन, अमेरिका इत्यादी देशांना या अवघड प्रदेशात भाडोत्री सैन्य पुरवणे ही कामे या संघटनेमार्फत केली जातात फ्रेंच आणि चिनी सरकारांनी अफूचे रूपांतर हिरॉइनमध्ये करणाऱ्या प्रयोगशाळांना व्हिएतनामच्या युद्धकाळात मदत केली होती असे सांगण्यात येते अलीकडेच ज्याला पकडण्यात आले तो "खून सा" या अफाट उद्योगाचा नेता होता याचे वडील चिनी, आई 'शान' आदिवासी जमातीची होती त्यांनी या मुलाला ब्रह्मी नाव 'क्वाय कायना' असे दिले त्याच्या वडिलांना बंडखोरीसाठी फाशी दिले. ब्रह्मदेशातील चीन, करिन आणि शान या जमाती स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व ठेवून स्वतंत्र राज्य करू पाहात होत्या शान ही जमात सयामचेच रूप आहे. या शान जमातीच्या राजकन्येला ब्रिटिश सत्तेने मान्यता दिली होती. या शान स्त्रीने नंतर एका शान बंडखोर सरदाराशी लग्न केले मग या 'क्वान कायना' मुलाचे नाव बदलून 'खून सा' (थायमध्ये खून म्हणजे श्रीयुत) असे ठेवले ज्या वेळी चीनमध्ये चँग कै शेकचा पराभव होत होता, त्या वेळी

'खूव सा'ने त्या सैन्याला मदत केली माओ त्से-तुगच्या सैन्याचा पराभव करण्यासाठी पुन्हा एका अफूनिर्मितीला चँग कै शेकच्या चीनने प्रोत्साहन दिले ब्रह्मदेशातील 'वा' आदिवासींना या कामाला लावले तायवानच्या नेत्यांनी या जमातीला लष्करी शिक्षण आणि शस्त्रे दिली हेरॉइन तयार करण्यासाठी तज्ज्ञ चिनी रसायनशास्त्रज्ञ पाठवले मधल्या काळात 'खूव सा' हा सोनेरी त्रिकोणातल्या भाडोत्री सैन्याचा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातला नेता झाला होता ब्रह्मदेशाच्या [illegible] मोठ्या प्रमाणावर अफूचा व्यापार सुरू केला. १९६७ मध्ये 'अफूची लढाई' होऊन खूव याला पकडून तुरुंगात टाकण्यात आले पण नतर दोन रशियन तंत्रज्ञाची 'शान' टोळ्यांच्या ताब्यातून सुटका करण्याच्या अटीवर त्याची सुटका झाली. १९७० च्या सुमाराला ब्रह्मी सरकारविरुद्ध उठाव करणाऱ्या कम्युनिस्ट 'आदिवासी' टोळ्यांचा पाठिंबा चिनी सरकारने काढून घेतला. त्यामुळे या भागातले दहा हजार भाडोत्री सैनिक बेकार झाले १९७९ ते १९८१ या काळातल्या दुष्काळाने अफूचे पीक नष्ट झाले खूव सा ला हेरॉइन करायला कच्चा माल मिळेना. थाय सरकारने अफूविरुद्ध आघाडी उघडली आजही अतर्गत प्रदेशातून अफूचा व्यापार चालतो. अलीकडे खूव सा यांच्या सैन्याच्या प्रशिक्षण शिबिरानतरच्या समारंभात बोलताना तो म्हणाला, 'मी अफूचा धंदा सोडला आहे पण अजूनही हेरॉइन उत्पादनात त्याचा ८० टक्के भाग आहे, असे थाय सरकारला वाटते. कारण नाहीतर त्याच्याजवळ असणारे पधरा हजार शस्त्रधारी सैनिक आणि २० हजार राखीव यांचा दरमहा एक कोटि २० लाख नाथ (२५ नाथ = डॉलर) खर्च कसा चालतो, या प्रश्नाला खूव सा जवळ उत्तर नाही. आज एका बाजूने ब्रह्मी सैन्य, दुसऱ्या बाजूने थाय सैन्य आणि अमेरिकन मादक द्रव्यांविरोधी दले त्याच्यामागे आहेत

रंगूनमध्ये सर्वात प्रसिद्ध असलेला श्वेतगहन पॅगोडा हे एक सुंदर देऊळ आहे. पायापासून शिखरापर्यंत २ लाख ८० हजार सोन्याची पाने लावून हा स्तूप सजवला आहे. या सर्वांची किंमत ७५ कोटी डॉलर्स आहे. देवळात गेल्याबरोबर चंदन, जाई याच्या सुवासाबरोबर नैवेद्याचाहि सुवास येऊ लागतो मोक्ष मिळविण्यासाठी कोणत्या वस्तू देवाला अर्पण करायला हव्यात हे पाहून तिथले पुजारी आपल्याकडून पैसे वसूल करतात. हा पॅगोडा बघण्याकरता जवळच्या शाही सरोवरात जावे तिथे नावेत बसून सरोवरात पडलेले सोनेरी पॅगोडाचे प्रतिबिंब बघत राहावे इतके सुदर दिसते. बघता बघता समाधि लागते. याखेरीज मंडालेचा राजवाडा आणि वनराईने झाकलेल्या टेकड्याहि बघण्याजोग्या आहेत ब्रह्मदेशात रेशीम विणण्याची कला फार जुनी. ते विणकाम बघणेसुद्धा एक आनददायी गोष्ट आहे. याखेरीज अनेक देवळे, पॅगोडा, राजवाडे याचे जगावेगळे शिल्प आणि उतरत्या छपराची शोभा बघण्यासारखी आहेत. मला त्यातल्या त्यात इल्ले सरोवर फार आवडले याच्याभोवती हिरवेगार डोंगर आहेत. सरोवर दाट निळ्या रंगाचे आहे.

याशिवाय झाडीत लपलेलीहि अनेक पर्यटन स्थळे आहेत तिथे मुद्दाम वाकडी वाट करून जायला हवे

## अज्ञातवासातील 'निवडणुका'

जगापासून आपणहून अज्ञातवास पत्करलेल्या ब्रह्मदेशात १९९० मध्ये प्रथमच सार्वत्रिक निवडणुका झाल्या. तीस वर्षे लष्करी राजवटीच्या बंदिस्त चौकटीत काढल्यावर जनतेला मतदानाचा हक्क बजाविता आला ताज्या वृत्तानुसार विरोधकाची 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रॉसी' ही आघाडी पुढे आहे. या आघाडीला बहुमत मिळाले तरी तिला सरकार स्थापन करू दिले जाईल काय, हा मुख्य प्रश्न आहे.

जगाच्या पाठीवर असे काही देश आहेत की त्यांचे अस्तित्व आपल्याला फक्त नकाशातच जाणवते अल्बानिया, उत्तर कोरिया व ब्रह्मदेश असे हे तीन देश आहेत पैकी अल्बानियात 'ग्लासनोस्त'चे वारे पोहोचल्याने तो देश जरा मोकळा होत आहे पण उत्तर कोरिया आणि ब्रह्मदेश मात्र अद्याप बंदिस्त आहेत

ब्रिटिश राजवटीच्या काळात ब्रह्मदेश भारताचाच भाग होता पण भारताला स्वातंत्र्य देता ना ब्रिटिशानी ईशान्येचा मोठा भूभाग तोडला १९४८ मध्ये 'ब्रह्मदेश' हे नवे स्वतंत्र राष्ट्र जन्माला आले

तथापि दोन वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांचा प्रचंड उठाव झाल्याने पुन्हा ब्रह्मदेशाकडे जगाचे लक्ष गेले हा उठाव एवढा प्रचड होता की, तो दडपणे सरकारला प्रथम अशक्य झाले नतर लष्कराने अत्यत निर्दयपणे हा उठाव चिरडण्यास सुरुवात केली. जनरल ने विन यांची सत्ता सोडावी आणि खुल्या निवडणुका घ्याव्यात, अशी विद्यार्थ्यांची मागणी होती लष्कराला न जुमानता उठावाचे लोण पसरत गेले शेवटी जनरल ने विन यानी सत्ता सोडली पण त्यांनी जनरल सॉ मॉंग या लष्करी अधिकाऱ्याची नियुक्ति आपल्या जागी केली व पडद्यामागून सूत्रे हलविण्यास सुरुवात केली.

या निवडणुका म्हणजे फार्सच आहे, असे म्हणावे लागेल कोणत्याही राजकीय पक्षाला जाहीर प्रचाराची परवानगी नव्हती मात्र एक सभा घेण्याची परवानगी होती त्यात भाषणे करणाऱ्या वक्त्यांनी लष्करी सरकारवर टीका करू नये, ही महत्त्वाची अट घालून भाषणाचा मसुदा सरकारला दाखविणे सक्तीचे करण्यात आले होते निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाली नाही विजयी उमेदवारांचीच नावे फक्त जाहीर होतील. या साऱ्या प्रकाराला 'खुली निवडणूक' अशी संज्ञा सरकारने दिली आहे।

जनरल ने विन यांनी आखलेली सर्वच धोरणे पूर्णपणे चुकली पैसा फक्त वाया गेला या आर्थिक दुरावस्थेतून मार्ग काढण्यासाठी सरकारने देशाची साधनसपत्तीच विक्रीस काढली आहे जगातील ७० टक्के सागाची जगले ब्रह्मदेशात आहेत. ही झाडे बहुराष्ट्रीय कंपन्यांना विकून सरकार कमाई करीत आहे अफूपासून भरपूर पैसा मिळतो हे लक्षात आल्यावर जनरल सॉ मॉंग यांचे सरकार अफूच्या शेतीस प्रोत्साहन देत आहे

जपानमधील आपली वकिलात बंद करण्याचा निर्णय सरकारने केला असून ही जागा २५ कोटि डॉलर्स एवढ्या किमतीला विकण्याची तयारी दर्शविली आहे.

आंदोलनात पकडलेले १५ ते २० हजार विद्यार्थी अद्याप तुरुंगात आहेत निवडून आलेल्या त्यांच्या नेत्या श्रीमती ऑंग सान सू की याहि स्थानबद्ध आहेत अन्य विरोधी नेते स्थानबद्ध आहेत किंवा तुरुंगात तरी आहेत. या साऱ्या पार्श्वभूमीवर 'खुली निवडणूक' झाली विरोधकांना उद्याचा विजय स्पष्ट दिसत आहे.

एकांतात राहणाऱ्या देशातून परत निघताना मनावर एक गूढ तवंग पसरल्यासारखे वाटते. लोक हसतमुख, आतिथ्यशील आहेत, पण अलिप्त आहेत. या देशाचे राजकारण समजायला अवघड आहे. इतर देशांशी संबंध जवळजवळ नाहीत, पण सीमेच्या पलीकडे एकसारख्या चकमकी घडत असतात.

रंगूनहून परत येताना एका स्तब्ध थांबलेल्या काळामधून पुन्हा एकदा मुंबईच्या प्रचंड वेगवान काळात आपण शिरतो आहोत असे मात्र निश्चित वाटले

(केसरी)

१०

## प्रशांत महासागराच्या परिसरात

# वेस्टर्न सामोवा

कॉमनवेल्थ देशातील सामाजिक आणि आर्थिक विकासात लोकांचा सहभाग या विषयावर एक परिषद जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात वेस्टर्न सामोवा या देशाची राजधानी अपिया येथे भरली होती. या परिषदेला एक समाज-विकास तज्ज्ञ म्हणून मला निमंत्रण आले तेव्हाच आपण एका अज्ञात दिशेला जात आहोत याची जाणीव झाली. आपल्या मनाशी असलेली भूगोलाची कक्षा सर्वसाधारणपणे अमेरिका, युरोप आणि आशियातील देश, इथपर्यंत असते. प्रशांत महासागराचा परिसर आणि तिथे असणारे १८ देश याची तशी फारशी माहिती आपल्याला उपलब्ध नसते. पॅसिफिक महासागर आपल्या नावाप्रमाणेच खऱ्याखुऱ्या अर्थाने शांत महासागर आहे. काही ठिकाणी तो इतका शांत आहे की, एखाद्या निळ्या काचेवरून बोट सरकत असावी असा भास होतो. पाणी इतके स्वच्छ पारदर्शक आहे की, ५०-५०, १००-१०० फुटावरचा तळ स्वच्छ दिसतो. पाण्यातील जलचर, मासे आणि विशेषतः कोरल्स किंवा प्रवाळ याचे रंगीबेरंगी खडक अतिशय सुंदर दिसतात. सहसा इतरत्र न आढळणारे असे सप्तरंगी जेलिफिश, हा माशांचा एक आगळाच प्रकार येथे पहावयास मिळतो. समुद्रावर सप्तरंगी तबके मांडावी तशी इंद्रधनुष्यासारखी दिसणारी तबके आपल्या बोटीच्या आसपास दिसतात. पण बोट जवळ आली की यांत्रिक छत्री कळ दाबताच मिटावी तशीच अलगद या तबकांची पाण्यात घडी होते आणि हे मासे दिसेनासे होतात. पाठीचा कणा नसलेले हे मासे बऱ्याच ठिकाणी विषारी असतात. या भागात मात्र ते विषारी नाहीत. प्रशांत महासागर हा पाण्याचा एक प्रचंड पसारा आहे. आपल्याकडे प्रचंड भू-पृष्ठाच्या मधूनमधून तळी आणि सरोवरे असतात. त्याच्या उलट इथे प्रचंड जलपृष्ठावर लहान लहान बेटे आहेत. प्रशांत महासागराच्या विभागात मुख्यतः तीन उपविभाग आहेत. पहिला उपविभाग 'मलेनेशिया' हा उत्तर पूर्व भागात आहे. यामध्ये पापुआ, न्यू गिनी इत्यादी देश आहेत. दुसरा भाग मायक्रोनेशिया आहे. हा महासागराच्या मध्यभागी असून अतिशय छोट्या छोट्या

ठिपक्यासारखी बेटं या भागात आहेत. तिसरा भाग म्हणजे पॉलिनेशिया. या भागात नारू, टोंगा, फिजी, वेस्टर्न सामोवा अशासारखे मध्यम आकाराचे देश आहेत.

वेस्टर्न सामोवा देशाचा विस्तार हा ११०० चौरस मैलांचा असून तीन बेटांमध्ये मुख्यतः विभागलेला आहे. वेस्टर्न सामोवा मुख्य बेट असले तरी सवाई आणि उपोलू अशी आणखी दोन बेटे आहेत. या उपोलू बेटावर देशाची राजधानी अपिया आहे. अपियामध्ये जवळजवळ तीस हजार लोकवस्ती आहे, या देशाच्या नागरिकात फार थोडे युरोपियन, चिनी आणि इतर पॅसिफिक देशामधील लोक आहेत. मुख्य लोकवस्ती सामोवान लोकाची आहे, सामोवान भाषा ऐकायला फार मंजुळ आणि लयकारी आहे. बहुतेक लोकांना इंग्रजी समजते. सामोवा हा देश आज संयुक्त राष्ट्रांचा सभासद असून आंतरराष्ट्रीय दिनरेषेच्या अगदी जवळ आहे. देशात एकूण ३६२ खेडी आहेत. प्रत्येक खेड्यात स्त्रियांची वेगळी समिती आहे. ती लोकांचे आरोग्य, भाजीपाल्याची घरगुती शेती आणि पारंपरिक कलाकौशल्याचा विकास हा कार्यक्रम अमलात आणतात.

पॅसिफिक महासागरात आंतरराष्ट्रीय दिनरेषा उत्तर दक्षिण गेलेली आहे ही दिनरेषा ओलांडली की दिवस बदलतो. नकाशाकडे पाहताना असे दिसते की, ही रेषा एके ठिकाणी मुद्दाम वाकवून फिजी, टोंगा, वेस्टर्न सामोवा इत्यादी देश एका भागात घातलेले आहेत. आणि याचे खरे कारण असे की, ही रेषा जर अशी वळवली नसती तर टोंगासारख्या देशात एका गावी रविवार आणि शेजारच्या गावात सोमवार अशी विचित्र अवस्था झाली असती. आंतरराष्ट्रीय दिनरेषा ही समजायला जरा अवघडच असा भाग आहे त्यामुळे दौऱ्याचे नियोजन करताना फारच धावपळीचे आणि गैरसमजुतीचे प्रकार होतात मुंबईहून निघताना माझाही असाच घोटाळा झाला सिडनेहून शनिवारी दुपारी ३ वाजता निघालेले विमान ८ तासाचा प्रवास करून पुन्हा आदल्या रात्री ८ ३० वाजता वेस्टर्न सामोवाला कसे पोचते आणि याच्या उलट परत येताना १२ जुलैला दुपारी निघून फक्त सहा तासाच्या प्रवासानंतर १३ जुलैला रात्री सिडनेला पोचतो त्यामुळे प्रवासातला वेळ आणि भूगोलाची वेळ याच्यातील मतभेद ज्या ठिकाणी पराकोटीला पोचतात, त्या रेषेला आंतरराष्ट्रीय दिनरेषा म्हणावे अशी नवीन व्याख्या मला सुचली आहे

सिडनेहून विमानाने आकाशात झेप घेतल्यापासून खाली सगळा निळा प्रशांत महासागर आणि भोवती आभाळात पारिजातकाची फुले तरंगत असावी असे लहान लहान पांढरेशुभ्र ढग दिसत होते. त्या पाण्याच्या निळाईमुळे त्या प्रकाशमान ढगाच्या तळभागाला एक निळी झळाळी आलेली दिसत होती. त्यामुळे निळ्या देठांची पारिजातके तरंगत जाताना पहावी असे एकसारखे वाटत होते. वेस्टर्न सामोवाची राजधानी अपियाला जाण्यापूर्वी, वाटेत न्यू कॅलिडोनिया या देशाची राजधानी नूमिए येथे विमान थांबले. पूर्वी मी या भागात आलो होतो पण अजूनही फ्रान्सपासून इतक्या लांब विमानतळावर फ्रेंच पोलिस आणि लयकारात गुंफलेली फ्रेंच भाषा ऐकताना थोडेसे वेगळे वाटत होते. प्रशांत महासागराच्या या भागात फ्रेंच सरकार आता अणुस्फोटाचे प्रयोग करीत आहे त्यामुळे या भागातील सारीच राष्ट्रे बिथरलेली आहेत. गंमत म्हणजे या अणुशास्त्रज्ञांच्या गटामध्ये

एकेकाळचे भारतीय असणारे दोघेजण आहेत. त्याचे सांगणे होते की, अणूचे प्रयोग करणे ऊर्जा विकासासाठी आवश्यक आहे. मग ते स्फोट गच्च लोकवस्ती असलेल्या भूविभागात करण्यापेक्षा समुद्राच्या तळाशी करणे अधिक हितकारक नाही का? अर्थात त्यांचे हे म्हणणे कोणालाच फारसे मानवणारे नाही. त्याच्या या प्रयोगामुळे प्रशांत महासागरातील जलजीवन आणि आसपासच्या देशातील लोकजीवन यांच्यापर्यंत विपरीत परिणाम होत आहे हे मात्र खरे. इतक्या लांब येऊन, गेली कित्येक वर्षे येथे काम करणारे जलविज्ञानाचे फ्रेंच संशोधक मला भेटले. त्यांचे मात्र कौतुक वाटल्यावाचून राहवत नाही येथील समुद्र गर्भाचा अभ्यास करणारा 'ज्यॉं' नावाचा शास्त्रज्ञ मला माहीत आहे मी भेटलो त्यावेळी हा ८२ वर्षांचा म्हातारा, प्रशांत महासागरातील मत्स्यजीवनाचा अभ्यास करीत होता मासे आणि प्रवाळ असलेले त्याचे खाजगी संग्रहालय कोणालाही अभिमान वाटावा अशा योग्यतेचे आहे. त्यांच्याशी बोलताना मला आपल्या राजा केळकर संग्रहालयाच्या दिनकरराव केळकराची फार आठवण झाली शेवाळ साचलेल्या दगडासारखा एक दगड त्यांच्याकडे पाहिला. 'ज्यॉं' मला म्हणाला याच्याइतका विषारी दुसरा मासा नाही काजव्याप्रमाणे स्वयंप्रकाशी असणारे मासे त्याच्याकडे मी पाहिले. रंगाचा कल्लोळ व्हावा अशा तऱ्हेची प्रवाळाची झाडे मी पाहिली. नाना तऱ्हेचे समुद्र शिंपले, शंख, शिंपा, खेकडे, कासवे या अफाट जलसंपत्तीचा, तो तपश्चर्या करून अभ्यास करीत होता. वयाने त्याच्याहून खूप लहान असणारी एकेकाळी त्याची विद्यार्थिनी असणारी त्याची बायको त्याला या कामात मदत करते या समुद्रसंपत्तीचा अधिक अनुभव मिळावा म्हणून त्याने मला स्नॉरकेलचा उपयोग करून पाण्याच्या तळाशी जायला शिकविले तो माझ्याबरोबर आला आणि अक्षरश: एखाद्या अद्भुत कथेत आपण वाचतो त्याप्रमाणे रुपे, माणकानी खचलेली झाडे असावी अशा रंगाच्या रानात - या प्रवाळाच्या रानात आम्ही जाऊन आलो. डोळ्यांचे पारणे फिटले त्याचवेळी त्या ठिकाणी असणाऱ्या व्हेल माशांचे प्रचंड कळप आणि इतर माशाचे मन लोभविणारे रंग पाहून डोळे तृप्त झाले कॅलिडोनिया सोडताना त्यांनी आठवण म्हणून या सर्व मासे आणि प्रवाळाच्या काढलेल्या स्लाइडस्चा एक सेट मला भेट म्हणून दिला अजूनही प्रशांत महासागर म्हटला की जलजीवनाचा अभ्यास करणारा हा ऋषितुल्य शास्त्रज्ञ मला आठवतो

## वेस्टर्न सामोवा

न्यू कॅलोडियापासून आणखी चार तास प्रवास केला म्हणजे वेस्टर्न सामोवाचा किनारा दिसू लागतो. आम्ही पोचलो तेव्हा रात्र झाली होती पण रात्रीच्या वेळीसुद्धा किनाऱ्याच्या उसळणाऱ्या लाटांचा जरीकाठ किनाऱ्याच्या काळ्या पोताला जडवलेला होता. विमानतळावर राजकीय स्वागत झाल्यानंतर हॉटेलकडे जाताना मोठमोठे मंडप असावेत अशा तऱ्हेची घरे मला दिसत होती जमिनीत तीन फूट खोल खांब रोवून आणि त्यावर फळ्या घालून केलेली ही अधांतरी घरे आणि त्यावर झावळांची घातलेली सुबक आणि सुंदर छपरे. आपल्याकडे छपरे एका किंवा दोन्ही बाजूला उतरती असतात. इथे छपरे चारी बाजूला उतरती असतात या घरांना कुठल्याच बाजूला भिंती असत नाहीत घर

म्हणजे एकसंध एकाला एक जोडलेल्या खोल्या अशी आपली कल्पना असते ही सामोवातली घरे अशा तऱ्हेची नाहीत. झोपायचे घर वेगळे, बैठकीचे घर वेगळे, स्वयंपाकाचे घर वेगळे. थोड्या थोड्या अंतरावर अशा एकेक खोलीचा बिनभिंतीचा मंडप, यालाच हे घर म्हणतात या घरांना 'फाले' म्हणतात. ज्यावेळी मी त्या लोकांना विचारले की, पावसाळ्यात काय करता? घरात पाणी येत नाही का? तेव्हा ते म्हणाले की, पावसाळ्यात भोवती गवताचे पडदे सोडण्यात येतात. पण माझे कुतूहल अजून होतेच, मी म्हटले या घरात खाजगीपणा कसा मिळतो? मुले आणि आई-बाप एकत्र राहत असताना आई-बापाना झोपायला वेगळी खोली नको का? त्यावर त्यांचे उत्तर असे होते की, या खाजगीपणाची काय जरुरी आहे? एक प्रकारच्या नैसर्गिक अशा वातावरणात ही मुले वाढतात. त्यामुळे त्यांना लिंगभेद, प्रजोत्पादन या विषयाबद्दल कुशंका असत नाहीत किंवा विकृत उत्सुकता नाही. या समाजाविषयी डॉ. मार्गारेट मीड या समाजशास्त्रज्ञ प्राध्यापिकेने एकेकाळी फार मोठे सशोधन केले होते सामोवन कुटुंबपद्धतीविषयी फार वादग्रस्त निष्कर्ष काढले होते परंतु आता त्याचे निष्कर्ष खोडून काढणारे नवीन सशोधन डॉ फ्रिमन नावाच्या समाजशास्त्रज्ञाने प्रसिद्ध केलेले आहेत. फालेमध्ये असणारे सामोवन स्वयपाकघर हेही वेगळ्याच तऱ्हेचे आहे. यज्ञाला वेदी करावी त्याप्रमाणे चार बाजूला लाकडे ठेवून त्याच्यावर विस्तव पेटवतात त्यानंतर त्याच्यावर विशिष्ट तऱ्हेने दगड रचतात दगड खूप तापले की त्याच्यावर आपल्याकडे तंदुरमध्ये चिकन भाजावे, त्याप्रमाणे ते मांस किंवा भाजीपाला भाजतात त्याच्यावर भांडी ठेवून स्वयंपाक केला जातो. त्यांच्या जेवणात नारळ आणि मासे यांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर केला जातो अशा तऱ्हेची अनेक घरे असणारी एक वस्ती म्हणजे एक कुटुंब. प्रत्येक कुटुंबात साधारणपणे ४०-५० माणसे असतात. भारतातील विस्तारित कुटुंबाप्रमाणे ही व्यवस्था आहे कुटुंबाचा जो प्रमुख असतो त्याला 'मताई' म्हणतात. केरळमध्ये असणाऱ्या 'मथाई'चा हा अपभ्रष्ट नामप्रकार असेल का? हे 'मताई' कुटुंबाच्या बाबतीतील सर्व निर्णय स्वतः करतात. एकदा मताई निवडल्यानंतर तो जन्मभर मताई राहतो मताई म्हणून निवडून येण्याकरिता पूर्वीच्या मताईची पुष्कळशी सेवा आणि बिनतक्रार आज्ञापालन करावे लागते सर्वसाधारणपणे २०-२५ च्या वयामध्ये माणूस मताई होऊ शकतो मताई झाल्यानंतर त्याचे चिन्ह म्हणून गुडघ्यापासून ओटीपोटापर्यंत हिरव्या रंगाने गोंदून अंगावर नक्षीकाम केले जाते. हे गोंदवण्याचे काम फार क्लेशकारक आहे. हाडाची तीक्ष्ण सुई करून, वनस्पतीपासून तयार केलेला हिरवा रंग, हातोड्याने ठोकून अंगात भिनवला जातो हे सर्व रंगकाम व्हायला सर्वसाधारणपणे ८ ते १० दिवस लागतात पुढे जन्मभर हे गोंदवलेले नक्षीकाम नाहीसे होत नाही सामोवा देशाच्या लोकसभेत जाण्याचा अधिकार फक्त 'मताई' मंडळींनाच आहे. इतरांना नाही 'मताई' नसलेल्या काही तरुणांना मी विचारले की, हे तुम्हाला कितपत योग्य वाटते? त्यावर ते म्हणाले की, आम्हाला योग्य वाटत नाही पण काही तडजोड म्हणून अलीकडे परदेशी शिकून आलेल्या मुलांना 'मताई' म्हणून निवडून देण्यात येते आजसुद्धा या 'मताई' मंडळींची समाजावरची पकड खूप घट्ट आहे. ज्याला आपण खेडे म्हणतो त्याला ते कुटुंब म्हणतात या कुटुंबात होणारी लग्ने, शेतजमिनीवरचा अधिकार,

मुलानी कोणते शिक्षण घ्यावे इत्यादी साऱ्या गोष्टींच्या बाबतीत 'मताई' या कुटुंबप्रमुखाचा निर्णय महत्त्वाचा असतो

## सामोवन माणसे

या संदर्भात आणखी दोन गमतीदार अनुभव आले पहिल्याच दिवशी परिषदेचे उद्घाटन करायला, वेस्टर्न सामोवाचे पंतप्रधान आले. पाश्चात्त्य पद्धतीने सूट घातलेले हे गृहस्थ आले आणि त्यांनी सामोवा भाषेमध्ये उद्घाटनाचे भाषण केले. व्यासपीठावर त्यांच्या शेजारी एक माणूस बसला होता, तो त्या देशाच्या पद्धतीप्रमाणे पंतप्रधानांचा 'प्रवक्ता' होता. कुटुंबाचा प्रमुख असणाऱ्या माणसाने फारसे बोलायचे नसते. या प्रवक्त्याचा वेष मोठा मजेदार होता थोडीशी गुडघ्याखाली येणारी लुंगी किंवा कोकणात पचा घालतात तसा, पण खूप रंगीत नक्षीकाम असलेला, असा पचा त्याला 'लावा लावा' म्हणतात, त्या माणसाने घातला होता. वर संपूर्ण उघडा, गळ्यात शंख-शिंपल्याची माळ आणि खांद्यावर गवताची विणलेली एक चवरी, पंतप्रधानांच्या भाषणानंतर या 'मताई' प्रवक्त्याने सुंदर इंग्रजीत उद्घाटनाचे भाषांतर करून सांगितले. सामोवाच्या समाजकल्याण सचिवाना मी विचारले, ही माणसे अशी उघडीबंब का? त्यावर ते म्हणाले, की उघडे राहणे हाच आमचा राष्ट्रीय पोषाख आहे. त्यामुळे एखाद्याने अंगात खमिस घातला तरी त्या माणसाला आपण नागवे असल्याप्रमाणे अशी लाज वाटते. अशा या अर्धनग्न देशात शिंप्यांची फार पचाईत होत असणार. या देशात बाजारात, रस्त्यात अनेक माणसे उघडी दिसतात अनेकांची अशी समजूत आहे की या भागातील माणसे आफ्रिकेतील निग्रो वंशाची माणसे आहेत. पण ही कल्पना सर्वस्वी चूक आहे. ही माणसे आपल्या केरळातील माणसे असावीत अशा रंगाची आहेत. केस आपल्यासारखेच पण उभे आणि वैशिष्ट्य म्हणजे ही सगळी माणसे स्त्री-पुरुष सारेचजण सर्वसाधारणपणे सरासरी सहा फूटापेक्षा जास्त उंच आहेत. हे लोक भीमकाय आहेत एका अर्थाने हा बलभीमांचा देश आहे असे म्हणावयास हरकत नाही. ज्या दिवशी परिषद संपली त्या रात्री जेवणानतर आभार मानायला एक माणूस उभा राहिला आणि तो प्रेक्षागारामधील एका कोपऱ्यात उभ्या राहिलेल्या एका उघड्याबरोबर 'मताई'शी बोलू लागला. याच्यानंतर दुसऱ्या कोपऱ्यातील एक मताई उभा राहिला आणि असे तीन-चार मताईंचे संभाषण सामोवान भाषेत पाच-दहा मिनिटे चालले होते सामोवामधील संयुक्त राष्ट्रांचे उपप्रमुख माझे मित्र श्री राम बात्रा याना मी विचारले की, हा काय प्रकार चालला आहे त्यावर ते म्हणाले की, कोणत्याही सभेमध्ये किंवा समारंभात अखेरचा शब्द फार महत्वाचा मानला जातो. त्यामुळे आभार मानणारा हा मोठा माणूस मानला जातो त्यामुळे आभार मानायला जो सरकारी अधिकारी उभा राहिला होता, तो स्वतः मताई असल्यामुळे, तो इतर मताईंच्यांशी चर्चा करून आभार कोणी मानावे, कसे मानावे याविषयी मताई मंडळींची समती घेत होता.

सामोवन माणूस हा जात्याच शांत, आरामप्रिय आहे. आयुष्यात थोडेफार कमवावे आणि आपल्या कुटुंबात आनंदात राहावे हीच त्यांची इच्छा असते. श्रीमंतीचा हव्यास येथे दिसत नाही. आपल्याला गुटगुटीत मुले असावीत, चांगलेचुंगले जेवू घालणारी बायको

असावी, स्वत:चे घर असावे, मासेमारीसाठी छोटी नाव (ज्याला आऊट-रिगर म्हणतात) असावी, थोडी नारळाची झाडे, थोडी केळीची झाडे आणि थोडीशी डुकरे जवळ असावी आपल्या फालेचा किंवा परिवार ग्रामचा मताई होता आले तर त्याला पृथ्वीवर स्वर्ग असल्यासारखे वाटते. सामोवन माणसाला समारंभाची, खेळण्याची, गाण्याची, नृत्याची फार आवड आहे. दररोजच्या जीवनातील प्रत्येक प्रसंगाचे समारभात वा आनंदोत्सवात रूपांतर कसे होईल हे ते पाहतात घरी आलेल्या पाहुण्याला 'कावा' नावाची मदिरा देण्याचा समारभ जपानच्या चहा समारभाप्रमाणे असतो सामोवात क्रिकेट मात्र थोडेसे वेगळे आहे. बेस बॉल आणि क्रिकेट याचा संकर त्यांनी आपल्या खेळात केलेला आहे याचा नृत्यप्रकारही प्रथमदर्शनी थोडासा आडदांड वाटतो. आपण कुस्तीला उभे राहिल्यानतर जसे दड थोपटतो, शड्डू मारतो त्याप्रमाणे आविर्भाव करून स्त्रिया आणि पुरुष मनसोक्त नाचत असतात. आपल्याकडील मंगळागौरीच्या खेळात आगोटा पागोटा किंवा झिम्मा, घसरफुगडी खेळतात त्या साऱ्यांचे मिश्रण करून ढोल-मृदंगांचा कल्लोळ केला की सामोवन नृत्यासारखे वाटेल पॉलिनेशन वंशात सामोवान लोक हे अत्यंत शुद्ध वंशाचे आहेत असे ते मानतात लोक अतिशय विनयशील आणि मायाळू आहेत. त्यांच्या कुटुंबाला 'आईना' असे म्हणतात. या विस्तारित कुटुबामध्ये केवळ रक्ताचे नातेच नव्हे तर लग्नाने आणि स्नेहाने झालेली नातीसुद्धा सामा[illegible] जातात सर्वजण मिळून शेतात एकत्र काम करतात. एकत्र चर्च बांधतात आणि आपल्या मताईच्या आज्ञेत राहतात. घरात लग्न ठरवायचे असेल तर सारे कुटुंब एकत्र बसून ते लग्न ठरवावे की न ठरवावे याचा विचार करतात. पण एकदा ठरल्यावर सारेजण नवरा-नवरीसाठी पोषाख आणि मेजवानीचे पदार्थ आणतात सामोवा समाजरचनेत विस्तारित कुटुंबाला फार महत्त्वाचे स्थान आहे

## गोष्टीवेल्हाळ सामोआ

आमची उतरण्याची व्यवस्था ज्या हॉटेलात केली होती, त्या हॉटेलचे नाव "तुसीताला" 'तुसीताला' शब्दाचा अर्थ गोष्टीवेल्हाळ असा आहे. सुप्रसिद्ध इंग्रजी लेखक रॉबर्ट स्टिफन्सन हा पॅसिफिकच्या प्रेमात पडला आणि तो सामोवात आला. सामोवाचे वैशिष्ट्य असे की एका बाजूला डोंगर सोडला तर तिन्ही बाजूला क्षितिज निळे, सागराचे पाणी निळे आणि मागे हिरवागार डोंगर, अशा छान जागेच्या प्रेमात तो कथालेखक न पडला तरच नवल. राहून राहून मनात आले, आमचे मित्र व्यंकटेश माडगूळकर यांनी 'या' गावाकडच्या गोष्टी किती झकास लिहिल्या असत्या. स्टिफन्सन हा या देशाच्या इतका प्रेमात पडला की त्याची शेवटची कविता म्हणजे समाधीलेख आहे तो असा

*ह्या विशाल चांदण्यानी खचलेल्या,*
*निळ्याशार आभाळाखाली*
*एक साधी समाधी बांधा,*
*माझ्या चिरनिद्रेसाठी–*

*इथे आनंदात राहिलो,*
*आनंदाने चाललो,*
*सारी आनंदयात्रा, याच मातीच्या*
*कुशीत शांत झोपावे म्हणून–*
*माझ्या समाधीवर*
*हाच लेख असावा*
*'इथे शांत पहुडला आहे हा,*
*इथलाच तो, इथेच राहणार–*
*सात समुद्र ओलांडून,*
*जन्मोजन्मीच्या प्रवासानंतर*
*सापडलेल्या स्वतःच्या*
*समाधी–निकेतनात–*

स्टिफन्सन मेल्यानंतर रात्री फार मोठी मिरवणूक काढून, चुडी पेटवून त्याच्या प्रकाशात त्यांनी स्टीफन्सनला डोंगराच्या शिखरावर नेऊन चिरसमाधी दिली त्याच्या या भूमीवरचे प्रेमाचे प्रतीक म्हणून त्या रस्त्याला आजही प्रीति–मार्ग असे म्हटले जाते. स्टिफन्सन ज्या घरात राहिला ते घर आता राष्ट्रपती भवन झालेले आहे स्टिफन्सन हा कथाकार, गोष्टीवेल्हाळ म्हणून त्याला 'तुसीताला' असे म्हणतात त्याच्या नावाने एक सुंदर हॉटेल बांधण्यात आलेले आहे, तेच 'तुसीताला' हॉटेल म्हटल्यानंतर आपल्या या डोळ्यांसमोर उंच इमारत, गर्दी, गडबड, एक व्यावसायिक अलिप्तता आणि कृत्रिम आपुलकी असे चित्र उभे राहते पण तुसीताला हे हॉटेल अजिबात तसे नाही. दोन मजल्यांची छोटी छोटी बगलीवजा घरे असे या हॉटेलचे स्वरूप आहे. खूप मोठी खोली आणि वातानुकूलित. पण खोलीबाहेरच्या गच्चीतून पाहिले तर हाताला लागतील इतक्या जवळ, पिवळ्या चाफ्याच्या फुलांनी बहरलेली झाडे, हिरवा गालीचा घालावा असे सर्वत्र लॉन्स, जेवणघरात घरच्यासारखे केळ्यांचे लगर टांगलेले. 'लावा लावा' घातलेली सेवातत्पर मंडळी. त्यामुळे या हॉटेलमध्ये राहणे फार सुखद झाले दिवसा भोवतालची फुले पाहावीत, रात्री चांदणे पाहावे, लांब दृष्टी पोहोचेल तिथे स्टिफन्सनचा डोंगर, दुसऱ्या दिशेला नजर पोचणार नाही तिथपर्यंत निळ्या क्षितिजाला सागराने कवेत घेतलेले, याहून स्वर्ग तरी काय वेगळा असणार? एक जुना चित्रपट आहे त्याचे नाव 'रिटर्न टू द पॅराडाइज' गॅरी कूपरने काम केलेला हा चित्रपट. त्याची कुणीतरी आठवण काढताच एकाने मला सांगितले की, त्या चित्रपटाचे चित्रीकरण वेस्टर्न सामोवात 'पॅराडाइज बीच' या एका समुद्र किनाऱ्यावर झालेले आहे. मुळापासून वाकून उंच वाढलेली माडाची झाडे आणि किनाऱ्याकडे प्रचंड गर्जना करत येणाऱ्या लाटा, हिरव्या–निळ्या पाण्यावर उधळलेला तो मोत्यांचा चूर, त्यावर घातलेले निळ्या आभाळाचे झाकण, खरोखरच अतिशय विलक्षण अशी ही जागा आहे

## कुटुंबरचना

सामोवा समाजामध्ये कुटुंबरचना ही विस्तारित कुटुंबाची आहे त्यामुळे प्रत्येक खेडे किंवा कुटुंब हे आपापल्या परीने स्वयंपूर्ण असते. सर्व प्रशांत महासागरात ख्रिस्ती धर्माचा पगडा मोठा आहे त्यामुळे वाक्यात स्वल्पविराम वारवार यावेत त्याप्रमाणे ठायी ठायी क्रॉस मिरवणारी चर्चेस् दिसतात. यांचा आकार आपल्याकडील चर्चसारखा नसतो पुष्कळदा एखाद्या 'फाले'चे रूपांतर चर्चमध्ये केलेले असते धर्माची पकडही मोठी असल्याने प्रत्येक सभेच्या सुरुवातीला व शेवटी प्रार्थना हा कार्यक्रम पत्रिकेचा एक अविभाज्य भाग होतो. या समाजामध्ये मताईच्या खालोखाल महत्त्व धर्मगुरूना आहे. हे धर्मगुरू लग्ने करतात, खूप श्रीमंतही आहेत. त्यामुळे मुली लग्नाचा विचार करताना मताई किंवा धर्मगुरू यांच्याशी लग्ने करण्याची स्वप्ने पाहात असतात या समाजात गरिबी आहे, पण दास्यत्व देणारी पिळवणूक नाही. धर्म आहे पण धर्माचा वितंडवाद नाही. आता आता कुठे तिथे बहाई धर्माची मंडळी येऊन त्यानी आपले धर्ममंदिर बांधले आहे शेजारच्या फिजीसारख्या देशामधून भारतीय पुष्कळ असल्यामुळे त्यांचा हिंदू धर्माशी परिचय आहे. राष्ट्राची राजधानी अपिया ही आपल्या एखाद्या जिल्ह्याच्या गावासारखी आहे. इमारती बहुधा एकमजली फार तर तीन मजली. मुख्य रस्ते दोन किंवा तीनच. दुसऱ्या दिवशी परिषदेला जाण्यापूर्वी हॉटेलच्या जवळच मंडईत आम्ही गेलो. ही मंडई पुण्याच्या मंडईइतकी मोठी नसली तरी बरीच मोठी आहे. यात सर्व तऱ्हेची फळे, मांस-मासे, इतर किराणा सामान मिळते. पण या ठिकाणी तारू नावाचे एक प्रकारचे मूळ विकत मिळते. एखाद्या केळीच्या झाडाचा बुंधा असावा इतके मोठे पण चवीला रताळ्यासारखे ते लागते. सामोवामध्ये गहू वा बाजरी घेण्याऐवजी तारोचे गोल तुकडे भाकरीसारखे भाजून खाल्ले जातात.

## समाजरचना

या देशात साक्षरतेचे प्रमाण जवळजवळ ८० टक्के आहे. शहरात किंवा खेड्यात जुगार किंवा वेश्या व्यवसाय नाहीच सर्वसाधारणपणे लग्ने प्रेमातून होतात. ठरविली जात नाहीत. या देशामध्ये इंग्रजी वृत्तपत्रे फक्त दोनच आहेत आणि बाकी चार सामोवन भाषेत आहेत खूप खपतात परंतु रोज निघणारी इंग्रजी वृत्तपत्रे फक्त दोनच आहेत. आणि बाकी आठवड्यातून दोनदाच निघतात. या वृत्तपत्रात काय मजकूर येतो याची पाहणी केली तर असे दिसते, की सर्वसाधारणपणे ज्याला बातमी म्हणता येईल म्हणजे माणसाला कुत्रा चावला, आग लागली, गुन्हेगारी, दगा अशा तऱ्हेच्या बातम्या या वृत्तपत्रातून फारशा दिसत नाहीत कारण अशा बातम्या इथे घडतच नाहीत पोस्टमास्तराची बदली किंवा शाळामास्तरांच्या मुलीचे लग्न ठरले अशा बातम्या. सारे वातावरण इतके शांत आहे की जवळजवळ हा बातम्या नसलेला देश आहे असे म्हणायला हरकत नाही सामोवामध्ये १.६० दशलक्ष लोकसंख्या आहे आणि या लोकसंख्येत १० हजार मताई किंवा कुटुंबप्रमुख आहेत. या देशाच्या लोकसभेमध्ये या १० हजारांनी निवडलेले ४२ सदस्य

आहेत. या ४२ संसद सदस्यांत फक्त दोन स्त्रिया आहेत कुटुंबात किंवा खेड्यामध्ये, एकमेकांना उपयोगी पडत राहण्याची प्रवृत्ती दिसते. सर्वसाधारपणे लोकांना खाजगी जीवन आणि समाजजीवन यामध्ये फारसे अंतर ठेवण्याची सवय नाही. त्यामुळे देशातील प्रत्येकजण दुसऱ्याचा नातलग, स्नेही असतो. छोट्या खेड्यात जशी अनामिकता असूच शकत नाही, त्याप्रमाणे या देशात कोणापासून लपवून काहीही करता येत नाही. या देशात जवळजवळ ५५ टक्के तरुण वयातील माणसे आहेत गरिबीचा विचार केला तर जवळजवळ ७० टक्के माणसे गरिबीत राहतात असे दिसते पण गरिबीतही ही माणसे आनदात राहताना दिसतात

## सामोवान संस्कृती

या देशाची संस्कृती जवळजवळ दोन हजार वर्षांइतकी जुनी आहे या देशात भरपूर सूर्यप्रकाश आणि उत्तेजक थंड हवा आहे. देशाच्या किनाऱ्याभोवती समुद्रात जवळजवळ एक मैलाचा परिसर प्रवाळांनी भरलेला आहे. पॉलिनियेशन सस्कृतीचे माहेर म्हणून सामोवा प्रसिद्ध आहे सामोवाच्या उत्तरेकडे हवाई, पश्चिमेकडे इस्टीन बेटे आणि दक्षिणेकडे न्यूझिलंड आहे. या संस्कृतीचा आणि देशाचा इतिहास जरी जुना असला तरी पाश्चात्यांना मात्र त्यांची ओळख १७२२ साली डच आणि फ्रेंच नाविकांनी करून दिली त्यांच्यानतर खिस्ती मिशनरी आले सामोवा लोककथेमध्ये 'टागा लोआ लागी' नावाचा एक राजा स्वर्गामधून उतरून आला होता. साऱ्या प्रशांत महासागरावर त्याचे राज्य पसरलेले होते, या राजाचा मुलगा 'ल्यू' हा वाईट प्रवृत्तीचा असल्यामुळे त्याला पदभ्रष्ट करण्यात आले. तेव्हा तो दुसऱ्या बेटावर पळून गेला. या भागात संपत्ती म्हणजे कोंबड्या, तेव्हा त्याने आपल्या कोंबड्या (ज्यांना सामोवा भाषेत मोआ म्हणतात) तारेच्या कुंपणात ठेवल्या. त्या कोंबड्या युवराजाच्या असल्यामुळे पवित्र मानलेल्या होत्या (सामोवा भाषेत पवित्रला 'सा' म्हणतात) त्यामुळे ज्या बेटावर पवित्र कोंबड्या ठेवल्या त्याचे नाव सामोवा असे पडले. लोककथा अशी आहे की एके दिवशी 'टागा लोआ' राजाने मासेमारांना मासे पकडायला पाठवले. सागरावर खूप आत जाऊनसुद्धा त्या मच्छिमारांना मासे न मिळाल्यामुळे ते व्याकुळ झाले. त्यांनी या बेटावर कोंबड्या पाहिल्या आणि त्यांना पकडायला सुरुवात केली. युवराज 'ल्यू'ला हे कळताच त्याने युद्ध पुकारले. राजाला ही लढाई आपल्याच मुलाविरुद्ध आहे ही बातमी मिळाल्यावर, त्याने हे युद्ध थांबविले आणि आपली दुसऱ्या बायकोची मुलगी ताताई लागी हिचा विवाह युवराज ल्यूबरोबर करून दिला. भारतीय इतिहासात यम आणि यमी यांची जी कथा आहे त्यासारखीच ही गोष्ट आहे.

त्यानंतर युवराज ल्यूचे राज्य साऱ्या प्रशात महासागरावर पसरले इसवी सन १५० मध्ये शेजारच्या टोंगा बेटातील लोकांनी सामोवावर ताबा मिळवला. काही दिवसांपर्यंत त्यांचे राज्य होते. इसवी सन १२५० मध्ये त्यांचा पराभव करून सामोवा पुन्हा स्वतंत्र झाले. त्या शूर लोकांच्या शौर्यदर्शक सामोवन शब्दांचा अपभ्रंश म्हणजे 'मालिटोवा' हे एका बेटाचे नाव झाले. १८७५ साली कर्नल स्टियो बेरगल या अमेरिकेच्या प्रतिनिधीने आपापसातील यादवी युद्धाचा शेवट करून एक मध्यवर्ती सरकार

केले. दुसऱ्या महायुद्धात जपानी लोकानी या भागाचा ताबा मिळविला, परतु युद्धानंतर सामोवाने स्वतत्र सरकार स्थापन झाले

सामोवा देशात मुख्य व्यवसाय शेतीचा आणि मच्छिमारीचा आहे. 'अपिया' शहराच्या जवळ जो प्रवाळांचा भाग आहे त्या भागात जलचर सपत्ती फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्या समुद्रात पाण्याखालचे छायाचित्रण करण्याकरिता आणि प्रवाळांची शोभा बघण्याकरिता अनेक लोक जातात. प्रवाळांच्या संरक्षणाकरिता विशेष व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सामोवा सोडण्यापूर्वी सामोवा खेड्यात काही घरांमध्ये जाण्याचा प्रसंग आला. लोकांच्या वागण्यात आदब आणि शिष्टाचार फार दिसतो. घरामध्ये आत येताना परवानगी मागणे, घराच्या प्रमुखाशी बसून न बोलणे, घरी बसताना पाय न पसरता नीट मांडी घालून बसणे, चालतचालत न खाणे, कुटुंब प्रमुखाला आदर दाखविण्याकरिता तो समोरून येताना दिसला तर घोड्यावरून उतरणे किंवा छत्री मिटणे, 'कावा' प्यायला दिल्यानंतर त्याचे २-३ थेंब भूमातेला प्रसाद म्हणून सांडणे, अशा तऱ्हेचे अनेक शिष्टाचार तिथे आहेत. शेवटच्या दिवशी आम्हाला मोठी मेजवानी दिली होती. जमिनीवर बसून मांडी घालून, केळीचे पान समोर ठेवून हे जेवण होते. फणसासारखे एक फळ, रताळ्यासारखे कंद, अननस, केळी आणि इतर फळे, मासे, डुकराचे मांस आणि पालोली किंवा पालोसामी हे नारळाच्या दुधात शिजवलेले तारो झाडाचे कंद देण्यात आले. जेवणानतर मनसोक्त नाच आणि त्यानंतर पूर्वी सांगितल्याप्रमाणे आभार मानण्यापर्वी [illegible] परवानगी घेऊन आभार मानण्याचा समारभ झाला.

सामोवा देशात सामाजिक असे प्रश्न फारसे नाहीत खरा प्रश्न जो आहे तो संपूर्ण विकासाचा आणि विकासाच्या संदर्भात शिक्षण, आरोग्य यांच्या सुविधा निर्माण करण्याचा आहे. इतिहासाचा बराचसा काळ निद्रितावस्थेत घालवल्यानंतर जागे झालेले सारे पॅसिफिक देश आहेत आणि त्यामध्ये वेस्टर्न सामोवा हा एक पुढारलेला देश आहे. जुन्या संस्कृतीचे जतन करता करता या देशाला विकसित देशांच्या पातळीवर कसे आणता येईल यासाठी खूप प्रयत्न केले जात आहेत. एक मात्र निखळ सत्य आहे की सामोवा हा अतिशय लोकविलक्षण, सुंदर आणि शांत असा देश आहे. त्यांच्या लोककथेत म्हटले आहे की, एकदा स्वर्गाला अवकाशात फिरण्याचा कंटाळा आला आणि तो म्हणाला कुठे तरी समुद्रकाठाला सुंदर जागी जाऊन उतरावे, ज्या ठिकाणी तो स्वर्ग उतरला तो सामोवा. याच्या सौंदर्याचा मोह पडून स्वर्गाला परत जावेसे वाटेना म्हणून तो जिथे कायमचा राहिला त्या देशाचे नाव वेस्टर्न सामोवा.

(केसरी)

# ११

## झाकलेली अस्पृश्यता

# जपान

कोणत्याही समाजरचनेमध्ये, मग ती लोकशाहीची असो, किंवा साम्यवादी असो, माणसामाणसांत फरक हा राहतोच. जोवर हा फरक व्यक्तिगत पातळीवर असतो, जोवर प्रत्येक माणसाच्या शारीरिक किंवा मानसिक गुणावगुणावर किंवा कष्टावर त्याची प्रगती अवलंबून असते, तोपर्यंत हा फरक बोचरा असत नाही. पण ज्यावेळी माणसामाणसांत त्याच्या जन्मावरून, जातीवरून, रंगावरून किंवा वंशावरून फरक केला जातो, त्यावेळेला त्या भेदभावाला सामाजिक स्वरूप येते. अमेरिकेतील कृष्णवंशीय मंडळी, भारतातील हरिजन आणि आदिवासी हे या प्रश्नाची ठळक उदाहरणे आहेत ज्यावेळी हा जातिभेद सामाजिक आचरणाचे, मूल्यकल्पनेचे स्वरूप धारण करतो त्यावेळी त्यातून अस्पृश्यता निर्माण होते एकत्र जेवायचे नाही, एकत्र राहायचे नाही, रोटीबेटी व्यवहार बंद, अशा स्वरूपाच्या संकुचित सामाजिक अपसंबंधातून अस्पृश्यता व्यक्त होत असते. याच्या पाठीमागे एका समाजाने दुसऱ्या समाजाला हीन लेखण्याचा, अहंभाव असतो. हा खोटा अहंभाव शतकानुशतके उराशी जपल्यामुळे त्या सामाजिक व्यवहाराला, परंपरेने दिलेले एक आर्थिक पिळवणुकीचे वा राजकीय स्वार्थाचे स्वरूप प्राप्त होते.

या प्रश्नाचा विचार करताना असे लक्षात येऊ लागले आहे की, भारतातील जातिभेदाची तुलना जगातील इतर समाजातील अस्पृश्यतेशी करणे शक्य आहे. अमेरिकेतील अथवा आफ्रिकेतील कृष्णवर्णीय आणि श्वेतवर्णीय अगदी वेगवेगळ्या वंशाचे आहेत. त्यांच्यात पुष्कळदा भेदभाव होतो. मध्य पूर्वेतील शिया व सुनी, युरोपातील ज्यू व ख्रिश्चन हे एकाच वांशिक गटाचे आहेत. पण त्यांच्यात सामाजिक अंतर आहे. तीच गोष्ट जपानमधील अस्पृश्यतेची आहे. अशा तऱ्हेच्या तौलनिक सामाजिक अभ्यासातून या अवघड प्रश्नाच्या सोडवणुकीची दिशा दिसेल. म्हणून मी अनेक देशातील भेदभावांचा विचार करू लागलो. दक्षिण अमेरिकेतील

स्वतःला पूर्वभारतीय समजणारे सामाजिक गट, अमेरिकेतील कृष्णवर्णीय मंडळी याचे प्रश्न दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णियाचा लढा, मध्यपूर्वमध्ये शिया आणि सुनी मुसलमान गट याच्यातील तणाव, ऑस्ट्रेलियात गोरे आणि आदिवासी यांचा लढा, भारतातील बोहरा जमातीमधील सुधारक व सनातनी याचा लढा असे अनेक तणाव आहेत. असे सागतात की, भारतात पारशी किंवा शिख समाजातहि थोड्याफार प्रमाणात अस्पृश्य मानला गेलेला असा एक गट आहे. असे अनेक सामाजिक प्रश्न मला दिसू लागतात. पण तुलनेसाठी मी जपानचा प्रथम विचार करतो

## जपानमधील अस्पृश्यता

अलीकडेच माझ्या लक्षात असे आले की, औद्योगिक आणि आर्थिक दृष्टीने सपूर्णपणे विकसित झालेल्या जपानसारख्या देशातही अस्पृश्यता आहे आणि ही अस्पृश्यता कित्येक शतके, म्हणजे जवळजवळ दुसऱ्या शतकापासून ते आजतागायत, थोड्याफार प्रमाणात अस्तित्वात आहे. जातिभेद व्यक्त करण्याचे प्रकार प्रत्येक शतकात बदलत गेले, तरीही समाजाचा एक भाग दुसऱ्या भागापेक्षा हीन आहे, अशी भावना या सामाजिक व आर्थिक सबधातून अजूनही दिसते

जपानमध्ये १००-१२५ वर्षांपूर्वी घडलेली एक गोष्ट आहे. १८५७ साली 'मसाकी इनारी' नावाच्या देवळामध्ये एक घटना घडली. हे देऊळ 'सान्या' जिल्ह्यात (आताचे टोकिओ) घडली. एक दिवस देवळात 'असाकूसा का को इऊची' या जमातीचा एक माणूस आला लगेच देवळात हजर असलेल्या भाविकांची कुजबूज सुरू झाली, 'अरे तो पहा देवळाच्या आवारात एक 'इटा' (हरिजन) आलेला आहे ताबडतोब काही माणसे ओरडू लागली. 'अरे शूद्रा, गलिच्छ माणसा, तुला आमच्या देवळात पाऊल टाकून देऊळ अपवित्र करण्याचे धाडस तरी कसे झाले, तुझ्या या येण्यामुळे देवाचा कोप होईल, येथे कोणालाही प्रार्थना करता येणार नाही.' यावर तो 'इटा' जातीचा माणूस उत्तरला, 'ईश्वराजवळ येऊन मी त्याची पूजा केली तर त्यात काय बिघडले? तो जसा तुमचा ईश्वर आहे तसाच तो माझाही भगवान बुद्ध आहे. तुम्ही जशी माणसे आहात तसाच मीही माणूस आहे. या प्रश्नोत्तरानंतर भोवतालच्या समाजात गडबड सुरू झाली लोक रागाने शिवीगाळ करू लागले, 'अरे त्या 'इटाला' ठार मारा अशी हाकाटी केली कोणी तरी पुढे येऊन आपल्या 'सामूराई तलवारीने' त्या तरुणाचे शीर धडावेगळे केले. रस्त्याच्या कडेला ते प्रेत टाकून देण्यात आले. 'काकोइउची' जमातीचे लोक आले त्यांनी ते प्रेत अंत्यसस्कारासाठी उचलले, त्यांच्यात रडारड सुरू झाली दुसऱ्या दिवशी काकोइउची जमातीच्या पचानी याविषयीची तक्रार त्या जिल्ह्याच्या प्रमुख न्यायाधीशांकडे केली. त्यांना म्हणाले, "आमच्यावर अन्याय झाला, ह्या गुन्हेगाराला शिक्षा व्हावी ही आमची मागणी आहे." जाती बंधनाने बांधलेला तो न्यायाधीश तरी काय करणार? काय उत्तर द्यावे याचा खूप विचार करून शेवटी तो म्हणाला, "या गुन्ह्याबाबत मी काहीही करू शकणार नाही, केवळ एक 'इटा' मारला

गेलेला आहे आणि तुम्हाला हे माहीत आहे की कुठल्याही सामान्य जपानी माणसांच्या तुलनेने एक 'इटा' याच्या आयुष्याची किंमत एक सप्तमांश इतकीच आहे तेव्हा यासाठी काही करायला हवे असे वाटत नाही''

## भेदाभेदाचा इतिहास

ही गोष्ट जरी जुनी झाली तरी यातून सर्वसामान्य जपानी माणसाच्या तुलनेने 'इटा' जमातीतील माणसाची कमी किंमत, त्यांच्याविषयी असणारी तुच्छतेची भावना जास्त आणि त्यामुळे त्या तथाकथित अस्पृश्यांना आलेली निराशा आणि राग याचे चांगलेच दर्शन होते. आज अस्पृश्यतेकरिता कोणाला ठार मारले जात नाही, पण आजसुद्धा बुराकू जमातीच्या माणसांची किंमत इतर जपानी माणसांच्या तुलनेने कमी मानली जाते माणसानी माणसाला कमी लेखण्याची ही घटना वस्तुस्थिति आहे. केवळ जपानमध्ये येऊन स्थायिक झालेली अनेक कोरियन माणसे आहेत या कोरियन मंडळींनाहि अशा तऱ्हेने, दुजाभावाने हीन मानले जाते. परतु ज्या लोकांना ही 'ऐनू' किंवा हीन लेखण्याची पार्श्वभूमी आहे अशा 'मिकाइहो बुराकू' जातीला मात्र इतरांच्यापासून खूपच वेगळे वागविले जाते. जपानमधील या अस्पृश्यतेचा विचार करताना तो जपानच्या समाजरचनेच्या संदर्भात आणि त्यांच्या इतिहासाच्या आणि परपरांच्या ओघातच करायला हवी अशा अभ्यासातून आपल्याला या परंपरांचे धागेदोरे दिसू लागतात. हा जातीभेद केला जातो कारण या मागे अशी एक सुप्त भावना आहे की ज्याला उच्च खानदानी रक्ताचा जपानी वंश म्हणता येईल अशा तऱ्हेचा एक वश आजही जपानमध्ये अस्तित्वात असून, इतर सर्व माणसे खालच्या दर्जाची आहेत. जपानी इतिहासात 'मा ईजा ताईशो' आणि शोवा या वंशातील सम्राटानी वांशिक श्रेष्ठतेच्या खोट्या कल्पनात जपानी समाजाला बद्धमूल करून ठेवले. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र या विषयीची एक नवी जाणीव जपानी समाजात निर्माण झाली आणि आज जपानमध्ये असलेल्या वंश, मिश्रणाविषयी नवी जागती दिस लागली आता वंशश्रेष्ठता हे एक थोतांड आहे असे पुष्कळांना हळूहळू पटू लागले आ.

जपानी बेटामध्ये आदिकाळा राहणाऱ्या वांशिक गटापैकी 'ऐनू' हा एक लोकसमूह आहे. 'ऐनू' लोकात खूप केस असणे (ज्यांचा संबंध कॉकेशियन वंशाशी लावला जातो) अशा तऱ्हेचे वांशिक गुण, त्यांचे जपानी समाजातले वेगळेपण सिद्ध करतात. याखेरीज आशियामधील पॅसिफिकमधील अनेक वंश जपानात येवून, त्याचेही काही मिश्रण या समाजात झालेले आहे असे दिसते. विशेषत: चीन, कोरिया या भागातील लोक जपानमध्ये येऊन, त्यांचे लग्नसंबंध होऊन, एक मिश्र व्यवस्था निर्माण झालेली आहे. त्यामुळे एकेकाळी जपानमध्ये जी माणसे असे मानत असत की, आपला वंश हाच एक शुद्ध जपानी वंश आहे, त्यांनासुद्धा आता तसे म्हणणे सोयीचे वाटत नाही कोरियन वंशाचा खूप मोठा पगडा जपानी समाजावर आहे हे जरी खरे असले तरी कोरियन मंडळींना वेगळे वागविले जाते. पण बुराकू

माणसाला मात्र अधिक हीन लेखून वागविले जाते.

## इतिहासाचा धावता आढावा

केवळ इतिहासाचाच विचार केला तर असे दिसते की, ख्रिस्ती युगापूर्वी पाच हजार वर्षे जपानमध्ये सापडलेली दगडांची हत्यारे आणि इतर साधनांवरून असे दिसते की, येथे 'जामोन' नावाची माणसे राहात असत. तिसऱ्या शतकात शेतीवर आधारलेल्या समाजरचनेला सुरुवात झाली. शेतीवर जगणाऱ्या माणसांना 'यायोजी' असे म्हणत असत. या काळात लिखित भाषा नव्हती. लवकरच चीनमार्गे, बुद्धधर्मीय माणसे जपानमध्ये आली. त्यांच्याबरोबरच चित्रलिपीची ओळख जपानला झाली. तिसऱ्या शतकातील एका चिनी लेखात जपानच्या बेटांना 'वा' आणि 'यमताई' अशी नावे दिलेली आढळतात. या देशावर राज्य करणारी एक जादूगार राणी आहे असे सांगून तिचे नांव 'हिमिको' किंवा सूर्यकन्या असे होते असे त्यात लिहिलेले आहे. चौथ्या शतकाच्या सुमाराला समाजाची श्रमकर्मानुसार विभागणी होऊ लागली असे दिसते. एक गट हा शेतकरी आणि व्यावसायिक हस्तकलेत गुंतलेल्या लोकांचा होता. या लोकांना घर बांधण्याचा अधिकार होता. त्यांच्या हाताखाली काम करणारा, थोडाफार दासवर्ग होता त्यांना स्वतःचे घर, पैसा अथवा जमीन नसे. या लोकांना 'नूही' म्हटले जात असे. हे लोक सर्वसाधारणपणे गुलाम मानले जात होते. चित्रलिपीमध्ये हा शब्द लिहितानासुद्धा ही माणसे हीन आहेत, अस्पृश्य आहेत असे दाखविणारी चित्राक्षरे तयार करण्यात आलेली होती. या दलितांना प्रतिकार करणे शक्य नव्हते. त्यामुळे जी कामे करायला सर्वसाधारण माणसाला कमीपणाचे वाटेल, जी कामे गलिच्छ आहेत किंवा भयकारी आहेत ती कामे या मंडळींना देण्यात येत असत भारतीय समाजात भंगीकाम, ढोरे ओढण्याचे काम दलितांना शतकानुशतके दिले गेले. त्याची खेदकारी आठवण या संदर्भात होते. वर्षानुवर्षे तीच कामे करीत राहिल्यामुळे या 'ऐनू' समाजातही असे वाटू लागले की ही कामे मुळातच आपली आहेत. या कामांना जपानी भाषेत शब्द आहे तो म्हणजे 'के गारे'. के गारेचा शब्दशः अर्थ अस्वच्छ, हीन, कलंकित किंवा पापी असा आहे. जपानी संस्कृतीमध्ये के गारेची कल्पना खूप महत्त्वाची आहे. शिंटो धार्मिक संस्कृतीमध्ये 'के गारेला' विरोधी शब्द म्हणून 'हराई' किंवा शुद्धीकरण असा शब्द प्रचलित होता. हा 'के गारे' कलंक ज्यांना लावला गेला ती माणसे समाजामध्ये अगदी दुय्यम होती. सम्राटाबरोबर या दासांना थडग्यात जिवंत समाधी घ्यावी लागत असे.

सहाव्या ते नवव्या शतकामध्ये चिनी सुधारणेचा जपानी संस्कृतीवर पुष्कळ परिणाम झाला. यामुळे जपानला लिखित भाषा मिळाली. प्रथमच जपानचा इतिहास लिहिला गेला. या काळात स्त्रियांना समान दर्जा नव्हता. याच काळात 'नारा' हे शहर चीनच्या शहरांच्या धर्तीवर बांधण्यात आले. हे प्रचंड बांधकाम करण्याकरता त्यांना अनेक मजुरांची आणि गुलामांची जरुरी होती. त्यामुळे त्या काळात काही

जातींना हीन मानण्याची परंपरा अधिकच बळावली या वेठबिगारीला कटाळून कामावर आणलेल्या मजुरांपैकी वीस टक्के मजूर पळून जात असत असेही उल्लेख सापडतात याच काळात म्हणजे सातव्या शतकामध्ये 'टेका' सुधारणा अंमलात आल्या, घरांची नोंदणी करण्यात आली वागण्याचे नियम घालून देण्यात आले, समाजाची विभागणी पाच गटात करण्यात आली आणि त्यातील सगळ्यात खालचा गट म्हणजे 'नूही' गुलामांचा गट मानला गेला. या गुलामांना घरच्या पाळलेल्या प्राण्यापेक्षाही, हीनदर्जाने वागविण्यात येत असे. आपल्याला वेठबिगारीला लावतील म्हणून जे लोक पळून जात, त्यांचे नेतृत्व बुद्धभिक्षूंनी करण्याचे ठरविले आणि गुलामीत रुतलेल्या या समाजाला एक नवीन आवाज सापडला. याच काळात समाजातील वेगवेगळ्या गटात रोटी-बेटी व्यवहार होऊ लागले आणि सम्राट 'एंगी' याने तात्पुरती का होईना ही वर्णभेदाची अन्यायी रचना नष्ट करण्यासाठी पहिली पावले उचलली

## ईटा समाजाची वाटचाल

तेराव्या शतकात 'ईटा किंवा हिनिन' या जातिभेदवाचक शब्दाचा प्रथम प्रयोग जपानी वाङ्मयामध्ये आलेला दिसतो. कामाकुरा काळात बुद्धधर्मियांचे अनेक पंथ जपानमध्ये प्रबळ झाले. अमित किंवा सूत्र यावर आधारलेला पंथ सर्वांत लोकप्रिय होता. भारतीय बौद्ध पंथामध्ये साऱ्या ऐहिक गोष्टींचा त्याग करून मोक्ष मिळवायचा ही कल्पना होती पण या नव्या जपानी पंथातून मरणानंतर एक स्वर्ग किंवा 'जोडी' आहे असे शिकविले गेले. त्यामुळे अस्पृश्य मानलेल्या समाजातील अनेक लोक निदान पुढील जन्मी समानसंधीचा स्वर्ग मिळावा म्हणून या पंथांच्याकडे आकृष्ट झालेले दिसतात. याच काळात बुद्धाच्या शिकवणीचा जपानी भाषेत अनुवाद झाला. या काळात 'शिनरान' नावाच्या समाजसुधारक बौद्ध भिक्षूने समानता स्थापण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने त्याचे हे प्रयत्न पूर्णपणे यशस्वी झाले नाहीत. स्वर्गाच्या आशेने जी मंडळी नव्या बुद्धपंथात गेली त्यांनाही रोजच्या जीवनात भेदभावाचे बळी व्हावे लागले. हा भेदभाव इतका पराकोटीचा होता की माणूस मेल्यानंतरसुद्धा या लोकांची थडगी वेगळी बांधून आणि त्यावर 'ईटाहिनान' असे लिहिलेले असे

तेराव्या ते पंधराव्या शतकाच्या काळात मात्र पुन्हा एकदा अंधारयुग सुरू झाले असे वाटते. या काळात अस्पृश्य आणि स्त्रिया यांना हीन मानण्यात येत असे. जी माणसे कलाकुसरीच्या, हस्तकौशल्याच्या कामात गुंतलेली आहेत. त्यांनाही हीन मानले गेले. केवळ क्षत्रियांना वरचा दर्जा दिला गेला. बुद्धभिक्षूंनी खूप प्रयत्न करूनसुद्धा या असमानतेत फारसा बदल होऊ शकला नाही. सोळाव्या शतकाच्या सुमारास सत्ताधारी आणि धनिक असे क्षत्रिय राज्यकर्ते आणि प्रजा जमीन मालक आणि भूमिहीन यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाले बंडाळीचे व वाढू लागले. याच काळात जपानी व्यापाराला सुरुवात झाली. 'शोगून'

वशातील सत्ताधाऱ्यांचे राज्य सुरू झाले. त्यानी जातिभेदाला औपचारिक स्वरूप दिले. सत्ताधारी 'शोगून' राज्यकर्त्यांनी क्षत्रिय, शेतकरी, कलाकुसरीचे काम करणारे, व्यापारी आणि क्षुद्र असे समाजाचे गट पाडले या काळात जपानमध्ये नाण्याच्याऐवजी तांदुळाचा उपयोग केला जात असे. सातव्या शतकापासून चांदीची आणि ताब्याची नाणी तेथे प्रचलित होती, परंतु व्यवहारात मात्र तांदूळ हेच विनिमयाचे मोठे साधन होते.

याच काळामध्ये वाळीत टाकलेल्या समाजाला किंवा माणसांना 'सेनमिन' असे म्हणण्यात येऊ लागले. 'सेनमिन' किंवा दलित समाजाच्या तळाशी असणाऱ्या या 'इटा' लोकांना काही धंद्याच्या बाबतीत एकाधिकार दिलेले होते. खाटकाचे काम, जनावरे फाडण्याचे काम, कातडी कमावण्याचे काम किंवा मेलेल्या जनावरांचे दफन अशा तऱ्हेची कामे त्याना दिली जात होती. भारतीय जातिव्यवस्थेचा विचार करताना या दोन्ही इतिहासातील साधर्म्य लक्षात घेण्याजोगे आहे. त्याकाळी एकेका किल्ल्याभोवती शहर बांधले जात असे आणि त्या शहरात 'इटा' लोकांच्यासाठी वेगळी गांवकुसाच्या बाहेर वस्ती असे किल्ल्यात राहणारे राज्यकर्ते आणि किल्ल्याखाली वेशीबाहेर राहणारा 'इटा' समाज यांच्यामधील फरक केवळ आर्थिक होता असे नाही तर सामाजिकही होता याच जमातीला नाक्या-नाक्यावर किंवा टेकावर पहारेकरी म्हणूनही काम दिले जाई. आपल्याकडे खेड्यात तराळाचे काम अशा तऱ्हेचे असते. 'इटा' समाजामध्ये पुन्हा अंतर्गत भेदभाव असत. 'हिनान' मंडळीही पुष्कळदा भटकी, गुन्हेगारीत गुंतलेली, भाडोत्री सैनिक म्हणून काम घेणारी असत आपल्याकडे भामटे, हरिण शिकणारी, रामोशी किंवा इतर भटक्या जमाती यांच्या समाजरचनेशी या लोकाचे सोळाव्या शतकात साधर्म्य होते. दोन्ही समाजामध्ये इतके अंतर असे की ही माणसे एकमेकापासून लांब राहात आणि त्यांना एकमेकाशेजारी घर घेणेही योग्य वाटत नाही.

या दृष्टीने आता प्रकाशात येत असलेला 'ऐनू' जमातीचा इतिहास पाहण्याजोगा आहे. एकेकाळी जपान आणि उत्तर आशियात राहणाऱ्या, वनवासी आदिम जमातीचे लोक केसाळ लोकरीचे कपडे घालत वराहपूजा करीत आणि शिकार करून जगत. बायका आपल्या ओठाभोवती जांभळ्या रंगाचे गोंदून घेत असत. या लोकांचा जपानमधील मूळ 'जागोवन' समाजाशी सबंध आहे किंवा नाही हे सांगणे कठीण आहे मूळ 'ऐनू' भाषेमधील अनेक शब्द जपानी भाषेत आलेले आहेत. काही लोकांच्या मते सर्व पवित्र-डोंगराचे 'फुजी' हे नावही त्यांच्याच भाषेतून आलेले आहे 'फुजिकामाई' या अग्निदेवतेच्या नावापासून ते नाव आलेले आहे. १०० वर्षांपूर्वी या जातीच्या लोकांची संख्या जेवढी होती तेवढीच आजही आहे. परंतु केवळ 'ऐनू' वंशाचे लोक किती असतील हे सांगणे कठीण आहे.

एकोणिसाव्या शतकामध्ये या सर्व समाजातून एक नवे नेतृत्व निर्माण होऊ लागले. जपानी लोकसभेमध्ये या लोकांच्या अधिकारांचा विचार होऊ लागला. एकेकाळी केवळ नवरा 'शिन हैमिन' समाजाचा आहे या एकाच कारणाने स्त्रीला घटस्फोट मिळू शके. पण आता त्यावर वाद सुरू झाला. पहिल्या महायुद्धानंतर समाजवादाचे वारे वाहू लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर समानतेचा, सर्वांच्या एकसाथ विकासाचा नवीन काळ सुरू झाला असे दिसते. अमेरिकेत सुरू झालेल्या 'बुकर टी' वॉशिंग्टन यांच्या चळवळीचा परिणाम जपानी समाजावरही दिसू लागला. याच काळात शेजारी असणाऱ्या रशियातून आलेल्या साम्यवादी विचाराचा परिणाम जपानी राजकारभारावर दिसू लागला. बुराकूंना 'तोकूसु बुराखू' (नवीन जमातीचे लोक) असे म्हणायला सुरुवात झाली याच सुमाराला पण पंचवीस वर्षे अगोदर भारतामध्ये अस्पृश्यांना अस्पृष्ट व नंतर हरिजन म्हणण्याची पद्धत सुरू झालेली दिसते. आज जपानमध्ये पुन्हा एक नवीन सामाजिक सुधारणेची लाट आलेली असून दलितांच्या मुक्तीसाठी चळवळ सुरू झाली आहे.

एकेकाळी सबंध कोरिया देश जपानच्या ताब्यात आला, यामुळे तेथील शेतकरी, गरीब भूमिहीन आणि बेकार माणसे जपानमध्ये येऊ लागली. यापैकी ५० टक्के माणसे ही स्वस्त मजूर म्हणून आणली गेली. १९४५ साली जपानमध्ये २१ लक्ष कोरियन राहात होते असे दिसते या पुढच्या तीन दशकामध्ये या स्थलांतरित कोरियन माणसांना जपानातील अस्पृश्यतेला तोंड द्यावे लागले. जपानी समाजातील बुराखू जाती आणि बाहेरून आलेले गरीब कोरियन यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत फारसे अंतर नव्हते. त्यामुळे या सर्व गटांचा मिळून मुख्यतः आर्थिक असा एक मुक्ती संग्राम सुरू झाला. यापैकी काही लढाऊ वृत्तीच्या माणसांनी, आमचे प्रश्न सुटले नाहीत तर आम्हाला हिंसक मार्गाने जावे लागेल असे म्हटले. दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यानंतर बुराखू जमातीला आपल्या उठावाची आणि लोकशाही हक्काची जागृती करण्याची एक नवी संधि उपलब्ध झाली. १९४७ साली नव्या घटनेनुसार नऊ बुराखू जातीचे खासदार लोकसभेवर निवडून गेले. यापैकी दोन माणसे ही मुक्तीसंग्राम आघाडीचे प्रमुख कार्यकर्ते होते याच काळात बुराखू जमातीच्या जमिनी काढून घेणे, जमीन सुधारणेच्या नावाखाली त्यांना आर्थिकदृष्ट्या परावलंबी करणे, इत्यादी प्रयत्न वरिष्ठ समाजाने सुरू केले. इतकेच काय १९४७ साली वरिष्ठ सभेवर किंवा राज्यसभेवर उपसभापती म्हणून निवडून आलेल्या बुराखू माणसाला तेथून काढून टाकण्यात आले. याच काळात डॉ. आंबेडकर व त्यांची चळवळ याविषयी जपानी वृत्तपत्रांनी उत्सुकता दाखवली असे दिसते. १९५५ च्या सुमाराला मुक्तीसंग्राम समितीच्या लोकांनी याविषयी वृत्तपत्रात लिहायला सुरुवात केली. १९६० साली दलितांचा एक प्रचंड मोर्चा दक्षिणेत असलेल्या क्युशू

केटापासून टोकिओपर्यंत गेला. त्यांनी सरकारला आपले निवेदन सादर केले याविषयी विचार करण्याकरिता शासनाने समिती नेमली, तिचा अहवाल १९६५ साली प्रसिद्ध झाला. परंतु बुराखू जातीच्या उत्थानासाठी कायदा करण्यात यावा ही या अहवालाची मुख्य सूचना अमलात यायला १९६६ साल उजाडले. "दोवा ताईसाकू" जिग्यो टोकूवेत्सु सोचि होवान" अशा नावाचा हा कायदा आहे. वरिष्ठ जाती आणि कनिष्ठ जाती याचे एकात्मीकरण करावे, दलितांना आर्थिक आणि सामाजिक सवलती मिळाव्यात आणि त्यांच्या विरुद्ध भेदाभेद असू नयेत यासाठी हा कायदा केलेला आहे. परंतु जपानी घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारापासून वंचित राहणाऱ्या बुराखू समाजाला, त्या अधिकाराची हमी कशी देता येईल याचा विचार मात्र अजूनही झालेला नाही.

## आजची स्थिति आणि नवी चळवळ

ऐनू समाजाच्या बाबतीत असे दिसते की, मुख्य समाजधारेशी एकरूप होण्याचा प्रयत्न करूनसुद्धा त्यांनी आपली वैशिष्ट्ये अजूनही कायम ठेवलेली आहेत. 'हुक्काइडो' पाहणीनुसार तेथील लोकांमध्ये अजूनही 'ऐनू' वंशभावना जागृत आहे असे दिसते अलीकडच्या काळात ऐनू संस्कृतीचे पुनरुज्जीवन करू पाहणाऱ्या 'ऐनू मुक्ती मोर्चा' या संघटनेने आता पुष्कळसे लढाऊ स्वरूप धारण केलेले आहे. ऐनू समाजातील जवळजवळ ३१ टक्के लोकांना आजही सामाजिक सुरक्षेवर आणि आर्थिक सहाय्यावर अवलबून राहावे लागते. सर्वसाधारण ऐनू कुटुंबाचे उत्पन्न, सर्वसामान्य जपानी कुटुंबाच्या १/४ टक्के इतके आहे. या समाजातील केवळ चार टक्के मुले प्राथमिक शिक्षण पूर्ण करतात. बुराकू, कोरियन किंवा ऐनू यांच्या या प्रश्नाबरोबरच 'हिरोशिमा'वरील ॲटोमिक बॉम्बच्या स्फोटामुळे आता अपंग झालेल्यांचा एक नवीन वर्ग निर्माण झालेला आहे. आज जपानमध्ये सहा हजार समाजगट (कम्युनिटी) आहेत. आणि त्यामध्ये तीन दशलक्ष बुराकू माणसे राहात आहेत पतप्रधान याच्या अहवालानुसार मात्र असे दिसते की, जपानमध्ये दीड दशलक्ष बुराकू माणसे आहेत. आकडेवारीतील फरक सोडला तरी असे दिसते की, पुन्हा एखादा बुराकू माणसांची संख्या वाढीला लागलेली आहे. बुराकू या शब्दाची कायदेशीर व्याख्या नसल्यामुळे कोणत्या दलित समाजाला बुराकू म्हणावे, हे सागणे कठीण आहे. आपल्याकडेही मागासवर्गीय कोणाला म्हणावे. मागासपणाचे आर्थिक अथवा सामाजिक निकष कोणते, मागासपणा केव्हा संपतो? इत्यादी परिभाषाविषयक आणि निकषविषयक चर्चा या संदर्भात आठवावी

बहुसख्य बुराकू समाज हा 'कानसाई' भागात वा अतर्गत समुद्राच्या काठाने राहतो. हिरोशिमासारख्या शहरात दोन बुराकू वस्ती मिळून सुमारे एक लाख लोक राहतात, हे लोक अनेक तऱ्हेचे उद्योग करतात. मुख्यत ज्यांना समाज हीन लेखतो अशा तऱ्हेच्या कामात ही माणसे आजवर गुंतलेली होती औद्योगिक

क्रांतीबरोबर या माणसांच्या उद्योगधद्याचे स्वरूपहि पार बदलून गेले आहे. पण परिणामी बुराकू बेकार होत आहेत. त्यांना नवीन तंत्रज्ञान मिळालेले नाही. याच काळात खिस्ती मिशनऱ्यांनी बुराकू लोकांच्यात काम सुरू केले आणि या माणसांच्या 'मुक्ती संग्रामाला' थोडाफार पाठिंबा दिला.

आजसुद्धा जपानमध्ये अस्पृश्यता आणि जातिभेद आहे. त्याला इतिहास आणि परपरेची पार्श्वभूमी आहे या प्रश्नाचे उत्तर केवळ आर्थिक किंवा राजकीय धोरणातून सापडणे कठीण आहे. भुकेलेल्या माणसाला एकवेळ भरपूर जेवण देऊन भागत नाही तर त्याच्या रोजच्या भुकेचा प्रश्न सोडवावा लागतो भुकेल्या माणसाला 'मासा' देऊन भूक भागवता येणार नाही. त्याला मासेमारीची विद्या द्यायला हवी. बूराकूना अनुदान नको आहे, त्यांना हवे आहे कामधंद्याचे कौशल्य आणि उत्पादनात सहभागी होण्याची संधी मिळायला हवी. आजसुद्धा लग्न आणि नोकरी या बाबतीत अन्याय चालूच आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. जपानमध्ये 'कोसेकी' या पद्धतीप्रमाणे प्रत्येक माणसाची व कुटुंबाची नोंदणी केली जाते. या नोंदणीमुळे अन्याय वाढतो असे बुराकू लोकांचे म्हणणे आहे.

अलीकडेच या लोकांच्यावर झालेल्या अन्यायाच्या काही कहाण्या एकत्र करून जपानमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. 'इटा खेड्याचा अभ्यास' नावाचा एक समाजशास्त्रीय अभ्यासही प्रसिद्ध झालेला आहे. 'धार्मिक भेदभावाचे खोटे शास्त्र' अशा पोटतिडकीने लिहिलेली एक लेखमालाही प्रसिद्ध आहे. त्यातील जुन्या गोष्टी जरी सोडल्या तरी अलीकडच्या काही गोष्टी पाहण्यासारख्या आहेत इटा मुक्ती संग्रामाच्या लेखनात आणि डॉ आंबेडकरांच्या जहाल लिखाणात खूप साम्य आजही दिसते आहे. ज्याचे अंतःकरण जळते तोच बोलतो. हे दोन्ही बाबतीत खरे आहे. इतर देशातील दलितांच्या संग्रामात आणि जपानच्या चळवळीत मला फरक दिसतो तो असा की, जपानी दलितांत कोरियन, ऐनू, बुराखू साऱ्यांचा समावेश आहे. त्यामुळे वेगवेगळ्या वंशाचे, पण आर्थिक आणि सामाजिक परंपरेने दलित मानलेले लोक एका ध्येयासाठी एकत्र आलेले आहेत. त्यामुळे हा मुक्तीचा लढा, सर्व जाती, वंश, आदिवासी, मागासलेले साऱ्यांचा आहे. परंपरा आणि प्रस्थापित व्यवस्था याविरुद्ध हे राष्ट्रीड बंड आहे.

## काही उदाहरणे

१९६३ साली 'सेयामा' शहरात एका शेतकऱ्याच्या मुलीला पळविण्यात आले आणि तिच्या सुटकेसाठी दोन लक्ष येनची मागणी करण्यात आली. पैसे घेऊन जाणाऱ्या माणसाला पोलिसांना पकडता आले नाही आणि पळवून नेलेली मुलगी त्याना मृतावस्थेत सापडली. त्या मुलीवर बलात्कार करून तिचा गळा दाबून तिला मारण्यात आले. यामुळे वृत्तपत्रे व सामाजिक संस्था यांनी पोलिसांवर टीकास्त्र सोडले. याला उत्तर देताना पोलिस म्हणाले, असे हीनकार्य केवळ

जातीबाहेर राहणारा बुराखूच करू शकतो. या आधारावर एका बुराखू तरुणाला पकडण्यात आले त्याला देहांताची शिक्षा झाल्यानंतर त्या बुराखू तरुणाने असे सांगितले की, पोलिसांनी मला मारून माझा कबुलीजबाब जबरदस्तीने लिहून घेतला आहे त्यामुळे त्याची केस लढवण्याकरता व त्याच्या मुक्ततेकरता जपानमध्ये एक नवी चळवळ उभी राहिली आठ लक्ष लोकांनी सह्या देऊन त्याच्या मुक्ततेचा अर्ज केला. त्यानुसार १९७३ साली टोकिओमध्ये नवीन खटला सुरू झाला आणि फाशीची शिक्षा जन्मठेपेची करण्यात आली. पुन्हा एकदा ह्या निर्णयाविरुद्ध चळवळ सुरू झाली या काळात बुराखूच्या विरुद्ध अपमानकारक भाषा सरकारने वापरली, अशा आरोपाचे खटलेही दाखल करण्यात आले. १९७४ साली जपानच्या सुप्रिम कोर्टाने झालेल्या साक्षी-पुराव्यातील विसंगती मान्य केली मागील शिक्षा मात्र बदलली नाही.

१९६७ साली 'निप्पॉन मुद्रणालयाने' एका माणसाला नोकरीत घेतले आणि नंतर तो बुराखू आहे हे कळल्यावर त्याला काढून टाकले. याविरुद्ध फार मोठी चळवळ उभी राहिली शेवटी त्याला पुन्हा नोकरीत घेण्यात आले १९७० साली एका मुलाला नोकरी देऊन तो कोरियन असल्यामुळे नोकरीतून काढून टाकण्यात आले. त्यामुळे जपानच्या सर्वांत मोठ्या 'हिताची' उद्योगाविरुद्ध खटला दाखल करण्यात आला. या खटल्यामुळे बुराखूना आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळाला आणि कोर्टात खटला आपल्याविरुद्ध जाईल असे वाटल्यावर, त्या माणसाला पुन्हा नोकरीवर घेण्यात आले. 'असाहिकामा' शहरात १९७२ साली जपानी आणि ऐनू युवकांचा एक पुतळा उभारण्यात आला होता. त्यावर जातिभेदाच्या [illegible] [illegible] टाकण्याचा हेतू एवढाच होता की, पुतळ्यात दाखवल्याप्रमाणे ऐनू युवक हा जपानी युवकाचा सेवक नाही हे स्पष्ट करावे आणि आम्हाला समान अधिकार प्राप्त करून द्यायचे आहेत हे सांगावे हा हेतू होता. १९७५ साली टोकिओचे गव्हर्नर 'मिनोबी' यांनी राजीनामा दिला. दोन वेळा गव्हर्नर झाल्यावर आणि तिसऱ्यावेळी यशाची खात्री असूनही हे निवडणुकीला उभे राहिले नाहीत. कारण आपण बुराखू प्रश्नाची सोडवणूक करू शकत नाही अशा खेदकारक जाणिवेतून त्यांनी हा राजीनामा दिला. या बुराखूचे हक्क मागणाऱ्या चळवळीला जपानमध्ये, समाजवादी आणि कम्युनिस्ट पक्षांचा पाठिंबा आहे. राजकीय पक्षांनी खूप दडपण आणल्यामुळे गव्हर्नर मिनोबे यांनी राजीनामा मागे घेतला पण बुराखूंच्या प्रश्नाला मात्र अजून तोडगा सापडलेला नाही. आणि अजूनही हा प्रश्न सुटलेला नाही. परंतु त्यांच्या चळवळीमधला एक विचार फार महत्वाचा आहे. केवळ कायदा करून प्रश्न सुटणार नाही. प्रगतिशील विचाराचे रूपांतर राजकीय हक्कात झाल्यावाचून हा भेदभाव संपणार नाही. असे त्यांना वाटते. या बुराखू नेत्यांशी बोलताना माझ्या असे लक्षात आले की, डॉ. बाबासाहेब [illegible] [illegible] त्यांना परिचय

आहे बुराखू चळवळीत आणि बाबासाहेबांच्या चळवळीच्या विकासात मला खूप साम्य वाटले.

बुराखू लोकांचा प्रश्न आणि इतर देशांतील जातिभेद सारखेच आहेत की वेगळे आहेत याविषयी समाजशास्त्रज्ञाचे मतभेद आहेत पण बुराखू जमातीची अन्याय आणि असमानता दूर करण्याची मागणी आणि मूलभूत हक्कांसाठी चाललेला त्यांचा लढा न्याय्य आहे. याबद्दल कुणाच्याही मनात संदेह नाही भविष्यकाळात हा प्रश्न सोडविण्याच्यादृष्टीने जे प्रयत्न करावे लागतील त्यामध्ये, मुख्यत: जपानी दलितांना, सामाजिक समानता, मूलभूत राजकीय अधिकार, प्रशासनात सहभाग आणि आर्थिक समानसधी यावर भर द्यावा लागेल, असे जपानच्या समाजशास्त्रज्ञांचे मत आहे जपानमध्ये बुराखू, भारतातील हरिजन, ब्रह्मदेशातील 'पारुगुन' देवसेवक, तिबेटमधले 'रागयपा' नावाचे जिप्सी पद्धतीचे आदिवासी, साऱ्यांच्या मुक्तिसंग्रामात त्याच्या इतिहासात काहीसे साम्य आहे. फरक आहे तो प्रत्येक प्रश्नात राजकारण, अर्थकारण, सामाजिक रचना आणि धर्मकारण यांचे प्रमाण काय आहे यामध्ये. मूळचे अमेरिकन असणारे, अमेरिकन रेडइंडियन्स, मूळचे ऑस्ट्रेलियन असणारे आदिवासी, न्यूझिलंडमधले मावरी यांचे प्रश्न समान आहेत. दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णियांचा लढा हा मूलत: राजकीय आहे. मध्यपूर्वेतील शिया-सुन्नींचा लढा धार्मिक आहे. तर ज्यूंच्या बाबतीत अर्थकारण, राजकारण जास्त आहे. हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही. तो सोडवण्यासाठी त्याचे धागेदोरे वेगळे करून त्याला समाजशास्त्रीय उत्तरे शोधायला हवी. मागासलेपण कशाला म्हणावे? याचे आर्थिक, राजकीय आणि सामाजिक निकष शोधून, मागासलेपण केव्हा आणि कसे संपते याचा विचार करायला हवा तसे झाले तरच मागासलेपणाचे भांडवल करता येणार नाही आणि त्याच्या कुबड्या झुगारून देण्याची ताकद दलित समाजात येईल जगातील सर्व माणसे, एकाच कुटुंबातील आहेत असे न मानता वंश, रंग, धर्म, भाषा यांच्या आधारावर जेव्हा एक माणूस दुसऱ्या माणसाला कमी मानू लागतो त्यावेळी हा भेदाभेद निर्माण होतो त्या भेदभावाला ज्यावेळी सामाजिक परपरेचे आणि आर्थिक अन्यायाचे स्वरूप येते त्यावेळी विषमतेला धार येते आणि समाजातले दोन गट एकमेकांविरुद्ध उभे राहतात जपानमध्ये दलितांचा मुक्तिसग्राम असमानता दूर करण्याचा एक नवा प्रयत्न जपानी समाजसुधारकांनी आरंभला आहे.

जपानमधील समाजशास्त्रज्ञ आणि बुराखु जमातीच्या नेत्यांशी बोलताना त्यांनी एक गोष्ट स्पष्टपणाने सांगितली की समाजाचा लढा हा समान संधीसाठी आहे. समान सधी मिळवणे हा मूलत: आर्थिक प्रश्न आहे त्यामुळे केवळ अनुदान, केवळ सवलती, केवळ अग्रक्रम, राखीव जागा यांनी हा प्रश्न सुटणार नाही. सामाजिक आणि आर्थिक निकषांचा समतोल साधून या समाजाला पुढे आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. शासनाने याबाबत पुढाकार घेतला नाही तर

मुक्ताचा हा चळवळ आक्रमक होईल अशी शक्यता आज तरी दिसते आहे.

मी जपानमध्ये असताना या प्रश्नाचे एक अभ्यासक श्री. लॉरेन्स टॉमसन यांनी याविषयी लिहिलेले पुस्तक आणि त्याचे समाजकेंद्राचे काम बघायची मला संधी मिळाली. त्यांच्या पुस्तकावर आणि इतर समाजशास्त्रांच्या अभ्यासावर आधारून हे लेखन केले आहे. या बाबतीत मला साक्षात अनुभव नाही. पण डोळसपणाने पाहण्याचा हा एक प्रयत्न आहे या प्रश्नाविषयी बोलायला जपानी राजकारणी माणसे फारशी उत्सुक नाहीत. तथापि हा प्रश्न आहे हे ते लपवीतही नाहीत या प्रश्नाला काही राजकीय तोडगा निघाला तर या मुक्तिसंग्रामाला यश येईल. आपले मूक वृत्त सोडून सारा समाज यामागे उभा राहिला तर आज नाही उद्या, पण या मुक्तिसंग्रामाचा विजय निश्चित आहे.

(केसरी)

❀ ❀ ❀

# १२

## राजकीय परिसर आणि

# संरक्षण विचार

भारताच्या सुरक्षेचा विचार करताना केवळ बाहेरून येणाऱ्या आक्रमणाचा विचार करून भागणार नाही तर अंतर्गत सुरक्षेचासुद्धा विचार करावा लागेल एकेकाळी सुरक्षेचा विचार हा केवळ परदेशी हितसबधाचा विचार किंवा लष्करी आक्रमणाचा विचार अशी कल्पना होती पण आता कोणत्याहि देशाच्या सुरक्षिततेचा विचार करताना आर्थिक, राजकीय, लष्करी, अतर्गत आणि बाह्य अशा सर्व घटकांचा विचार करावा लागतो उदाहरणार्थ, भारताच्या सुरक्षेचा विचार करताना असे दिसते की, भारताच्या सर्व सीमा आज अस्वस्थ आहेत याला ज्याप्रमाणे लष्करी कारणे आहेत त्याप्रमाणे त्याला बिनलष्करी धोकेहि आहेत पजाबमध्ये अस्वस्थता निर्माण करणारे खलिस्तानवादी अतिरेकी, काश्मीरमध्ये पाकिस्तानी घूसखोरानी चालवलेले हत्याकाड, आसामात बोडोंचे बड, मडल कमिशनच्या शिफारसीवरून माजलेला वादंग, रामजन्मभूमी–बाबरी मस्जिद विषादामुळे वाढलेला जातीय तणाव, बागला देश, पाकिस्तान, ब्रह्मदेश येथील अस्थिर राजकीय स्थिती, श्रीलका भागात राजकीय कारणाने निर्माण झालेली भाऊबदकी या साऱ्याचा विचार केल्यावाचून भारताच्या सरक्षणाचा विचार पूर्ण होणार नाही

### संरक्षणाचा नवा सदर्भ

संरक्षणाच्या बाबतीत भारताची तयारी कितपत आहे किंवा सरक्षणासाठी लागणारी सर्व साधनसामग्री भारताजवळ आहे का, याचा विचार करताना ही सिद्धता कोणाच्या तुलनेने आणि कोणत्या सदर्भातहि आहे असा प्रश्न उभा राहतो भारताच्या सुरक्षिततेला धोका आहे असे अनेकदा म्हटले जाते परतु पुष्कळदा चर्चा मात्र सीमाच्या सदर्भात केली जाते. माझ्या दृष्टीने मुळातच हा सदर्भ चुकीचा आहे ऐतिहासिक काळापासून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी सीमाच्या सुरक्षेचा प्रश्न ज्या रीतीने हाताळला त्यामुळे आजहि भारत

स्वतंत्र झाल्यावरहि अनेक लोक असे म्हणत राहतात की, भारताला धोका हा पाकिस्तानपासून आणि चीनपासून आहे. याच्या उलट पूर्वी असेहि म्हणणारे लोक होते की, आशियातील काही थोड्या ठेंगू अप्रगत देशात भारत हे एक महाकाय राष्ट्र आहे त्यामुळे भारताला कसलीच भीति नाही पहिल्या महायुद्धापर्यंत हे म्हणणे खरे होते पण वैज्ञानिक प्रगतीमुळे लांब पल्ल्याची नवीन प्रक्षेपणास्त्रे, गतिमान विमानदले, पाणबुड्या आणि अण्वस्त्राच्या विकासामुळे सुरक्षेचा प्रश्न आता सीमेपुरताच मर्यादित राहू शकत नाही आता युद्ध आपल्या अंगणात आलेले आहे माझ्या दृष्टीने वरील दोनही विधाने चूक आहेत भारताचा नकाशा घेऊन आमच्या सीमा म्हणून काश्मीरच्या पलीकडला भाग, लंका, बांगला देश, ब्रह्मदेश, पाकिस्तान, चीन, अशा मर्यादित सीमसंदर्भाचा संरक्षण म्हणून विचार केला जातो पण माझ्या दृष्टीने मुळातच हा संदर्भ चूक आहे.

"माझ्या दृष्टीने भारताच्या संरक्षणाचा विचार हा संपूर्ण आशियाच्या संदर्भातच व्हायला हवा आणि त्याला जागतिक विचाराची चौकट हवी आशिया हा एक लहान-मोठ्या देशाचा गट आहे भारताभोवतालच्या देशांचा विचार करण्यापूर्वी जगातील मोठे देश कोणते यांचा विचार करायला हवा. भूभागाच्या विस्ताराच्या दृष्टीने विचार केला तर भारताच्या दृष्टीने मोठे देश म्हणजे चीन आणि रशिया आणि त्यानंतर इंडोनेशिया, भारताभोवती असणाऱ्या देशात जपान, बांगला देश, पाकिस्तान, चीन, रशिया, इंडोनेशिया आणि श्रीलंका यांचा विचार करायला हवा. ब्राझील आणि आफ्रिकेतील देशांचा विचार त्या दृष्टीने प्रस्तुत नाही. आशियात ज्यांचे भूभाग नसूनसुद्धा ज्यांचे अस्तित्व जाणवते ती राष्ट्रे म्हणजे अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स थोडक्यात म्हणजे भारताच्या संरक्षणाचा विचार करताना आपल्याला मुख्यत: रशिया, चीन, इंडोनेशिया, पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका आणि जपान या सात देशांचा विचार करायला हवा. या सात देशांचे लष्करी सामर्थ्य काय? याचा विचार केल्यावाचून भारताच्या संरक्षणाच्या सिद्धतेचा विचार करता येणार नाही याचा अर्थ असा की, लष्करी भारत हा आशियातील छोटेखानी देशात एक मोठा देश नाही, तर अनेक मोठ्या देशामध्ये असलेला एक मोठा देश आहे लष्करी सामर्थ्यांचा विचार करताना मात्र आपल्याला जरा वेगळ्या भू-राजकीय दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे

## भारतीय संरक्षणाची राजकीय चौकट

लष्करी सामर्थ्यांचा विचार करताना या देशाच्या अणुनिर्मिति सामर्थ्यांचा विचार करायला हवा आपल्या भागात अणुशक्तीचे सामर्थ्य असणारी राष्ट्रे म्हणजे रशिया, चीन, पाकिस्तान आणि अमेरिका त्यामुळे भारताच्या संरक्षणाच्या क्षमतेची तुलना याच राष्ट्राशी करायला हवी अशा दृष्टीने संरक्षणाचा विचार केला म्हणजे भारताच्या भौगोलिक सीमेवरील संरक्षणाचा विचार हा त्या मानाने कमी महत्त्वाचा ठरतो संरक्षणाच्या बाबतीत आपली तयारी किती आहे असा प्रश्न जर कोणी विचारला तर त्याला अणुक्षमतेचा विचार वगळून दिलेल्या उत्तरातून न्याय मिळत नाही कारण उत्तर देताना पुष्कळदा केवळ कोणाकडे किती तोफा, किती विमाने, किती सैन्यदले याचा विचार केला जातो आज

आशियामध्ये रशिया, चीन आणि भारत ही अणुसामर्थ्य असणारी राष्ट्रे आहेत वसाहतवादाच्या काळात ब्रिटन ही एक महाशक्ति होती या राष्ट्राचे समर्थ असे सैन्य भारतात होते युद्धासाठी आणि सरक्षणासाठी लागणारी भरपूर साधनसंपत्ति भारतात होती त्या काळात रशिया आणि भारत यामध्ये एक बफर किंवा स्थितिस्थापक असावा म्हणून अफगाणिस्तानचा ब्रिटिशानी उपयोग केला चीनला तोंड देण्याकरिता एक बफर असावा म्हणून तिबेटचा उपयोग केला त्याचप्रमाणे चीनने तिबेटवर आपला सार्वभौम हक्क सागितला आणि ब्रिटिशानी तो मान्य केला याचे कारण ब्रिटनला त्या बाजूने चीनच्या चढाया नको होत्या साम्राज्यवादी ब्रिटनच्या दृष्टीने ही चाल अगदी योग्य होती आणि भारताच्या दृष्टीने अगदी अयोग्य होती, त्यामुळे तिबेटवर चीनने हक्क सांगणे आणि सार्वभौमत्व मागणे हा ब्रिटिश साम्राज्यवादी धोरणाचा झालेला अटळ असा परिणाम आहे.

## सत्ताप्रभावाची पोकळी

ब्रिटिशामुळे साम्राज्यशाहीच्या काळात आशियामधील सार्वभौम सत्ता भारतात होती आणि त्या सामर्थ्याचे सत्तेचे किरण भारताच्या बाहेर चारी दिशानी पसरत होते आता मात्र अगदी उलट स्थिति झालेली आहे आज असे दिसते की, चीनकडून पाकिस्तान, बांगला देश या देशात युद्धसाहित्याची सर्वात मोठी मदत जात आहे चीनने पाकिस्तानला आणि नेपाळला रस्तेबाधणीची मदत करून आपले पाय आशियात रोवण्याचा प्रयत्न केला आहे आणि याच्या उलट रशिया अफगाणिस्तानात आपले पाऊल भक्कम करून आणि भारताशी मैत्रीचे करार करून आपल्या प्रभावाचे दडपण भक्कम करीत आहे. आज अमेरिका नौदल भारताच्या सागरात आहे. दिएगो गार्सियासारख्या बेटावर लष्करी तळ आहे. मधून मधून रशियाच्या नौदलाच्या फेऱ्याहि इंडोनेशियाच्या सागरी भागात होत असतात चीनने निळ्या पाण्यातील नौदल (ब्ल्यू वॉटर नेव्हल फ्लीट) वाढविले आहे त्यामुळे आज राजकीय बुद्धिबळाचा पट सपूर्णपणे बदलला आहे, असे म्हणावे लागेल १९ व्या शतकात भारत हा शक्ति केंद्र होता आणि त्याच्या प्रभावाचे प्रवाह चारहि दिशानी बाहू पसरत होते आता हा प्रभाव जवळजवळ नष्ट झालेला आहे. निसर्गाचा नियम असा आहे की, ज्या ठिकाणी पोकळी निर्माण होते त्या ठिकाणी इतर शक्तिस्रोत धावू लागतात आणि ती पोकळी भरून काढतात त्याचप्रमाणे भारताच्या भागात निर्माण झालेली ही प्रभावाची पोकळी भरून काढण्याकरिता चारहि दिशानी लष्करी प्रभावाचे प्रवाह भारताकडे धावू लागलेले आहेत माझ्या दृष्टीने लष्करी सुरक्षेचा विचार करताना 'प्रभावाची पोकळी' हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे आणि आज भारतात राजकीय विस्थापनेचे जे दर्शन दिसते आहे किंवा लष्करी आणि राजकीय अस्थिरता दिसते आहे त्याचेहि मुख्य कारण म्हणजे ही राजकीय प्रभावाची पोकळी आहे ''

## अण्वस्त्रनिर्मितीचा पर्याय

मग ही प्रभावाची पोकळी भरून कशी काढणार? ही पोकळी भरून काढण्याकरिता अण्वस्त्रनिर्मिति हा एकुलता एक पर्याय भारतापुढे आहे हा पर्याय वेळच्या वेळी

वापरायला हवा कारण हा निर्णय जर आपण फार लांबविला तर त्या काळात इतर राष्ट्रांची अण्वस्त्र शक्ति खूपच वाढेल आणि याच्या उलट आपल्याकडील अणुविज्ञानाला गंज चढायला लागेल आणि न वापरलेल्या शस्त्राची धार जावी त्याप्रमाणे अणुविज्ञान संरक्षणाच्या दृष्टीने नित्योपयोगी होण्याचा संभव आहे. म्हणून भू-राजकीय दृष्टीने, संरक्षणाच्या दृष्टीने आणि भारताच्या विकासाच्या दृष्टीने अण्वस्त्रनिर्मिति करणे हे अटळ झाले आहे या दिशेने पाकिस्तानने आपली आघाडी आधीच उघडलेली आहे कोणत्याहि तऱ्हेची लाज, शरम न बाळगता अण्वस्त्रनिर्मितीचे कारखाने चीनने सुरू केले आहेत आणि याबाबतची प्रगति करण्याची त्याची हुकूमशाही शक्ति प्रचंड आहे अशा स्थितीमध्ये आपण अण्वस्त्र निर्मिति केली नाही तर आपण आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला, अशी स्थिति होऊन भविष्यकाळ आपल्याला या अपराधासाठी क्षमा करणार नाही

जर भारताने अण्वस्त्रनिर्मिति केली तर आमच्या सर्व सीमा राखण्याच्या आणि अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेच्या प्रश्नाला तोंड देण्याचे सामर्थ्य भारतामध्ये निश्चितच येईल. आज लढाई छेडण्यापूर्वी कुठल्याहि राष्ट्रासमोर जो प्रश्न असतो तो असा, आपण ज्यावर हल्ला करणार त्या राष्ट्राची अणुशक्ति किती आहे? या अणुशक्तीच्या धाकानेच पुष्कळदा लढाया टाळल्या जातात चीन आणि भारत यासंबधात विचार केला तर असे दिसते की, चीनभारत राजनैतिक चर्चेला वळण लावण्यात अण्वस्त्रनिर्मितीची क्षमता हा एक फार मोठा घटक होता त्यामुळे भारत अणुबॉम्ब तयार करू शकतो एवढी घोषणा शत्रुमनात धाक निर्माण करायला पुरेशी नसते तुमच्याजवळ प्रत्यक्ष अणुबॉम्ब निर्मितीचा क्षमता लागते नव्या विज्ञानामुळे शत्रूचे डोळे हे आभाळातून उपग्रहामार्फत आपल्या देशाचा कोपरान् कोपरा न्याहाळून पाहात असतात तीव्र शक्तीच्या ध्वनिग्राहकातून आवाज त्याच्यापर्यंत पोहोचत असतो तेव्हा घोषणा आणि वास्तव यामधला फरक शत्रूला कळणार नाही, असा भोळेपणा बाळगणे म्हणजे मूर्खपणाची कमाल होणार आहे

पुष्कळ लोकांना असे वाटते की, आपण चीनशी समझोता करावा याचे कारण असे की, त्यांच्या मनात चीनविषयी एक सुप्त भीति आहे दुसरा प्रश्न असा विचारला जातो की, आजहि चीनशी समझोता झालेला नाही आणि तरीहि अशा परिस्थितीत आपण शेजारी शेजारी राहतो आहोत गेली ४० वर्षे ही अस्वस्थ शांततेची स्थिति चालू आहे ती आणखी पुढे चालवायला काय हरकत आहे? याला साधे उत्तर असे आहे की, चीनच्या मनात काही वेगळेच आहे आज चीनने लडाखच्या काही भागात आक्रमण करून त्याचा काही भाग बळकावला आहे तो भाग बळकावला गेला कारण या भागात आपण चिनी सैन्याचा प्रतिकार केला नाही आज अरुणाचल प्रदेशाच्या बाबतीत चीनचे धोरण मित्रत्वाचे खास नाही संधि मिळाली तर अरुणाचलमध्ये घुसण्याची चीनची तयारी आहे त्यामुळे तिबेट, अरुणाचल प्रदेश, लडाख पाकिस्तानवर नजर ठेवण्याकरता काश्मीरच्या उत्तरेची बर्फाळ शिखरे यांचा विचार केला तर असे वाटते की, गेलेला तुकडा सहजासहजी परत मिळणार नाही आणि चावा घेणाऱ्या शत्रूचा प्रतिकार करण्याची शक्ति अण्वस्त्रावाचून

मिळणार नाही

## संरक्षणाकडे दुर्लक्ष

सरक्षणव्यवस्थेकडे जेवढे लक्ष भारत सरकारने द्यावयास हवे तेवढे दुर्दैवाने दिले गेले नाही, असे माझे मत आहे इतर देशात लष्कराच्या बाबतील अतिम सत्तेचे केंद्र महामंत्र्याच्या कार्यालयात असते भारतातहि तशी थोडीफार अवस्था आहे. परतु अनुभव असा की, महामत्र्यांच्या कार्यालयात लष्करी तयारी, देशाचे सरक्षण अशा किरकोळ गोष्टींकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही आणि धोरणात्मक महत्त्वाच्या गोष्टी नजरेआड राहून जातात आपल्या महामत्र्यांना कुठल्या राज्यात कोण मुख्य मत्री असावा याचा विचार करण्यासाठीच इतका वेळ घालवावा लागतो की, देशाच्या सरक्षणाचा विचार करायला त्याना फुरसदच नसते मत्रिमडळात बदल कसे करावे, मत्रिमडळाची वाढ कशी करावी, निवडणुका कशा जिंकायच्या हे प्रश्न आपापल्या परीने महत्त्वाचे आहेत परतु देशाच्या सरक्षणाच्या दृष्टीने ते कमी महत्त्वाचे आहेत भारताच्या संरक्षणाचा प्रश्न फार लाब काळपर्यंत दुर्लक्षित राहिला आहे, असे माझे स्पष्ट मत आहे अलीकडच्या काळात मात्र यात काही सुधारणा व्हावी म्हणून थोडीफार धडपड केल्याची लक्षणे दिसू लागली आहेत आजवर ज्या लोकानी हा प्रश्न दुर्लक्षित ठेवला किंवा या अवस्थेला जी माणसे जबाबदार होती, तीच माणसे आणि तेच राजकीय नेते आजसुद्धा सरक्षणव्यवस्थेत सुधारणा व्हायला विरोध करीत आहेत या विरोधाला थोड्याफार प्रमाणात नोकरशाही पण पुष्कळशा प्रमाणात राजकीय नेतेच जबाबदार आहेत धोरणामध्ये स्थैर्य यायचे असेल तर नेतृत्वात स्थिरता हवी, पण आपण एक साधा विचार करू की, देशाचे सरक्षणमत्री किंवा सचिव पाच–सहा वर्षांत किती व्हावेत? किंवा देशाचे परराष्ट्रमत्री किती व्हावेत? परराष्ट्र सचिव किती झाले याचा विचार केला तर १९८० पासून आजपर्यंत राम साठे, रसगोत्र, भंडारी, व्यकटेश्वरन् आणि मेनन असे पाच सचिव झाले परराष्ट्रमत्री किती व्हावेत? नरसिंह राव, मिर्झा, खुर्शिद भगत, शिवशकर, राजीव गाधी, एन् डी तिवारी आणि नटवरसिंग गेल्या सात वर्षांत सात सरक्षणमत्री झाले व्यंकटरमण, अरुण नेहरू, शकरराव चव्हाण, नरसिंह राव, राजीव गाधी, विश्वनाथ प्रताप सिंग आणि के. सी पत सात वर्षांत सात सरक्षणमत्री झाले तर सरक्षण व्यवस्थेमध्ये एकसूत्रता राहणार कशी? हा माझा साधा प्रश्न आहे. परराष्ट्र व्यवहार आणि सरक्षण ही दोन्ही महत्त्वाची खाती आहेत त्यामुळे या खात्यात इतर देशात किती वेळा बदल होतो याचा विचार केला तर असे स्पष्ट म्हणावेसे वाटते की, भारतात या प्रश्नाकडे फार उथळपणे पाहिले गेले आहे आणि इतक्या घाईघाईने अदलाबदल केले गेले आहेत की, धोरणामधील एकसूत्रता केव्हाच नष्ट झाली आहे

युद्धाच्या साहित्याच्या बाबतीत विज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, आपण फार लवकर कालबाह्य ठरत असतो यासाठी डोळ्यात तेल घालून आपण आधुनिकीकरणात मागे तर पडत नाही ना याचा सदैव विचार केला पाहिजे. आपल्या सैन्याच्या बाबतीत बोलायचे तर १) दळणवळणाची साधने आणि तोफखाना या बाबतीत आपल्यापेक्षा पाकिस्तान पुढे आहे असे दिसते २) हवाईदलाचा विचार केला तर चीन

आणि पाकिस्तान याच्यापेक्षा भारत पुढे आहे. पाकिस्तानला जर अमेरिकेकडून अत्याधुनिक विमाने मिळाली तर मात्र आपली आघाडी कमी होणार आहे ३) मारगिरीचा विचार केला तर (फायर पॉवर) पायदळाच्या बाबतीत भारत पुढे आहे आणि या बाबतीत आघाडी मिळवायची असेल तर बोफोर्स निर्मित हावित्झारसारख्या तोफा विकत घेतल्यावाचून गत्यतर नाही ४) नौदलाचा विचार केला तर भारत निश्चितच आज आघाडीवर आहे. आजवर चीनचे नौदल हिंदी महासागरात नव्हते परतु १९८६ मध्ये प्रथमच चीनच्या नौदलाने हिंदी महासागरात प्रवेश केला आहे फार मोठ्या प्रमाणावर जरी नव्हे तरी चीनचे नौदल 'हिंदी महासागरात आले हीच महत्त्वाची गोष्ट आहे. चीनबाबतीत दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे चीनजवळ अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुड्या आहेत याच्या उलट भारतातील पहिली पाणबुडी अलिकडेच निर्माण झालेली आहे याविषयीचा अभ्यास करणाऱ्या ज्या आतरराष्ट्रीय सस्था आहेत त्याच्या मताने भारतापेक्षा चीनचे लष्करी सामर्थ्य दहा टक्क्याने जास्त आहे

## भारत आणि पाकिस्तान

उत्तर सीमाचा विचार करताना या बाजूने पाकिस्तान आक्रमण करील या धोक्यापेक्षा सुद्धा त्यांची आक्रमण करण्याची प्रवृत्ति आहे, हा मानसशास्त्रीय घटक महत्त्वाचा आहे त्यामुळे प्रवृत्ति अशी दिसते की, युद्ध पुकारायचे नाही पण दुसऱ्या देशाचा, प्रदेशाचा चावा घ्यायचा आणि थोडा फार प्रदेश बळकावता आला तर बळकवायचा त्यामुळे प्रत्यक्ष युद्धापेक्षा लष्करी शक्ति वापरून आपल्या प्रदेशाचा चावा घेण्याची चीन-पाकिस्तानची वृत्ति ही मला अधिक धोकादायक वाटते

## सागरी सुरक्षा

भारताला फार मोठी सागराची सीमा आहे. या सीमेवरून भारताच्या सरक्षणव्यवस्थेला फार मोठा धोका आहे, असे मला वाटत नाही परतु हिंदी महासागरात अमेरिकन नौदल उपस्थित आहे हे मात्र आपल्याला विसरता येणार नाही. या नौदलाकडून आपल्याला धोका नाही याचे कारण अमेरिकन काँग्रेस हल्ला करण्याकरिता या नौदलाचा उपयोग कधीच करू देणार नाही, असे वाटते धोका असलाच तर पाकिस्तानच्या पाणबुड्याचा आणि त्यांच्या आधाराने भारताच्या किनाऱ्यावर क्षेपणास्त्रे मारण्याचा धोका आहे जहाजातून मारगिरी करणे पाकिस्तानला शक्य नाही त्याला तोंड द्यायला भारतीय नौदल समर्थ आहे कुठल्याहि देशाचे सैन्य बोटीतून येऊन आपल्या किनाऱ्यावर उतरेल ही शक्यता जवळजवळ नाही. परतु अमेरिकेचे सातवे नौदल हे पुढेमागे आपल्या शस्त्रांचा आक्रमणासाठी नाही पण भारताच्या शत्रूंच्या मदतीसाठी उपयोग मात्र जरूर करू शकतो, बागला देशाच्या लढाईच्या वेळेला हे सातवे नौदल बंगालच्या उपसागरात आले आणि त्या वेळी अमेरिका युद्धात पडते की, काय अशी भीति निर्माण झाली होती, हे विसरता येणार नाही

हवाई हल्ला होण्याच्या बाबतीत इतकेच म्हणता येईल की, हल्ला केव्हा आणि

कोठून होईल हे कोणालाच सागता येणार नाही. कारण कोणत्या देशाचे हवाई सामर्थ्य किती आहे, कोणत्या देशाजवळ लाब पल्ल्याची मारगिरी करणारी क्षेपणास्त्रे आहेत यावर ते अवलबून आहे यामुळे लाब पल्ल्याची क्षेपणास्त्रे निर्माण करण्याचा वा विकत घेण्याचा प्रयत्न भारताने केला पाहिजे ही क्षेपणास्त्रे तयार करण्याचे कारखाने उभारून त्याची चाचणी करण्याकरिता ओरिसातील बालासोर येथे क्षेपणास्त्र चाचणीचे क्षेत्र उभारायचे ठरले त्याला आज विरोध करण्यात येत आहे. क्षेपणास्त्राचा प्रयोग करावयाचा तर त्याच्या चाचणीकरिता पुरेशी जागा देणे आवश्यक आहे आणि ही जागा सरकारने ताब्यात घेतली तर त्याविरुद्ध चळवळ केली जाते हे दुर्दैव आहे. या चळवळीला राजकीय नेते पाठिंबा देतात हे पाहिले म्हणजे या नेत्याना देशाच्या सरक्षणाचा दृष्टिकोन कसा उमजलेला नाही याची जाणीव होते लाब पल्ल्याची क्षेपणास्त्रे निर्माण करून त्याची चाचणी घेण्यासाठी जास्त लोकसख्या असलेल्या राज्यात जागा मिळणे अशक्य म्हणूनच ओरिसाची ही जागा निवडण्यात आली तेव्हा या विरोधाला न जुमानता ही चाचणी केंद्रे तातडीने होणे आजची गरज आहे

## भारत रशिया संबंध

आजवर भारताकरिता रशियाने पुष्कळ केले आहे. १९६२च्या युद्धात अमेरिकेकडून मदत मिळविण्याचा आपण खूप प्रयत्न केला एकेकाळी अमेरिका आणि चीन हे शत्रु होते त्यामुळे त्या वेळी आपल्याला थोडीफार मदत अमेरिकेकडून मिळाली नेहरू-केनेडी स्नेहाचे ते सुवर्णयुग होते पण नंतरच्या काळात आपल्याला मदत द्यायला अमेरिकेने नकार दिला त्या वेळी चीन व अमेरिका यांचे सबध सुधारले होते अमेरिकन नेते असे म्हणत राहिले की, "चीनने तुमच्यावर हल्ला केला तर आम्ही तुम्हाला मदत करू, परतु तुमची युद्धाची क्षमता वाढविण्याकरिता आम्ही आज काही करू शकत नाही " अमेरिकेने आम्हाला साधने देऊ केली पण साधननिर्मितीची क्षमता दिली नाही. त्याच्या उलट रशियाने आपल्याला शस्त्रनिर्मितीसाठी मदत केली, विमान निर्मितीसाठी मदत केली आणि त्यामुळेच भारत व रशिया याच्यामधील संबंध हे दीर्घकाळपर्यंत उपयोगी पडणारे संबध आहेत, असे मला वाटते

अमेरिका, रशिया आणि चीन या त्रिकोणाचा विचार केला तर असे दिसते की, एकेकाळी अमेरिका आणि रशिया हे शत्रु असल्यामुळे अमेरिका चीनचे प्रणयाराधन करीत होते चीन आणि रशिया यांचा एकमेकावर अजिबात विश्वास नाही अमेरिका आणि रशिया हेहि एकमेकांकडे साशकतेने बघत असतात त्यामुळे शत्रूचा शत्रु मित्र व्हावा या नात्याने भारताशी मैत्री केली गेली एका बाजूने आपला राजकीय प्रभाव आशियात वाढविण्याचा प्रयत्न अमेरिका करीत आहे इग्लडच्या मदतीने आशियात हाँगकाँग, सिंगापूर, मलेशिया, फिलिपाईन्स, जपान अशी साखळी एका बाजूला बाधली जात आहे, तर दुसऱ्या बाजूला पाकिस्तान, आखाती देश अशी आघाडी उभी केली जात आहे. याच्या उलट रशिया हे पूर्वेकडे उत्तर कोरिया, व्हिएटनाम, काम्पुचिया आणि पश्चिमेकडे अफगाणिस्तानच्या बाजूने अशी साखळी बाधून भारताशी मैत्री जोडण्याचा प्रयत्न करीत

आहे आणि या सत्तास्पर्धेच्या त्रिकोणात अलिप्त राहणे हेच सर्वात महत्त्वाचे धोरण ठरणार आहे कारण गटनिरपेक्ष साखळीतून मिळणारे मित्रत्वाचे संरक्षण घेता येते, आणि आपले परराष्ट्र धोरण स्वतंत्रपणे बांधता येते गोर्बाचेव्ह किती बोलतात यापेक्षा ते भारतासाठी किती करतात याकडे भारताने जाणीवपूर्वक लक्ष दिले गेले पाहिजे.

## भारत-चीन संबंध

गेल्या चार-पाच वर्षांत तिबेटमधील चीनची लष्करी उपस्थिति निश्चितपणे वाढलेली आहे चीन-सोविएत युनियनच्या सीमेवरील फौजा जवळजवळ पचवीस टक्क्याने कमी केलेल्या आहेत ते सगळे सैनिक घरी गेलेले नाहीत हिंदुस्थानच्या सीमेवर व व्हिएटनामच्या सीमेवर त्यातले बरेचसे सैनिक येऊन पोहोचले आहेत हे उघड आहे

या लष्करी हालचालींचा समग्र अर्थ समजावून घेतला पाहिजे एक म्हणजे तिबेट हा अल्पसंख्याकाचा प्रदेश आहे. अल्पसंख्य प्रदेशात केंद्रीय सत्तेचा दबदबा राजकीय व लष्करी दोन्ही प्रकारच्या धोरणाचा अवलंब करून वाढवावा लागतो बव्हशी सगळ्याच आशियाई देशात केंद्रीय सत्ता आणि प्रादेशिक सत्ता यात अंतर्विरोध निर्माण झालेले दिसतात तसे ते चीनमध्येहि झालेले आहेत. त्या अंतर्विरोधाचे स्वरूप भारत किंवा पाकिस्तानमधील अंतर्विरोधाइतके गंभीर नसले तरी विकासाची रणनीति आणि लष्करी हजेरी या दोन्ही मार्गांनी ते अंतर्विरोध शक्यतो सौम्य करून सोडविण्याचा मार्ग चिनी नेतृत्व चोखाळताना दिसतो त्यामुळे गेल्या पाच वर्षांत तिबेटमधील भांडवलाची गुतवणूक वाढलेली आहे तिबेटचा विकास आणि तिथे केंद्रीय सत्तेची पकड बळकट करणे, या दोन्ही उद्दिष्टांनी चीन सरकार तिथे कार्यरत आहे. वाढती लष्करी उपस्थिति ही त्याच रणनीतीचा भाग आहे या दशकांत चीन एकमेव बलिष्ठ जरी नाही तरी हिंदुस्थानच्या तुलनेत महासत्ता झालेला असेल 'महासत्ता' ही संकल्पना आधुनिक राजकारणात निव्वळ शस्त्र भांडार किंवा सैनिकाच्या तुकड्या किंवा लढाऊ जहाजे, विमाने यावरून ठरत नाही पोलाद, कोळसा, तेल इतर खनिज पदार्थ, अन्नधान्य, कापड याच्या उत्पादनावर सत्तेचे मोठेपण अवलंबून असते आजमितीस हिंदुस्थानी उत्पादनाच्या तुलनेत बोलायचे तर चौपट अन्न, सहापट कोळसा, जवळजवळ पाचपट पोलाद चीनमध्ये उत्पन्न होते

भारत-चीन सीमा विवाद्य आहे किंवा नाही हा मुख्य प्रश्न आहे. आपल्याकडचे बरेचसे विचारवंत आपला सीमेवरचा हक्क त्रिकालबाधित सत्य आहे, असे मानतात ती सीमा विवाद्य आहे हाच भारत-चीन सीमा प्रश्नातील मध्यवर्ती मुद्दा आहे

दग् शिया पिंग यानी एक तडजोड सुचविलेली होती. त्या तडजोडीचा मुख्य भाग असा होता चीनने ईशान्येस मॅकमहॉन रेषा मान्य करायची बदल्यात भारताने भारत-चीन सीमेचा वायव्य भागात अक्साई चीन हा भूप्रदेश चीनचा आहे हे कबूल करायचे मागे सुमदोरुग खोऱ्यात चिनी फौजा घुसल्या तेव्हा मॅकमहॉन रेषा चीनला मान्य नाही, असे दृष्टोत्पत्तीस आले या दोन्ही भूमिकात उघडच विरोध आहे तथापि भारत अक्साई चीनवरचा चीनचा हक्का मान्य करीत असेल तर तडजोड म्हणून मॅकमहॉन रेषा चीन मान्य

करील, अशी चीनची भूमिका आहे श्रीमती इदिरा गाधींनी भारत–चीन सीमाप्रश्न विभागवार (सेक्टरवाईज) सोडवूया अशी भूमिका घेतलेली होती मॅकमहॉन रेषा उभयमान्य सीमा आहे. येऊन जाऊन अक्साई चीनबाबत बोलणी करायची आहेत, असा त्याच्या भूमिकेचा अर्थ केला गेला होता श्रीमती गाधींची सत्ताकारणाची जाण लक्षात घेता त्यानी असा चाणाक्ष युक्तिवाद करावा याविषयी नवल वाटण्याचे कारण नाही चीनला मात्र भारताचा युक्तिवाद समंजस आहे हे आतरराष्ट्रीय व्यासपीठावर मान्य झालेले परवडण्याजोगे नव्हते सुमुडोरुग खोरे मॅकमहॉन रेषेच्या उत्तरेस आहे की, दक्षिणेस आहे यावरहि वाद झाला होता तिथे चीनने हेलीपॅड बाधले आहे, असे प्रथम अरुणाचल प्रदेशाच्या मुख्य मत्र्यानी उजेडात आणले या बातमीचा प्रथम इन्कार करण्यात आला नतर हेलीपॅड बाधले गेले आहे हे मान्य करण्यात आले हे खोरेच मॅकमहॉन रेषेच्या उत्तरेस आहे हा चीनचा दावा आहे. याचा अर्थ मॅकमहॉन रेषेसबंधी परिभाषा (डेफिनिशन), प्रत्यक्ष जमिनीवरील ती तिची मर्यादा स्पष्ट करणे (डिलिमिटेशन), इत्यादि प्रश्न अजूनहि सुटायचे आहेत. मॅकमहॉन रेषा ही सीमा एवढे म्हणून प्रश्न सपत नाही. त्या रेषेची व्यवस्था लावायचा प्रश्न अजूनहि बाकी आहे सीमेची व्यवस्था लावायची म्हणजे भौगोलिक तत्त्व पाया भूत धरून सीमा कुठे आणि कशी आहे याचा निर्णय करणे. रशिया–चीन सीमेचा प्रश्न अलीकडे गोर्बाचेव्ह यानी फार दूरदृष्टीने एका दिवसात सोडवला चीनच्या ईशान्येस सीमेवर दोन मोठ्या नद्या आहेत आमुर आणि उसरी या नद्या इतक्या विस्तृत आहेत की, नद्यात बेटे आहेत त्या बेटाचा प्रश्न फार नाजुक होऊन बसलेला होता नदीत सीमा ठरवायची कशी? सर्वमान्य भौगोलिक तत्त्व गृहीत धरायचे तर जिथे नदी सीमेवर असते तिथे पाण्याचा मुख्य प्रवाह ही सीमा ठरते. तशी सीमा ठरली आहे बेटाची मालकीहि मुख्य प्रवाहाच्या चिनी बाजूचे बेट चीनकडे व दुसऱ्या बाजूचे रशियाकडे अशी शेवटी ठरली आहे राजकीय दूरदृष्टी असेल तर बोलणी सफल होऊ शकतात

## सागरी सीमा

भारताचा केवळ पाकिस्तान, चीन, बागला देश आणि श्रीलका या सदर्भात विचार करून चालणार नाही, तर हिंदी महासागरातील तसेच दक्षिण आशिया मधील त्याचे स्थान पाहावे लागेल. सुमारे सात हजार पाचशे किलोमीटर एवढा किनारा असणारा आपला देश सागरी सीमांकडे दुर्लक्ष करूच शकत नाही भावी काळात हिंदी महासागराला अतिशय महत्त्व प्राप्त होणार असून भारताला त्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागणार आहे हिंदी महासागर हा अटलांटिक आणि प्रशात महासागर सोडल्यास जगातील तिसरा मोठा महासागर. या महासागराला लागून असलेल्या देशात जगाच्या एकूण लोकसंख्येच्या एकचतुर्थांश लोकसख्या राहाते विशेष म्हणजे जगातील तेल उत्पादनापैकी अर्ध्याहून जास्त तेल उत्पादन हिंदी महासागरातील देशात होते आफ्रिका, आशिया आणि ऑस्ट्रेलिया या उपखडाना जोडणारे महत्त्वाचे जलमार्ग या महासागरातूनच जातात सुवेझमार्गे युरोपला जाता येत असल्याने हिंदी महासागरात सापडणारी खनिजे आणि इतर सागरी उत्पादने यामुळेहि या महासागराला महत्त्व आले आहे अरब देशात होणारे तेलाचे

उत्पादन पश्चिमे कडील राष्ट्रे आणि जपान याना पोहोचविण्यासाठी तेलवाहू जहाजाना हिंदी महासागरातून जावे लागते या महासागराचे महत्त्व जाणूनच अमेरिकेने दिएगो गार्सिया बेटावर कोट्यवधि डॉलर्स खर्च करून नाविक आणि हवाई तळ उभा केला आहे त्याशिवाय रशिया आणि अमेरिकेचे नाविक ताफे या महासागरात तळ ठोकून आहेत.

हिमालयापासून हिंदी महासागरापर्यंत दक्षिणोत्तर ३२०० किलोमीटर आणि पूर्व पश्चिम सुमारे ३००० किलोमीटर पसरलेला आपला भारत हा खंडप्राय देश आहे जगात लोकसंख्येमध्ये दुसरा आणि क्षेत्रफळामध्ये सातवा असणारा भारत हिंदी महासागरातील सर्वात मोठा देश आहे दक्षिण आशियामधील सात राष्ट्राच्या सागरी किंवा भूसीमेला सीमा लागणारा भारत हा एकमेव देश आहे. लोकसख्या, क्षेत्रफळ आणि साधन सामग्री याबाबती ७५ टक्के ही भारतात असून उरलेली २५ टक्के इतर ६ राष्ट्रात आहे यावरून आर्थिक आणि भौगोलिक दृष्टीनेहि हिंदी महासागरात भारताला महत्त्वाचे आणि जबाबदारीचे स्थान आहे हे दिसते इराणच्या आणि होर्मुझ सामुद्र धुनीत सध्या हल्ले होत आहेत त्यामुळे आखाती देशातून बाहेर होणाऱ्या तेलपुरवठ्यावर विपरित परिणाम होत आहे. म्हणूनच आपले व्यापारी आणि आर्थिक हितसंबध सुरक्षित ठेवण्यासाठी हिंदी महासागरावर आपले लक्ष असणे आवश्यक आहे. सागरावर वर्चस्व ठेवणे म्हणजेच नौदल सुसज्ज करणे या दृष्टीने गेल्या दशकात नौदलाच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले ते योग्यच आहे. १९७१च्या भारत-पाकिस्तान सघर्षात नौदलाच्या क्षेपणास्त्रांच्या बोटींनी कराचीवर केलेला भडीमार आणि विक्रांत या विमानवाहू नौकेने चित्तगाव आणि ढाका बंदरावर केलेली बॉम्बफेक यासंघर्षात महत्त्वाची ठरली आणि नौदलाचे महत्त्व सर्वांना पटले

या सदर्भात भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या १९८६-८७च्या राष्ट्रीय सुरक्षा विश्लेषणातील उल्लेख लक्षात घेण्याजोगा आहे तो उल्लेख असा, "आपल्याला अनुकूल नसणारी हिंदी महासागरातील राष्ट्राची सरकारे बदलण्याचे आणि अनुकूल सरकाराना पाठिंबा देण्याचे प्रयत्न या महासागराबाहेरील शक्ति करीत असून त्यासाठी हिंदी महासागरात लष्करी तळ उभारण्याचे प्रयत्न सतत चालू आहेत," अशा परिस्थितीत श्रीलंका, बांगला देश, ब्रह्मदेश किंवा मॉरिशस ही राष्ट्रे लहान किंवा भारताच्या लष्करी तुलनेत नगण्य म्हणून चालणार नाही उद्या ही राष्ट्रे भारतविरोधी शक्तीच्या प्रभावळीत एकत्र आली आणि त्यानी जर त्या शक्तीला तेथे लष्करी तळ उभे करू दिले तर भारताच्या सभोवती एक प्रकारची प्रतिबधात्मक साखळी तयार होईल ईशान्येकडे बलाढ्य चीन, पश्चिमेस केव्हाहि काही करणारे बेभरवशाचे पाकिस्तान आणि आजूबाजूला भारत विरोधी राष्ट्रे हे चित्र अस्वस्थ करणारे आहे त्यामुळे भारताला आपले संरक्षणविषयक अदाजपत्रक वाढवावे लागेल. म्हणजेच विकास योजनाना कमी निधि भारतविरोधी शक्तींना हेच हवे आहे प्रगति आणि लोकांचे राहणीमान खालावत गेले की, असंतोष निर्माण होतो असतोषाची परिणति सशस्त्र क्रांति किंवा मतपेटीद्वारे बदल यात होते बदल म्हणजे अस्थिरताहि होऊ शकते अस्थिरता ही प्रगतीस बाधक म्हणून अशी राष्ट्रे

महाशक्तीच्या पखाखाली आपोआप येतात जगातील राजकारणाचे हे सूत्र आहे आणि हे साध्य करण्यासाठी महासत्ताचे सतत प्रयत्न चालू असतात

## पाकिस्तान

पाकिस्तानचाच विचार करायचा झाल्यास सुमारे ८ लाख चौरस किलो मीटर क्षेत्रफळ असलेल्या या देशाची लोकसख्या सुमारे ८ कोटि ४५ लाख इतकी आहे त्या तुलनेत भारत क्षेत्रफळामध्ये चौपट तर लोकसख्येत सुमारे ९ पट आहे लष्करी सामर्थ्यामध्ये मात्र पाकि स्तान त्याच्या आकाराच्या मानाने फारच सामर्थ्यवान आहे

पाकिस्तानची निर्मिति आणि पाकिस्तान–अमेरिका ही युति लक्षात घेतली तर मात्र पाकिस्तान भारताविरुद्ध कारवाई करण्यास उतावीळ असल्याचे आढळून येते सरक्षणशास्त्राचे अभ्यासक के. सुब्रह्मण्यम् याच्या मते भारत–पाकिस्तान सबध आणि अमेरिका–रशिया या महासत्ताचे या भागातील लष्करी राजकीय स्वारस्य यावर भारताचे पाकिस्तानविषय लष्करी डावपेचात्मक धोरण अवलबून राहील पाकिस्तानचा जन्म द्विराष्ट्र (दोन धर्म, दोन राज्ये) सिद्धांतावर झाला असून भारताविरुद्ध युद्ध म्हणजे 'जिहाद' आणि हिंदु हे 'काफर' म्हणून 'कायमचे शत्रू' ही सकल्पना त्याच्या सैन्यात रुजविण्यात आली आहे १९५१मध्ये अमेरिकेच्या परराष्ट्रखात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्याने पाकिस्तानबाबत केलेली गुप्त टिपणे आता प्रसिद्ध होत आहेत त्यातील एक टिपण बोलके आहे 'पश्चिम आशिया मध्ये पाकिस्तानला भूमिका पार पाडावयाची आहे काश्मीरची समस्या (त्याच्यासारखी) सुटली तर ते (पाकिस्तान) काहीहि तयार करण्यात तयार होतील '

अमेरिकेच्या मते पाकिस्तान म्हणजे 'दक्षिण आशियातील इस्रायल' हेच पाकिस्तान आता अणुबॉम्ब आणि अत्याधुनिक शस्त्राच्या मदतीने आणि अमेरिका–चीन याच्या साहाय्याने भारताविरुद्ध केव्हाहि 'जिहाद'ची घोषणा करील त्यामागे तीन उद्देश १) काश्मीरचा प्रश्न सोडविणे, २) बागला देश निर्मितीचा बदला घेणे आणि ३) भारताचे महत्त्व कमी करणे पूर्व सीमेवर चीनचे म्हणणे आपण मानीत नाही आणि दलाई लामाना आश्रय दिला याचे शल्य चीनला अजूनही बोचते आहे तेव्हा मुत्सद्दीपणा आणि वाटाघाटी याच्या मदतीने अमेरिका आणि चीन याना अलग करून पाकिस्तानला एकटे पाडले पाहिजे आणि आपल्या लष्करी बळाची पाकिस्तानला भीति वाटेल या तऱ्हेने कृति केली पाहिजे 'ब्रास टॅक'च्या कवायतीच्या मागे भारतीय लष्कराची झपाट्याने हाल चाल व आघात करण्याची क्षमता पाकिस्तानला दाखविण्याचा एक हेतु होता

## श्रीलंका

श्रीलंकेचा वांशिक सघर्ष (तामिळ विरुद्ध सिंहली) १९८४ पासून जोरात सुरू झाला आणि आता अलीकडेच तो आटोक्यात आला असला तरी तामिळ टायगर्सच्या बदलत्या भूमिकेमुळे ही समस्या समाधानकारक सुटेल अशी चिन्हे नाहीत श्रीलकेमध्ये आपल्या फौजा पाठवून भारताने विनाकारण जबाबदारी घेतली, अशी टीका भारत–

श्रीलका याच्यातील कराराविरुद्ध केली जाते परतु वांशिक संघर्षात तामिळींची होणारी ससेहोलपट, भारतात आलेले सुमारे एक लाख तामिळ निर्वासित, तामिळ बडखोराना काबूत आणण्यासाठी श्रीलंकेच्या सरकारला मदत करण्याची पाकिस्तान, इस्रायलची उत्सुकता आणि अमेरिका, चीन याची श्रीलंकेमध्ये लष्करी तळ मिळविण्यासाठी चालणारी धडपड या गोष्टी लक्षात घेता भारताने ३० जुलै रोजी केलेली कृति अगोदरच करावयास हवी होती त्यामुळे निदान तामिळींची हत्या टाळता आली असती श्रीलका हे अतिशय छोटे राष्ट्र असले तरी भारताच्या अगदी जवळ आहे या राष्ट्राची लोकसख्या सुमारे दीड कोटि असून क्षेत्रफळ ६५,६१० चौरस किलोमीटर एवढ आहे. परतु हिंदी महासागरात या बेटाचे स्थान महत्त्वाचे आहे. आफ्रिकेकडून ऑस्ट्रेलिया किंवा जपानकडे जायचे तर कोलबोला अथवा त्रिंकोमालीला थांबून इंधन भरून पुढे निघणे केव्हाहि सोयीचे त्यामुळे कोलंबो शहराला भौगोलिक महत्त्व आहे

तामिळ दहशतवाद्याच्या कारवायांना पायबद घालण्यासाठी अमेरिकेबरोबर करार करून त्याना लष्करी तळ उभारण्यासाठी श्रीलका जागा देईल आणि इस्रायल व पाकिस्तानचे सैनिक मदतीस घेईल ही गोष्ट भारताच्या सुरक्षिततेस बाधा आणणारी आहे पाकिस्तानी वैमानिकांनी तामिळ बडखोरावर जाफना भागात हल्ला केल्याचा आरोप खुद्द तामिळ बडखोरानी केला होता भारताच्या दक्षिण किनाऱ्याजवळून पाकिस्तानी वैमानिकानी उड्डाण करणे भारताला परवडणारे नाही भारत-श्रीलका कराराच्या अंमलबजावणीची जबाबदारी भारतावर असून ती अवघड आहे. परतु पश्चिम दक्षिण आशियात भारताचे जे स्थान आणि महत्त्व आहे ते टिकवायचे असेल तर श्रीलकेमध्ये हस्तक्षेप करणे लकेत शातिसेना पाठविणे आवश्यक होते मात्र मूळ योजनेत श्रीलकेच्या सैन्याने अतिरेक्याना तोंड द्यायचे व शातिसेनेने मागे राहून लष्करी पाठबळ द्यायचे ही कल्पना होती पण प्रत्यक्षात श्रीलकेचे सैन्य बराकीत राहिले आणि भारतीय सेना लढत राहिली यातच या धोरणाचे अपयश होते अध्यक्ष जयवर्धने यांनीच या गोष्टीला दुजोरा दिला आहे भारत-श्रीलका करारानतर पत्रकाराशी बोलताना त्यानी ही बाब स्पष्ट केली ते म्हणाले, "या भागातील (दक्षिण आशिया) भारत हे एक सत्ताकेंद्र आहे, असे मी मानतो त्यामुळे बाहेरच्या महासत्तांना मदतीस बोलाविण्यापेक्षा भारताची मदत घेणे केव्हाहि रास्त आहे त्यामुळे राजीव गांधींनी सुचविताच मी तावडतोब तयार झालो "

भारताच्या या कृतीमुळे भारत, शेजारी राष्ट्राशी असलेले मतभेद सामंजस्याने सोडवितो आणि सोडविण्याचा प्रयत्न करतो, अशी प्रतिमा आतरराष्ट्रीय राजकारणामध्ये निर्माण झाली आहे श्रीलंकेला भारतावर अवलंबून राहावे लागणार आहे त्यामुळे भारतीय मालाला आणखी एक बाजारपेठ मिळेल श्रीलकेबरोबरच्या व्यापारामध्ये भारताचा नववा क्रमांक लागतो आणि एकूण व्यापारामध्ये ४.२ टक्के इतका वाटा आपल्याला मिळतो यामध्ये आता निश्चितच सुधारणा होऊ शकते शांतिसेना परत बोलावून फार शहाणपणाचा मार्ग भारताने स्वीकारला. आता अतर्गत भाऊबदकी मिटवणे श्रीलकेची जबाबदारी आहे

## भारत-लष्करी महाशक्ति

मालदीव या चिमुकल्या देशात १९८९ एप्रिलमध्ये सत्तांतराचा प्रयत्न केला गेला १२०० छोटी बेटे असणाऱ्या या देशात परकीय सत्तांनी हस्तक्षेप करायचा प्रयत्न केला. भारताला मालदीवने विनंती केल्या-बरोबर भारतीय लष्करी वाहतूक विमानांनी मध्यरात्री आकाशात झेप घेतली आणि चार तासांत मालदीवला जाऊन बंडाळी मोडून काढली अगदी साध्या वाटणाऱ्या या हालचालींनी जगातील अनेक देशांची झोप उडवली कारण भारत लष्करी महासत्ता बनत असल्याचे ते पूर्वचिन्ह होते १९८४ साली काश्मीरच्या सियाचीन क्षेत्रातील २० हजार फूट उंचीवरच्या बर्फाळ शिखरावर, भारतीय सैन्याने आपले पाय रोवले १९६० सालापासून भारत-चीन सरहद्दीवरच्या 'नो मॅन्स' भूमीवर भारतीय सैनिक गेले आणि चिनी सैन्याच्या 'डोळ्याला डोळा' भिडवून उभे राहिले. १९८६-८७ साली 'ब्रासटॅक' या नावाच्या लष्करी हालचालींनी पाकिस्तानचे धाबे दणाणले. त्यानंतर १९८७ ला मालदीवला मदत केली. त्या वेळी अमेरिकन अध्यक्ष रेगन म्हणाले की, 'भारताने विभागीय स्थैर्याला मदत केली आहे अमेरिकेचे उपपरराष्ट्रमंत्री म्हणाले की, 'एकविसाव्या शतकात भारत ही राजकीय आणि लष्करी महाशक्ति होणार आहे, यात मला शंका नाही' (रिचर्ड आर्मिटेज) गेल्या दशकात भारताचे लष्करी खर्चाचे अंदाजपत्रक दुप्पट झाले आहे. लष्करी संशोधनावर खर्च चौपट झाला आहे यात अण्वस्त्र विभागातील संशोधन, प्रक्षेपणास्त्रांचा विकास याचा समावेश आहे भारताची सैनिकसंख्या १३,६२,००० आहे, इतकी म्हणजेच जगात चौथ्या क्रमांकाची आहे यात आणखी ८० हजारांची भर पडणार आहे. भारताला विस्तारवादी महत्त्वाकांक्षा नाहीत, भारताला अणुबॉम्ब बनवण्याची इच्छा नाही, परंतु भारताने लष्करी सामर्थ्याच्या बाबतीत आता आत्मनिर्भर व्हायलाच हवे ही आपली भूमिका आहे ऑस्ट्रेलियन लोकसभेत असा प्रश्न विचारला गेला की, 'भारताने लष्करी सामर्थ्य जरूर वाढवावे, पण ऑस्ट्रेलियापर्यंत एका दमात झेप घेणाऱ्या प्रहरी विमानांचा उपयोग भारत कसा करणार आहे' इंडोनेशियाने सुमात्रा येथे खूप मोठा नाविक तळ उभारला आहे. तेथून त्यांचे नौदल बंगालच्या उपसागरापर्यंत प्रभाव पाडू शकते त्याविषयी कोणी बोलत नाही पण इंडोनेशियन लोकसभेत मात्र विचारले जाते की 'भारताला एवढे नौसेनेचे सामर्थ्य कशाला हवे?' चीनने अण्वस्त्रे बनवायची आणि वर प्रश्न करायचा की 'गांधींच्या अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या भारताने अण्वस्त्र-शक्तीचा विकास का करावा?' चोराच्या उलट्या बोंबा म्हणावे ते यालाच. आता मुंबईच्या माझगाव गोदीत प्रत्येकी १८० दशलक्ष डॉलर्स किमतीच्या पाणबुड्या बांधल्या जात आहेत मध्य प्रदेशातील महाराजपूर विमानतळावर 'मिराज'या फ्रेंच विमानाची उड्डाणे झेपावत आहेत बंगलोर येथे 'इलेक्ट्रॉनिक' लष्करी उपकरणे विकसित केली जात आहेत हॉवित्झर तोफांच्या खरेदीनंतर भारतीय तोफखाना बलवान झाला आहे भारतीय लष्करी सामर्थ्य याच वेगाने वाढत गेले व त्याला समांतर असे परराष्ट्रीय व राजकीय धोरण आखता आले तर येणाऱ्या शतकात भारत हा महासत्ता बनेल, असा विश्वास बाळगायला हरकत नाही

सर्व परिस्थितीचा आढावा घेतला तर नजरेसमोर गोष्टी येतात त्या अशा १) भारताने आपली अण्वस्त्रनिर्मितीची शक्ति वाढवून प्रत्यक्षपणे अण्वस्त्रनिर्मिति केली पाहिजे. २) भारतीय सीमाचा सकुचित विचार न करता जगाच्या आणि आशियाच्या राजकीय सदर्भात सरक्षणाचा विचार केला गेला पाहिजे ३) विज्ञान झपाट्याने बदलत असल्यामुळे सैन्याचे आधुनिकीकरण करणे ही अग्रक्रमाची गोष्ट झालेली आहे. ४) लाब पल्ल्याची मारगिरी करण्याची ताकद वाढविण्याकरिता क्षेपणास्त्रनिर्मिति आणि चाचणी क्षेत्र आवश्यक आहे इतकेच नव्हे तर, बोफोर्सच्या हॉवेत्झरसारख्या तोफा राजकीय चर्चेचा विषय न करता विकत घेतल्या गेल्या पाहिजेत. ५) आपली हवाई दलातील क्षमता वाढविण्याबरोबरच नवीन बनावटीची शक्तिशाली विमाने खरेदी करीत राहिले पाहिजे ६) नौदलाची ताकद टिकविण्यासाठी पाणबुड्याची तातडीने बाधणी करणे किंवा त्या विकत घेणे आवश्यक आहे. अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी ही आवश्यक मानली गेली पाहिजे ७) जो प्रत्यक्ष मदत करतो तो मित्र मानून रशिया-भारत सबधांचा विचार केला गेला पाहिजे ८) भारतीय भागाचा चावा घेऊन बळकावण्याचा चीनचा आणि पाकिस्तानचा हेतु आहे हे ध्यानात ठेवून त्या सीमा सदैव जागत्या ठेवल्या पाहिजेत ९) संरक्षणविषयक आणि परराष्ट्रविषयक धोरण यात स्थैर्य आणण्याकरिता वारवार होणारी या खात्याच्या मत्र्याची आणि सचिवाची बदलाबदली टाळायला हवी १०) युद्धसज्जता आणि शस्त्रास्त्रखरेदी या विषयाची गुप्तता राखणे आवश्यक आहे. लोकसभेची सर्वपक्षीय समिति नेमून, त्याना विश्वासात घेऊन शस्त्रखरेदीबाबत चर्चा करता येईल पण भारताची लष्करी खरेदी या जागतिक चर्चेचा विषय होऊ नये ११) आपल्या अण्वस्त्राच्या बळावर चीन वाटाघाटी जिंकू पाहात आहे ते टाळायचे असेल आणि चीनला भारतात पाऊल ठेवू द्यायचे नसेल, गमावलेला प्रदेश परत मिळवायचा असेल तर भारताची अण्वस्त्रशक्ति स्पष्टपणाने दिसल्याशिवाय हे घडणार नाही आणि म्हणून अणुनिर्मितीवाचून भारताला दुसरा पर्याय नाही

REFBK-0026392

(केसरी)

❀ ❀ ❀

ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३९
३६३९२
२२।४।०९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

| | |
|---|---|
| 4 SEP 1991 | 24 JUL 1993 |
| 18 SEP 1991 | 20 NOV 1993 |
| 21 SEP 1991 | 11 DEC 1993 |
| 25 APR 1992 | |
| 14 JUL 1993 | |
| 17 JUL 1993 | |

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९